विषय निबंध
सं. नं. १०७

REFBK-0005004

आचार्य कालेलकर

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ५७७ ४०८
ता. २५।१३८
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र. ५१८०
ठाणे.

॥ श्री ॥

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें.

ग्रंथ सहावा

# हिंडलग्याचा प्रसाद

लेखक : दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

REFBK-0005004

ज्येष्ठ १८५६

किंमत ९ आणे

[ कायम ग्राहकांस ८ आणे ]

प्रकाशक : गोविंद वामन कुलकर्णी,
किकाभाई मोतीवाले यांचा बाग,
४७१ सदाशिव पेठ, पुणें २.

[ पहिली आवृत्ति ]

मुद्रक : ल. ना. चापेकर,
'आर्यसंस्कृति मुद्रणालय'
चिमणबाग, टिळकरस्ता, १९८।१७ पुणें २.

## सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला

# प्रसिद्ध झालेले ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधींचें आत्मचरित्र भाग १ ला | १—०—० |
| २ | ” ” ” भाग २ रा | १—०—० |
| ३ | खादीमीमांसा | ०—१२—० |
| ४ | स्वराज्यशिष्टाई | ०—६—० |
| ५ | संयम कीं स्वैराचार | ०—८—० |
| ६ | हिंडलग्याचा प्रसाद | ०—९—० |

# प्रसिद्ध होणारे ग्रंथ

१ प्रगमनशील हिंदु जीवन — ( प्रो. राधाकृष्णन्‌कृत The Hindu View of Life)

२ उपनिषदांतील गोष्टी :— लेखक—शंकरराव देव.

३ कम्युनिझमचें तत्त्वज्ञान
४ लोकसत्ता व लोकस्वातंत्र्य
} लेखक—आचार्य जावडेकर.

## विज्ञापना

मालेचे कायम–ग्राहक होणारांस मालेतर्फे प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतींत मिळतील. एक रुपाया प्रवेश-फी भरून मालेचे कायम ग्राहक होतां येते.

# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | १३ | पुरुषाविरू | पुरुषाविरुद्ध |
| २२ | २६ | अडूज | अँडूज |
| २७ | १३ | चें | हातचें |
| २९ | २१ | ता | तो |
| ५७ | ११ | केहां | केव्हां |
| ८० | १ | unite | unite to |
| ९१ | १५ | दरबार | कारभार |
| १०३ | १७ | म्हणत | म्हणता |
| १०६ | १४ | दुधाच्य | दुधाच्या |
| ११९ | १७ | (Constitution) | 'Constitution' |
| १२२ | ५ | कनिष्टकांति | हीनत्त्वभाव |
| १२३ | ५ | हस्तकौशल्य | हस्तकौशल्यांत |
| १४० | १२ | त्या | त्याचा |
| १४१ | १ | खडयांत | खड्डयांत |
| २४३ | ९ | ानी | ज्ञानी |
| २४३ | १४ | प्रभय | प्रभव |
| २५५ | १३ | ( Royalty ) | ' Royalty ' |
| २६७ | ९ | नुष्यजाति | मनुष्यजाति |
| २६७ | १८ | नेच्या | साधनेच्या |

## खेडेगांव कशाला म्हणावें ?

( अ ) ज्या गांवाची जनसंख्या पांच हजारांपेक्षां कमी असेल तें खेडेगांव असें समजावें.

( आ ) ज्या गांवचे लोक स्वतःच्या सामान्य वापरासाठीं लागणारा माल खरीदण्याकरितां परगांवीं जात असतात, तें खेडेगांव असें समजावें.

( इ ) ज्या गांवांतील अधिकांश लोकांचा शेतीशीं प्रत्यक्ष आणि नेहमींचा संबंध असतो तें खेडेगांव समजावें.

# परिचय

'हिंडलग्याचा प्रसाद' हें पुस्तक महाराष्ट्राच्या हातीं जात आहे हें पाहून मला अत्यंत समाधान वाटतें. विशेषतः खेड्यांतील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांविषयीं चर्चा व ठाम निर्णय या पुस्तकांत माझे विद्वान मित्र काकासाहेब कालेलकर यांनीं केलेले आहेत. खेड्यांतील पुनरुद्धारावरच यापुढें सर्व चळवळी व राष्ट्राचें जीवन सर्वस्वी अवलंबून राहणार आहे हें जाणून या पुस्तकांतील विषयांची निवड व ऊहापोह झाला आहे.

गेल्या पन्नास वर्षांमधील आपल्या देशांतील राष्ट्रीय प्रवृत्तींकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास त्यांत आपल्याला यावें तितकें यश अद्यापि आलेलें नाहीं असेंच दिसून येईल. केवळ मोठमोठ्या शहरांतून या सर्व प्रवृत्ती जोरानें चालविल्यास व शहरांतील लोकांमध्यें जागृति उत्पन्न केल्यास आपलें ध्येय आपल्याला गाटतां येईल असें बहुतेक जबाबदार लोकांना वाटत होतें. आणि अर्थात् त्यामुळें आपल्या देशांतील खेड्यापाड्यांकडे आम्हीं पाठच फिरविलेली होती. परंतु आमच्या प्रवृत्तींना पुरेसें यश न येण्यास मुख्यतः हा खेड्यापाड्यांविषयींचा आमचा अक्षम्य उदासीनपणाच कारणीभूत आहे असें जेव्हां नजरेस आलें, तेव्हांपासून या प्रश्नाकडे सर्वांचेंच लक्ष कमीअधिक प्रमाणानें जाऊं लागलें आहे. आपल्या सर्व चळवळी आपल्या मातृभाषेंत साध्या व सोप्या शब्दांत चालवून लोकमान्यांनीं 'स्वराज्य हें वास्तविक गोरगरीबांकरितां व खेड्यापाड्यांतील लोकांकरितां आहे,' या शिकवणीचा उपक्रम केला. आणि त्याच शिकवणीला अधिक विस्तृत व अधिक उत्कट स्वरूप देऊन महात्माजींनीं देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत, देशाच्या अगदीं कानाकोपऱ्यांतीलहि हजारों तरुणांच्या मनांत या पवित्र कार्या-

करितां आपलें सबंध आयुष्य समर्पण करण्याची बुद्धि, स्फूर्ति आणि धैर्य उत्पन्न केलें. एवढेंच नव्हे, तर एकदां, दोनदां, तीनदां, अनेकवेळां आसेतुहिमाचल दौरे काढून ते या दिशेनें कार्य करणाऱ्यांना सल्ला, प्रोत्साहन आणि प्रत्यक्ष मदतहि देत आले आहेत. अलीकडे अनेक विचारी व कळकळीच्या लोकांनीं या दिशेनें विचार केलेला आहे, पुस्तकें लिहिलेलीं आहेत, खेडेगांवांची पाहणी केलेली आहे आणि कित्येक ठिकाणीं प्रत्यक्ष प्रयोगहि करून पाहिले गेले व जात आहेत. अशा रीतीनें भिन्नभिन्न लोकांचे भिन्नभिन्न अनुभव व मतें जनतेपुढें आलेलीं आहे. त्यामुळें प्रारंभीं प्रारंभीं आस्थेवाईक तरुण कार्यकर्त्यांना थोडेंसें गोंधळून गेल्यासारखें होण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत काकासाहेबांच्या या पुस्तकाचा उपयोग विशेष आहे असें माझें मत आहे. बाहेरील अनेक कार्यांच्या व प्रवृत्तींच्या धांदलीमधून मुक्त होऊन हिंडलगा तुरुंगामध्यें कांहीं महिने विश्रांति लाभतांच काकासाहेबांनीं आपला कांहीं वेळ या प्रश्नांचा विचार करण्यांत घालविला, यावरून मीं वर नमूद केल्याप्रमाणें विचारी देशसेवकांचें लक्ष या प्रश्नाचा उलगडा करण्याकडे कसें उत्कटतेनें लागून राहिलें आहे हेंच निदर्शनास येतें.

श्री काकासाहेब कालेलकर यांची माहिती वर्तमानपत्रांवरून महाराष्ट्राला बरीच असली तरी त्यांच्या विचारांची, विचार करण्याच्या पद्धतीची, खोल दृष्टीची आणि तत्त्वनिष्ठेची ओळख महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांना पुरेशी नाहीं. ही ओळख त्यांना व्हावी अशी माझी फार इच्छा आहे, आणि ती करून देण्यास या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल असें मला वाटतें. काकासाहेब हे महात्माजींच्या अत्यंत विश्वासातले आहेत. आज पंधरा सोळा वर्षें ते महात्माजींच्या सहवासांत रहात असून महात्माजींच्या अनेक राष्ट्रव्यापी प्रवृत्तींमध्यें ते प्रमुख्यानें

व एक जबाबदार कार्यकर्ते या नात्यानें भाग घेत असतात. ते गुजरात विद्यापीठाचे आचार्य होते. महात्माजींच्या ‘ नवजीवन ’ पत्रामध्यें ते नेहमीं लिहीत असत एवढेंच नव्हे, तर त्या पत्राचे ते संपादकहि होते. अनेक राष्ट्रीय आंदोलनांमध्यें त्यांना अनेक वेळां कारागृहवासहि भोगावा लागला आहे; आणि अमुक अमुक प्रसंगीं महात्माजींनीं अमुक विषयावर काय अभिप्राय दिला असता, अथवा तो तसा कां दिला असता हें अचूक सांगूं शकणाऱ्या कांहीं थोड्या लोकांमध्यें काकासाहेबांची गणना प्रामुख्यानें केली जाते, इतकीच त्यांची माहिती महाराष्ट्राला आहे. काकासाहेबांच्या जीवनांतील स्थित्यंतरांचा अथवा त्यांच्या आजपर्यंतच्या अनेकविध कार्यांचा इतिहास बोधप्रद व स्फूर्तिदायक असला तरी येथें तो सांगत बसण्याचें कारण नाहीं. पण, गेल्या पंधरा वर्षांमध्यें गुजरात प्रांतामध्यें जें नवचैतन्य व नवजीवन उत्पन्न झालें आहे, राजकारणाचें व समाजकारणाचें शुद्धीकरण होऊन त्यांतील उत्कटता जी वृद्धिंगत झाली आहे, आणि या गोष्टी घडवून आणण्यामध्यें काकासाहेबांनीं प्रामुख्यानें भाग घेऊन जे परिश्रम केले आहेत, यांचा विचार माझ्या मनांत ज्या ज्या वेळीं येतो त्या त्या वेळीं महाराष्ट्राचा व काकासाहेबांचा परिचय व सहवास खूप वाढला पाहिजे असें मला मनःपूर्वक वाटतें.

हें पुस्तक या कामीं बरेंच उपयोगी होईल असा मला भरंवसा वाटतो. काकासाहेबांनीं ‘ अनुबंधा’मध्यें म्हटल्याप्रमाणें ही लेखमाला अपूर्णच आहे. परंतु ती पुरेशी दिशासूचक आहे यांत शंका नाहीं. खेड्यांतील कार्याची स्पष्ट कल्पना आणि दृष्टि या पुस्तकापासून मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. काकासाहेबांची भाषा पाल्हाळिक नसून तात्त्विक व सोपी असते. शब्द वेंचून, तोलून आणि अर्थपूर्ण असे वापरलेले असतात. अगदीं सामान्य वाचकालाहि एकाद्या विषयाच्या बुडाशीं

नेऊन जबाबदारीनें विचार करावयास लावण्याचें सामर्थ्य काकासाहेबांच्या लेखणीमध्यें आहे, हा माझा आज बरेच वर्षांचा अनुभव खरा असल्याची प्रतीति या पुस्तकाच्या वाचनानें कोणासहि येईल. या पुस्कतांतील 'शिक्षणाचा प्रश्न', 'धर्मसंस्करण', 'स्त्रीशिक्षण', 'पंचायत व लवाद', 'जातीजातींतील संबंध', 'अस्पृश्यतानिवारण', 'सामाजिक रिवाज, वगैरे ग्रामसेवाविषयक प्रकरणें आणि 'गोरक्षा', 'ॐनमो नारायणाय पुरुषोत्तमाय', 'सप्तवर्ण्य', 'पारलौकिक जीवन', 'हिंदूधर्मांतील अवतारवाद' इत्यादि धार्मिक प्रकरणें यांवरून मी म्हणतों त्याची सत्यता वाचकांच्या निदर्शनास येणार आहे.

गुजराती भाषेमध्यें काकासाहेबांचें लिखाण आज बरेच विपुल आणि प्रसिद्ध आहे. गुजराती जनतेकडून त्याचा किती आदर होत असतो हें मी जाणत असल्यामुळें, त्यांच्या लेखांचें व पुस्तकांचें भाषांतर मराठीमध्यें व्हावें अशी आग्रहाची सूचनाहि जातां जातां दिल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं.

अहमदनगर, गांधी जयंति,
भाद्रपद व. १२,
शके १८५५.

गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

# अनुबंध

सात दिवसांच्या उपवासानंतर मला सूत कांतण्याची परवानगी मिळाली, आणि त्याबरोबर अकल्पित रीतीनें माझे मित्र पुंडलीकजी यांचा सहवासहि मिळाला. आम्हां दोघांच्या निष्ठेचा विषय एकच असल्यानें एकत्र सहवासाचे पांच महिने आम्हीं एकत्र वाचन व चिंतन यांत घालविले. महाभारत, गीता, गांधीजींचें जीवनकार्य, राष्ट्राच्या अभ्युदयामध्यें आजकालच्या आश्रमांची सेवा, वगैरे किती तरी गोष्टी आमच्या चिंतनाचे व चर्चेचे विषय होऊन बसल्या होत्या.

हिंडलग्यांत जें चिंतन झालें, त्यापैकीं खेडेंगांवांतील कांहीं प्रश्न, आश्रमगत शिक्षणाची पद्धति, परलोकाविषयींच्या कल्पना, वर्णव्यवस्थेचा पुनरुद्धार, गीताचर्चा, आजची उपासना वगैरे कित्येक विषयांवर सुचलेले विचार लिहून काढण्यास पुंडलीकजींनीं मदत केली. यांतील कोणचेंहि विवेचन संपूर्ण नाहीं; तरी जें आहे तें पुरेंसें दिशासूचक आहे या आशेनें, व या अपूर्ण जीवनांत प्रस्तुत लेखमाला पूर्ण होण्याचा संभव कमी या भीतीनें, ही माला आहे तशीच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. पुंडलीकजींची मदत नसती तर यांतील एक अक्षरहि लिहून झालें नसतें. यासाठीं ही लेखमाला महाराष्ट्रांतील समाजहितचिंतकांना व तरुण ग्रामसेवकांना अर्पण करण्याचें काम खरोखर माझ्यापेक्षां त्यांनींच करणें योग्य होईल.

आपल्या सामाजिक जीवनामध्यें आणि सामाजिक–धार्मिक विचारांमध्यें आतां झपाट्यानें परिवर्तन होऊं लागलें आहे. नदीचा प्रवाह मंद असला म्हणजे त्यांत शेवाळ उगवतें; तोच प्रवाह जोरानें वाहूं लागला म्हणजे पाणी आपोआप स्वच्छ होतें. सामाजिक जीवनाचें असेंच

आहे. पण दोन्ही बाजूंच्या कांठांच्या मर्यादेंत पाणी वाहतें म्हणूनच पाण्याचा ओघ टिकतो. सामाजिक जीवन सत्य आणि अहिंसेच्या मर्यादेंत स्वतंत्रपणें वाहूं लागलें म्हणजे तेंहि शुद्ध, वेगवान, अमोघवीर्य आणि कल्याणकारी होईल.

येथें जी धर्मविचारणा करण्यांत आली आहे ती आपल्या धार्मिक परिपाठास धरूनच आहे, असा आमचा विश्वास आहे व याच आस्थेनें ती विचारून पहावी अशी विनंति आहे.

दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर

# अनुक्रमणिका


१ खेडेगांव कशाला म्हणावें ... १
२ परिचय ... ... ... ३
३ अनुबंध ... ... ... ७


## भाग पहिला

### लोकजीवन


४ धर्मसंस्करण ... ... ... १
५ खेड्यांमधील पक्षापक्षी ... ... १०
६ पंचायत अथवा लवाद ... ... १३
७ सत्तेचें स्वरूप ... ... १८
८ जातीजातींतील संबंध ... ... २०
९ अस्पृश्यतानिवारण ... ... ३२
१० सामाजिक रिवाज ... ... ३९
११ वर्णव्यवस्था ... ... ४८
१२ सप्तवर्ण्य ... ... ... ५५
१३ जातिधर्म व कुलधर्म ... ... ७८
१४ सावकार ... ... ... ८३
१५ कर्ज ... ... ... ८८
१६ कोर्टबाजी ... ... ... ९६
१७ व्यसनें ... ... ... १०१
१८ उघळपट्टी ... ... ... १०६
१९ दारिद्र्य ... ... ... ... १०९

२० मजूरवर्ग आणि बेकारी ... ११४
२१ ग्रामव्यवस्था ... ... ११९
२२ ओनामा ... ... ... १२०
२३ खेडेगांवांमधील शिक्षणाचा प्रश्न ... १२५
२४ साहित्योपासना ... ... १३३
२५ शरीरसंवर्धन ... ... १३६
२६ आरोग्य ... ... ... १४०
२७ स्त्रीशिक्षण ... ... ... १४३
२८ औद्योगिक शिक्षण ... ... १६७
२९ ग्रामवृद्ध आणि अधिकारन्यास ... १७३
३० फंड ... ... ... १७८
३१ स्वदेशी नवविचार ... ... १८१
३२ आश्रमांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम १८४
३३ दोन प्रश्न ... ... ... २१३
३४ खेडेगांवच्या पुनरुज्जीवनाचे प्रश्न ... २१५
३५ दोन कार्यक्रमांची तुलना ... २२४

## भाग दुसरा

### धर्मविचार

३६ महाभारताचा आस्वाद ... ... २२९
३७ प्रकीर्ण ... ... ... २४०
३८ मरणोत्तर जीवन व सांपराय यांचें टिप्पण २४७
३९ पारलौकिक जीवनाची स्पष्ट कल्पना ... २४९
४० हिन्दुधर्मांतील अवतारवाद ... २५७
४१ ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय ... २६७
४२ गोरक्षा ... ... ... २७०

भाग पहिला

# लो क जी व न

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. निबंध
ता.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

# हृदयस्थाचा प्रसाद

५००४

## धर्मसंस्करण

१

मानवी जीवनाचा साकल्यानें विचार करणारा जर कोणी असेल तर तो धर्म आहे. जीवनाचें स्थायी अथवा अस्थायी असें एकहि अंग नाहीं कीं ज्याचा धर्माला विचार कर्तव्य नाहीं.

म्हणून धर्म हा मनुष्याच्या सनातन जीवनाइतकाच अथवा त्याहून अधिक व्यापक असला पाहिजे. आणि अशेष जीवन हें त्याचें क्षेत्र असल्यानें तो अत्यंत उत्कटपणें आणि परमार्थतया जिवंत असला पाहिजे.

आज जगामध्यें जे प्रख्यात धर्म आहेत ते सर्व बऱ्याच अंशानें असे व्यापक आहेत. स्थापनाकाळीं तर ते जिवंत होतेच. पण वेळोवेळीं धार्मिक पुरुषांनीं धर्माचा जिवंतपणा पुनः पुनः साधलेला आहे. शेगडींतील विस्तव जसा स्वभावें करून पुनः पुनः मंद होतो आणि म्हणून त्याला वारंवार कोळसे पुरवून आणि वेळोवेळीं फुंकर घालून त्याचें संस्करण करावें लागतें, त्याला जागृत ठेवावें लागतें; त्याचप्रमाणें धर्मतेज समाजांत जागृत ठेविण्यासाठीं धर्मपरायण समाजपुरुषांना पोषण आणि फुंकर घालण्याचें काम करावें लागतें. हें काम जर वेळोवेळीं न झालें तर धर्मजीवन क्षीण व विकृत होतें; आणि धर्माचें क्षीण व विकृत स्वरूप अधर्माइतकेंच बाधक असतें. धर्मतेज जिवंत व प्रज्वलित राखण्याचें काम धर्मैकपरायण व्यक्तींच्या

ह्यातूनच होत असतें. ही शक्ति धर्मग्रंथांमध्यें नाहीं, धार्मिक रिवाज किंवा संस्कारांमध्यें नाहीं, धार्मिक संस्थांमध्यें नाहीं आणि धर्माला टेका देणाऱ्या राज्यव्यवस्थेंतहि नाहीं. शास्त्रग्रंथ, संस्कार, रिवाज आणि त्याचप्रमाणें धार्मिक व राजकीय संस्था यांचा धार्मिक जीवनाला कमी अधिक प्रमाणानें उपयोग आहे. धार्मिक वातावरण स्थिर करण्याच्या कामीं यांची सेवा बहुमोल आहे. पण मूळ शक्ति धर्मप्राण अशा ऋषींची व संतांची आणि महात्म्यांचीच होय. धर्माचा अंतिम आधार मनुष्यहृदय आहे. 'धर्मशास्त्रं महर्षीणां अंतः-करणसंभृतम्' असें जें उपनिषदांत म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे.

धर्मजिज्ञासा आणि धर्माचार हा मनुष्याचा स्वभावच आहे व म्हणून सर्वकाळीं व सर्वदेशीं उन्नतीच्या पायरीप्रमाणें मनुष्यहृद-यांत धर्माचा आविर्भाव झालाच आहे. हा हृदयधर्म कितीहि कलु-षित असला, मलिन असला तरी मूळ वस्तु शुद्ध आहे. अशुद्ध सोनें म्हणजे कांहीं पितळ नव्हे आणि पितळ कितीहि शुद्ध, लखलखीत आणि घाटीव असलें तरी त्याला सोनें म्हणतां येत नाहीं. केवळ बुद्धीच्या जोरावर जमवलेला, लोकांमधील रागद्वेषांचा फायदा घेऊन चालू केलेला आणि थोड्या अथवा अधिक सामर्थ्यशाली लोकांच्या स्वार्थाला पोषण देणारा धर्म तो धर्म नव्हे. असंस्कारी हृदयांतील क्षुद्र वासना आणि दंभामुळें उत्पन्न होणारी विकृति यांवर झांकण घालणारा शिष्टाचार आणि चातुर्याच्या तर्कानें केलेला त्याचा बचाव हाहि धर्म नव्हे. अज्ञान म्हणजे अल्पज्ञान, भोळसटपणा आणि अंध-श्रद्धा यामुळें कलुषित झालेला धर्म अधर्माच्या कोटीला पोहोंचला असला तरी ती वस्तु निराळी; आणि मुळांतच जो धर्म नव्हे पण केवळ शिताफीनें धर्माचें रूप धारण करणारी वस्तु ती निराळी. मानवी इतिहासांत वरील दोन्ही प्रकार मुबलकपणानें सांपडण्या-इतका मनुष्यसमाज परिणत झाला आहे; पण या दोन्ही वस्तूंचें पृथ-

करण करून त्यांचें यथार्थ स्वरूप ओळखण्याची तसदी मनुष्यानें अजून घेतली नाहीं.

हृदयधर्म जेव्हां बुद्धिप्रधान लोकांत आपलें कार्य करूं लागतो, शिष्टमान्य होतो आणि त्यामुळें जेव्हां धर्माचें संस्थीभवन होतें, तेव्हां शास्त्रें निर्माण होतात; शास्त्राचा अर्थ लावणारी मीमांसा उत्पन्न होते; आणि अंतिम निर्णय देणारा शास्त्रज्ञांचा वर्ग तयार होतो, अथवा अधिकारारूढ व्यक्ति स्वीकारण्यांत येते.

धर्माचें शास्त्रग्रथन आणि संस्थीभवन हें व्यवहारज्ञ आणि बुद्धि-प्रधान अशा लोकांकडून होत असल्यानें त्यायोगें धर्माची स्वाभा-विक भविष्योन्मुख दृष्टि क्षीण होते आणि तीवर भूतकालाचींच पुटें जडतात. भूतकालांमध्यें अग्नीपेक्षां राख अधिक असल्यानें धर्मतेज गुदमरून जातें हें निराळें सांगावयास नको. आणि म्हणूनच दरेक धर्माला संस्करणाची आवश्यकता असते.

तुकारामबोवा बाजारांत जाऊं लागले म्हणजे गांवच्या अनेक लोकांनीं त्यांच्या सज्जनतेचा फायदा घेण्यासाठीं आपापली तेलाची नळकांडीं तेल आणण्यासाठीं त्यांच्याकडे सोपवावीं, व त्यांनींहि संतो-षानें अशा नळकांड्यांची वजनदार माळ गळ्यांत घालून सांगित-लेलें काम नियमित करावें. जनस्वभाव हा असाच आहे. मुलें अथवा लोक एखाद्याचें मुकाट्यानें ऐकतात असें पाहिलें कीं, त्याच्या मार्फतच मन वळवण्याचें काम करून घेण्यास ऐतोबांचा जनसमाज प्रवृत्त होतो. एखादें जहाज नियमितपणें आणि वेगानें इष्ट मुक्कामीं जात असलें तर त्याचा वेग क्षीण होई तोंपर्यंत आणि तें बुडण्याची पाळी येई तोंपर्यंत त्यांतच आपला माल भरण्याचा आग्रह लोकां-मध्यें दिसून येतो. धर्माची सार्वभौम शक्ति पाहून दरेक लोभ्यानें आपापल्या लोभाचें कार्य कोणत्याना कोणत्या रूपानें धर्माच्या गळ्यांत बांधलेंच आहे. या कारणामुळें देखील धर्मतेज वारंवार क्षीण होतें.

एखादें चालतें दुकान आपली भरभराट कायम टिकावी आणि वाढावी यासाठीं ज्याप्रमाणें वेळोंवेळीं जुना व कुचकामाचा होऊं पहाणारा माल काढून टाकतें आणि चांगला माल जर पडून पडून बिघडला असेल तर तो उजळून काढतें त्याप्रमाणें धर्मांनीं वेळीं-वेळीं स्वतःचें संस्करण केलें पाहिजे. मात्र हें संस्करण खरें सोनें कोणत्याहि रूपांत पारखण्याची आणि संभाळून ठेवण्याची शक्ति ज्यांच्यामध्यें आहे अशा कुशल, धर्मज्ञ समाजसेवकांच्या हातूनच झालें पाहिजे. जगांत माजलेल्या बऱ्याचशा नास्तिकतेचें कारण धर्म-संस्करणाचा अभाव हेंच होय.

२

कोणताहि समाज म्हातारा किंवा क्षीणवीर्य होतो त्याचीं कारणें दोन : विलासिता आणि धर्मजडता.

समाज विलासी झाला म्हणजे असलेली साधनसंपत्ति त्याला पुरे-नाशी होते; पुरुषार्थ आपोआप कमी होतो; यांत काय आहे, त्यांत काय आहे, कशांत कांहींच नाहीं, अशा प्रकारचें नैष्कर्म्य व एक प्रकारचा झोपाळूपणा समाजांत येतो. आणि मग नवा नवा अनुभव घेण्याच्या ऐवजीं जुन्या विषयींचा कृत्रिम आदर आणि आग्रह वाढून तो ढाल म्हणून पुढें केला जातो.

दुसऱ्या बाजूनें मनुष्यामध्यें जेव्हां बौद्धिक जागृति मंद पडते, प्रयोगापेक्षां प्रामाण्यावरच भिस्त ठेवण्याची वृत्ति वाढते तेव्हां समा-जांत एक प्रकारचें धर्मजाड्य उत्पन्न होतें. हें धर्मजाड्य दिसण्यांत धर्माभिमानासारखें दिसतें पण वस्तुतः ती एक प्रकारची नास्तिक-ताच असते. अभिमान आणि आग्रह यांच्या मुळाशीं खरा आदर किंवा खरी श्रद्धा असतेच असा अनुभव नाहीं.

आज हिंदुस्थानांत खेडेगावांतील समाजाची असाधारण दुर्दशा

मराठी ग्रंथ संग्रहालय
मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ५१२०

आहे. शहरांतून परदेशी माल व मिनीच्या वस्तू खेडेगांवांत पोहों- चतात. पण उद्योगधंदे खेडेगांवांत पोहोंचत नाहींत. शहरी उद्धटपणा, व्यसनी, असंस्कारिता व इतर समाजविनाशक दुर्गुण खेडेगांवांत झपा- ट्यानें पसरू लागले आहेत. पण शहरांत जी धर्मविचाराची जागृति, राजकीय प्रगति आणि समाजसुधारणा थोडया फार अंशानें दिस- तात, त्यांचें लोण खेडेगांवांत फारच थोडया प्रमाणानें पोहोंचतें. ज्या हिंदू धर्मानें व आर्य तत्त्वज्ञानानें आपण जगाचे डोळे आज दिपवीत आहोंत, तो धर्म व तें तत्त्वज्ञान कोणत्या रूपानें आजच्या खेडयांतील समाजांत नांदत आहे हें पाहिलें असतां ‘ नेदं यदिद- मुपासते ’ असेंच म्हणावें लागेल. खेडेगांवांमध्यें खरीखुरी धर्मनिष्ठा, पवित्र आस्तिकता, व उच्च चारित्र्यसंपत्ति अगदीं परवां परवांपर्यंत होत्या, आजहि त्यांचे अवशेष दिसून येतात; पण अबुद्धि, जडता आणि नास्तिकता यांचें साम्राज्य खेडेगांवांतून सार्वत्रिक होऊं पहात आहे. यामुळें शहराच्या मानानें खेडेगांवच्या समाजांत वार्धक्य अधिक दिसून येतें. खेडेगांवांत अज्ञान आहे, अनारोग्य आहे आणि दारिद्र्य आहे. हीं तीन दूर न केलीं तर खेडेगांवांतील समाज आतां जगणेंच शक्य नाहीं. पण ज्ञान, आरोग्य आणि उद्योग हीं लोकांवर बाहेरून कितपत लादतां येणार ! लादण्याच्या उपायाला स्वाभाविक मर्यादा आहे. या गोष्टी लोकांनीं स्वेच्छेनेंच स्वीकारल्या पाहिजेत. आणि स्वेच्छेनें स्वीकारण्यास समाजाचें वार्धक्य प्रथम गेलें पाहिजे. समाजांत उत्साह व उत्थान हीं आलीं पाहिजेत. धर्म- संस्करणावांचून ही गोष्ट होणें नाहीं. म्हणून इतर सर्व गोष्टींच्या आधीं खेडेगांवांतून धर्मसंस्करणाचा यथायोग्य प्रयत्न झाला पाहिजे.

खेडेगांवांतून जो धर्म मानला जातो त्यामध्यें भीति, लांच, दैव- वाद आणि जादूवजा कर्मकांड हेंच मुख्य असतें. मग तो धर्म हिंदूंमध्यें असो, मुसलमानांत असो अथवा ख्रिस्ती लोकांत असो.

खेडेगावांतील लोकांना स्वतःच्या दुर्बळतेची, अज्ञानाची, भोळसट-पणाची, आणि अनाथ स्थितीची इतकी कांहीं कटु- अनुभवमूलक जाणीव असते कीं स्वभावतः ते शक्तिउपासक होतात- मग ते जैन असोत कीं लिंगायतहि असोत. या अज्ञानमूलक शक्तिपूजेनेंच जादूवर विश्वास बसतो आणि जादूला धर्माची प्रतिष्ठा मिळते. धर्म म्हणजे जबरदस्तांची आराधना अथवा विकत घेतलेली राखण असा अर्थ सामान्य जनतेमध्यें असतो. धर्माच्या योगानें मांगल्यावरील श्रद्धा वाढवावयाची असते; चारित्र्याची तेजस्विता स्वाभाविक करावयाची असते; ऐहिक अनुभवांत पदोपदीं जो विषाद प्राप्त होतो तो दूर करणारें दैवी आश्वासन मिळवावयाचें असतें; आणि जीवनांतर्गत प्रत्येक तत्त्वाचें नवीन दृष्टीनें नवीनच मूल्य करावयाचें असतें. सफळतेची व निष्फळतेची कल्पनाच बदलून या भौतिक जगांत आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवावयाचें असतें.

तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीनें हें दृष्टयंतर फारच अवघड वाटतें. पण हृदय हृदयाशीं बोलूं लागलें म्हणजे उन्नत भूमिकेचें आमंत्रण तेथें सरळ जाऊन पोहोंचतें अथवा भिडतें आणि एकदां हृदयांत परिवर्तन झालें म्हणजे कांहीं केल्या त्यानें माघार घेणें शक्य नसतें. हें आमंत्रण देणाऱ्या व्यक्तीच्या हृदयांत कोणाच्या संबंधानें तुच्छ भाव नसावा. आपलें आमंत्रण अमोघ आहे अशी अमर आस्तिकता असली पाहिजे. आणि मनुष्यमात्राच्या हृदयाविषयीं प्रेम आणि आदर असला पाहिजे.

[ धर्मज्ञान देतां घेतांना ग्रहण करणाऱ्याच्या अधिकाराविषयीं आजवर बेसुमार चर्चा झाली आहे. धर्मज्ञानाचें दान करणाऱ्याच्या अधिकाराचा ऊहापोह करण्याचे दिवस आतां आले आहेत. वर वर्णिलेली आस्तिकता असेल त्यानेंच धर्मबोधाचें व धर्मसंस्करणाचें काम हातीं घ्यावें. ]

धर्मांधतेच्या रूपानें खेडेगांवांतून आज नास्तिकता किती पसरली आहे याची बरोबर कल्पना झाल्यास मनाला आघातच पोहोंचावा.

प्रत्येक धर्मांत मुबलक काव्य सांठविलेलें असतें. खरें पाहूं जातां धर्मज्ञानाचें वाहन युक्ति आणि तर्क नसून काव्यच आहे. आणि म्हणून काव्यविहीन धर्म असूंच शकत नाहीं. पण जेथें समाजांत अज्ञान आणि जडता यांचें साम्राज्य असतें तेथें धार्मिक काव्याचा शब्दार्थ खरा मानला जातो. आणि स्वतःच्या अज्ञानामुळें नाहीं तेथेंहि गूढतेचें व जादूचें आरोपण केलें जातें. या वृत्तीहून धर्म-विघातक दुसरी एकादी वृत्ति असेल कीं काय याविषयीं शंकाच आहे. उलटपक्षीं धर्मवेडानें चिडून गेलेले लोक अशा प्रसंगीं धर्मांत असलेलें काव्य पुसून टाकण्याचा निरर्थक आणि निष्फळ प्रयत्न करितात. खरा उपाय म्हणजे लोकांची बुद्धि तीव्र करून आणि लोकांमधील काव्यरसिकता जाणती करून काव्य वाढविलें पाहिजे. लोकांची काव्यशक्ति वाढविली म्हणजे त्यांना धर्म समजणें सोपें जातें आणि धार्मिक वहीम ( भोळ्या समजुती—superstitions ) सहज ओळखतां येतात.

पण हें सर्व करण्यास जाणत्या लोकांनीं खेडेगांवांतील लोकांच्या श्रमपूत व निसर्गमधुर अशा दैनिक जीवनामध्यें ओतप्रोत झालें पाहिजे. ‘ स्वामी गोसावी ’ होऊन चालावयाचें नाहीं.

कोणताहि समाज युगकल्पनेच्या दृष्टीनें मागें राहून कधींहि निभावयाचा नाहीं. आजचें युग केवळ मानवी समानतेचें नाहीं. स्त्री-पुरुषांची समानता, जातीजातींची समानता आज कबूल केलीच पाहिजे, एवढेंच नव्हे तर सर्व धर्मांना समान दर्जा मिळाला पाहिजे. सर्वच धर्मांविषयीं सारखा अनादर अथवा सारखी अनास्था, अथवा सारखेंच अज्ञान हा एक समानतेचा मार्ग मानला जातो, पण तो घातक आहे. आजच्या युगांत समाजांत राहणाऱ्या प्रत्येक मनुष्यास

जगांतील प्रमुख प्रमुख धर्मांची सामान्य माहिती असली पाहिजे. मात्र ही माहिती देतां घेतांना तार्किक, चिकित्सक अथवा केवळ ऐतिहासिक दृष्टि असतां कामा नये. प्रेम, आदर, आणि सहानुभूति यांसहित डोळस जिज्ञासा-बुद्धीनें सर्व धर्मांचा परिचय झालेला असावा. खेडेगांवांतील धर्मज्ञान बरेंच मागासलेलें असतें; दृष्टि संकुचित असते; आणि जीवनाचा आशय फारसा उन्नत नसतो. अशा वेळीं विशेष प्रेमानें जगांतील निरनिराळ्या धर्मांतील सत्पुरुषांनीं आणि चारित्र्यपरायण संघांनीं चालविलेल्या प्रयत्नांची माहिती करून दिली पाहिजे. मात्र येथें उद्देश धर्मजागृति हा असावा. केवळ बहुश्रुतता हा नसावा.

आजच्या समाजांतील एक महान् दोष म्हणजे वर्ग-विग्रह हा होय. लोकांना ईर्ष्या, द्वेष, मत्सर करावयास एकादी ध्यानमूर्ति हवी असते. स्त्रियांनीं पुरुषांविरू तक्रार करावी, युवानांनीं वृद्धांविरुद्ध, गरीबांनीं संपन्नांविरुद्ध, हिंदूमुसलमानांनीं परस्परांविरुद्ध, गोऱ्या लोकांनीं काळ्या व पिवळ्या लोकांविरुद्ध, सर्वत्र विग्रहाचेंच वातावरण आहे. थोडयाअधिक लोकांचें संघटन करून त्यांचा पुढाकार मिळवावयाचा असल्यास त्या सगळ्यांची द्वेषबुद्धि केंद्रित करून त्यांना एक ध्यानमूर्ति देऊन टाकावी आणि संशयाचें वातावरण उत्पन्न करावें.

हा रोग धर्मामध्यें फार लवकर शिरूं शकतो. या दिशेनें प्रयत्नहि जोरकस चालू आहेत. यांचा परिणाम परस्परहत्या व अंतीं आत्महत्या हाच होणार! आपण ज्या धर्मसंस्करणाचा विचार करीत आहोंत त्यामध्यें वरील रोगांपासून मुक्त रहाण्याची पुरी पुरी खबरदारी घेतली पाहिजे.

वाईट गोष्टी काढून टाकतांना एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं

त्या जागीं चांगल्या सात्विक भरीव गोष्टी उभ्या केल्या पाहिजेत. केवळ शून्य पोकळी ही भयानक आहे.

व्यवहारकुशल लोक म्हणतील कीं हें सर्व विवेचन सुंदर आहे, उद्बोधक आहे, पण येथें योजना अशी मुळींच दिसत नाहीं.

राजसभेंत कायदे करतांना प्रथम कायद्याचा उद्देश मानला जातो व मग कायद्याचीं कलमें येतात. पण व्यवहारांत हातांत कायद्याचीं कलमें आल्यावरोबर हेतु आणि उद्देश गौण होऊन विसरून जातात. समाजाला कलमबंदी योजनेची संवय झाली आहे. पण त्यायोगें जीवन यांत्रिक होतें. भावनेची जागा योजनेनें कशी भरून निघणार ? भावनेचें क्षेत्र शिक्षणानें खुलतें. योजना सरते शेवटीं राज्य-व्यवस्थेचें रूप धारण करते. येथें नमूद केलेलें परिवर्तन कोणत्याहि सत्तेच्या जोरावर व्हावयाचें नसून तें शिक्षणद्वारां आणि प्रत्यक्ष उदाहरणद्वारां हृदयपरिवर्तन केल्यानें व्हावयाचें आहे. यासाठीं सार्वत्रिक योजना करून चालावयाचें नाहीं. भावना शुद्ध, सुरक्षित व जिवंत राहिली तर ती आवश्यकतेनुसार स्वतःची योजना उत्पन्न करील आणि बदलत राहील.

# खेड्यांमधील पक्षापक्षी

मध्वाचार्यांनीं दोन बोटें वर करून जगाला ठासून सांगितलें आहे कीं ' सत्यं भिदा ;' रामदास स्वामींनीं आपल्या लाक्षणिक शैलींत म्हटलें आहे, कीं 'भेद ईश्वर करून गेला। त्याच्या बाचेन न वचे मोडिला।' जगामध्यें मतभेद, दृष्टिभेद, वृत्तिभेद आणि हितभेद हीं असावयाचींच. मारून, भांडून, वादविवाद करून, चर्चा करून, तडजोड करून, पायां पडून किंवा गप्प बसून हे भेद जावयाचे नाहींत. तेव्हां खेडेगांवांतून तरी भेदाचा नाश कसा व्हावा ! खेडेगांवांतील जीवन संकुचित असो, अज्ञानमय असो, कसेंहि असलें तरी तें संपूर्ण जीवन आहे. जिवंत लोकांचा तो समाज आहे. तेथें या सर्व गोष्टी असावयाच्याच. याहून पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं भेद जीवनसमृद्धीला आवश्यक आहे. अगदीं साध्या संगीताला देखील चार पांच स्वर लागतात. उच्च संगीताला बावीस श्रुतींची गरज असते. समाज जसजसा वाढावयाचा तसतशा त्याच्या प्रवृत्ती विविध व्हावयाच्या आणि अनुभवभेदानें, आदर्शभेदानें, त्याचप्रमाणें आस्थाभेदानें, साध्यांत व साधनांत व कार्याच्या पद्धतींत भिन्नमति यावयाचीच. **तेव्हां प्रश्न हा नाहीं कीं मतभेद कसे टाळावेत; पण मतभेदांविषयीं सहिष्णुता आणि आदर राखून एकोपा कसा संभाळावा हा खरा प्रश्न आहे.** घरांत भाकरी एकच असली आणि खाणार आई आणि मुलगा असे दोन असले तर दोघांचे हितसंबंध –स्वार्थ– परस्परविरोधी आहेत यांत शंका नाहीं. पण तेवढयानें त्या दोघांत भांडण उत्पन्न होत नसतें. कारण दोघांमधील समंजसपणा, स्वार्थत्याग आणि प्रेम यांची शक्ति बलवत्तर आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नोंद क्र. ७१८०

वेड्यांमधील सख्याशीं

समाजांतहि भांडणें मिटविण्यासाठीं याच गुणांचा परिपोष केला पाहिजे. विभक्तांमध्यें अविभक्त[illegible] ओळखणें, क्षुद्रवासना[illegible]तील तेथें व्ययभावाचें महत्त्व जाणणें यांतच समाजाचें कल्याण आहे असें गीतेनेंहि सांगितलें आहे. मतभेद कितीहि असले तरी त्यासाठीं माणुसकी सोडण्याचें कारण नाहीं. माणुसकी सोडल्यानें सर्वांचेंच अनहित होतें, कोणाचेंच हित साधत नाहीं, एवढी समज लोकांत उत्पन्न केली पाहिजे; आणि स्वतःचें नाक कापून घेऊनहि दुसऱ्याला अपशकुन करण्याची वृत्ति समाजांत जी बोकाळली आहे ती नाहींशी केली पाहिजे.

हें काम सरकारी न्यायमंदिरांतून होण्याचें नसून समाजाच्या हृदयमंदिरांतच झालें पाहिजे. व्यक्तीव्यक्तींच्या स्वार्थ–इर्ष्या–असूया–मूलक भांडणांपासून तें तहत द्वैत अद्वैताच्या सनातन विवादापर्यंत सर्वत्र माणुसकीचें, सज्जनतेचें लोण पोहोंचविलें पाहिजे.

समाजांतील शिष्ट, प्रतिष्ठित, धर्मनिष्ठ, व कारुण्यवृत्तीच्या लोकांनीं समाजाच्या रहाटींत मन घातलें पाहिजे; व तटस्थपणें सर्वांच्या बऱ्याची दृष्टि राखून सल्लामसलत दिली पाहिजे. या कामासाठीं म्हणून देखील स्वतःची सत्ता, प्रतिष्ठा, यांचा आग्रह त्यांनीं धरतां कामा नये. **जेथें सत्ता आली तेथें प्रेमसंबंध मावळलाच, निदान म्लान तरी झालाच.** वकीली वृत्तीनें हें वातावरण उत्पन्न करतां यावयाचें नाहीं. धर्मनिष्ठा आणि मोठें मन यांतच सामाजिक ऐक्याची आणि सामर्थ्याची किल्ली आहे.

हा निव्वळ धर्मोपदेश आहे, हा व्यवहाराचा मार्ग नव्हे असें कांहीं लोक म्हणतील. पण ‘ व्यवहाराचा मार्ग ’ शेंकडों वर्षें झालीं आपण अजमावून पहात आहोंत. तथापि फळाच्या दृष्टीनें तपासतां मात्र तो व्यवहार्य ठरला नाहीं ! खरा **व्यवहार्य** मार्ग वर सांगितला तोच आहे.

दरेक गांवांत किंवा समाजांत ग्रामकंटक म्हणून असतातच. त्यांचा विरोध केल्यास ते अधिकाधिक बिघडतात आणि साधन साध्याच्या बाबतींत कसलाच विधिनिषेध त्यांनां ठाऊक नसल्यानें आणि सामान्य लोकांत दुष्टता, भोळसटपणा आणि ईर्ष्येला पडून गाढवावर बसण्याची वृत्ति यांचें मिश्रण पुष्कळदां दिसत असल्यानें ग्रामकंटकांची पोळी चांगलीच पिकते. खरा उपाय ग्रामकंटकांच्या युक्त्यांचा विरोध करीत बसणें हा नसून त्यांचें व त्यांच्या पद्धतींचें स्वरूप उघडें करणें हा होय.

# पंचायत अथवा लवाद.

ग्रामसेवेमध्यें सर्वांत कठिण काम लवादाचें आहे. असें म्हणतात कीं, मोक्षसाधनेमध्यें सर्वांत शेवटचा विजय कामविकारावर मिळवावयाचा असतो. काम परिपूर्ण जिंकला म्हणजे मोक्ष जवळ आलाच म्हणून समजावें. त्याचप्रमाणें खऱ्या लवादाचें वातावरण स्थायी आणि समाजव्यापी झालें म्हणजे तेंच स्वराज्य असें म्हणतां येईल. लवाद स्थापन करण्याचें कामीं धीर धरला पाहिजे. उतावळीनें काम नासणें बरें नव्हे.

ज्याप्रमाणें खेडेंगांवीं औषधोपचार करतांनां आपण म्हणतों किंवा म्हटलें पाहिजे कीं, ' आम्ही कांहीं सशास्त्र शिक्षण घेतलेले वैद्य नव्हे; थोडासा अनुभव आहे आणि आमच्या उपायांनीं निदान नुकसान होणार नाहीं अशी खात्री आहे म्हणून थोडें करून पाहतों; दुसरा योग्य मनुष्य मिळाल्यास तिकडे तुम्ही जा. रोग आमच्या आवाक्याबाहेर असेल तर प्रथमच तसें आम्ही सांगूं. प्रतारणा करणार नाहीं.' त्याचप्रमाणें लवादीचें काम हातीं घेतांनां भिऊन चाललें पाहिजे. जेथें ईर्ष्या, द्वेष, अत्यंत लोभ, जुनी अदावत अथवा सर्वनाशाचा प्रसंग असेल तेथें आपण होऊन लवाद उपस्थित करूं नये. लवादीचें काम बहुमतानें कोणी तरी चार पांच पंच नेमून त्यांचे मार्फत होण्याजोगें नसतें. लवाद हा सामाजिक पुरुष असावा लागतो. चारित्र्यानें, निरपेक्ष सेवेनें, धर्मबुद्धीनें अर्थात् सर्वांविषयींच्या कळकळीनें तो 'अल् अमीन' झाला पाहिजे. (सर्वांच्या विश्वासाला पात्र अशा प्रामाणिक मनुष्याला आरबी भाषेंत ' अल् अमीन ' असें म्हणतात.)

लवादाचा विचार करतांनां सर्वांत महत्त्वाची गोष्ट जी प्रथमपासूनच ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, लवाद म्हणजे कोर्टांतील

खर्च आणि कोर्टांतील दिरंगाई टाळून कोर्टांचाच न्याय देण्याची सोपी पद्धति नव्हे. लवादानें फक्त एवढेंच काम केलें आणि कायदा पाहून पुराव्याचा विचार करून कोर्टांच्याच पद्धतीनें कोर्टांत मिळ-णाराच न्याय दिला तरी लवादानें उपयोगी काम केलें असें म्हणतां येईल. वेळ आणि खर्च वाचेल आणि आपण आगाऊ पसंत केलेल्या माणसांच्या हातून न्याय मिळविण्याची व स्वीकारण्याची संवय लोकांना लागेल. पण लवादाचा हा खरा उपयोग नव्हे.

कोर्टांत मिळणारा न्याय कितीहि काटेतोल असला तरी तो माणुसकीचा न्याय नव्हे. शुद्ध सामाजिक न्याय नव्हे. कोर्टांची न्यायदेवता जाणूनबुजून आंधळी होते. विवादी अशा दोन्ही पक्षांमध्यें शेवटीं सलोखा करण्याची दृष्टि कायद्यांत नसते. एका हातांतील तलवारीनें लोकांमधील सहकार, प्रेमसंबंध, घरोबा यांचा वध करून, दुसऱ्या हातांतील तागडीनें मालमत्तेचीं शकलें करून वाटून देण्याचें काम कोर्टांतील न्यायदेवता करीत आली आहे. दोन पक्षांमधील भलेपणाचा नाश झाल्यानंतर यहुदी शायलॉकप्रमाणें मांसाचा रत्तल बरोबर तोलून घेण्याची वृत्ति बळावणारच. आणि त्या वृत्तीला संतुष्ट करण्याची स्वतःची जबाबदारी कोर्टांतील न्यायदेवतेनें 'स्वतःची' मानली आहे. कोर्टें पुष्कळदां अशा न्यायांत माणुसकीच्या दृष्टीनें थोडाफार फेरफार करितात हें खरें; पण तें स्वतःचा मार्ग अथवा धर्म सोडूनच, न्यायाच्या आदर्शाला धरून नव्हे.

असमानता अन्यायमूलक आहे. समानता न्यायमूलक असली तरी हीनवृत्तींतून उत्पन्न झालेली असण्याचा संभव असतो. खरी स्थिति ऐक्याची होय. जेथें हार्दिक ऐक्य असेल तेथें असमानतेला अवकाश नसणार आणि समानतेचा आग्रह नसणार. वरील वाक्यांत एक महान् जीवनतत्त्व ढिल्या भाषेंत मांडलेलें आहे. हेंच तत्त्व योग्य रीतीनें समजून लवादानें वापरावयाचें आहे.

पैसा जोडणें हें जितकें व्यवहारांत महत्त्वाचें आहे, तितकेंच माणसें जोडणें हें अगत्याचें आहे. ही गोष्ट पक्षांध झालेल्या माणसाला पटविण्याची जबाबदारी लवादाकडे आहे. दुष्टवृत्तीच्या अन्यायी मनुष्याचें सबंध जीवन अन्यायी किंवा दुष्ट नसतें. आणि तसें असलें तरी त्याला वांचवून जर त्याला सुधारणें शक्य असलें तर तसें करणें यांत मोठेपणा नसून तें आवश्यक कर्तव्यच आहे.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. त्याचे जीवनसंबंध अनेक लोकांशीं आलेले असतात. अपराध्याला शिक्षा करूं जातां, त्याच्याशीं संबंध असलेल्या निरपराधी आणि दयापात्र अशा कितीतरी लोकांना संकटांत पडावें लागतें. सामाजिक न्यायाला हें कधींहि पसंत पडणार नाहीं. आपण पुष्कळदां म्हणतों कीं, 'दांत आपले व ओठ आपले, दांतांनीं ओठ चावला म्हणून दांत पाडून टाकणें बरोबर होईल काय!' आपण म्हणतों 'एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये.' वासरूं मारण्यांत सुडाची बुद्धि तृप्त होईल; पण एकाच्या ठिकाणीं दोन गोवध होतील. क्रूरतेचा इन्साफ करण्यासाठीं दुसरी क्रूरता केल्यानें अन्यायाची फिटंफाट न होतां ती दुणावते. एकानें शेजाऱ्याचा मुलगा ठार केला म्हणून शेजाऱ्यानें किंवा शेजाऱ्याच्या वतीनें सरकारी कोर्टानें याचा मुलगा ठार केल्यास कोर्टाच्या न्यायालाहि तें पसंत पडणार नाहीं. पण प्रथम खून करणाऱ्यास फांशी दिल्यानें आणि त्याची सर्व मालमत्ता जप्त केल्यानें खुनी मनुष्य कायमचा सुटून जातो आणि त्याचीं अर्भकें माल वधाहून घोर दुर्दशा अनुभवतात. जुनें वचन आहे कीं वृत्तिछेद करणें हें शिरच्छेद करण्याहूनहि अधिक घातकी आहे. एखाद्यानें अन्याय केला असतां त्याच्या हालअपेष्टा करणें आणि त्यांत संतोष मानणें हें समाजाला इष्ट नसून अन्याय पुढें चालू न राहील, जुन्या अन्यायाचे दुष्परिणाम शक्य तितके

कमी होतील आणि लोकांमध्यें प्रेम, सलोखा, सहकार या सामाजिक वृत्तींचा विकास होईल आणि प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुसार निर्भयपणें डोकें वर काढण्यास अवकाश मिळेल असें करणें हा लवादाचा सामाजिक न्याय असतो.

समाजसेवकानें उतावळ करून लवादाचें काम डोक्यावर घेतलें आणि कोर्ट पद्धतीचा न्याय तो देऊं लागला तर त्याच्या निवाड्याचा अम्मल होणें दुरापास्त होईल, त्याच्यासंबंधानें नाहीं नाहीं ते गैरसमज उत्पन्न होतील, ग्रामकंटक त्या परिस्थितीचा फायदा घेतील आणि लवादाचें काम तर विघडेलच पण समाजसेवेचीं त्याचीं अन्य कामेंहि संकटांत येऊन पडतील. जेथील वातावरण अत्यंत कलुषित आहे अशा ठिकाणीं प्रथमपासून लवादांत पडल्यानें समाजसेवकांत देखील पक्षाभिमान उत्पन्न होणें संभवनीय आहे. आणि पक्षापक्षी हा खेडेगांवांतील सर्वोपरी दोष असल्यानें पक्षाभिमानी मनुष्याला खरी ग्रामसेवा करणेंच अशक्य होऊन बसतें. पक्षाभिमानी मनुष्याचें वजन व सामर्थ्य खूपच वाढतात पण त्याच्या हातून सामाजिक कल्याण होत नाहीं. त्याची स्वराज्यवृत्ति तर नष्टच होते.

यापेक्षां समाजसेवकांनीं नम्रपणें आळस, अज्ञान आणि बेकारी हीं दूर करण्याचा आणि सामाजिक रूढी सुधारण्याचा नम्र प्रयत्न करीत रहावें; आणि लोकहृदयांत आर्य वृत्ति प्रतिष्ठित होईल असा कसून प्रयत्न करावा. अशा प्रयत्नामुळें समाजामध्यें जो प्रेमादर उत्पन्न होतो त्याची मात्रा ( प्रमाण ) वाढली म्हणजे मग निवडक लोकांच्या मधील सामान्य विवादांत लवाद म्हणून पडावें आणि तेंहि लोकांचा आग्रह असेल तेथेंच.

लवादाच्या निकालानें दोन्ही किंवा दोहोंपैकीं एकाहि पक्षास संतोष होईलच असें सांगतां येत नाहीं. तो उद्देशहि मनांत बाळगणें

शक्य नाहीं. उभयपक्षांचें कल्याण व्हावें, कोणाचाहि सर्वस्वी घात होऊं नये, आणि तटस्थ अशा समाजाच्या धर्मबुद्धीला संतोष व्हावा, हीच महत्त्वाकांक्षा लवादाची असावी. लवादाच्या कामानें समाजाला संतोष होऊं लागला म्हणजे समाजाची आर्य वृत्ति व्यक्त होऊं लागते, आणि लोक लवादपद्धतीला प्रतिष्ठित करतात. असें झालें म्हणजे दुर्बळ आणि सात्विक लोक लवादाकडे अधिकाधिक धांव घेऊं लागतात. आणि जबरदस्त आणि रजोगुणी लोक लवादाचा विरोध करूं धजत नाहींत. अशी स्थिति आल्यानंतरहि लवादानें रजोगुणी अथवा दुर्जन लोकांचें नाक ठेंचण्याचा हेतु कधींहि मनांत ठेवूं नये. प्रत्येक हृदयांत सात्विकतेचा उदय होईल, समाज हें एक प्रकारचें मोठें व्यापक असें कुटुंब आहे या वृत्तीचें संवर्धन होईल असाच प्रयत्न लवादानें करावयाचा आहे. समाजाला दुर्जनांचें पारिपत्य करणेंच असेल, दुर्जनांना अद्दल घडविणेंच असेल तर समाजानें तें अन्य मार्गानें करून पहावें, लवादामार्फत कधींहि करूं नये.

---

# सत्तेचें स्वरूप

जुनी म्हण आहे: 'राजा बोले दळ हाले, बुड्ढा बोले दाढी हाले.' मनुष्य दुसऱ्याच्या सांगण्यानें कांहीं करण्यास किंवा न करण्यास प्रवृत्त होतो, तें त्याचें सामर्थ्य अथवा आपला स्वतःचा लाभ पाहून. सत्व-हीनाचें कोणीच ऐकत नाहीं. अर्थात् स्वतःला पटून स्वेच्छेनें वागणाऱ्यांचा येथें विचार नाहीं. आज्ञा पालन केली जाते याचें कारण आज्ञेच्या मागें आज्ञाभंग करणारास धाक, जरब, दरारा असतो अथवा आज्ञापालनार्थ कांहीं आमिष दाखविलेलें असतें हें होय. आज्ञेला पाठिंबा म्हणून जी वस्तु ठेविलेली असते तिला इंग्रजींत सँक्शन् असें म्हणतात. बहुजनसमाजासाठीं शरीरदंड, अर्थदंड किंवा प्राणदंड अशाच कांहीं दुसऱ्या दुःखाचें भय अथवा पैशाची, सामाजिक प्रतिष्ठेची लालूच यांचेंच पाठबळ (सँक्शन्) असतें. भय आणि लालूच या दोन्ही हीन वृत्ती आहेत. यांच्या आधारावर लोकांना वश ठेवणें हें उच्च संस्कृतीचें लक्षण नव्हे. कायदा आणि राजसत्ता यांच्याजवळ याहून श्रेष्ठ असें सँक्शन् नसतें. म्हणून मनुष्यहितचिंतकांनीं राजसत्ता ही पशुबलावर उभारलेली आहे असें म्हटलें आहे.

धर्मप्रधान भारतीय संस्कृतीमध्यें मनुष्यजीवन संस्काराच्या आधीन ठेवून धर्मज्ञान, धार्मिक आचार, धर्मश्रद्धा, आणि पारमार्थिक जीवनोद्देश यांचें सामर्थ्य वाढविलें आहे. यामुळें मनुष्य अंतःप्रेरणेनें आर्य वृत्ति धारण करतो; भयानें किंवा लोभानें प्रेरित न होतां वासनांवर विजय मिळवून निर्भय वीराप्रमाणें स्वेच्छेनें शुद्धाचरण करितो. तपस्वी, पवित्र, धर्मशील पुरुष कायक्लेशाला भीत नाहीं, खुशामतीला बधत नाहीं, मोहानें धर्मच्युत होत नाहीं. म्हणून तो राजसत्तेच्या कह्यांत नसतो. अशांची संख्या वाढली आणि सामान्य

जनसमुदाय अशांच्या अनुरोधानें वागण्यांत स्वतःचें कल्याण मानूं लागला म्हणजे जगांत राजसत्तेची आवश्यकता उरणार नाहीं. व्यवस्थेसाठीं म्युनिसिपालिटीसारखें अथवा स्वेच्छा–संघटितसंस्थेसारखें तंत्र चालूं ठेवणें केव्हांहि आवश्यक आहे. पण तें सत्तामूलक नसून सेवामूलक असेल. स्वातंत्र्य मर्यादित करण्याचा तेथें प्रश्नच नसतो.

---

# जातीजातींतील संबंध

लॅओटसी अशा इंग्रजी उच्चारानें ओळखला जाणारा एक चिनी तत्वज्ञ व धर्मज्ञ मध्यचीनमध्यें होऊन गेला. त्याचें वचन म्हणून असें सांगतात कीं, त्याला लोकांमध्यें संतोष अथवा तृप्ति हाच मोठा गुण वाटत होता. रिकामटेकडी जिज्ञासा हा एक मोठा रोगच आहे असें त्याला वाटे. खेडेगांवाविषयींचा त्याचा आदर्श असा कीं, ' खेडेगांवांतील लोकांनीं आपलें गांव सोडून कोठेंहि जाऊं नये. आसपासच्या खेडेगांवांतील वेशीवर असणारीं कुत्रीं भुंकलेलीं या खेडेगांवांत ऐकूं यावींत, पण तें कसलें खेडेगांव आहे हें पाहण्यासाठीं देखील येथून तेथें कोणीं जाऊं नये.' कोलंबसापूर्वीं युरोप आणि अमेरिकेला एकमेकांविषयीं जेवढी माहिती होती त्याहून अधिक माहिती इतक्या जवळच्या दोन खेड्यांमधून नसणें शक्य आहे किंवा कसें याचा विचार न करितां आपण हिंदुस्थानची स्थिति तपासूं. हिंदुस्थानांतील खेडवळ लोक जिज्ञासेसाठीं फारसे प्रख्यात नाहींत. इतर प्रांतांत काय चाललें आहे याची माहिती त्यांना बहुतेक नसतेच. इतर धर्मांचीं तत्त्वें काय, आदर्श काय, याची स्पष्ट माहिती कोणालाच नसते. प्रवाहांत पडलेल्या ओंडक्याप्रमाणें समाज मुकाट्यानें चालत आहे. सामाजिक परिस्थितींत होणाऱ्या स्थित्यंतराची जबाबदारी कोणाचीहि असो, खेडेगांवांतील जनतेची ती खास नव्हे. ' हरि ठेवील तैसें रहावें ' हा जड तत्वाचा वेदांत लोकांना उत्तम पटला आहे. कोणालाही विचारा जबाब एकच मिळावयाचा; ' अहं करोमीति वृथाभिमानः. '

हिंदुस्थानांतील सामाजिक जीवनांत फरक होत नाहींत असें नाहीं; पण ते सर्व फरक परवश अशा जड तत्त्वांत होणारे फरक होत.

पाणी विस्तवानें गरम होतें, वाऱ्यानें थंड होतें; पण त्यांत त्याचा स्वतःचा असा आग्रह नसतो. पाणी कधीं रागानें लाल झालें नाहीं अथवा कधीं तें तो राग विवेकपूर्वक गिळून थंड झालें नाहीं. स्वतःच्या पुरुषार्थानें इरादापूर्वक फेरफार करणें आणि पूर्वी योजून ठेविलेल्या दिशेकडे प्रयाण करणें हा चैतन्याचा गुण आहे. पण वेदान्तानें सांगितलें कीं, मुक्त पुरुषानें 'जडवल्लोक आचरेत्.' आपण मुक्त होण्याच्या पूर्वींच तो बोध स्वीकारला, आणि वत् प्रत्यय अगदींच विसरून गेलों.

हिंदुस्थानांतील-अर्थात् हिंदुस्थानांतील खेडेगांवांतील-जातीजातींचा प्रश्न हा असाच एक जडतेचा प्रश्न होऊन बसला आहे, व तो सबंध जनतेनें सोडवावयाचा आहे. जनता ज्ञानमय, चैतन्यमय आणि यौवनमय झाली म्हणजे तो आपोआप सुटेल. जनता रूढीला चिकटून रहाते. त्यामध्यें समाजाचें स्थैर्य आहे, संतोष समाधान आहे. अमुक माणूस अमुक तऱ्हेनेंच वागेल किंवा न वागेल याची खात्री आहे. रूढीचे असे कितीतरी गुण आहेत. कारण ते सर्व जडाचे गुण आहेत. पुलाचे धोंडे ठेवल्या जागींच असतात, पक्ष्यांप्रमाणें उडून चरावयास जात नाहींत म्हणूनच पुलावर विश्वास ठेवून आपणाला गाडी हांकतां येते. गाडीला भिऊन पूल वाकत नाहीं हाहि कांहीं थोडाथोडका लाभ नाहीं. पण समाजामध्यें केवळ जडाचे स्थैर्यादि गुण असणें यांत उत्कर्ष नाहीं, कृतार्थता नाहीं. थोडासा धूर लावून मधमाशांना पिटाळून ज्याप्रमाणें मध लुटण्याचा धंदा पाश्चात्य लोक अहर्निश करीत असतात, त्याप्रमाणें आपल्या येथील जड समाजाला न कळत त्याच्याकडून वाटेल तें काम करून घेतां येतें; त्याला वाटेल त्या स्थितीप्रत पोहोंचवितां येतें. मधमाशांप्रमाणेंच हा समाज डुजणार नाहीं एवढी काळजी घेतली म्हणजे बस्स.

हिंदुस्थानांत जातीजातींमध्यें वैमनस्य नाहीं, तेढ नाहीं, सापामुंगसांत

हितसंबंध विरुद्ध असल्याकारणानें जसें हाडवैर असतें तसें हाड-वैरहि नाहीं; जर कांहीं असेल तर तें परस्परांविषयींचें गाढ आणि भयानक असें अज्ञान आहे. आणि जेथें अज्ञान नाहीं तेथें विषारी कुज्ञान आहे. वाटेल तसल्या भ्रामक कल्पना एकमेकांनीं एकमेकांविषयीं चालू केल्या आहेत, आणि त्या रूढीच्या जडतेनें जगत आल्या आहेत. ब्राह्मण आणि साप बरोबर, मारवाडी चामडी देईल पण दमडी देणार नाहीं, मुसलमान बडे बेइमान, अशा प्रकारच्या म्हणी या कुज्ञानाच्या द्योतक आहेत. याचा एक पुरावा हा आहे कीं, असल्या बहुतेक सर्व म्हणी निंदामूलकच असतात. हिंदुस्थानांत अशी एकहि जात, धर्म किंवा पंथ नाहीं कीं, ज्याच्याविषयीं अशी एखादी अनुदार वृत्तीची म्हण सांपडणार नाहीं. आणि या म्हणी जबाबदार लोक देखील वापरतांना आढळतात.

जातीजातींचा प्रश्न सोडविण्याचा सर्वांत पहिला आणि महत्त्वाचा मार्ग म्हटला म्हणजे जातींचा एकमेकांविषयीं हा जो अज्ञानमूलक किंवा कुज्ञानमूलक अभिप्राय दृढमूल झाला आहे त्याच्यावर घाव घालाव-याचा. चार मंडळी जमली असतांना ज्या जातीचे लोक हजर नाहींत त्यांची निंदा ही चालावयाचीच. ती येथवर कीं, आयांच्या पोटीं जन्मलेल्या पुरुषांनीं सरसहा सर्व बायकांची यथेच्छ निंदा करावी, आणि 'अनृतं साहसं माया' इत्यादि अधार्मिक वचनें धर्म म्हणून चालू ठेवावींत. कोणीहि कोणाची जातीवरून निंदा केली तर शहाण्यांनीं तात्काळ त्याचा तेथेंच विरोध केला पाहिजे. गैरहजर जातींविषयीं वाटेल तसे अनुदार उद्गार काढणें यांत नामर्दाई आहे, पिशुनता आहे, असंस्कारिता आहे हें समाजाच्या हाडींमासीं खिळलें पाहिजे. परस्पर चांगुलपणाच्या जितक्या खऱ्या गोष्टी उपलब्ध होतील त्या सर्व चलनी नाण्याप्रमाणें समाजांत चालू केल्या पाहिजेत. मि. अॅड्रयूज इंग्रज असूनहि चांगला आहे, डॉ० अन्सारी मुसलमान

असूनहि न्यायनिष्ठ आहेत, अमुक गृहस्थ मारवाडी असूनहि उदार आहे, फलाणा गृहस्थ कोकणस्थ असूनहि खरा साधु आहे, वगैरे वगैरे वचनें आपण ऐकतों यांचा उद्देश मूळ गैरसमज तोडणारा अनुभव आला तरी गैरसमज टिकवावा असाच आहे. कारण, लक्षावधि अपवाद एकाच वेळीं आपल्या समोर येत नसतात. आलेल्या अपवादांची तेव्हांच वासलात लावली म्हणजे खराखुरा अनुभव मृतप्राय होतो आणि दुर्जनतेचा काल्पनिक गैरसमज जगत राहतो.

लोकमानसाच्या या सर्व खुब्या ध्यानांत घेऊन प्रत्येक ज्ञात्यानें जातीजातींविषयींच्या सर्व अनुदार उद्गारांना मूठमाती देण्यासाठीं एक होऊन कमर कसली पाहिजे.

हें काम पॉलिसी म्हणून कधींहि साधावयाचें नाहीं. युरोपमध्यें भौतिकशास्त्रांची आणि औद्योगिक कारखान्यांची अभूतपूर्व प्रगति झाल्यामुळें लोकांना धर्मांवांचून समाज टिकूं शकेल असें वाटूं लागलें. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांतील प्रगतीचे बहुतेक सर्व प्रयत्न मानवी स्वभाव सुधारण्याचे सर्व प्राचीन मार्ग सोडून केवळ बाह्य परिस्थिति सुधारण्याच्या दिशेनेंच झालेले आहेत. सामाजिक रचना बदलावी, कायदे बदलावेत, ते अधिक व्यापक करावेत, सार्वजनिक पैशांतून सुखासमाधानाच्या सोई वाढवाव्यात, शिक्षणद्वारां बहुजनसमाजाच्या डोक्यांतील माहिती वाढवावी आणि निरनिराळ्या रोगांवर निरनिराळीं औषधें तयार करावींत हीच काय ती आजकालची प्रगति. मनुष्यस्वभाव आहे तसाच राहणार, तो बदलणें फारसें शक्य नाहीं आणि शक्य असो वा नसो तो बदलण्याचें फारसें कारणहि नाहीं, अशा प्रकारची वृत्ति गेल्या दोन पिढ्यांनीं दाखविली आहे.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, भांडणें मिटवावयाचीं तीं मन मोठें करण्याच्या उच्च भूमिकेवर जाऊन न मिटवितां, परस्पर स्वार्थांचा मेळ घालून तात्पुरती तडजोड करण्याच्या तत्त्वानेंच तीं

मिटविण्याचे प्रयत्न होतात. यामुळें हीन वृत्ति बळावते. भांडणें चालू ठेविलीं तरच आपणांस कांहीं तरी मिळणार असें बरेच लोकांना वाटूं लागतें; निर्लज्जपणा वाढतो आणि नैतिक आदर्श आपल्या डोळ्यांदेखत नाश पावतात.

धर्माधर्मांचीं आणि जातीजातींचीं भांडणें हिंदुस्थानांत तरी पॉलिसीच्या जोरावर मिटावयाचीं नाहींत. सर्व भांडणांच्या मुळाशीं अज्ञान आणि अनुदारता आहे. एक दोष बौद्धिक आहे आणि दुसरा नैतिक; दोन्ही दूर केले पाहिजेत. भांडणें मिटविण्यासाठीं प्रतिपक्षाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां प्रतिपक्षाला समजण्याचा अधिक प्रयत्न झाला पाहिजे; आणि उदारतेचा उपदेश दरेक पक्षानें स्वकीयांनाच केला पाहिजे. क्षुद्रतेचा आणि अविश्वासाचा खड्डा भरून निघाल्यानंतर परस्पर उदारतेची चढाओढ लागेल, आणि ती कल्याणकारक होईल.

केवळ उच्च स्वार्थाच्या दृष्टीनें पहाणाराला एवढी श्रद्धा आली पाहिजे कीं कोणीहि कोणाचें खरें सामर्थ्य लुटून घेऊं शकत नाहीं. जो उदारतेनें कांहीं देऊं करतो त्याचें सामर्थ्य कमी न होतां वाढतें. आणि दुर्बळाला त्याचप्रमाणें अज्ञान्याला सर्व कांहीं देऊन टाकलें तरी तो आपल्या सामर्थ्याइतकेंच ठेवून घेऊं शकणार अथवा वापरूं शकणार यांत शंका नाहीं. **सामर्थ्य वाढण्यास लोभ आणि हाव न वाढवितां जबाबदारीचें क्षेत्र वाढविलें पाहिजे;** उच्च वातावरणांत वावरलें पाहिजे; आळस आणि विलासिता कमी केल्या पाहिजेत. अखंड उद्योग, डोळ्यांत तेल घालून केलेली काटकसर आणि विशाल हृदय यांतच सर्व प्रकारचें सामर्थ्य आहे.

खेडेगांवांत या बाबतींत शहराइतकें हीन वातावरण नसतें हा एक मोठा लाभ आहे. शेतकऱ्यांमध्यें सहकार विशेष असतो; व्यापाऱ्यांमध्यें चढाओढ विशेष असते; आणि सरकारी नोकरांमध्यें एक-

मेकाचे पाय ओढून हीन स्वार्थ साधण्याचें नीतिबाह्य वर्तन अधिक दिसून येतें. खेडेगांवांतून नोकरीचा प्रश्न फारसा नसतो, व्यापार बेताचाच असतो, आणि मुख्य व्यवसाय शेती व मजूरीचा व गौण व्यवसाय मुमूर्षुदशेला येऊन पोहोंचलेल्या अशा उद्योगधंद्यांचा. अशी स्थिति असल्यानें खेडेगांवांतून जातीजातींच्या भांडणांना फारसा अवकाश नसतो.

पण खेडेगांवांतील जनता जितकी अज्ञान तितकीच विकारवश असते. धर्माच्या नांवानें, जातीच्या नांवानें, कोणत्याहि विकाराच्या नांवानें लोकांच्या मनोविकारांना पेट लावून देणें फारसें कठीण नसतें. तरीहि असला दावानल शहराच्या मानानें खेडेगांवांत कमी पेट घेतो. कारण खेडेगांवांतून जीवनसहकाराचा ओलावा अधिक असल्यानें सर्व जाती व धर्म अधिक ओतप्रोत असतात.

सामान्यपणें भांडणास तोंड लागलें म्हणजे तोंडीस तोंड करतां करतां प्रत्येक बाजूला आपला धर्म दुसऱ्या इतकाच हीन, संकुचित, भांडखोर, आणि आंधळा बनवावा लागतो आणि मग परस्पर उखाळ्या पाखाळ्या काढण्याचें दोघांनाहि सुचतें. दुसऱ्यास काळा ठरविण्यासाठीं त्याच्या तोंडास काजळ फांसण्यापेक्षां आपण आपलें तोंड जर धुऊन पुसून उज्वळ ठेविलें तर दुसरा आपोआप काळा ठरेल, व दुसऱ्यालाहि तोंड धुण्याची आवश्यकता भासूं लागेल. दोन मुलें पाटीवर वर्तुळ काढीत असतां एकाचें वर्तुळ वाकडें आलें, आणि दुसऱ्याचें अगदीं बरोबर आलें तर ज्याचें बिघडलें असेल तो आपलें सुधारण्याचा प्रयत्न करणारच; निदान आपलें वर्तुळ कमी दर्जाचें आहे एवढें तरी तो मनांत समजणारच. आणि त्यानें मनांत समजावें एवढेंच समाधान सर्वांना बस्स असावें. त्याच्याकडून कबुलीजबाब घेण्याचा कधींहि प्रयत्न करूं नये.

जीवनाचे औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, शिक्षण-

विषयक असे विभाग आपण विचाराच्या आणि चर्चेच्या सोयीसाठीं पाडतों. मुळांत जीवन एकरूपच आहे. त्याचे तुकडे पाडून त्याला जिवंत ठेवणें शक्य नाहीं. तुम्हांला काय वाटेल ते औद्योगिक किंवा राजकीय फेरफार करावयाचे असतील ते करा, धर्मांत आणि सामाजिक व्यवस्थेंत हात घालूं नका; असें म्हणणारे कित्येक लोक असतात. जणूं काय, सामाजिक आणि धार्मिक चुका अथवा दोष प्रजाकीय प्रगतीला बाधतच नाहींत! अथवा धर्म आणि समाजव्यवस्था कधीं सदोष असतच नाहींत! खेडेगांवांतून धार्मिक सुधारणा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. खाण्यापिण्याच्या बाबतींत शुचिर्भूतपणा ठेवणें आणि उच्च आदर्शाचा आग्रह ठेवणें हें संस्कारिता आणि सामर्थ्य यांच्या दृष्टीनें आवश्यक आहे. पण आज आपल्या समाजांत जें सोवळ्याओवळ्याचें, खरकट्यानिर्लेपाचें व शिवाशिवीचें बंड बोकाळलें आहे तें प्रजाकीय कल्याणाच्या दृष्टीनें मोडलेंच पाहिजे. कारण त्यांत शुचिर्भूतपणाचें अंग असल्यास तें अत्यंत अल्प आहे; केवळ मोठेपणाची प्रतिष्ठा आणि आढ्यताच त्यांत अधिक आहे. आणि हिंदुस्वभावांत अज्ञानमूलक आग्रहानें प्रत्येक गोष्टीचा अतिरेक करण्याचा दोष प्रथमपासून आहे. खेडेगांवांतून असलीं बंडें मोडण्याचा प्रयत्न खऱ्याखुऱ्या धार्मिक लोकांनींच केला पाहिजे; आणि तो भीतभीत न करितां झपाट्यानें, दृढतेनें आणि लोकांची समजूत घालून केला पाहिजे. हिंदु देवळांच्या व्यवस्थेंत आणि रहाणींत महत्त्वाचा फेरफार केला पाहिजे. पण याविषयींचें स्वतंत्र विवेचन करणेंच अधिक इष्ट होईल.

मनुष्य कोणत्याहि जातीचा अथवा धर्माचा असो तो अत्यंत अमंगळ नसेल अशा वेळीं त्याला शिवावयास कोणताच प्रत्यवाय नसावा. त्याचप्रमाणें जर स्वयंपाक योग्य लोकांच्या हातून शुचिर्भूतपणें झाला असेल आणि तोच पंक्तींत वाढला जात असेल आणि

वाढणारे वाढण्याचे नियम पाळत असतील तर पंक्तीला बसणारे लोक कोणत्या जातीचे अथवा धर्मांचे आहेत याची शहानिशा करण्याचें कांहींच कारण नसावें. दुसऱ्याची ठेव बुडविणारे, खोट्या साक्षी देणारे, व्यभिचार करणारे, नातेवाईकांना देखील दगा देणारे आणि चोरून मारून अभक्ष्यभक्षण व अपेयपान करणारे असे सजातीय लोक आज एका पंक्तीला बसतातच. तेव्हां पंक्तिव्यवहाराच्या नियमांत पवित्र आचरण किंवा सदाचार याचें तत्त्व राखलेलें दिसत नाहीं. सरकारी दरबारांत ज्याप्रमाणें मानाचा उच्चनीच भाव असतो त्याचप्रमाणें सामाजिक जीवनांत दरबारी उच्चनीच भाव उत्पन्न करून प्रपंचाचे नियम रचलेले दिसतात; निदान आज तरी निष्प्राण झालेल्या कलेवराप्रमाणें पंक्तिभेदाचे नियम दुर्गंधी पसरवीत आहेत.

पाण्याचीं भांडीं उष्टीं खरकटीं नसलीं म्हणजे पाणी कोणाच्याहि चें चाललें पाहिजे. यांत जात किंवा धर्म आड येऊं नये. एवढी प्रगति झाली म्हणजे विहिरींचा प्रश्न आपोआप सुटेल. आपली बाटण्याची कल्पना आपण अर्थविहीन नाजूक करून ठेविली आहे. आणि गोऱ्या लोकांच्या मिजासीप्रमाणें ब्राह्मणशाहीचे मिजासखोर नियम आपण आजहि चालवूं पहात आहोंत. आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं मिजासखोरपणा सुटूनहि मिजासखोरीचे नियम मात्र धर्माच्या नांवानें चिकटून राहिले आहेत. आणि ज्यांनीं हे नियम सोडले आहेत त्यांनीं धार्मिक शुद्धीच्या दृष्टीनें तसें केलें असेल तर उत्तम; पण बरेच लोक शहरांत जो कांहींसा धर्मलंडपणा आलेला आहे त्यामुळें केवळ सोयीच्या दृष्टीनेंहि कांहीं इष्ट सुधारणा अनिष्ट रीतीनें घडवून आणीत आहेत.

धार्मिक जीवनाचा अत्यंत आग्रह बाळगणाऱ्या समाजसेवकांनीं ठिकठिकाणीं आश्रम स्थापून तेथील जीवनांत या सुधारणा केल्या पाहिजेत. म्हणजे समाजांत धर्मनिष्ठाहि वाढेल आणि सामाजिक जीव-

नाचें संस्करणहि होईल. असें केल्यावांचून आपला समाज सुदृढ होणार नाहीं. पांढरपेशा हिंदु जातींना आपण इतर जातींचा किती अपमान करतों, किती पाणउतारा करतों, किती हृदयवध करतों, आणि त्यांना किती दूर लोटतों याची कल्पनाच येत नाहीं; व म्हणून त्यांना प्रामाणिकपणें वाटतें कीं, आपण अगदीं निर्दोष असून आपल्या दुरवस्थेचा फायदा घेऊन इतर लोक शिरजोरपणें आपल्यावर हल्ला करीत आहेत.

अशा प्रकारें जीवनशुद्धि केल्यानंतर जातीजातींमधील वैमनस्य दूर करणें कांहीं अंशीं सोपें जाईल. मुख्य भर प्रेमाची उदारता या तत्त्वावरच नेहमीं असली पाहिजे.

रवींद्रनाथ ठाकूर म्हणतात कीं, 'जात हा शब्दच जन्मवाची आहे, आणि जोंवर जातीजातींमध्यें आणि भिन्नधर्मीयांमध्यें देखील मोकळेपणानें लग्नें होणार नाहींत तोंवर जातिवैमनस्याचें घोंगडें भिजतच रहाणार !'

भिन्नधर्मीयांमध्यें विवाह होणें केव्हांहि अनिष्टच. दोघांनांहि धर्माविषयीं सारखीच अनास्था असेल तर त्यांना भिन्नधर्मी म्हणतांच यावयाचें नाहीं. धर्म म्हणजे व्यापकतम अशी जीवनव्यवस्था. ही व्याख्या जर खरी असेल तर भिन्न तत्त्वांवर रचलेल्या जीवनव्यवस्थांमध्यें विवाहासारखा जीवनव्यापी संबंध जुळणार किंवा टिकणार नाहीं आणि कसाबसा टिकलाच तर अशा विवाहाच्या अपत्यांना तो पोषक होणार नाहीं.

असें असलें तरी जर आज समाजांत असला एखादा विवाह झालाच तर समाजानें चिडून न जातां स्वतःचा तात्त्विक निषेध व्यक्त करून स्वस्थ असावें; सामाजिक बहिष्काराच्या भानगडींत पडूंच नये. रोटीव्यवहाराचें धोरण वर लिहिल्याप्रमाणें जर ठेवलें तर

भोजनबहिष्कार ही वस्तूच निघून जाते. लग्नसंबंधाच्या बहिष्काराचा प्रश्न मुलें होऊन लग्नाच्या वयाचीं होतील तेव्हांच उठावयाचा. त्या-वेळचा समाज त्याचें निराकरण करील; आणि तेंहि आईबापांच्या आचारअनाचाराचा विचार करून नव्हे, पण अपत्यांच्या संस्कारितेचा विचार करून.

एकाच धर्मांत भिन्नवर्णीयांमध्यें लग्न होणें फायदेशीर नाहीं; पण याहि बाबतींत बहिष्काराचें शस्त्र उचलूं नये. वर्णव्यवस्था ही रहाणी-करणी—विचारसरणीची समानता आणि उपजीविकेचा धंदा यांसाठीं आहे. विवाहसंबंधांत वर्णांचा विचार करणें प्राप्त होतें खरें; पण तो विचार जबरदस्तीनें लोकांवर न लादतां सामाजिक शिक्षणानेंच तो टिकविला पाहिजे. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य स्वतः वातुळ किंवा पित्तकर आहार स्वतःच्या प्रकृतीचा विचार करून टाळण्याचें ठरवितो, ज्याप्रमाणें रूढ धर्माची आडकाठी नसूनहि श्रीमंत—गरीबांमध्यें विवाह फारसे होत नाहींत, ज्याप्रमाणें केवळ सामाजिक मताच्या जोरावर वृद्ध-बालिकाविवाहाची आणि बहुपत्नीकत्वाची चाल आपण जवळ जवळ नामशेष केली आहे, त्याचप्रमाणें विवाह सवर्णांतच व्हावेत हा नियम देखील सामाजिक समजुतीवरच टिकावा.

पोटजातीच्या विवाहासंबंधानें येथें थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्याप्रमाणें एकाच गोत्रांत विवाह होत नाहींत,भिन्न गोत्रच पहावें लागतें, त्याप्रमाणें विवाह एका पोटजातींत होऊं नयेत. विवाह म्हटला म्हणजे ता दुसऱ्या पोटजातीशींच झाला पाहिजे हा सिद्धांत धर्मनिष्ठ समाजा-ग्रणींनीं लोकांना उत्तम रीतीनें समजावून दिला पाहिजे.

आज हिंदु समाजांत जशा जाती जीवंत आहेत, तसे वर्ण जिवंत नाहींत. तेव्हां वर्ण ठरविणें तो जुना ऐतिहासिक पुरावा शोधीत न बसतां सबंध जातीची हल्लींची रहाणीकरणी व मुख्य व्यवसाय पाहूनच त्यावरून ठरविला पाहिजे. अशा रीतीचा वर्णनिर्णय शहरी समाजांत

कदाचित् कठीण जाईल; परंतु खेडेगांवांत हें काम फार सोपें आहे.

भिन्नवर्णी विवाह अनिष्ट असले तरी ते पापमूलक आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. आईबापांच्या किंवा पालकांच्या संमतीनें उघडपणें निर्मळ संबंध भिन्नवर्णीयांमध्यें झाला तर एक सामाजिक प्रयोग होत आहे असें समजून त्याचा निषेध किंवा प्रचार न करतां निरीक्षणदृष्टीच ठेवावी.

भिन्नधर्मीयांमध्यें आज सलोखा जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. एकमेकांच्या घरीं जाणें व बसणें उठणें, एकमेकांच्या सुखदुःखाच्या वेळीं हजर असणें, मदत करणें, एकमेकांच्या उत्सवांत भाग घेणें, एकमेकांच्या धर्मांचे व सामाजिक रूढीचे सिद्धांत सहानुभूतिपूर्वक समजून घेणें, स्वतःच्या दृष्टीनें जें चांगलें दिसेल त्याचा स्वतःच्या समाजांत स्वीकार करणें हें अखंड चाललें पाहिजे. आज संकुचित संघटनानें आणि परस्पर अविश्वासानें याच्या अगदीं उलट प्रकार सुरू झाला आहे. परस्पर सहिष्णुता आणि धार्मिक रूढींना झेपेल इतका सलोखा या दोन गोष्टी खेडेगांवांतील लोकांच्या हाडींमासीं खिळलेल्या आहेत. पण हल्लीं याचा एकसारखा ध्वंस सुरू झाला आहे. उदारतेवर अविश्वास आणि ‘मुत्सद्देगिरी’ वर अलोट विश्वास हें सामाजिक अधःपाताचें मुख्य लक्षण आहे. समाज विस्कळित करावयास याव्यतिरिक्त दुसरें कांहीं साधन नसलें तरी चालेल.

हा जातीजातींमधील आणि भिन्न समाजांतील घरोबा केवळ पुरुषांचा नसून बायकामुलांतहि दिसून आला पाहिजे.

असा घरोबा प्रथम सुरू करून मगच त्याला अनुरूप असें वातावरण मिळविणें शक्य आहे. पांढरपेशा जातींतील बायकांमध्यें शिवाशिवीचें प्रस्थ अतिशय असे. त्याचा उद्देश अनिष्ट घरोबा टाळण्याचाच असण्याचा संभव बराच आहे. पण आतां ही अनिष्टता राहिली नाहीं. उलट घरोबा नसणें हेंच एक अनिष्ट अथवा अरिष्ट आहे. ही

शिवाशिव प्रथम काढून टाकिली पाहिजे. घरोबा सुरू झाला म्हणजे मग खालच्या जातींतून स्वच्छता, नीटनेटकेपणा, शुचिर्भूतता ही यावयास लागतील. पांढरपेशा राहाणींतील एक गोष्ट सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांनीं घेतली पाहिजे व ती म्हणजे उच्छिष्टसेवन न करणें ही होय. भांडीं, पाणी आणि खाद्यपदार्थ कधींहि उष्टे कोणास देऊं नयेत. वरच्या जाती पुष्कळदां आपलें उष्टें उघडपणें किंवा चोरून खालच्या जातीस देतात आणि म्हणतात कीं, त्यांना चालतें. त्यांना चाललें तरी आपणांस चालतां कामा नये. उष्टें असेल तें पुरूनच टाकलें पाहिजे. जमिनीनें दिलेलें अन्न उष्टें झाल्यावर जमिनींत परत खत म्हणून पोहोंचविलेलेंच बरें.

दुसरा प्रश्न मांसाहाराचा. मांसाहारी जातींनीं अन्नाहारी जातींशीं सलोखा वाढण्यासाठीं कांहीं गोष्टींत जपलें पाहिजे. उभयतांच्या सहभोजनाच्या वेळीं मांसाहार नसावा. भांडीं वगैरे सर्व कांहीं शुद्ध केलेलें असावें व घरच्या मुलांलेकरांना व नोकराचाकरांना सुद्धां या बाबतींत शिक्षण देऊन ठेविलेलें असावें. कांहीं थोर मुसलमान खानदानांमध्यें ही गोष्ट पहावयास मिळते. अशांच्या घरीं जेवण्यांत कांहींच संकोच वाटत नाहीं. युरोपियन मिशनरी कुटुंबांत देखील ही गोष्ट साधणें अशक्य नाहीं. कांहीं ख्रिश्चन कुटुंबांतून ब्राह्मणी पद्धत चांगलीच आंगवळणी पडलेली दिसते; पण याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांनीं अंडीं कोंबडीं किंवा इतर मांस सोडून दिलेलें असतें. अन्नाहारी लोकांसंबंधाचा प्रेमादर व्यक्त करण्यासाठींच त्यांचेबरोबर ते ब्राह्मणी थाट ठेवतात आणि एवढें आपणास बस्स झालें पाहिजे. जर मांसाहार त्याज्य असेल तर त्या तत्त्वाचा प्रचार झाला पाहिजे; पण मांसाहारी लोकांचा त्याग करून हा प्रचार होणें नाहीं. केवळ अन्नाहाराचे आपण कुशल मिशनरी बनलें पाहिजे.

---

# अस्पृश्यतानिवारण.

शहरांतून गाई पाळणें जितकें कठीण आहे तितकेंच सोवळ्या-ओवळ्याचे आणि शिवाशिवीचे जुने नियम पाळणें कठीण आहे. लोकांची रहाणी जसजशी बदलत गेली तसतसे जुने सामाजिक रिवाज मावळत गेले. अस्पृश्यतानिवारणाची चळवळ खेडेगांवापेक्षां शहरांत अधिक झाली असल्याकारणानें वर सांगितलेल्या शहरी वळणाला स्वाभाविक उत्तेजन मिळालें. जेथें जेथें अस्पृश्यता नाहींशी झाली आहे तेथें तेथें ती न्यायाच्या आग्रहानें झाली आहे असें म्हणतां येत नाहीं; तरी अस्पृश्यता अन्यायमूलक आहे, त्यांत धर्म नसून अधर्म आहे हें लोकांना आतां चांगलेंच पटूं लागलें आहे. आणि म्हणून जेथें अस्पृश्यता पाळण्यांत येते तेथेंहि तिचा बचाव आतां पूर्वीसारखा जोरानें होत नाहीं. धर्माभिमानी हिंदु म्हटला म्हणजे तो अस्पृश्यतेचा बचाव करावयाचाच, ही स्थिति आतां राहिली नसून बरेचसे सनातनी लोक असेंच म्हणतांना आढळतात कीं, हजारों वर्षें चालत आलेली रूढि आणि तीहि धर्माच्या नांवानें चालत आलेली रूढि एकाएकी मोडणार नाहीं, जरा दमानेंच घेतलें पाहिजे. अस्पृश्यता पापमूलक आहे याविषयीं आतां कोणी डंवचल्यावाचून चर्चा अथवा विरोध करीत नाहीं.

परंतु विरोध एक वेळीं पत्करला पण हें दमानें घेण्याचें तत्त्वज्ञान मोठें भयंकर आहे. अमेरिकेंतील स्वातंत्र्य वीर वुइल्यम लॉइड गॅरीझन जेव्हां गुलामीचा विरोध निकरानें करूं लागला तेव्हां 'व्यवहारदक्ष' लोक त्याला म्हणूं लागले, 'असे जहाल होऊं नका, जरा बेतानें घ्या, दमानें घ्या, हळूंहळूं पाऊल टाका' तेव्हां तो चिडून जाऊन म्हणतो: 'हळूंहळूं पाऊल कसें टाकावयाचें तें मला समजत नाहीं.

तुमच्या घरास आग लागली असली आणि तुम्हांस कोणीं सांगितलें कीं, आगीचा बंब जरा दमानें चालवा, पाणी थोडें थोडें शिंपा, तर तुम्ही त्याचें ऐकाल काय ? तुमचें घर कोणी लुटत आहे, तर त्या चोराचा विरोध धीरे धीरे कसा करावयाचा ? तुमच्या आईवर कोणी अत्याचार करीत आहे अशा नराधमाचा प्रतिकार सावकाश कसा करावयाचा ?' सुधारणा व प्रगति ही वाटल्यास सावकाश चालोत पण अन्यायनिर्मूलन तात्कालिकच झालें पाहिजे. निदान आपला प्रयत्न तरी तसा असला पाहिजे. शुद्ध अन्याय, धडधडीत पाप, महान् अधर्म, मानवी स्वातंत्र्याची पायमल्ली, यांच्याशीं देवाण घेवाण तें काय करावयाचें ? शरीरांत गरम रक्ताचा एक थेंब उरला असेल तोंवर या अनाचाराचा तीव्रांतीव्र निषेधच केला पाहिजे. एक तर अस्पृश्यतेचा नायनाट व्हावा किंवा उघड्या डोळ्यांनीं तिला पहाणाऱ्या आपला नायनाट व्हावा.

धनवान , विद्वान्, हिकमती, कल्पक, हिंमतवान आणि महत्त्वाकांक्षी अशा सर्वच लोकांनीं खेडेगांवांचा त्याग करून खेडेगांवांचा आणि मनुष्यसमाजाचा द्रोह केला आहे. किराणा माल ज्याप्रमाणें खेडेगांवांतील लोकांना जुना, शिळा, किडका मिळावयाचा, त्याचप्रमाणें धर्माच्या, सामाजिक कल्याणाच्या, आर्थिक हिताच्या, तरुण पिढीच्या शिक्षणाच्या, सर्वच कल्पना तेथें सडक्या रूपांत नांदावयाच्या. जुनें तेवढें वाईट असें म्हणण्याचा आमचा आशय नाहीं. घरांत जुनीं भांडीं असूं नयेत असें आम्ही म्हणत नाहीं. जुनीं भांडीं घरंदाजपणाचें, प्राचीन वैभवाचें आणि संस्कारितेचें द्योतक आहेत; पण जुनीं भांडीं देखील रोजच्या रोज घासूनच वापरलीं पाहिजेत. जुन्या कळकटलेल्या भांड्यांवरील हिरवा जहर मोरचूद—गंज—देखील संभाळून टेविला पाहिजे, आणि स्वयंपाकाबरोबर तो पोटांत गेला पाहिजे असें म्हणणाऱ्या भूतकालाच्या उपासकांनीं मरून भूतच झालें

पाहिजे. जगण्यांत, जिवंत राहण्यांतहि भूत काळाचा द्रोह होतो हें त्यांना पटलें पाहिजे.

आधुनिक समाजांत धर्मजागृति करून नवीन छाप पाडणारे बहुतेक सत्पुरुष आणि महात्मे शहरांतच संचार करितात. प्रवासाच्या सुखसोयींचीं साधनें जेथवर पोहोंचतात तेथवरच यांचीं चरणकमलें पोहोंचावयाचीं ! अशी स्थिति असल्यानें खेडेगांवांतून अस्पृश्यतानिवारणाची चळवळ फार थोडी झाली आहे. हरिदास,पुराणिक,कथेकरी वगैरे लोक वैराग्याच्या रसाळ गोष्टी आशाळभूतपणें सांगत असतांना लोकांना काय रूचेल याचाच विचार करीत असतात. लोकांच्या हिताचें काय आहे याचा विचार करण्याची त्यांना संवय किंवा हिंमत नाहीं. आपल्या वाणींत आधुनिकता आणण्याची जरूर त्यांना भासूं लागली आहे. पण धर्मतेजाची त्यांना जरूर भासेल तेव्हांच ते समाजाचे सेवक व नेते बनतील. तोंवर समाजरंजक म्हणून त्यांचा उपयोग आहे तेवढाच असणार !

येथवर जी टीका केली त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें विधायक सूचनाच केलेल्या आहेत.

अस्पृश्यतानिवारण करण्याची जबाबदारी धर्मनिष्ठ, प्रजाहितैषी, निस्पृह, आणि नीतिधैर्याच्या लोकांचीच आहे. स्वतःच्या मनांतून अस्पृश्यतेचें भूत काढून टाकिलें म्हणजे बस्स झालें नाहीं. धर्म म्हणून, रूढि म्हणून, अथवा संस्था म्हणून जें पाप समाजांत घुसतें तें कालांतरानें अपौरुषेय होऊन बसतें; म्हणजे त्याची जबाबदारी एका विशिष्ठ व्यक्तीवर असल्याचें दिसून येत नाहीं. अशा रूढीचा निर्दयपणा, घातकीपणा, असह्य अन्याय, हीं सर्व बिचाऱ्या अंत्यजासारख्यांना सहन करावीं लागतात. पण ती रूढि चालविणाऱ्या व्यक्ती स्वभावानें निर्दय, घातकी अथवा अन्यायी असतातच असें म्हणतां येत नाहीं.रूढीची निंदा केली तर व्यक्तींना वाटतें कीं, आमच्यावर हा नाहक ताशेरा आहे.

पण दोषमुक्त ठरविल्यानें पापमूलक रूढीला बळी पडलेल्या वर्गांचा जाच कांहीं कमी होत नाहीं. जे लोक व्यक्तींवर चिडतात, जशास तसें या न्यायानें स्पृश्य समाजांतील व्यक्तींचें शासन करूं पहातात ते रूढीचें कंबरडें मोडण्याच्या ऐवजीं मजबूतच करतात. कोणतीहि समाजसुधारणा करितांना ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये. प्राचीन काळापासून आजवर ही गोष्ट विसरून जाऊन समाजानें पापी रूढींविषयींचा स्वतःचा पुण्यप्रकोप, रूढि अंधपणें चालविणाऱ्या व्यक्तींवर काढून नवे अन्याय व नवे घोंटाळे उत्पन्न केले आहेत. इतिहासाचें प्रत्येक पान या गोष्टीचें साक्षी आहे.

अस्पृश्यतानिवारणाची जबाबदारी दोन वर्गांवर येऊन पडते. अस्पृश्यता ज्यांनीं चालू केली त्यांचे वारस असे उच्चवर्णीय स्पृश्य लोक, आणि ज्यांना आज अस्पृश्यता भोंवत आहे असे दलित 'अस्पृश्य' लोक.

या दलितांचें शिक्षण त्यांच्या धार्मिक समजुती व समाजांत आज त्यांना असलेलें स्थान या गोष्टींचा विचार करितां अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न त्यांनीं करून करावा अशी जबाबदारी त्यांच्यावर टाकतां येत नाहीं. त्यांना रोज अन्याय आणि अपमान सहन करावा लागत असल्यानें स्पृश्यांविरुद्ध सर्व न्याय्य मार्गांनीं बंड करण्याचा त्यांना हक्क आहे हें नाकबूल करितां येत नाहीं. अशा बंडामुळें सर्वच समाजाला नुकसान सोसावें लागेल हें खरें असलें तरी तेवढ्यासाठीं तुम्ही अन्याय सहन करीत रहा असें अस्पृश्यांना कोणीं सांगावें ?

पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, अस्पृश्य इतके दलित आहेत कीं, त्यांच्यांत बंडाची इच्छा उत्पन्न करण्यांतहि बराच काळ जाईल; बंडाची शक्ति उत्पन्न करणें ही त्याच्या पुढची गोष्ट ! आणि इतकें करूनहि अशा बंडामुळें सुरवातीला अस्पृश्यांचेंच नुकसान अधिक होणार आहे. प्रजाहितैषी लोकांनीं त्या बिचाऱ्यांवर एवढें ओझें

घालूं नये. पण अस्पृश्यांमध्यें अस्मिता जागृत होण्यापूर्वींच त्यांचीं अस्पृश्यता दूर करण्याचे निकराचे प्रयत्न स्पृश्यांनीं केले पाहिजेत.

तोंवर अस्पृश्यांमध्यें करण्याजोग्या गोष्टी म्हणजे त्यांच्यांतील प्रधान व्यसनें दूर केलीं पाहिजेत. तीं व्यसनें म्हणजे ( १ ) मृतजनावरांचें मुडदार मांस खाणें; ( २ ) व्यसन म्हणून अथवा जातीचा रिवाज म्हणून दारू पिणें; (३) लोकांचें उष्टें अन्न मागून आणून खाणें; (४) कर्जांत नेहमीं बुडलेलें असणें; ( ५ ) शिक्षण जेथें मिळणें शक्य आहे तेथेंहि शिक्षणाविषयीं अत्यंत उदास असणें किंबहुना शिक्षणाचा विरोध करणें; ( ६ ) शहरें आणि गांवें रोज साफ करूनहि स्वतः साफ न रहाणें आणि ( ७ ) व्यसन जरी म्हणतां येत नाहीं तरी हिंदु समाजांत स्वाभाविक स्थान मिळविण्याच्या बाबतींत जबरदस्त अडचणीची अशी गोष्ट म्हणजे गोमांसभक्षण.

मेलेलीं गुरें सोलून त्यांचें कातडें कमावण्याचें काम अंत्यजांना आपल्या रहात्या जागेच्या आसपासच करावें लागतें. हें अत्यंत अमंगळ आणि आरोग्यास अहितकर असें आहे. याबाबतींत सुधारणा एकदम झाली पाहिजे. चामडीं सोलून कमावण्याचें काम मनुष्यवस्तीपासून दूर आणि वाऱ्याची दिशा व पावसाळ्यांतील पाण्याचे ओहोळ यांचा विचार करून नक्की करावी; आणि श्वापदांकडून चामड्याला नुकसान पोहोंचूं नये अशीहि तेथें काळजी घेतलेली असावी.

[ चामडीं कमावून त्यांचे निरनिराळे पदार्थ करून विकणें हा मोठा व किफायतशीर धंदा गोरक्षकांच्या हातींच असला पाहिजे ही गोष्ट अंत्यजांना समजावून देऊन तसें घडण्यास त्यांनां व्यावहारिक मदतहि केली पाहिजे. ]

अस्पृश्यतानिवारणाची दुसरी बाजू–पापमूलक रूढीवर चढाई करण्याची-अर्थात् हृदयपरिवर्तन करण्याची बाजू स्पृश्य समाजांतील प्रतिष्ठित अग्रणी लोकांनीं आपल्या हातीं घेतली पाहिजे. आणि आळीला आग

लागली असतां ज्या आकांतानें आपण आगीचा बंब चालवितों तितक्याच निकरानें हें काम चालविलें पाहिजे. लोकांचा विरोध होता तोंवर विरोधाचा नायनाट करण्याचें काम सोपें होतें. आतां बौद्धिक विरोध जवळ जवळ शमला आहे. आतां अस्पृश्यतेचा मुडदा अनास्थेच्या रूपानें कुजत पडून सर्वत्र दुर्गंधी आणि रोगराई पसरवीत आहे त्याला वेळींच मूठमाती दिली पाहिजे.

अस्पृश्यांना आम्ही न्यायानें वागवूं, त्यांच्या प्रगतीच्या आड कोठेंहि येणार नाहीं असला मेंगा न्याय देऊन भागावयाचें नाहीं. शेंकडों अथवा हजारों वर्षांच्या अन्यायाचें प्रायश्चित्त करण्यासाठीं अर्थात् पापकृत्येपासून स्वतःचें रक्षण करण्याच्या स्वार्थाच्या दृष्टीनें अस्पृश्यांना मदत करण्याचे प्रसंग मुद्दाम शोधले पाहिजेत. आजवर त्यांच्याविरुद्ध पक्षपात झाला याचें स्मरण ठेवून आज स्वार्थत्यागपूर्वक त्यांच्या फायद्याचा पक्षपात केला पाहिजे; आणि हें सर्व हृदय कळवळून झालें पाहिजे.

अस्पृश्यतानिवारणांत खालील गोष्टी प्रमुखत्वानें येतात: (१) दुकानांत, शेतीच्या कामांत, देवळांत, विहिरींवर वगैरे जेथें जेथें अस्पृश्यांशीं संबंध येतो तेथें तेथें त्यांना दूर ठेवतां कामा नये, त्यांच्यांशीं कसलाच भेदभाव असतां कामा नये. ( २ ) सार्वजनिक असो अथवा खाजगी असो, सर्व विहिरींवर पाणी ओढून घेण्याची वगैरे मुभा अस्पृश्यांना इतर जातींइतकीच असावी. ही सुधारणा सर्वांत अगोदर झाली पाहिजे. ( ३ ) ज्यांचा मूर्तिपूजेस विरोध नाहीं, देवदर्शनाची ज्यांना आस्था आहे, अशा स्पृश्य आणि अस्पृश्य लोकांना—मग ते कोणत्याहि जातीचे अथवा धर्माचे असोत —मंदिरप्रवेशाची मोकळीक सारखीच असावी. ( ४ ) शिक्षणसंस्थांतून, तालमीच्या आखाड्यांतून, वाचनालयें, ग्रंथालयें, रुग्णालयें वगैरे समाजसेवेच्या संस्थांतून अस्पृश्यांना आदरानें वागविण्यांत आलें पाहिजे. कोणतीहि

सामाजिक सेवा त्यांना इतर जातींइतकीच आस्थेनें व सहज मिळाली पाहिजे. (५) लग्नाच्या वराती, जातींच्या मिरवणुकी, वगैरे बाबतींत अंत्यजांना हीनताद्योतक जे प्रतिबंध पाळावे लागतात ते दूर झाले पाहिजेत. (६) अस्पृश्यतानिवारणाचें एक अंग म्हणूनहि शौच-कूपांची व्यवस्था सुधारून ती माणसांना शोभेशी केली पाहिजे. शौचकूपाशेजारीं जेवावयास बसलें तरी कोणालाहि कंटाळा येऊं नये इतकी सफाई ठेवणें शक्य आहे व तोच आदर्श असावा.

(शौचकूप साफ करण्याचें काम अंत्यज जातीच्या हातीं न ठेवतां इतर जातींनीं करावें हें इष्ट आहे, पण आज शौचकूप साफ करणाऱ्या अस्पृश्य कुटुंबांच्या आजीविकेची अन्य रीतीनें तरतूद लावूनच ही सुधारणा केली पाहिजे.)

(७) अंत्यज मुलांमुलींना सामान्य शिक्षणसंस्थांतून प्रवेश मिळवून देऊनहि खास अस्पृश्यांसाठीं म्हणून कांहीं आश्रम काढावे लागतील; आणि त्यांतहि मुलांच्या शिक्षणापेक्षां मुलींच्या शिक्षणा-कडे अधिक लक्ष दिलें गेलें पाहिजे. असें न केल्यास समाजाचें स्वास्थ्य बिघडेल आणि अस्पृश्य कुटुंबें दुःखी होतील. (८) लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिटी, सरकारी कौन्सिलें वगैरे संस्थांतून जेथें जेथें लोक-प्रतिनिधी पाठवावयाचे असतात तेथें तेथें आपण मागसलेले अल्प-संख्यांक, आपली हेटाळणीच होणार अशी जी शंका अस्पृश्यांमध्यें असते ती दूर होण्याइतका अंत्यजांचा पुरस्कार केला पाहिजे. व त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य संभाळून हीं नवीन प्रकारचीं कामें मोठ्या हुषारीनें पार पाडण्यास त्यांना मदत केली पाहिजे. (९) अंत्यजांपैकीं हुषार व सात्विक तरुणांना संस्कृत भाषा व हिंदु-धर्मशास्त्र शिकण्यास पुष्कळ उत्तेजन दिलें पाहिजे. व हिंदुधर्माच्या बऱ्यावाईट दोन्ही बाजू स्वतंत्रपणें पाहून हिंदुधर्माच्या भव्य मिशनची त्यांना कल्पना येईल अशी सोय करून दिली पाहिजे.

# सामाजिक रिवाज.

भारतीय संस्कृति फार प्राचीन असून तीमध्यें समाजहिताचा विचार फार खोलवर जाऊन केलेला आहे, आणि ही संस्कृति काला-च्या कसोटीनें समर्थ व टिकाऊहि ठरलेली आहे. दीर्घ जीवनासाठीं ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या त्या या संस्कृतीला वेळोवेळीं मिळत आल्या आहेत, व त्यामुळेंच अत्यंत जुनाट असूनहि ही संस्कृति जीर्ण झाली नाहीं.

या संस्कृतीची एक श्रद्धा अशी आहे कीं, खरोखर चांगलीं अशीं कितीहि तत्त्वें एकत्र आलीं तरी तीं परस्पर विघातक होणार नाहींत; मात्र त्या तत्त्वांना एकत्र कसें आणावयाचें याची कला आपणांस अवगत असली पाहिजे. हें सर्व विश्व एक रूप आहे, यांतील सर्व चांगल्या गोष्टींचा परस्पराशीं मेळ बसलाच पाहिजे आणि अनुकूल व स्थायी असा मेळ बसला म्हणजे त्यांतून आत्मसाक्षात्कार करविणारे समृद्ध संगीत–जीवन संगीत–निघालेंच पाहिजे; ही श्रद्धा भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे, प्राण आहे.

आणि म्हणूनच भारतीय संस्कृतीमध्यें युद्ध, जीवनकलह अथवा द्रोह यांना तात्त्विक स्थान नाहीं. मनुष्यस्वभावामध्यें जे अनेक दोष आहेत, जे महान् रिपु आहेत त्यांच्या प्रादुर्भावानें युद्धें होवोत, पण युद्धांना जीवनव्यवस्थेंतील एक आवश्यक आणि आध्यात्मिक अंग म्हणून आपण कधींहि स्वीकारलेलें नाहीं.

भिन्नधर्मीयांमध्यें विवाह झाला तर तो कोणत्या शास्त्राप्रमाणें, कोणत्या कायद्याप्रमाणें व्हावयाचा हें जसें तटस्थपणें, तिऱ्हाईतपणें आणि उच्च भूमिकेवर जाऊन ठरवावें लागतें, त्याचप्रमाणें भिन्न भिन्न संस्कृती एकत्र येऊन त्यांच्यामध्यें सहचार सुरू झाला म्हणजे त्यांचा

मिलाफ कोणत्या तत्त्वांवर व्हावयाचा हेंहि ठरवावें लागतें. वळी तो कान पिळी हा न्याय प्रकृतीमध्यें दिसून येतो पण तो तिर्यक् सृष्टीचा आहे. त्यांत आध्यात्मिक उच्चता नाहीं. दोन संस्कृती एकत्र आल्या म्हणजे त्यांनीं भांडलेंच पाहिजे आणि अंतीं एकीनें दुसरीच्या आहारीं पडलें पाहिजे असा कांहीं निरपवाद नियम नाहीं. आर्य आणि द्रविड या भिन्न संस्कृती मानल्या तर त्यांचा सहचार युद्धद्वारें साधला असें म्हणतां यावयाचें नाहीं. दुधांत साखर मिसळावी त्याप्रमाणें त्या परस्परांत ओतप्रोत झाल्या. दुसरें उदाहरण हिंदी आणि चिनी संस्कृतींच्या सहचाराचें.

अशा सहचाराचें सामान्य तत्त्व, सामान्य शास्त्र एकत्र येऊं पहाणाऱ्या संस्कृतींशीं मिळतें असूनहि त्यांच्याहून उच्च व श्रेष्ठ असें असलें पाहिजे.

भारतीय इतिहास सांगतो कीं, सहचाराचें हें तत्त्व म्हणजे परस्पर प्रेम व आदर, सद्भाव व समान भाव हें होय. सत्य, अहिंसा, सरळपणा, समानता, सहनशीलता, त्याग, उत्साह आणि विविधतेमध्यें उच्च एकता पहाण्याची दिव्य दृष्टि इतक्या गुणांचा जो समुच्चय त्यालाच सहचाराचें रसायन म्हणतां येईल. हें रसायन भारतीय जनसमाजांमध्यें ज्या मानानें असेल त्या मानानें विश्वैक्य साधण्याचें काम भारतवर्ष करूं शकेल.

भारतवर्षामध्यें सर्वांना प्रवेश आहे, सर्वांना आमंत्रण आहे, सर्वांचें स्वागत आहे. येथें कोणाचाहि त्याग नाहीं, बहिष्कार नाहीं. व्यक्ति, समाज, समाजमान्य रीतिरिवाज आणि विविध संस्कृति, कोणाशींच आत्यंतिक असहकार नाहीं. मात्र सर्वांनीं वर सांगितलेली सहचाराची निष्ठा अथवा भारतीय रसायन स्वीकारलें पाहिजे. जे न स्वीकारतील त्यांचाहि बहिष्कार नाहीं, पण त्यांना या रसायनाचें महत्त्व कळेतोंपर्यंत भारतीय प्रेमसंगीताचा सूर काढतां यावयाचा नाहीं.

जगांत जोपर्यंत कलहवृत्ति आहे तोंपर्यंत भारतीय संस्कृतीला पुनः

पुनः क्रूसावर चढून पुनरुत्थान करून दाखविलें पाहिजे. भारतीय संस्कृतीचें भाग्यच असें आहे. देवदानवांनीं लोभानें किंवा ईर्ष्येनें समुद्रमंथन केलें तरी विषाचा वांटा महादेवाकडेच यावयाचा !

ज्याला रोज अग्निप्रवेश करावा लागतो त्याच्यामध्यें एक प्रकारचें तेज, एक प्रकारचें मार्दव, एक प्रकारची सौम्यता आणि त्या बरोबरच एक प्रकारचा कणखरपणा, सत्त्व, स्वत्व आणि सर्वग्राहकत्व हीं येत असतात.

हिंदुस्थानांतील सामाजिक रीतिरिवाज आर्यसंस्कृतीचे द्योतक आहेत. त्यांच्यामध्यें जातिनिहाय आणि प्रांतानिहाय कितीहि भेद असले तरी सर्वत्र एक प्रधान साम्य अनुस्यूत आहेच. भारतवर्षांतील पगड्या, फेटे, रुमाल यांच्यामध्यें जितकी विविधता आहे तितकी जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांत नसेल. आणि इतकें असूनहि भारतीय शिरोवेष्टन इतर देशांतील शिरोवेष्टनांहून सहजच निराळें पडतें. हीच गोष्ट सर्व रीतिरिवाजांची !

असें असलें तरी पिढी दरपिढी या रिवाजांत फेरफार झालाच पाहिजे. शहरांतून असे फेरफार लवकर होतात. परिवर्तनाची लाट खेडेगांवांतून आणि मागसलेल्या प्रांतांतून फार उशिरां जाऊन पोहोंचते. तलावांत धोंडा टाकला म्हणजे वीचिमालांचीं वलयें एकामागून एक कांठाकडे जात असतात; त्याचप्रमाणें संस्कृतीचें आहे. चातुर्वर्ण्याच्या कल्पनेवर नवीं नवीं पुटें देऊन ' आठरा पगड ' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पण संख्येनें २५०–३०० भरणाऱ्या जाती आपण पडूं दिल्या आहेत; आणि जणूं काय या सर्वांना मोठ्या समारंभानें दरबारांत बसवावयाचें आहे असें समजून त्यांच्यामध्यें ' उच्चनीच भेद ' ठरवून टाकला. सर्व जातींमध्यें अनुस्यूत असलेलें हें तत्त्व म्हणजे उच्चनीच भाव जीवनसूत्र नसून एकाच वेळीं सर्वांना फांशी देण्याचा हा यमपाश आहे. पण खेडेगांवांतील लोकांना ही गोष्ट पटवून देतां

देतां नाकीं नऊ येणार आहेत! कारण उच्चनीच भाव त्यांच्या हाडींमासीं खिळण्याइतके हातोडे आपण त्यांना पूर्वी मारले आहेत. हे सर्व खिळे आतां पुनः उपटून काढावयाचे म्हणजे कांहीं क्लेश हे होणारच!

कुटुंबामध्यें किंवा जातीमध्यें लहानमोठा असा भेद असतो. वयामुळें, नात्यामुळें, अनुभवामुळें अथवा सामर्थ्यामुळें लहान मोठा असा भेद पडतोच. पण येथें हा भेद विश्वरूप नसतो. पहिली गोष्ट अशी कीं, हा भेद सर्वांनीं प्रेमानें स्वीकारलेला असतो. यांत मतभेद नसतो. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, या संबंधांत जो उच्च असेल त्याला सर्वांचे दास बनावें लागतें. सर्वांची सेवा, सर्वांसाठीं स्वसुखाचा त्याग या बाबतींत मर्यादाच नसणें, खंड नसणें, हेंच कुटुंबाचें लक्षण होय. सर्वांचीं बोलणीं सोसणें, सर्वांच्या आग्रहाला मान देणें, मोठेपणानें सर्वांचे दोष गिळून टाकणें, आणि समाधानपूर्वक सर्वांच्या पायांखालीं तुडविली जाणारी धूळ बनण्यापर्यंत शून्य होणें हेंच कुटुंबांत मोठेपणाचें लक्षण आहे. पृथ्वीलाच 'क्षमा' म्हणतात. जें कांहीं पृथु, विशाल आहे तें क्षमावान असतेंच. अशा स्थितींत मोठेपणाचा अभिमान, मोठेपणाचे हक्क, मोठेपणाचा तोरा आणि मोठ्याचा मोठा वांटा या गोष्टींना अवकाश कोठून असणार! कौटुंबिक न्यायाचा मोठेपणा जगांत ज्याला घ्यावयाचा असेल त्यानें खुशाल घ्यावा. त्याला कोणीच नाहीं म्हणणार नाहीं. [ खिस्तानें असला मोठेपणा स्वतःच्या अनुयायांस घ्यावयास सांगितलें होतें; कदाचित् हिंदुधर्माच्या वांट्यास हा मोठेपणा येईल. अथवा असेंहि संभवतें कीं, असला मोठेपणा समाजासमाजांत स्थापन होण्याच्या सुमारास सर्वच धर्मांचें हृदयैक्य होऊन जाईल. ]

जेथें ऐक्य आहे तेथें समानतेचा, बरोबरीचा प्रश्नच रहात नाहीं. डोकें वर कां व पाय खालीं कां असा झगडा माणसांनीं किंवा झाडांनीं कधींच केलेला नाहीं. जेथें ऐक्य स्थापन व्हावयाचें आहे तेथें

अत्यंत आग्रहपूर्वक समानता संभाळलीच पाहिजे. बरोबरीच्या नात्यानेंच भिन्न समाज बरोबर चालूं शकतील.

आपण एक उदाहरण घेऊं. मांसाहार त्याज्य आहे असें मानणाऱ्या दोघांपैकीं एकाला त्याग करितां आला आहे व दुसऱ्याच्यानें अजून मांस सोडवत नाहीं अशा स्थितींत हा दुसरा प्रकृति-दुर्बळ पहिल्या संस्कार-समर्थाला आपण होऊन श्रेष्ठ मानील व हा श्रेष्ठ स्वतःचा श्रेष्ठ-पणा विसरून प्रकृति-दुर्बळाला जवळ करण्यांत, त्याला मदत कर-ण्यांत, समाधान मानील. मी श्रेष्ठ आहें, मी पवित्र आहें म्हणून मी सामान्य लोकांना दूर ठेवीन असें म्हणणारा किंवा मानणारा विशिष्ट आचारांत कितीहि शुद्ध असला तरी तो महापातकी आहे.

आतां ज्याला मांसाहार त्याज्य आहे हें पटलेंच नाहीं, मांसाहारांत अयोग्य असें कांहींच नाहीं असें ज्याला वाटतें तो स्वतःला निरा-मिषाहाऱ्याहून कनिष्ठ काय म्हणून मानेल? आणि निरामिषाहाऱ्याला त्याच्याशीं मोठेपणानें वागण्याचा अधिकार तरी कसा पोहोंचतो? त्यानें मनांत वाटेल तें मानावें; पण मोठेपणाचा आव आणूं नये. आणि अनुभवहि असेंच सांगतो कीं, एका बाबतींतला मोठेपणा मनुष्याला सार्वत्रिक मोठेपणा देऊं शकत नाहीं. रूढीनें किंवा वंशपरंपरेनें जो निरामिषाहारी आहे त्याचें हृदय संकुचित, निर्दय व कपटी असण्याचाहि कोठें कोठें संभव असतो. आणि जो रूढीनें मांसाहारी आहे व रूढीमुळेंच ज्याला मांसाहाराची त्याज्यता पटणें मुष्कील झालें आहे असा मनुष्य अन्य रीतीनें पाहतां प्रेमळ, उदार, स्वार्थत्यागी आणि विश्वासपात्र असा असूं शकेल. जीवन-तोलनाच्या दृष्टीनें येथें श्रेष्ठकनिष्ठभाव कसा ठेवावयाचा?

म्हणूनच जीवन-शास्त्र्यांनीं ठरविलें आहे कीं, तोलन करण्याच्या भरीस पडूं नये. सर्वांना समान लेखावें. सर्व व्यक्ति, सर्व जाती, सर्व वर्ण, सर्व आश्रम व सर्व धर्म समान आहेत. विशेषतः धर्मांच्या

बाबतींत आजच्या व आपल्या वांट्यास आलेल्या त्या त्या धर्मांच्या अनुयायांवरून कोणत्याहि धर्माची प्रतिष्ठा नक्की करतां कामा नये. प्रत्येक धर्म अनुयायांपेक्षां तर मोठा असतोच पण त्या त्या धर्मांच्या धर्मग्रंथाहून आणि शास्त्रवचनांहूनहि मोठा असतो.

प्रत्येक हृदयांत आत्म्याचा वास आहे असें आपण म्हणतों; पण दुष्ट, दगलबाज, कृतघ्न, हीन, द्रोही अशा हृदयांत देखील आत्मा आहे व यथाकाळीं तेथेंहि आत्म्याचा म्हणजे धर्मबुद्धीचाच विजय होणार आहे एवढी श्रद्धा अथवा आस्तिकता मात्र आपण दाखवीत नसतों. ही आस्तिकता जेव्हां आपल्यामध्यें उदय पावेल तेव्हांच आपलें आचरण अचूक धर्मानुकूल होईल.

धर्माधर्मांच्या बाबतींत एवढीहि श्रद्धा आपण दाखवीत नाहीं. सर्वच धर्मांत ईश्वर आहे, आत्मतेज आहे; सर्वच धर्म उन्नतिगामी आहेत. सर्वच धर्मांमध्यें सत्यपरायणता, प्रेमपरायणता आहे. सर्वच धर्म ईश्वराला प्रिय आहेत. आईला ज्याप्रमाणें स्वतःचीं सगळींच लेकरें अत्यंत प्रिय असतात त्याप्रमाणें ईश्वराला सगळेच धर्म अत्यंत प्रिय आहेत. ही गोष्ट तत्त्वानें देखील कबूल करण्यास आज लोक तयार नाहींत, मग त्याप्रमाणें वागण्यास कोठून असणार !

[ आस्तिकता म्हणजे काय ? भिन्नभिन्नकाळीं या शब्दाचे निरनिराळे अर्थ झाले आहेत. ज्याचा ईश्वरावर विश्वास आहे तो आस्तिक असा आजकाल अर्थ होतो. वेदाचें प्रामाण्य ज्याला कबूल आहे तो आस्तिक अशी जुनी समजूत आहे. वेद ज्याला प्रमाण आहेत पण ईश्वर आहे असें ज्याला वाटत नाहीं तोहि वरील व्याख्येप्रमाणें आस्तिकच. उदाहरणार्थ निरीश्वर सांख्य. आणि ज्याचा ईश्वरावर विश्वास आहे पण ज्याला वेद प्रमाण नाहींत तो नास्तिक.

याहून व्यापक अर्थानें पाहतां ज्याचा पारलौकिक जीवनावर विश्वास आहे तो आस्तिक. किंवा आत्मा आहे, तो अमर आहे,

सत्यसंकल्प आहे, अशी ज्याची श्रद्धा आहे तो आस्तिक.

वरील विवेचनांत आस्तिकतेचा असाच पण जरा निराळा अर्थ घेतला आहे व तेथें तो स्पष्टहि केला आहे.

प्रस्थानत्रयीचा समन्वय करणें ही धर्मबुद्धीची उच्च कसोटी मानली जात असे. सर्वदर्शनसमन्वय ही त्याच्यापुढील पायरी होय. आणि आतां वैदिक धर्म, यहुदी धर्म, फारशी धर्म, बौद्ध धर्म, चीनमधील धर्म, त्याचप्रमाणें ख्रिस्ती आणि इस्लामी धर्म इत्यादि सर्व धर्मांचा समन्वय करणें हें आजचें काम आहे. सर्व धर्मांविषयीं सद्भाव, समानभाव असल्यावांचून असा समन्वय करतां यावयाचा नाहीं. हा सद्भाव हीच आजची आस्तिकता, हीच मानव्य श्रद्धा. ]

सामाजिक रिवाज जे बदलावयाचे आणि समाजाला नवीन घडी बसवून द्यावयाची त्याच्या मुळाशीं धर्मशैथिल्य किंवा केवळ व्यवहारवाद नसावा. पण नवयुगीन व्यापक संस्कृति आणि धर्मजीवन लक्षांत घेऊनच रीतिरिवाजांत फरक झाला पाहिजे. यासाठीं येथवर केलेलें विवेचन आवश्यक होतें.

जो स्वतःच्या धर्माचा नव्हे तो धर्मबाह्य अशी जी समजूत बहुतेक सर्व धर्मीयांची आहे ती मोडून काढली पाहिजे. म्हणजे मग सदाचाराचा नवीन नकाशा काढण्याची आंखणी आपल्या हातांत येईल.

सर्व जाती, सर्व धर्म, सर्व पंथ समान आहेत; सर्व आदरणीय आहेत; एवढी खात्री झाली म्हणजे परस्परांत कसें वागावें हें आपोआप समजेल. भिन्नांनीं विभक्त न राहतां एकमेकांशीं ओतप्रोत होण्याचा प्रयत्न चालवावा, मदतीची देवघेव करावी, एकमेकांच्या उत्सवांत भाग घ्यावा, जेथें आघात पोहोंचण्याचा संभव असेल तेथें संभाळून घ्यावें व अशा रीतीनें स्वतःस व दुसऱ्यास समृद्ध करावें. येथें स्वतःची निष्ठा सोडावयाची नसून ती उदात्त करावयाची असते.

आपल्या जुन्या चालीरीतींमध्यें जुन्या काळालाच योग्य अशा

किती तरी गोष्टी आहेत कीं, ज्या आज सोडल्याच पाहिजेत अथवा बदलल्या पाहिजेत. सोवळ्याओवळ्याचें शास्त्र अर्थविहीन, कृत्रिम व घातुक झालें आहे. त्याच्या जागीं व्यवहार्य असा शुचिर्भूतपणा आणला पाहिजे. मांसाहार व अन्नाहार हा भेद आग्रहपूर्वक टिकविला पाहिजे. पण मांसाहारी व अन्नाहारी एका पंक्तीला जेऊं शकतील अशी व्यवस्था असली पाहिजे. कोणीं कोणाचें उष्टें खाऊं नये, हा आग्रहहि उत्तम आहे. भंग्यांना किंवा नोकरांना त्याचप्रमाणें स्वतःच्या बायकोला किंवा लहान मुलांना देखील उष्टें खाऊं देतां कामा नये. अन्नाहारी लोकांनीं स्वतःला हवे त्या पद्धतीचें अन्न तयार होत असेल तर तें कोणाच्याहि हातचें असलें तरी खावें. विहिरींमध्यें शुद्ध भांडीं सोडलीं जातील एवढी काळजी घेऊन ब्राह्मण, अंत्यज, हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी सर्वांनाच विहिरी सारख्या मोकळ्या असाव्यात.

स्त्रियांचें जीवन अगदींच घरकोंबड्यांप्रमाणें झालें असल्याकारणानें त्या पंगू, भित्र्या, प्रसंगावधानशून्य आणि परावलंबी अशा झाल्या आहेत. त्यांना व्यापक सामाजिक जीवनाचा अनुभव करून दिला पाहिजे. सार्वजनिक कार्यांत गुरांच्या कळपाप्रमाणें हजर न राहतां माणसांप्रमाणें त्यांनीं भाग घेतला पाहिजे.

स्त्रियांच्या बाबतींत एक नाजूक प्रश्न आहे. कांहीं जातींत मासिक रजोदर्शनाचा विटाळ मानीत नाहींत; व कांहीं जातींत तो कडकपणें मानला जातो. अस्पृश्यतेपेक्षां स्वच्छतेकडे जें विशेष ध्यान दिलें पाहिजे तें दोन्ही प्रकारामध्यें दिलें जात नाहीं. आदर्श स्वच्छता जर संभाळता आली व रजस्वलांना तीन किंवा पांच दिवस शारीरिक, मानसिक आणि वैषयिक आराम देण्याची काळजी घेतली तर—तरच—विटाळांतील अस्पृश्यतेचें स्तोम बरेंच कमी करितां येईल. कांहीं जातींना जर स्वच्छतेचा उच्च आदर्श पाळणें शक्य होतें तर आग्रही

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

आणि सतत शिक्षणानें तें सर्वांना शक्य झालेंच पाहिजे.

हिंदूंच्या मंदिरांत ज्या सुधारणा करण्यांच्या त्याची चर्चा येऊन गेलीच आहे.

आपल्या बऱ्याचशा जुन्या चालीरीतींत खर्चिकपणा असतो. त्यांत उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ नसतो. दंभ आणि कृत्रिम प्रतिष्ठा यांना बरेचसें स्थान असतें. कोणताहि सामाजिक रिवाज कधींहि सत्याला सोडून नसावा. दंभ, कृत्रिमता, पाखंड, डौल यांना समाजानें रिवाजाच्या नांवाखालीं कधींहि थारा देऊं नये. आळस, ऐदीपणा व पराश्रय यांचा नायनाट केला पाहिजे.

प्रत्येकजण स्वतःच्या पुरतेंच अथवा आपल्या कुटुंबापुरतेंच पहात असतो, त्याऐवजीं त्यानें सामाजिक कल्याणाची व्यापक दृष्टि आग्रहानें स्वतःमध्यें आणिली पाहिजे. सार्वजनिक हिताचीं कामें संघशक्तीनें करण्याचा उत्साह वाढविला पाहिजे. सर्वच सामाजिक जीवन उन्नत होईल असे प्रयत्न नेहमीं चालले पाहिजेत. वारंवार विचार, चर्चा, होऊन लोकमत जागृत होईल असे नवे रिवाज पाडिले पाहिजेत.

# वर्णव्यवस्था

वर्णव्यवस्था गुणकर्मविभागशः आहे. यांपैकीं गुण बऱ्याच अंशीं आनुवंशिक असल्याकारणानें आणि कर्म म्हणजे उपजीविकेचा उद्योग किंवा धंदा यांत देखील कुळपरंपरेचें महत्त्व अधिक असल्यानें वर्ण-व्यवस्था मनुष्याच्या जन्मानुरूप ठरविली गेल्यास त्यांत अशास्त्रीय किंवा अन्यायाचें असें कांहींच नाहीं. According to Birth or according to Worth असा काल्पनिक विरोध उत्पन्न करून चातु-र्वर्ण्याचा विरोध करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. गुणकर्मविभाग बहु-तांशीं जन्माप्रमाणेंच पडत असल्याकारणानें चातुर्वर्ण्य ईश्वरकृत (मया सृष्टं) मानलें गेलें आहेत. पण चातुर्वर्ण्याचें तत्त्व गुण आणि कर्म आहे यांत शंका नाहीं. गीतेमध्यें जेथें ब्राह्मणांचें कर्म म्हणून सांगि-तलें आहे तेथें ते गुणच आहेत. क्षात्रकर्माविषयीं पण असेंच म्हणतां येईल. वैश्यशूद्रांच्या बाबतींत मात्र जीं स्वाभाविक कर्में म्हणून सांगितलीं आहेत तीं कर्मेंच आहेत.

ब्राह्मण आणि क्षत्रिय हे दोन्ही वर्ण प्रत्यक्ष रीतीनें समाजसेवेला वाहिलेले असल्यानें त्यांची आजीविका समाज चालवितो. वैश्य आणि शूद्रांना मात्र आजीविकाप्राप्त्यर्थ विशिष्ट कर्में करावीं लाग-तात. यामुळेंच असा भेद केला असावा. मनुस्मृतीनें मात्र ब्राह्मणां-साठीं सहा कर्में सांगून त्यांपैकीं तीन (अध्यापन, याजन व प्रतिग्रह) आजीविकेसाठीं आणि तीन ( यजन, दान व अध्ययन ) धर्मासाठीं अर्थात् समाजसेवेसाठीं करावींत असें सांगितलें आहे. यांपैकीं अध्यापनद्वारां आजीविका मिळत असली तरी त्याचा प्रधान उद्देश समाजसेवा हाच आहे. आजीविकेसाठीं अध्यापन करणारा उपाध्याय ब्राह्मणवर्गांत देखील विशेष प्रतिष्ठा पावत नाहीं.

कोणत्याहि धंद्यांत मनुष्य वर्णाप्रमाणें भिन्नवृत्तीनें राहूं शकेल. शिंप्याच्या मोठ्या दुकानांत रोजची मजूरी घेऊन टाके मारणें, बटनें शिवणें वगैरे फालतू कामें करणारा शूद्र शिंपी होय. शिवणकामाचें मोठें दुकान चालविणारा शिंपी वैश्यवर्णाचा शिंपी म्हणतां येईल. शहरांतील सर्व शिंप्यांना संघटित करून समाज आणि सरकार यांच्या विरुद्ध प्रसंगविशेषीं संप करून शिंपी जातीच्या हक्कांचें संरक्षण करणारा क्षत्रिय शिंपी असें म्हणतां येईल; आणि शिवणकामाचा वर्ग चालवून नवीन नवीन लोकांना त्या कलेचें सांगोपांग ज्ञान न चोरतां देणारास ब्राह्मण शिंपी असें म्हणतां येईल. ( यतिधर्मसंग्रह या ग्रंथांत दहा प्रकारच्या ब्राह्मणांचें वर्णन अत्रिस्मृतींतून उद्धृत केलें आहे तें अवश्य पहावें. त्यांत क्षत्रिय ब्राह्मण, वैश्य ब्राह्मण, म्लेच्छ ब्राह्मण इ० वर्ग पाडून त्यांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. जाती आणि वर्ग या दोन तत्त्वांच्या मिश्रणानें असल्या प्रकारचें वर्गीकरण उत्पन्न होतें. )

येथवर गुणशः या बाजूंचा विचार केला. पण वर्णव्यवस्था ही मुख्यतः समाजांत चालू असलेले सर्व इष्ट धंदे आनुवंशिक परंपरेनें चालून समाजद्रोही चढाओढ बंद करण्यासाठींच रचली गेली आहे.

समाजसेवेसाठीं परोपकारवृत्तीनें वाटेल त्यानें स्वतःला साधेल असें वाटेल तें काम करावें. कारण, यांत आजीविकेची चढाओढ नाहीं. आजीविका पत्करावयाची ती मात्र वंशपरंपरेनें जी प्राप्त असेल ती अथवा तत्सदृशच एखादी पत्करावी हा वर्णव्यवस्थेचा आग्रह आहे. आणि म्हणून सर्व वर्ण समाजाच्या दृष्टीनें समान गणले गेले आहेत. प्रत्येक वर्ण आपल्या ठायीं श्रेष्ठ आहे असा कल्याणकारी सिद्धांत नसला तर चढाओढ थांबावयाची नाहीं; आणि जगांतील द्रोह, विग्रह आणि असूया हीं बंद पडावयाचीं नाहींत. आनुवंशिक

संस्कारांमुळें स्वकर्म व स्वधर्म यांचें अनुशीलन करण्यांत असाधारण कौशल्य कमावलें जातें. सामाजिक दृष्टीनें हा फारच मोठा लाभ आहे. वकिलाच्या मुलाला बाळपणापासून वकिली धंद्याचें बाळकडू मिळतें. मोठेपणीं ठरलेलीं अशीलेंहि प्रथमपासून कायमचीं मिळतांत. आणि अशा रीतीनें अशील—वकील यांच्यामध्यें घरोब्याचा संबंध दृढावतो. कोणताहि धंदा पैसा उकळण्यासाठीं करूं नये असा आर्यसमाजशास्त्राचा नियम असल्यानें आणि दरेक धंद्याचे प्राप्तीचे दर 'सर्वभूतहिते रताः' अशा निःपक्ष व निःस्पृह समाजसेवक ऋषींनीं नक्की केले असल्याकारणानें भिन्न धंद्यांमध्यें मत्सर असण्याचें कारण नाहीं.

एखाद्या अपवादात्मक व्यक्तीला स्वतःच्या पिढीजाद धंद्याची गोडी नसेल आणि दुसराच एखादा धंदा विशेष अनुकूल दिसत असेल; पण अशा अपवादावरून समाजव्यवस्था व्यवस्थाशून्य किंवा तंत्रशून्य करणें हें बुद्धिशून्यतेचें लक्षण आहे. उपजीविकेची व्यवस्था केवळ समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच करण्यांत व्यक्तीचा विकास कुंठित होतो असें मानण्याचें कांहींच कारण नाहीं. शाली विणून पोट भरणारा कबीर आणि तंबू तयार करून स्वतःचें व स्वतःच्या शिष्यांचें पोषण करणारा सेंट पॉल यांचा कोणत्या बाजूचा विकास कुंठित झाला होता ?

स्त्रिया मुख्यत्वें शिशुसंगोपनांत गुंतल्या असल्यानें त्यांना आजीविकेसाठीं स्वतंत्र धंदा करण्याची आवश्यकता नसावी. पतीच्या धंद्यांत तिनें हातभार लावला म्हणजे त्यांतच सर्व कांहीं आलें. वस्तुस्थिति अशी असल्याकारणानें गोत्राप्रमाणें वर्णाच्या बाबतींतहि निश्चय करितां येईल कीं, पतीचा जो वर्ण तोच पत्नीचा वर्ण. जेथें रहाणी, करणी आणि विचारसरणी परस्परानुकूल आहेत आणि दुसरी कोणचीहि आक्षेपार्ह गोष्ट आड येत नाहीं अशा ठिकाणीं

ग्रं. क्र. ५००४

वर्णांतर विवाह झाले तरी त्यांत समाजद्रोह अथवा धर्महानि कर लीच नाहीं.

असले वर्णांतर विवाह करण्याचा आपण आग्रह धरून बसलों तरी ते फारसे होणार नाहींत. आणि समाजहितैषी लोक योग्य अपवादांना विरोध न करितां आशीर्वादच देतील तर सामाजिक वातावरण निरोगी आणि जिवंत राहील.

धर्माचें अध्ययन आणि आचरण तसेंच कालानुरूप संस्करण यांना प्राधान्य देऊन समाजांतील संस्कार, ज्ञान, कौशल्य आणि पराक्रम हीं वाढविण्यासाठीं जे लोक समाजसेवेच्या कामास स्वतःला वाहून घेतील ते ब्राह्मण.

धर्मशास्त्राचें (अर्थात् यामध्यें समाजशास्त्र पूर्णपणें आलें) संपूर्ण अध्ययन करून आणि समाजाच्या सर्व व्यवहाराची आवश्यक तितकी माहिती करून घेऊन समाजांतील सर्वच वर्गाच्या आणि घटकांच्या रक्षणपालनाची जबाबदारी निःपक्षपातपणें आणि निरलसपणें जो पार पाडतो तो क्षत्रिय.

समाजाच्या नित्य वर्धमान अशा निरनिराळ्या अंगांना उपयोगी अशा वस्तू तयार करून लोकांना विकणारे अथवा समाजोपयोगी अनेक प्रकारचें ज्ञान आणि कौशल्य कमावून समाजाला तें विकत देणारे आणि वस्तू किंवा कौशल्य प्राप्त करण्यांत, विकण्यांत आणि स्वतःच्या जीवनांत, जे लोक धर्माचे म्हणजे समाजहिताचें उल्लंघन करीत नाहींत ते वैश्य.

परिचर्या म्हणजे अंगसेवा देणें किंवा घेणें ही समाजहिताच्या दृष्टीनें फारशी हितावह नाहीं. जीं कामें प्रत्येकानें स्वतःच केलीं पाहिजेत तीं दुसऱ्याकडून करून घेण्यांत उभयपक्षीं व्यक्तीचें व समाजाचें अनहितच आहे. परिचर्या देणारे घेणारे परस्पर आश्रितच होत. वृद्धजन, रुग्णजन, दुर्बळ अथवा मूर्खजन आणि बालक हेच स्वभावतः परिचर्येचे

अधिकारी आहेत. अशांची परिचर्या समाजांतील कुटुंबांतील लोकांनी वेळांत वेळ काढून आद्य धर्म समजून केली पाहिजे. परिचर्या हा आजीविकेचा धंदा होतां कामा नये. समाज जेव्हां हीन होतो तेव्हां समाज-सेवेच्या क्षेत्रात धंदेवाईक लोक घुसतात आणि सेवेचीं कामें धंद्याचीं होऊन बसतात.

परिचर्या समाजहितदृष्ट्या भयावह आहे ही दृष्टि प्राचीन आर्यांत जितकी जागृत असावयास पाहिजे होती तितकी ती नव्हती. प्राचीन काळचे आर्यसदृश ग्रीक यवन लोक तर मानीत कीं, 'परिचारक गुलाम हे समाजाचें स्वाभाविक अंगच होत.' परिचर्यादोषामुळें आर्यसंस्कृति आणि ग्रीकसंस्कृति दोन्ही फारच खालावल्या असें आपण आज स्पष्ट पाहूं शकतों. यासाठीं गुलाम, शूद्र आणि अंत्यज इत्यादि वर्गांचा आपण नव्यानें विचार केला पाहिजे.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तीन्ही वर्ण संस्कारप्रधान आहेत. हे संस्कार घेण्याची ज्यांची पात्रताच नाहीं अथवा ज्यांना संस्कार देण्यांत समाज निष्फळ झाला अशा लोकांना जी आजीविका रहाते ती परिचर्येचीच. परिचर्या करणाऱ्यानें एकच गुण दाखवावयाचा असतो. तो म्हणजे नम्रता, संतोष अर्थात् असूयेचा अभाव.

एका बाजूनें परिचर्येचें क्षेत्रच कमी कमी करून टाकणें आणि दुसऱ्या बाजूनें शिक्षणशास्त्रांत नवीन नवीन प्रयोग करून संस्कार-दानांतील निष्फळतेचें क्षेत्र अगदीं संपुष्टांत आणणें हें समाजाच्या उत्कर्षाचें लक्षण आहे. असें केलें असतां शूद्र हा वर्ण नाहींसाच झाला पाहिजे. ज्या समाजांत शूद्र वर्ण मोठा आहे, तो समाज गळ्यांत मोठा धोंडा बांधून पोहूं रहात आहे, असें म्हटलें पाहिजे. असा समाज पराधीनच व्हावयाचा.

शिक्षण आणि स्वावलंबन यांच्या विकासानें शूद्र वर्णाला स्थान नाहीसें झाल्यावर बाकीच्या तीन वर्णांचा विचार करूं. आळस

आणि विलास हे दोन दोष जर कमी झाले तर लोभ आणि मत्सरहि कमी होतील. संतोष आणि पराक्रम या दोन गोष्टी जर पूर्ण प्रमाणांत वाढल्या तर कोणी कोणास लुटणार नाहींत. कोणी कोणाचा अन्याय करणार नाहींत. असें झाल्यास प्रजारक्षणाकडेच स्वतःचें आयुष्य वाहून घेणाऱ्या क्षत्रियांची संख्या आपोआप कमी होईल. समाजांत रोगराई वाढूं देत आणि डॉक्टर लोकांचा धंदा जोरानें चालूं दे असें ज्याप्रमाणें आपण इच्छीत नाहीं, त्याचप्रमाणें समाजामध्यें लूटफाट, अन्याय, जबरदस्ती वाढावी व शेजारचीं राष्ट्रें वाघालांडग्यासारखीं असावींत आणि त्यांच्यापासून प्रजेचें रक्षण करण्याची संधि क्षत्रियांना मिळून त्यांची प्रतिष्ठा आणि भरभराट वाढावी अशी इच्छा करणेंहि अयोग्यच होईल. आगीचा बंब, दुष्काळाचीं कामें आणि दवाखाने कामावांचून बेकार पडावेत अशी ज्याप्रमाणें आपण इच्छा करितों आणि तरीहि या गोष्टी जय्यत तयार ठेवितों त्याप्रमाणें क्षत्रियवर्ण रक्षणपरायण, निकरानें लढणारा, जिवाची पर्वा न राखणारा आणि पक्षपातरहित, त्याचप्रमाणें व्यसनरहित असावा. अशी तयारी ठेवूनहि समाजामध्यें आदर्श माणुसकी नांदूं दे आणि क्षत्रियवर्णाची जरूरच उरणार नाहीं असें होऊं दे अशीच इच्छा केली पाहिजे.

जोंपर्यंत जन्मतःच मनुष्यप्राणी शिक्षणसंपन्न आणि संस्कारसंपन्न असणार नाहीं तोंपर्यंत ज्ञानदान करणारा वर्ग आवश्यक असणारच. या वर्गाच्या हातीं सत्ता आणि मत्ता दोन्ही नसाव्यात. सत्य आणि सेवा, स्वावलंबन आणि गरीबी यांच्या जोरावरच त्यांनीं संतोषसमाधानानें असावें अशी व्यवस्था झाल्यानें हा वर्ग वाढल्याचें कधींच दुःख किंवा अरिष्ट वाटणार नाहीं. पण याची संख्या नेहमीं परिमितच असणार. ब्राह्मणाचा आदर्श कडक असल्यानें आनुवंशिक संस्कार असतील तरच त्याचें पालन सोपें होणार. तरीहि स्वतःच्या उज्वल जीवनक्रमानें वाटेल त्या वर्णाच्या मनुष्याला ब्राह्मण वर्ण

स्वीकारून सेवाकार्य करणें शक्य आहे व असलें पाहिजे. असा मनुष्य निरहंकारी असल्यानें आणि सर्व वर्ण समान आहेत अशी सामाजिक बुद्धि दृढ झाल्यानें जो ब्राह्मणवर्णांत जन्मला नाहीं तो स्वतःला ब्राह्मण म्हणवून घेण्याचा मुळींच आग्रह धरणार नाहीं. उलटपक्षीं समाजहि त्याचा जीवनक्रम पाहून त्याला ब्राह्मण म्हटल्यावांचून आणि ब्राह्मणाप्रमाणें वागविल्यावांचून मुळींच राहणार नाहीं हेंहि खरें आहे. अशाचे वंशज ब्राह्मण कुळांत मिसळून जाणें अगदीं स्वाभाविक आहे.

राहतां राहिला वैश्यवर्ण. वेदांमध्यें विट् अथवा विश् याचा अर्थ 'वैश्य' असाहि होतो, आणि सामान्यपणें 'मनुष्य' असाहि होतो. आणि तें यथायोग्य आहे. कारण विराट मनुष्यसमाज केव्हांहि वैश्यच असणार. या वैश्य समाजांत सर्व प्रकारच्या धंद्याचे लोक येतात. पुस्तकें लिहून पोट भरणारा, दिवाणगिरी करून राज्य चालविणारा, पगार घेऊन सरकारी न्यायाधिशाचें काम करणारा आणि चामडीं कमावून त्याचे जोडे करणारा हे शेतकरी, गवळी, साळी, विणकर आणि लमाणी( सार्थवाह ) लोकांसारखे वैश्यच आहेत. एका वैश्य वर्णांत असंख्य जातींच्या जमातींचा अंतर्भाव होतो. या सर्व जमातींमध्यें परस्पर विवाह होतीलच असें नाहीं. पण वर्णव्यवस्थेप्रमाणें प्रतिबंध नसावा. अशा रीतीनें विवाहव्यवस्थेचें निबंधन बरेंच स्वाभाविक झाल्यास समाज अधिक सुसंघटित आणि जोमदार होईल आणि स्त्रियांची स्थिति तर पुष्कळच सुधारेल.

# सप्तवर्ण्य

वर्ण म्हणजे रंग. जुन्या काळीं पांढरा, तांबडा, पिवळा आणि काळा असे चार वर्णांचे चार रंग कल्पिले होते. गायनविद्येंत राग-रागिणींचीं रूपें, रंग आणि नातींगोतीं ज्याप्रमाणें कृत्रिम कल्पनेनें बसविलीं गेलीं, त्याचप्रमाणें ब्राह्मणादि वर्णांचे चार रंग कल्पिले गेले. स्वतःच्या गोऱ्या कातडीचा अभिमान बाळगणाऱ्या पाश्चात्य संशोधकांना भारतवर्षीय आर्यलोकांमध्यें देखील वर्णाभिमान होता, असें म्हणण्याला यामुळें चांगलीच सोय झाली आहे. तीन वर्ण एकाच आर्य जातीचे होते आणि शूद्र मात्र आर्येतर एतद्देशीय मूळ रहिवासी होते, असेंहि म्हणतात. तें कसेंहि असो; जर सूर्यप्रकाशाचे रंग अथवा वर्ण सात आहेत तर आर्यकल्पनेप्रमाणें संपूर्ण समाजव्यवस्थेंत देखील सात वर्ण कां असूं नयेत ! अशी एक कल्पना प्रथम मनांत आली. समाजाच्या प्राथमिक अवस्थेंत सर्वच प्रकारचीं कामें एकाच व्यक्तीनें करणें साहजिक आहे. समाज जसजसा विकसित होतो तसतसे कार्यभेद–कर्तव्यभेद–स्थिर होऊन वर्ग अथवा वर्ण नक्की होतात. या दृष्टीनें पाहतां श्रुति–स्मृति–पुराणकाळीं आर्यसमाजशास्त्रानें प्रथम तीन व नंतर चार वर्णांची कल्पना केली, हें यथायोग्य झालें. पण आतां समाज अधिक जटिल झालेला आहे, जीवनक्षेत्राचा विस्तार वाढला आहे, तेव्हां त्यांत तीन वर्णांची भर टाकून इंद्रधनुष्याच्या सात रंगांप्रमाणें वर्णव्यवस्था संपूर्ण आणि सुंदर कां करूं नये अशी मूळ कल्पना.

प्राचीन ग्रंथांत लिहिलें आहे कीं, प्रथम एकच वर्ण होता. पुढें त्याचे तीन व चार वर्ण झाले. पण हें विधान विकासवादाच्या दृष्टीनें केलेलें नसून युगऱ्हासाच्या दृष्टीनें केलेलें असावें असें वाटतें. प्रथम

एकच देव होता, एकच वेद होता आणि वर्णहि एकच होता असें तें विधान आहे ( म. भा. ). एक वर्ण अर्थात् ब्राह्मणवर्ण. धर्म ज्यावेळीं समाजांत संपूर्णपणें जागृत असतो, आणि सर्वच लोक अत्यंत पवित्र, सत्यनिष्ठ आणि दीर्घायु असतात त्यावेळीं एक वर्ण असणेंच स्वाभाविक आहे. अशा कल्पनेनें तें विधान केलेलें असलें पाहिजे. सर्वच लोक सुशिक्षित, संस्कारसंपन्न, स्वावलंबी, संतोषी, सत्याग्रही आणि मोक्षपरायण झाल्यानंतर समाजांत एकच वर्ण उरेल असें आजहि आपणांस वाटतें. बौद्ध, जैन, ब्राह्मसमाजी वगैरे आर्यसांप्रदायांत देखील चातुर्वर्ण्याच्या कल्पनेस उत्तेजन नाहीं. केवळ हिंदूंनीं आणि केवळ हिंदूंसाठीं चालविलेल्या शिक्षणसंस्थांतूनहि चातुर्वर्ण्याला आज उत्तेजन नाहीं. जुन्या आचारांचें थोडेंसें स्तोम सांभाळण्यासाठीं बाह्य व्यवहारांत थोडासा दिखाऊ वर्णभेद कांहीं संस्थांतून पाळला जातो हें खरें, पण शिक्षणपद्धति आणि विद्यार्थ्यांचें व्यापक जीवन निर्वर्ण्य अथवा एकवर्णीच असतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. हा एक वर्ण कोणता हें ठरविणेंहि मुष्कील आहे. मध्यम स्थितींतील तरुणांना पांढरपेशी शिक्षण देणें एवढाच मतलब साधण्याचा यांत उद्देश असतो. वैश्य आणि शूद्र वर्णांचीं लक्षणें ज्यांत सम्मिलित झालेलीं दिसतात, त्यांत ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णांचीं लक्षणें दिसत असलीं तरी तीं केवळ शोभारूपच होत. जीवनामध्यें, शिक्षणामध्यें आणि संस्कारांमध्यें जेथें वर्णांचा लोप होत आहे तेथें चाराच्या ठिकाणीं सात वर्णांची कल्पना समाजापुढें मांडणें व्यवहारास कितपत धरून आहे हा एक मोठाच प्रश्न राहतो. चाराच्या ठिकाणीं सात वर्ण करून समाजसंघटन आपण अधिक दुर्घट तर करणार नाहींना अशीहि शंका डोकावते. पण जर वर्णव्यवस्था शास्त्रशुद्ध आहे आणि मानव जातीच्या उत्कर्षाभ्युदयास कारणीभूत आहे हा विश्वास खराखुरा आणि दृढमूल असेल आणि खरोखरच समाजशास्त्रदृष्ट्या वर्णव्यवस्था शास्त्रीय व्हावयाची असेल

तर वर्ण अधिक किंवा उणे झाल्याची क्षति बाळगतां कामा नये.

सामाजिक जीवनांत धंदे किंवा पेशे अगणित आहेत. पण समाजाच्या अस्तित्वास, स्थैर्यास आणि अभ्युदयास अत्यंत आवश्यक असे सामाजिक वर्ग कोणते पडतात हें आपण प्रथम पाहिलें पाहिजे आणि मग रहाणी-करणी-विचारसरणी या दृष्टीनें त्यांचे किती गट पडतात, हें ठरविलें पाहिजे. कांहीं धंद्यांना विशिष्ट काळीं असाधारण महत्त्व येतें आणि कांहीं धंदे निष्कारण हीन गणले जातात. हुन्नरी आणि कलाधर लोकांना प्राचीन समाजांत यथायोग्य प्रतिष्ठा नव्हती. एके काळीं त्यांना राज्यव्यवस्थेकडून सविशेष रक्षण आणि आश्रय मिळे. पण त्याबरोबर त्यांचें स्वाभाविक स्वातंत्र्य बरेंच संपुष्टांत येई. केव्हां केव्हां त्यांची स्थिति अगदीं गुलामाप्रमाणें होऊन जाई. उलटपक्षीं आज पाश्चात्य देशांत या वर्गांना त्यांच्या योग्यतेहूनहि अधिक असें समाजधुरीणांचे अथवा समाजगुरूंचें पद प्राप्त होऊं पहात आहे. या भेदाला ऐतिहासिक कारणें पुरतीं आणि सबळ आहेत हें खरें पण आपण वर्णव्यवस्थेचा विचार करितांना शक्य तितकी शास्त्रीय तटस्थता बाळगली पाहिजे.

सैन्य पोटावर चालत असतें अशी जी म्हण आहे ती अखिल समाजालाहि पूर्णपणें लागूं पडते. मनुष्य हा अन्नमय आहे; अन्नवस्त्रप्राप्ति हा जीवनाचा मुख्य आधार आहे हें आपण कधींहि विसरतां कामा नये. यांपैकीं वस्त्रास लागणारा कच्चा माल मुख्यत्वें वनस्पतिजन्य असल्यानें अन्नवस्त्राचा विचार एकत्रच करावा लागतो; तरी वस्त्रें निर्माण करण्याची कला जटिल आणि दीर्घकालीन असल्यानें वस्त्रें तयार करणें हा स्वतंत्र धंदाहि होऊं शकतो. शेतकी आणि विणकरीचा धंदा हे एकत्र गणावेत किंवा भिन्न गणावेत ? हे धंदे भिन्न असले तरी त्यांचा वर्ण एकच ठरविणें कदाचित् योग्य होईल. पण याचाहि खोलवर विचार केला पाहिजे. कारण शेतकीच्या धंद्यांत

जी विविधता असते, भूमीशीं, पशुपक्ष्यांशीं पर्जन्यादि प्राकृतिक शक्तींशीं आणि विविध मनुष्यजीवनाशीं जितका शेतकऱ्याचा संबंध येतो, तितका विणकऱ्याचा येत नाहीं. विणकऱ्याचा धंदा क्रयविक्रयरूपी बाजार या संस्थेशीं जितका संबद्ध आहे तितका शेतकीचा धंदा कदाचित् नसेल. शेतकीच्या धंद्यांत ऋतुपरत्वें जी विविधता असते तीहि विणकामांत नसते. या दोन्ही धंद्यांत मुख्य साम्य हें आहे कीं, दोन्ही धंदे मनुष्यजीवनास अत्यावश्यक आहेत आणि दोन्ही धंद्यांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेणें शक्य आणि आवश्यक असतें. हुषार मेहनती आणि उत्साही शेतकऱ्यांस विणकामाचा धंदा फावल्या दिवसांत घरींच करणें शक्य आहे हेंहि विसरतां कामा नये.

या दोन धंद्यांनंतर तितक्याच महत्त्वाचा पण कमी लोकांना गुंतवणारा धंदा सुतारी आणि लोहारी करणाऱ्या कारागिरांचा अथवा कारूंचा आहे. शेतकीचीं औतें, विणकरांचीं अवजारें, घरामध्यें लागणारीं तऱ्हतऱ्हेचीं उपकरणें आणि प्रत्यक्ष घर या सर्व कामांसाठीं सुतार, लोहार, गवंडी, कुंभार इ० कारागिरांची आवश्यकता आहे.

अन्न, वस्त्र, घर आणि माणुसकीचें मुख्य लक्षण जीं उपकरणें यांची सोय झाल्यानंतर मनुष्याला जर कोणाची अतिशय जरूर भासत असेल तर समाजांतील शहाण्या पुरुषांची. या शहाण्याला नवीन नवीन कल्पना सुचत असतात, मनुष्यस्वभाव माहीत असतो, जुन्या प्रसंगांचें स्मरण असतें, त्याचा स्वभाव बराचसा प्रयोगपरायण असतो, दुसऱ्याची अडचण ती आपलीच अडचण असें समजून ती दूर करण्यास झटण्याइतका त्याच्या हृदयाचा विकास झालेला असतो. या सर्व गुणांमुळें सर्वांस तो हवासा वाटतो. सर्व पशू ज्याप्रमाणें पाणी पिण्याच्या स्थानाकडे प्रत्यहीं जातात त्याप्रमाणें समाजांतील सर्व लोक अडल्यावेळीं त्याच्याकडेच धांव घेतात. कालांतरानें लोकांना प्रसंगविशेषीं आज्ञा करण्याची योग्यता त्याच्यांत येते. या योग्यतेमुळेंच सर्वांची बाजू पाहून

सर्वांचा न्याय करण्याचें काम त्याचेकडे येतें. सर्वांकडे समदृष्टीनें पहाण्याची योग्यता वाढविणें त्याला अपरिहार्य होतें.

त्याची बुद्धि, त्याची भावनाशक्ति, कल्पकता, सामर्थ्य आणि वेळ समाजसेवेकडे अधिकाधिक जाऊं लागल्यानें त्याच्या व्यक्तिगत सुखसमाधानाकडे लक्ष देण्याची काळजी, समाजाला वाटूं लागते. अग्रत्वाचा मान त्याच्याकडे येतो. अशा रीतीनें प्रतिष्ठेबरोबर त्याचें वैभवहि वाढतें.

एवढ्यावरच जर या शहाण्याची प्रगति खुंटली नाहीं तर त्याच्या मध्यें औदार्य, निस्पृहता, आणि स्वसुखनिरभिलाषवृत्ति या गोष्टी वाढल्याच पाहिजेत. त्यागानें आणि वैराग्यानेंच प्रतिष्ठा आणि वैभव हीं शोभतात, स्थिर होतात आणि वाढतात हें समजावयास फार वेळ लागूं नये. निष्कामसेवा हेंच परम तप आहे. अनाहूत ऐश्वर्य हें त्याचें फळ आहे.

‘ न सर्वः सर्वं वेत्ति ’ या न्यायानें या शहाण्याचे अनेक प्रकार किंवा अवतार होतात. हा शहाणा (हिंदीमध्यें याला ‘ सयाना ’ म्हणतात ) कोठें वैद्य होईल, कोठें हुन्नरी लोकांचा शास्त्रज्ञ-आचार्य होईल, कोठें न्यायाधीश होईल, कोठें राष्ट्राचा शाहीर होईल, कोठें राजा होईल, कोठें कुशल सेनानी होईल, समाजव्यवस्थापक धर्मकार होईल, नावाडी अथवा सार्थवाह होईल, तार्‍यांवरून भविष्य सांगणारा ज्योतिषी होईल, लोकांच्या ठेवी ठेवणारा व्यापारी सावकार होईल, साहित्याचार्य अथवा अध्यापक होईल अथवा लोकहिताची मोठीं मोठीं कामें करणारा स्थपति (इन्जीनियर) होईल.

चारित्र्याची उदात्तता याच्या खालोखाल जर एखाद्या गुणाची समाजांत अत्यंत चहा असेल तर ती सुचणुकीची आहे. सुचणूक, ‘ सूझ, ’ प्रत्युत्पन्नमति या एका गुणानेंच जगाची असाधारण प्रगति झालेली आहे. सुचणूक हे मनुष्यसमाजरूपी मोटारीचें पेट्रोल आहे.

चारित्र्याची आर्यता हें त्याचें सुकाणूं आहे. (आजच्या मनुष्यसंस्कृतींत सुकाणूंची प्रतिष्ठा कमी झाली आहे. सर्व लोक पेट्रोलचीच कदर करितात. यामुळें मानवी दुःखांचा ढीग वाढूं लागला आहे.)

समाजांतील या शहाण्याच्या वर ज्या अनेक विभूति सांगितल्या त्या वरवर पाहतां कितीहि भिन्न असल्या तरी मुळांत त्यांचें लक्षण एकच आहे. भिन्नभिन्न काळीं आणि भिन्नभिन्न समाजांत निरनिराळ्या विभूतींना प्राधान्य येतें. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, मुळांत एकच कोटी असूनहि या भिन्न विभूति एकमेकांचा मत्सर आणि तिरस्कार करीत असलेल्या दिसून येतात. पण त्यांत आश्चर्य कसलें! वृत्तिसाम्य अथवा क्षेत्रसाम्य असल्याखेरीज मत्सर अथवा तिरस्कार संभवतच नाहीं.

समाजांत ज्याप्रमाणें हा एक शहाण्यांचा वर्ग आपोआप उत्पन्न होतो आणि सामान्य व्यवसायापासून तो मुक्त राहतो त्याचप्रमाणें बुद्धिमांद्यामुळें आणि महत्वाकांक्षेच्या अभावामुळें सांगितलेलें काम करून असण्यांतच संतोष मानणारा एक वर्ग समाजांत असतो. आजवर सामाजिक अन्यायामुळें आणि शहाण्या वर्गाच्या नृशंस्यामुळें हा वर्ग बेसुमार वाढला आहे. बुद्धि असून विकासाला अवकाश नाहीं आणि महत्त्वाला पोहोंचण्याची योग्यता असून महत्त्वाकांक्षा ही वस्तूच आपल्यासाठीं नाहीं अशा तऱ्हेची वृत्ति होण्याजोगी परिस्थितिच सर्वत्र दिसून येत आहे. जगामधील थोर पुरुषांची यादी आपण अभिमानानें तयार करितों पण मनुष्यसंख्येच्या मानानें आणि मानवी शक्तीच्या मानानें ही यादी इतकी लहान आहे कीं, संकुचित दृष्टीचा स्वार्थ आणि अन्याय यांमुळें मानवकोटीचें अनंत रीतीनें अकल्याण करणाऱ्या लोकांनीं लज्जेनें मान खालींच घातली पाहिजे. कोट्यवधि दुर्दैवी लोकांना जर आपण योग्य संधि मिळूं दिली असती तर जगाच्या थोर कर्तबगार पुरुषांची यादी किमानपक्षीं हजारपट वाढली असती.

चातुर्वर्ण्याच्या पुनर्घटनेचा विचार करितांना आजवर झालेल्या या जगद्व्यापी अन्यायाचें परिमार्जन कसें करितां येईल याचा मुख्य विचार झाला पाहिजे. आजवर ज्यांनीं सामाजिक भाराचें वहन केलें पण सामाजिक पुरुषार्थापासून कांहींच फायदा मिळविला नाहीं, अशांना विकासाची विशेष संधि मिळवून दिली पाहिजे. अन्यायाचें बीं पेरून त्याचा विशाळ वृक्ष झाला आणि त्याचीं पाळेंमुळें कोट्यवधि लोकांना जखडून बसलीं. अशी स्थिति असतां आजवर झालें तें झालें; आहे ती स्थिति स्वीकारून यापुढें सर्वांनीं गुण्यागोविंदानें वागावें असा शांति-मंत्र 'तुष्टिरस्तु पुष्टिरस्तु' म्हणून गाणें म्हणजे अजगरानें गिळून टाकलेला पशु पचविण्यासाठीं फुरसत मागण्यासारखेंच आहे.

जुन्या शास्त्रांतून सांगितलें आहे कीं, आनुवंशिक संस्कार सात पिढी-पर्यंत पोहोंचतात. त्यावेळीं हें खरें असेल. पण शिक्षण, अनुकूल परिस्थिति, जबाबदारी, समान दर्जा, महत्त्वाकांक्षा, सत्संग आणि विकासास लागणारा अवकाश किंवा संधि या गोष्टींच्या जोरावर एकाच पिढींत वाटेल तितकी प्रगति करून दाखविणें शक्य आहे. या बाबतींत जुन्या शास्त्रकारांच्या वचनाला जेवढें प्रामाण्य आहे, त्यापेक्षां आजच्या समाजसेवकांच्या अनुभवाला अधिक प्रामाण्य असलें पाहिजे.

१ परिचर्येची मजूरी, २ उद्योगधंद्यांतील किंवा सार्वजनिक कामांतील मजूरी, ३ काबाडकष्ट करून दिवसाच्या शेवटीं रोजी मिळविण्याचा धंदा, ४ महिन्याच्या महिन्याला पगार मिळणारी नोकरी, ५ हुन्नर उद्योग करून पोट भरण्याचा व्यवसाय, ६ कारागीर लोकांना पदरीं बाळगून लहानमोठे कारखाने चालविण्याचा धंदा, ७ धंद्याच्या अब्रूचा ज्यांत विशेष विचार असतो असे पेशे ( Professions ), ८ पगार घेऊन समाजसेवेचीं लहानमोठीं कामें करण्याचा धंदा, ९ समाज देईल तें घेऊन अथवा तेंहि न घेतां निरपेक्षपणें सेवा करण्याचें पवित्र जीवन आणि शेवटीं १० अयाचित वृत्तीनें तपस्वीपणें

राहून समाजकल्याणाचें ध्यान करीत कर्तव्यातीत होऊन रहाणें, हें जीवनाचें उत्तरोतर महत्त्वाचे प्रकार आहेत. पेन्शन खाऊन किंवा नुसत्या व्याजावर राहून किंवा भिक्षा मागून आयतोबासारखें राहणें हाहि एक जीवनक्रम आहे पण त्याला वरील यादींत स्थान दिलें नाहीं. आजीविकेची श्रमशून्य व जबाबदारीविरहित अशी कायमची सोय लागणें ही एक व्यक्तीच्या दृष्टीनें आपत्तिच आहे. आणि समाजाच्या दृष्टीनें अनेक नैतिक रोगांचें तें मूळ आहे. जो स्वतःच्या आणि स्वाभाविकपणें जे स्वतःचे आश्रित आहेत त्यांच्या पोटांसाठीं श्रम करीत नाहीं, समाजाला इष्ट अशी कोणतीच सेवाहि करीत नाहीं, त्याचें जीवन भूमीला म्हणजे समाजाला भारभूत आहे एवढेंच नव्हें पण त्याच्या योगानें समाज आणि समाजतंत्र दोन्हीं संकटांत येऊन पडलीं आहेत असें निश्चित समजावें. अशा मनुष्याला जगण्याचा किंवा खाण्याचा अधिकारच नाहीं. विगलितसामर्थ्य असे वृद्ध, अर्भक, रुग्ण आणि वेड्यांत जमा असे मंद अथवा भ्रमिष्ट एवढ्यांचेंच ओझें समाजाला पुरेसें आहे. स्वतःच्या आळसानें आणि बेजबाबदारीनें समाजावर आपलें ओझें टाकणें हा सर्वांत मोठा समाजद्रोह आणि आत्मद्रोह आहे.

वर जीवनक्रमाची जी एक शिडी दिली आहे तिच्या पायऱ्या समजून घेतल्या पाहिजेत. उपजीविका, जीवनक्रम आणि समाजसेवा हीं अधिकाधिक निष्पाप असलीं पाहिजेत. त्यामध्यें स्वार्थापेक्षां समाजहिताची दृष्टि वर्धमान असली पाहिजे. जबाबदारीचें भान आणि त्यागवृत्ति हीहि अधिकाधिक विकसित झाली पाहिजे आणि सरतेशेवटीं समाजकल्याणासाठीं स्वतःला संपूर्णपणें विसरून जाऊन जीवन म्हणजे एक महान् आत्मयज्ञ झाला पाहिजे. या दृष्टीनें वरील पायऱ्या लावल्या पाहिजेत.

शूद्र हा वर्ण होतां होईल तों कमी करावा हें तर आपण ठरविलें

आहेच. पण तो अजीबात नष्ट होणें दुरापास्त दिसतें. क्षत्रिय हा वर्ण मात्र निराळा वर्ण म्हणून राहतां कामा नये. आत्मरक्षण करणें म्हणजे दुसऱ्याला ठार करण्यास तयार असणें अशी जी लोकांची समजूत झाली आहे ती काढून टाकिली पाहिजे. आत्मरक्षण असो किंवा समाज-रक्षण असो त्यासाठीं दुसऱ्याचा घात किंवा वध करण्याची आव-श्यकता सिद्ध झालेली नाहीं. रक्षणच जर इष्ट असलें तर सर्वांचेंच रक्षण झालें पाहिजे. हें रक्षण आत्मबलिदानानें करणें हाच क्षत्रि-याचा प्रधान धर्म होय. आज मारेकरी आणि खाटीक यांची वृत्ति आणि रक्षणार्थ स्वतःचें बलिदान देण्याची वृत्ति या दोहोंचा विचित्र संयोग करून क्षत्रियांचा आदर्श घडविलेला दृष्टीस पडतो.

प्रसंगविशेषीं दुसऱ्याला मारणें आवश्यक असणें, अपरिहार्य असणें निराळें आणि मारण्याच्या कलेंत निष्णात असे लोक तयार करून जय्यत ठेवणें, मनुष्यवध किंवा कत्तल करण्याची कठोर आणि कपटी कला पूर्णत्वास पोहोंचविणें हें निराळें.

खरें पाहतां आत्मरक्षणाची कला, मग ती आत्मिक सामर्थ्याची असो, बौद्धिक कुशलतेची असो अथवा शारीरिक सामर्थ्याची असो, प्राणिमात्रास आवश्यक आहे. प्रत्येक मनुष्यानें ही कला अवगत करून घेतली पाहिजे. ही कला जाणणारा स्वतंत्र वर्ण तयार करून बाकी-च्यांना त्या वर्णाचे आश्रित करणें म्हणजे सामान्य समाजाची खच्ची करण्यासारखें आहे. रघुकुळांतील राजानें मनूच्या वंशजांविषयीं जें म्हटलें आहे तें सबंध मनुष्यसमाजास लागू आहे. 'स्ववीर्यगुप्ता हि मनोः प्रसूतिः।' मनुष्यमात्र स्वतःच्या वीर्यानेंच रक्षित असला पाहिजे. समाजरक्षणाच्या कामीं समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा उपयोग झाला पाहिजे. पुरुष, बायका, युवान्, वृद्ध, सर्वांनाच आत्मरक्षणांत अथवा समाजरक्षणांत भाग घेतां यावा अशी ही रक्षणकला असली पाहिजे.

मनुष्याचा सामाजिक स्वभाव पाहतां युद्ध, हिंसा आणि कत्तल

यांची गोडी, शक्यता आणि ज्ञान सर्वांनाच असणें शक्य नाहीं. सर्वांना साधण्याजोगें असें सामर्थ्य म्हणजे संघटन, सत्याग्रह, बहिष्कार, असहकार आणि हृदयपरिवर्तन हेंच होय. शारीरिक दंड, धाक, जरब, दरारा अथवा कत्तल हीं आवश्यक आहेत असें मानलें, व त्यांचें शास्त्र तयार करून त्याचा प्रचार करणें इष्ट ठरलें तरी या शास्त्राचे निराळे तज्ज्ञ उत्पन्न करून चालावयाचें नाहीं. कारण असा वर्गच बाकीच्या समाजाला जरबेंत ठेऊन त्यावर कुरघोडी करावयाचा. यापेक्षां या मार्गाचें ज्ञान व शिक्षण सर्वसुलभ करून देणें हाच खरा मार्ग आहे. एवंच क्षात्रगुण प्रत्येकांत असावा, क्षात्र वर्ण निराळा नसावा, एवढें सिद्ध होतें. आपल्या चातुर्वर्ण्यांत हा एक मोठाच दोष राहिला होता कीं त्यानें युद्धकला, तिला लागणारे जीवनाचे सद्गुण, आणि तद्विषयक जबाबदारी मूठभर लोकांच्या हातीं ठेवून दिली. यायोगें समाज सुदृढ, संघटित आणि सुश्लिष्ट होऊं शकला नाहीं. हा आपला हजारों वर्षांचा अनुभव आहे. शिवाजी महाराजांच्या लक्षांत ही गोष्ट कांहीं अंशीं आली होती असें मानण्यास जागा आहे. कारण त्यांनीं पूर्वपरंपरेंत जे महत्त्वाचे दोन तीन फेरफार केले त्यांत ही गोष्ट दिसून येते. कोणालाहि जमीन जहागीर न देणें, राजसत्तेचा उपयोग परदेशांशीं व्यापार वाढविण्यासाठीं करणें, या दोन गोष्टी जशा त्यांच्या स्वतंत्र आहेत, त्याप्रमाणें आपल्या अष्टप्रधानांपैकीं प्रत्येकास सेनाधिपत्य हें सामान्य असलेंच पाहिजे असा त्यांचा नियम हीहि आहे. याचा अर्थ असा कीं, अष्टप्रधानांपैकीं प्रत्येकजण उत्तम सेनापति असून त्याखेरीज त्यानें आपल्या खात्याचें तज्ज्ञ असलें पाहिजे.

क्षत्रिय हा वर्ण निराळा न करितां मनुष्यमात्र क्षत्रिय असला पाहिजे असा सिद्धांत यापुढें तरी आपण स्वीकारलाच पाहिजे.

शेतकरी हा जात्याच क्षत्रिय असतो. जो क्षेत्राचा मालक झाला त्यानें त्याच्या रक्षणासाठीं आपले प्राण खर्ची घालण्यास तयार झालेंच

पाहिजे हें स्वाभाविक आहे. जो कुटुंबवत्सल झाला, गृहस्थाश्रमी झाला त्यानें आपल्या कुटुंबाचें रक्षण करण्यासाठीं प्राण खर्चीं घालण्यास तयार झालेंच पाहिजे. पशुपक्ष्यांत देखील हा नियम आपण पाहतों कीं, नर, मादी आणि विशेषतः मादी आपल्या अर्भकाच्या रक्षणासाठीं क्षात्रतेजानें जपत असते आणि प्रसंगीं स्वतःचे प्राण खर्चीं घालण्यास मागें पुढें पहात नाहीं. ज्यानें म्हणून संपत्ति बाळगली त्यानें क्षात्रधर्म स्वीकारल्यावांचून चालावयाचें नाहीं. जो समाजाची सेवा घेतो अथवा कोणत्याहि रीतीनें समाजाची सेवा करतो त्याला समाजाचें रक्षण करण्याची जबाबदारी टाळतां येतच नाहीं. तेव्हां सत्याग्रह असो किंवा हत्याग्रह असो, शस्त्रयुद्ध असो किंवा अहिंसक युद्ध असो, त्याचें शास्त्र व त्याची कला विश्वजनीन असली पाहिजे.

येथवर शूद्र आणि क्षत्रिय या दोन वर्णांचा विचार झाला. आतां ब्राह्मणवर्णाचा विचार करूं. येथें आपण प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, कर्मकांडी धर्माचा मनु आतां राहिला नाहीं. पुरोहिताची जरूर आतां फारशी उरणार नाहीं. आणि थोडीफार उरलीच तर पुरोहिताचा पेशा परिचर्यात्मक असल्यानें शूद्रांत गणला जाईल. दुसऱ्यासाठीं देवपूजा करणें, दुसऱ्यासाठीं मंत्र म्हणणें आणि विधी चालविणें, दुसऱ्याकडून संस्कारांत भाग घेणें, दुसरे सांगतील त्याप्रमाणें धार्मिकग्रंथाचें पठन-श्रावण करणें आणि या रीतीनें स्वतःची आजीविका मिळविणें हें शूद्रकर्मच होय. आचारी, मालिश करणारे, मेणा उचलणारे भोई यांच्याबरोबरच वरील वर्गाचा दर्जा गणला जाईल.

शास्त्रग्रंथांचें पठनपाठनद्वारां रक्षण हाहि आतां ब्राह्मणाचा धर्म राहिला नाहीं. कर्मकांडी शास्त्रें मागें पडणार आणि समाजव्यवस्थेचीं आणि चारित्र्यसंघटनाचीं शास्त्रें पुढें येणार. स्वर्ग नरकादि परलोकांचा इतिहास—भूगोल लोकांना आतां खरा वाटत नाहीं. ईश्वराची भक्ति करावी, आचरण पवित्र ठेवावें, गोरगरीबांची सेवा करावी.

प्रामाणिकपणें समाजाची सेवा करावी, साधेपणानें आणि कडकपणानें रहावें आणि अंतीं सर्व गोष्टींतील मन काढून घेऊन विरक्तपणें जीवन पुरें करावें हाच खरा धर्म आहे हें जाणत्यांना समजू लागलें आहे. या प्रकारच्या धर्मांचा विचार असलेले ग्रंथ केवळ ब्राह्मणांनींच वाचावे किंवा संभाळावे असें म्हणतां यावयाचें नाहीं. आत्मिक कल्याण आणि समाजहित यांची जबाबदारी सर्वांना सारखीच आहे. तपश्चर्या आणि त्यापासून मिळणारें सामर्थ्य सर्वांनाच आवश्यक आहे. ज्ञानाचा प्रचार सर्वत्र अधिकाधिक जोरानें झाला पाहिजे. तेव्हां या कामासाठीं देखील निराळा वर्ण नको.

निराळा वर्ण हवा आहे तो आचार्यांचा. शिक्षक, धर्मोपदेशक, धर्मशोधक आणि दिशादर्शक गुरु असा एक वर्ग हवा आहे. याला आचार्य असें नांव देणें योग्य होईल. आचिनोति हि शास्त्रार्थं आचारे स्थापयत्युत। स्वयमाचरते यस्तु स आचार्यः प्रचक्षते ॥ अशी आचार्यांची व्याख्या आहे. समाजांतील ज्ञानी, कुशल आणि पवित्र पुरुष कसे काय वागतात, कशाप्रकारचें जीवन पसंत करितात हें सर्व पाहून जीवनशास्त्र रचावयाचें असतें. अशा जीवनशास्त्राची परंपरा समजून घेऊन त्यांतील उद्देश व व्यवस्था नक्की करून प्रजेपुढें मांडणें हें आचार्याचें प्रथम कर्तव्य पहिल्या ओळींत सांगितलें आहे. शास्त्राची ही दिशा चालू परिस्थितींत आचरणांत कशी आणावयाची हें नक्की करून त्याचा बोध व प्रचार करणें आणि नेहमीं जागरूक राहून समाज सदाचारी होईल, त्याची आर्यवृत्ति वृद्धिंगत होईल, अशी काळजी वाहणें व सतत प्रयत्न करणें हें त्याचें दुसरें कर्तव्य नंतर सांगितलें आहे. हें सर्व करण्यासाठीं स्वतःचें जीवन सर्वोच्च असलें पाहिजे. आत्मोन्नतीच्या दृष्टीनें, नवीन नवीन अनुभव वाढविण्याच्या दृष्टीनें आणि समाजाला धडा घालून देण्याच्या दृष्टीनें यांचा स्वतःचा आचार अत्यंत निर्मळ, उज्ज्वळ, कडक, प्रसन्न आणि अखंड अशा खोल

ग्रंथ संग्रह
स्थल प्रत ६७

विचारानें जागरूक असा असला पाहिजे. ही मर्यादा तिसऱ्या चरणांत सांगितली आहे.

अशा आचार्यांनें जगांत चाललेले जीवनक्षेत्रांतील निरनिराळे प्रयोग तपासले पाहिजेत; जबाबदारपणें स्वतः अनेक प्रयोग चालविले पाहिजेत; जीवनशास्त्र वृद्धिंगत होईल, मागें पडणार नाहीं याची खबरदारी घेतली पाहिजे; आणि निरलसपणें समाजाचें निरीक्षण व समाजाची सेवा चालविली पाहिजे.

एवढी महत्त्वाची जबाबदारी ज्याच्या डोक्यावर आहे, त्याच्या हातीं इतर कामें व इतर अधिकार आपोआप येऊं लागणार. हीं नवीं कामें व हे नवे अधिकार मूळच्या पवित्र जाबाबदारीला पोषक आहेत किंवा बाधक आहेत याचा सूक्ष्म विचार झाला पाहिजे. असा विचार करितां लवकरच नजरेस येईल कीं, हा आचार्यवर्ग जितका तटस्थ आणि अलिप्त राहील आणि एकाग्रपणें स्वकर्तव्यरत राहील तितकाच तो कृतार्थ होणार आहे. या वर्गाच्या हातांत व्यावहारिक सत्ता होतां होईल तों नसावी. लोकांना दंड करणें, लोकांपासून कर वसूल करणें, इत्यादि राजत्वाचे अधिकार या वर्गाकडे नसावेत. नाहीं तर तो भ्रष्ट होईल. हा वर्ग स्वतःच्या चारित्र्यानें, तपानें व दानानें, निःस्पृहतेनें व सर्वकारुणिकतेनें सर्वमान्य, श्रद्धेय आणि अनुसरणीय असा असेल. या वर्गाची सत्ता आध्यात्मिक असावयाची. लोकांची बुद्धि, हृदय आणि लोकांचें संघटन यांवर जी स्वाभाविक छाप पडेल तीच यांची शक्ति.

असा वर्ग लोकांच्या दानबुद्धीवर अवलंबून राहील आणि राजनियमनापासून बराचसा मुक्त राहील. सर्व समाजांत जी धर्मबुद्धि आहे तिच्या कसोटीवर हे लोक कसले जाणार; हाच काय तो यांच्यावरचा मुख्य अंकुश. हे लोक समाजावर राज्य करणार नाहींत आणि समाज यांच्यावर राज्य करणार नाहीं अशी स्वाभाविक स्थिति असली

पाहिजे. साधेपणा, गरीबी आणि संयम आणि निरलस अखंड उद्योग, त्याचप्रमाणें निःपक्षपातिता, कारुण्य आणि अखंड सेवा या गुणांनींच हा वर्ग टिकणार आहे.

ब्राह्मणाच्या कर्तव्याची अशी छाननी करून भविष्यकाळीं आवश्यक अशा गुणकर्मवृत्तींचा निश्चय केल्यानंतर व त्याला जाणूनबुजून नवें नांव दिल्यावर वैश्य वर्णाचाच विचार करावयाचें राहतें.

कृषिगोरक्ष हीं एकत्र असूं शकतात. वाणिज्य हें निराळें पडतें. कृषी ही स्वभावतःच स्थावर वृत्ति आहे. वाणिज्य हें प्रवासमूलक असल्यानें तें निराळें पडतें.

[ शेतकऱ्यांनीं आपली जमीन सोडून कोठें जाऊं नये असें म्हणण्याचा येथें आशय नाहीं. शेतकऱ्याला आपल्या शेतांतील, बागेंतील आणि कुरणांतील सर्व प्रकारचें उत्पन्न–धान्य, गवत, फळें, तेलें, पशु-पक्षी, मध, अंडीं वगैरे पदार्थ– जेथें किफायतीचा भाव मिळेल तेथें जाऊन विकण्याची सोय आणि संवय असली पाहिजे. शेतकी करावयाची म्हणजे बैल हा बाळगलाच पाहिजे. शेतकऱ्याला ज्याप्रमाणें रिकाम्या दिवसांसाठीं दुय्यम धंदा हवा आहे त्याप्रमाणें बैलालाहि स्वतःचें पोट सर्वस्वीं शेतीवर टाकणें शक्य नसल्यानें दुय्यम धंदा असला पाहिजे. हे धंदे दोन : एक वाहतुकीचा व दुसरा घाण्याचा. शेतीचा माल आणि इतर माल रिकाम्या दिवसांत आसपासच्या पेठांना पोचविणें हें शेतकऱ्याचेंच काम आहे. बैलाला रिकामा ठेवून मोटारींतून असा माल नेणें हें राष्ट्रघातक आहे, हें आपण समजलेंच पाहिजे व प्रजाकीय सरकारांनीं बैलाच्या या जोडधंद्याला रक्षण दिलेंच पाहिजे.

तेलाला लागणाऱ्या बिया अथवा शेंगा अथवा धान्यें शेतकऱ्यांकडेच मिळतात. तेलाबरोबर तयार होणारी पेंड, गुराढोरांचा खुराक म्हणून अथवा शेताचें खत म्हणून, मुख्यतः शेतकरीच वापरतो

यामुळें हा तेलाचा धंदा शेतकऱ्यांनीं केल्यास सगळा नफा त्यांच्याच घरीं राहूं शकेल. ]

शेतकऱ्याबरोबर बागवान हा आलाच. हिंदुस्थानांत फळझाडांची लागवड पुष्कळच वाढविली पाहिजे; आणि सुकलेलीं किंवा ताजीं फळें व त्यांतील काजू, बदाम, गोडंब्या वगैरे बिया अथवा 'बदाम' यांचा उपयोग आहारांत जास्ती केला पाहिजे. जमीन वारंवार नांगरून त्यांत धान्य पेरण्यापेक्षां जमिनीची चांगली मशागत ठेवून त्यांत उत्कृष्ट फळझाडांची लागवड करणें हें आहाराच्या दृष्टीनें व नफ्याच्या दृष्टीनें अधिक फायदेशीर होण्याचा संभव आहे. अहिंसेच्या दृष्टीनें तर इष्ट आहेच.

धनगर आणि गवळी यांचे धंदे देखील शेतकऱ्यांच्या धंद्यांहून फार दूर जातां कामा नयेत. लोकरीची पैदास करणें व ती कांतून विणून त्याचीं वस्त्रें करणें हें काम देखील शेतकीशीं संबद्ध आहे. आज धनगराजवळ जमिनी नाहींत. त्यांना भटकत हिंडावें लागतें. यामुळें या गरीब जातीला किती कष्ट पडतात याची कल्पना जिव्हाळ्यानें त्यांच्या जीवनाचा तपास केला तरच येईल; नाहीं तर त्यांच्या वंशांत गेल्यानेंच कळेल. उलट बाजूनें शेतकऱ्याजवळ शेळ्यामेंढ्या नसल्यानें त्याला खतापायीं बराच खर्च करावा लागतो. लोकरीचे कपडे जे घरींच तयार करणें शक्य आहे ते विकत घ्यावे लागतात आणि जे अन्नाहारी नाहींत त्यांचा आहाराचा खर्च देखील वाढतो. ही सर्व आपत्ति टाळण्यासाठीं क्षेत्रपाल आणि मेषपाल हे एकच असावेत हें चांगलें. [अहिंसेच्या दृष्टीनें, अन्नाहाराच्या दृष्टीनें विचार करितां येथें एवढें नमूद करून ठेविलें पाहिजे कीं, पशूंचें पालन आपण स्वार्थासाठीं करीत असल्यानें त्यांचा वंशविस्तार आपण आपल्या गरजेहून अधिक होऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. ] दोऱ्या वगैरे वनस्पतिजन्य

पदार्थ तयार करण्याचें कामहि शेतकऱ्यांच्या बायकामुलांनींच करण्याचें असतें.

हे सर्व धंदे एकत्र केल्यानंतर या वर्णाला कांहीं नवीन नांव दिलें पाहिजे. हा वर्ण सर्व समाजाचें भरण–पोषण करीत असल्यानें त्याला जुन्या पद्धतीनें ' स्वामी-गोसावी ' असें म्हटलें पाहिजे. आपण त्याला **' भर्ता किंवा पूषा '** असें म्हणूं.

विणकऱ्याचा धंदा निराळा ठेवावा किंवा शेतकऱ्याच्या बरोबरच ठेवावा हें नक्की करणें जरा कठीण आहे. कापूस किंवा इतर तंतू तयार करण्याचें काम शेतकरीच करितो. हे तंतू पिंजून कांतून सूत किंवा धागा तयार करणें हेंहि मुख्यत्वें शेतकरी कुटुंबाचेंच काम आहे. खरें पाहतां मनुष्यमात्रानें हातचाळा म्हणून हें काम केलें पाहिजे.

मनुष्य जर शीतनिवारणाचा आणि लाज झांकण्याचा एवढाच उद्देश धरून वस्त्र वापरील तर विणण्याचें कामहि शेतकऱ्यानें फावल्यावेळीं करून चालेल. पण वस्त्र शोभा आणि प्रतिष्ठा यांचें साधन म्हणून अधिक वापरलें जातें. यामुळें विणकरांचा धंदा स्वतंत्रपणें नित्य चालूं लागला, त्यांतील कौशल्य वाढलें व त्याला कारागिरीचें रूप आलें.

आपण कारागिरांचा कल्पक म्हणून एक स्वतंत्र धंदा अथवा वर्ण बनविणार आहोंत. तेव्हां विणकरांनीं वाटल्यास शेतकरी आदि पोषक वर्गांत रहावें किंवा सुतार, लोहार आदि कल्पक वर्गांत रहावें.

पोषक वर्ग मुख्यत्वें कच्चा माल तयार करितो, आणि कल्पक कच्च्या मालावर आपलें कौशल्य चालवून पक्का माल तयार करितो.

दगडाच्या व धातूच्या खाणींमध्यें काम करण्याचा धंदा हाहि विणकरांच्या धंद्याप्रमाणेंच सरहद्दीवरचा धंदा आहे. पोषक आणि कल्पक दोहोंची वृत्ति त्यांत समान आहे. असे सरहद्दीवरचे धंदे वर्णव्यवस्थेला एकजीव करण्याला अतिशय उपयोगी पडतात. सात वर्ण निरनिराळ्या तळ्यांप्रमाणें अगदीं परस्पर अस्पृश्य न राहतां इंद्रधनु-

ध्याच्या रंगांप्रमाणें एकमेकांत मिसळलेले चांगले. एखाद्या मोठ्या देशांत अनेक भाषा चालू असल्या म्हणजे भाषांच्या सरहद्दीवर भाषांची जी भेसळ होते ती अपरिहार्य आहे. अशी भेसळ कांहीं अंशीं कर्णकटु असली तरी उभय भाषांना विनिमयाचें साधन होऊन त्यांना परिपुष्ट करण्यास कारणीभूत होते. त्याचप्रमाणें सरहद्दीच्या वर्णांचें समजावें.

आतां आपण कारागीर लोकांच्या कल्पक वर्णाचा विचार करूं या. आपला आचार्यांचा प्रथम वर्ण हा शोधक व कल्पक आहे खरा. पण निरनिराळ्या कल्पनांचा कौशल्याकडे उपयोग करून तरतऱ्हेचीं उपकरणें समाजाला पुरी पाडणें हें काम त्याच्या हातून होणार नाहीं. आचार्यवर्णांतील कांहीं लोक कल्पक कारागिरांत प्रवेश करतील, आणि कांहीं कल्पक कारागीर निवृत्तवृत्तीनें राहून आचार्यवर्णांत प्रवेश करतील. पण दोहोंचें कार्यक्षेत्र आणि जीवननिष्ठा ( attitude towards Life ) इतक्या कांहीं भिन्न असणार कीं, हें अपवाद अपवादच रहावयाचे.

कल्पक अथवा हुन्नरी लोकांचा वर्ण बहुतकरून स्वभावानें एकलकोंडा असतो. तो समाजसेवक असला तरी आपल्या कामांत तो इतका चूर असतो कीं, बहुतेक काम तो आपल्या हौसेसाठींच करीत असतो. म्हणून स्वतःच्या धंद्याचा विशिष्ट धर्म नक्की करून आग्रहपूर्वक त्याचें पालन करण्याकडे त्याची वृत्ति विशेष. अशा कारागिराला जेव्हां पैशाचा लोभ सुटतो तेव्हां तो एखाद्या कारखानदाराचा आश्रित होऊन तज्ज्ञ मजूर म्हणून यथेच्छ पैसे मिळवितो व अशा रीतीनें ठराविक साचाच्या मालाचे ढीगच्या ढीग तयार होतात. आणि गिऱ्हाइकी जिंकण्यासाठीं पुढें राष्ट्राराष्ट्रांमध्यें बाजार–युद्धें सुरूं होतात. कल्पकवर्ण आणि आचार्यवर्ण स्वधर्मभ्रष्ट झाले म्हणजे सामाजिक व्यवस्था बिघडते, आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य नष्ट होतें आणि कलेची मौलिकताहि लयाला जाते.

कल्पक वर्णात सुतार, लोहार, गवंडी, रस्ते तयार करणारे पथिक, वैद्य, शिंपी, चांभार, लेखक ( सुंदर अक्षरानें लिहून देणारे ) इ० अनेक धंदे समाविष्ट होतात. या सर्वांचा मिळून एकच वर्ण करणें कांहींसें कठिण आहे. सगळ्यांची रहाणी–करणी सारखी नसणार तरी यांचा एकच वर्ण करण्याकडे समाजानें आपली सगळी शक्ति वापरली पाहिजे, चांभार, शस्त्रवैद्य आणि सोनार यांचें कौशल्य जवळ जवळ सारखेंच. चांभाराचा धंदा जर जुगुप्सित तर शस्त्र-वैद्याचा धंदा कांहीं कमी नाहीं. आणि शस्त्रवैद्याची रहाणी जर शुचि-र्भूत ठेवितां येते तर चांभाराची तशी कां येऊं नये ?

यानंतरचा वर्ण तो मालाच्या विनिमयास स्वतःला वाहून घेत-लेला सार्थवाहांचा वणिकवर्ग. यांतच दुकानदार, कारखानदार आणि सराफ इत्यादि लोक येतात. आजचे दुकानदार घरबसल्या दुकान चालविण्यास सोकावले आहेत. बैलांचा तांडा, गाड्यांची रांग अथवा जहाजांचा काफला घेऊन हिंडणारा वर्ग आणि दुकानदार यांची फारकत झालेली आहे हें अनेक रीतींनें अनिष्ट आहे. या योगें सार्थवाहांचा वर्ग अगदीं असंस्कारी आणि गरीब होऊन गेला आहे, आणि दुकानदार वर्ग निदान आपल्या देशांत तरी बराचसा आंधळा आणि साहसशून्य असा झाला आहे. सार्थवाह, दुकानदार व कार-खानदार या तीन्ही बाजू जर एकाच कुटुंबांत राहिल्या तर कुटुंबें संघटित, समर्थ व समृद्ध होतील. मात्र कारखानदारी कल्पकवर्गाच्या नाशास कारणीभूत होऊं नये; याविषयीं खोलवर विचार करून व्यवस्था करावी लागेल. आज येथें त्याची अधिक चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं.

या वणिकवर्गाकडे स्वाभाविकपणें समाजाची बरीचशी संपत्ति रहाते. ती त्यानें स्वतःची आहे असें समजतां कामा नये. संपत्तीचा प्रवाह जसा सहजासहजीं या वर्णाच्या हातीं येतो त्याचप्रमाणें सहजा-

सहजीं सार्वजनिक हितासाठीं त्याच्या हातून संपत्ति सुटली पाहिजे. हें काम स्वेच्छेनें, धर्मबुद्धीनें आणि हौसेनें न झालें तर याविषयीं सामाजिक नियमन कायद्याच्या द्वारां करावें लागेल. पण समाजांत धर्माचें साम्राज्य संपुष्टांत आणून कायद्याचें साम्राज्य वाढविणें हें सोपें भासत असलें तरी संस्कृतीला हीनता आणणारें आहे हें विसरतां कामा नये.

भर्ता, कुशल [ कल्पक ] आणि वणिक अर्थात् शेतकरी, कारागीर ,आणि दुकानदार या तीन वर्णांना प्रेरणा देणारा, त्यांना रस्ता दाखविणारा, आत्मोन्नति आणि सामाजिक कल्याण या उभय दृष्टींनें त्यांचा धर्म त्यांना लावून देणारा असा आचार्य इतक्यांचा आपण विचार केला. आतां वर सांगितलेल्या त्रैवर्णिकांना संघटित करणारा, त्यांचें सामर्थ्य वाढविणारा, त्यांचा म्होरक्या-संचालक-धुरीण-या वर्गाचा अथवा वर्णाचा विचार करणें प्राप्त होतें. धुरीण म्हणजे समाजाची धुरा वहन करणारा जबाबदार आणि समाजाला इष्ट दिशेनें खेंचून नेणारा पुढारी होय. याला योजक असेंहि म्हणतां येईल. द्रव्यबळ, बुद्धिबळ आणि संख्याबळ [ म्ह० मनुष्यबळ ] तीन्हीं याला वश असल्यानें याची शक्ति असाधारण आहे. धर्मबळ आणि तपोबळ असलेल्या दीर्घदर्शी आचार्यांच्या खालोखाल याचेंच महत्त्व आहे. हा जर स्वधर्मभ्रष्ट झाला तर समाजाला रसातळास नेईल. आज पाश्चात्यांकडे हा वर्ग सामान्यपणें स्वार्थी झालेला आहे. संख्याबळाची सेवा करण्याच्या ऐवजीं स्वार्थासाठीं संख्याबळाचा तो उपयोग करितो. यानें द्रव्यबळ आपल्याच ताब्यांत घेतलें आहे व बुद्धिबळाला वाटेल तेव्हां विकत घेऊन तो भ्रष्ट करूं शकतो. यामुळें द्रव्यबळ आणि मनुष्यबळ यांचा परस्पर घोर विद्रोह तेथें माजला आहे. प्राचीन काळीं राजेलोकांवर धर्माचा जो अंकुश असे तसा अंकुश या वर्णावर असला पाहिजे, पण तो नाहीं. मनुष्यस्वभाव जसा षड्रिपूंना वश आहे तसा तो धर्मालाहि वश आहे. ही श्रद्धा तेथील समाजानें

सोडून दिली आहे. धर्माचें स्थान कायदा–कानू आणि राजकीय नियमन यांनीं घेतलें आहे. यामुळें खरी प्रगति कुंठित झाली आहे. लोकशिक्षणानें जें कांहीं थोडें फार धर्मजागृतीचें कार्य चालविलें आहे तें जर नसतें तर तेथील समाजाचा नाश व्हावयास मुळींच वेळ लागला नसता. Noblesse oblige म्हणजे खानदानीचा धर्म–समाजांत ज्याचें वर्चस्व, महत्त्व आणि प्राधान्य, त्याचा धर्महि अतिशय उग्र आणि कठीण हें तत्त्व–जेथें क्षीण झाला तेथें नरक जवळ आलाच म्हणावयाचा. नरक म्हणजे समाजबंधनें शिथिल होऊन समाजाचा होणारा विच्छेद.

या धुरीण वर्गांत सर्व प्रकारचीं महान् कार्यें करणारे, आणि लोकांची संघटित शक्ति वापरणारे संचालक, व्यवस्थापक, योजक आणि पुढारी आले. राज्यकर्ते लोक जर स्वतःला लोकसेवक समजून वागूं लागतील तर तेहि याच कोटींत येतील. प्रजाहितार्थ अंशतः प्रजापीडन करणें आवश्यक आणि इष्ट आहे अशी मनुष्यसमाजाचा उपमर्द करणारी बुद्धि ज्यांच्यामध्यें आहे त्यांना धुरीण असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. धाकदराऱ्याच्या योगानें व दंडेली करणाऱ्या लोकांचें भय पुढें करून सामान्य लोकांवर स्वतःच व्यवस्थित दंडेली करणें ही कांहीं खरी समाजसेवा नव्हे. थोडी जबरदस्ती पुरवली, थोडा स्वातंत्र्यनाश पुरवला पण अनर्थकारी अव्यवस्था नको अशी कृपण बुद्धि जनसमाजांत वावरत आहे तोंवर हें असेंच चालावयाचें. आणि इतकें करूनहि चोर लुटारू इत्यादिकांच्या भयापासून परिपूर्ण रक्षण मिळत नाहीं तें नाहींच.

प्रथम आपण हें ओळखलें पाहिजे कीं, सुस्निग्ध व्यवस्था ही जशी मनुष्याच्या हाडींमासीं उतरली नाहीं त्याचप्रमाणें अव्यवस्था आणि अंदाधुंदी हीहि मनुष्याच्या हाडींमासीं खिळलेली नाहीं. सत्तातंत्र असो वा नसो, व्यवस्था आणि अव्यवस्था दोन्ही समाजांत आहेत

तितक्याच असणार. केवळ अव्यवस्थेच्या भयानें आपण अपमानास्पद आणि खर्चाळ असें व्यवस्थातंत्र विकत घेतो.

यापुढचा वर्ण तो प्रजारंजकांचा. गायन, चित्रकला, नटनाट्य, साहित्यसेवा व शिल्प इत्यादि कलांच्या द्वारां लोकांना त्रिगुणात्मक आनंद देण्याचें काम हा वर्ण करतो. कलाद्वारां हृदयाची उन्नति किंवा अवनति होते, व म्हणून या वर्गाचें समाजावर प्रभुत्व असाधारण असते. एका काळीं या वर्गाला फावल्या वेळीं मनोरंजन करणाऱ्या विदूषकाचें किंवा खिदमतगाराचें स्थान असे. पण पूर्वकाळीं ऋषि, आचार्य किंवा धर्मकाराबरोबरीची याची योग्यता असे. हृदयांतील गूढ भावांना जागृत करून हृदयांतील कोमल, आर्य आणि ओजस्वी अशा भावांना हा पाणी चढवितो, ओप काढतो आणि अशा रीतीनें धर्म आणि नीतीचें काम सोप्या रीतीनें करतो. हा इंद्रियगम्य वस्तुद्वारां इंद्रियातीत वस्तूंना मूर्त स्वरूप देतो. अत एव हा अपर ब्रह्म आहे. अशी या वर्णाची योग्यता आज लोक समजूं लागले आहेत. स्वास्थ्यप्रिय युगांत आणि भोगैश्वर्यांनीं कंटाळून गेलेल्या जीवनांत रंजकवर्णाचें महत्त्व वाढणें स्वाभाविक आहे.

एवढें खरें कीं, जर आचार्यवर्णांतील अथवा धुरीणवर्णांतील व्यक्तींमध्यें कलाधर रंजकाची शक्ति असेल तर त्यांचें कार्य अद्भुत सामर्थ्यानें सिद्ध होईल. त्याचप्रमाणें रंजकवर्णांतील संस्कारी पुरुषांत जर आचार्यांची ज्ञानदृष्टि आणि प्रेरक शक्ति—त्याचप्रमाणें धुरीणांचें योजनासामर्थ्य आणि लोकनायकत्व वसत असेल तर त्यांच्या कलेस दैवी स्वरूप प्राप्त होईल.पण एवढ्या मिलाफावरून रंजकवर्गाला समाजशिरोमणींचें स्थान देणें चुकीचें होईल. तीन वर्णांचे गुण एकत्र वसणें अशक्य नाहीं. पण त्या त्या गुणान्वयें अनुरूप वर्णांचेंच माहात्म्य स्वीकारलें पाहिजे.

आतां राहतां राहिला समाजाच्या दयेला पात्र असा भृत्यवर्ण.

अन्य वर्णांत ज्याला म्हणून कांहीं स्थान मिळविणें शक्य आहे त्यानें भृत्यवर्णाची आजीविका कधींहि पसंत करूं नये. समाजसेवा म्हणून परोपकारबुद्धीनें भृत्यकर्म प्रत्येकानें केलेंच पाहिजे. तो प्रातधर्म होय. पण परिचारकाचा पेशा पत्करून आजीविका मिळवीत रहाणें हें होतां होईलतों टाळावें. या वर्णामध्यें सर्व प्रकारचे परिचारक, पाक-सिद्धि करणारे, मंदिरांत पुजारी होऊन रहाणारे, पालखी–मेणा उच-लून भोईकाम करणारे, सर्व प्रकारचे खिदमतगार, कल्पकांच्या हाता-खालीं केवळ सांगकामे होऊन रहाणारे मजूर हे सर्व येतात. या वर्णाकडून होणारी समाजसेवा लहानसहान नाहीं. समाजपोषक भर्त्यां-हून यांची योग्यता जराहि कमी नाहीं. मोक्षदृष्ट्या यांची संतोष-मूलक सेवा त्यांना उन्नतकरच आहे. पण भृत्यसेवा वाढल्यानें समाज पंगू होतो व हीच आजीविका करीत रहाणारा वर्ग कालेंकरून संस्कार-शून्य होतो. म्हणून या वर्णांची संख्या वाढणार नाहीं इतकें समा-जानें आत्मरक्षणार्थ पाहिलें पाहिजे.

अशा रीतीनें सात वर्णांचें सुस्निग्ध संघटन झाल्यास समाज संस्कारी, सामर्थ्यवान, समृद्ध आणि सुखी होईल.

## सप्तवर्ण्य-विचार—सारांश

१. आचार्य:—ज्ञानशोधक, धर्मोपदेशक, अध्यापक, जीवन-प्रेरक.

२. भर्ता:—समाजपोषक, शेतकरी, बागवान, विणकर, खाणी-वाले, धनगर, गवळी.

३. कल्पक:—कौशल्ययुक्त - उपकरणवान - कारागीर, हुन्नरी तज्ज्ञ, सुतार, लोहार, गवंडी, पथिक, वैद्य, शिंपी, लेखक, चांभार.

४. वणिक:—सार्थवाह, दुकानदार, कारखानदार, सराफ.

५. **धुरीणः**—संचालक, व्यवस्थापक, राज्यकर्ता, पुढारी, योजक.

६. **रंजकः**—कलाधर, गायक, चित्रकार, शिल्पी, साहित्यसेवी, नट.

७. **भृत्यः**—परिचारक, आचारी, पुजारी, भोई, मजूर, खिदमतगार.

# जातिधर्म व कुलधर्म

कुल आणि जाति या दोन संस्था प्रकृतिगत असल्यानें स्वयंभू, स्वयंप्रेरित आणि सनातन आहेत, अर्थात् शाश्वत आहेत. दोहोंमध्यें रक्ताचा संबंधहि येतो. ज्यांचीं रक्तें एक आहेत तें एक कुल. ज्यांचीं रक्तें एक होऊं शकतात ( विवाहसंबंधानें ) ते एकजाति. ( जन्मना जातिः )

कामविकाराची प्रेरणा, अपत्यैषणा, अपत्यवात्सल्य हीं या दोन्ही संस्थांच्या मुळाशीं आहेत.समूह करून रहाणें आणि समूहशक्तीच्या जोरावर जगणें, वाढणें आणि विजय मिळविणें (निसर्गावर अथवा परकीयांवर विजय मिळविणें) ही वृत्तीहि या दोन्ही संस्थांच्या मुळांशीं आहे. या सर्व वृत्ती प्राणिसहज (Biological) आहेत. आणि म्हणूनच त्यांचें जतन करण्याचा फारसा प्रयत्न करावा लागत नाहीं. या वृत्ती आंधळ्या, जबरदस्त आणि स्वाभाविक आहेत. या जीवनाला पोषक आहेत पण त्यांना जीवनसाफल्याची कल्पना नाहीं. जीवनसाफल्याचा जेथें विचार सुरूं होतो तेथेंच जीवनसंसृतीमध्यें संस्कृति ( culture ) उत्पन्न होते या संस्कृतीच्या परिपोषासाठीं आश्रमव्यवस्थेप्रमाणें वर्णव्यवस्था ही निर्माण झाली आहे. वर्ण आणि जाति एक नव्हेत. जाति वर्णाचा पोटभेद आहे असेंहि नव्हे. या दोन्ही संस्था परस्पर संमिश्र असल्या तरी तत्त्वतः आणि स्वरूपतः परस्पर विभिन्न आहेत. कांहीं अंशीं परस्परविरोधी आहेत. जातिसंकर आणि वर्णसंकर हेहि एक नव्हेत. वर्ण हे संस्कृतिप्रधान आहेत.

आनुवंशिक संस्कार, कौटुंबिक जीवनांतील संस्कार, कुलधर्मामध्यें आणि जातिधर्मामध्यें उत्पन्न झालेलें व्रीदरूपी सांस्कृतिक तत्त्व या सर्वांचा विचार करितां वर्णव्यवस्थेंत देखील जातीचें तत्त्व प्रादुर्भूत

होणें अयोग्य नाहीं. पण केवळ जातितत्त्वाला प्राधान्य मिळतां कामा- नये. वर सांगितलेल्या कारणांनीं जातितत्त्व संस्कारपरंपरेला व विकासाला पोषक असल्यानें जाति आणि वर्ण दोहोंना एका प्रवा- हांत नेऊन सोडणें शक्य आणि शास्त्रशुद्ध आहे. पण या बाबतींत कडक नियम केल्यानें मूळ उद्देश मारला जातो.

संकर हा नरकाला कारणीभूत आहे हा सिद्धांत निरपवाद किंवा त्रिकालाबाधित नाहीं. ( चोरटेपणा, लोकनिंदित संबंध, आणि शिष्टांनीं नापसंत केलेला संबंध हे मात्र निरपवाद नरकगामी आहेत. ज्यांचा धार्मिक आदर्श परस्पर विभिन्न आहे, ज्यांच्या संस्कृतीची भूमिकाच निराळी आहे अथवा ज्यांच्या रहाणी–करणी–विचारसरणी इत्यादीं- मध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे अशांमधील विवाह जीवनशास्त्र- दृष्ट्या आणि संस्कृतिदृष्ट्या शुभपरिणामी होत नाहींत. आणि त्यांमध्यें अपत्यद्रोह होतो म्हणून या दोन कारणांसाठीं असे विवाह अनिष्ट गणले पाहिजेत. )

समान भूमिकेवरील भिन्नभिन्न समाजांमध्यें मिश्रविवाहानें उत्तेजन देण्याचा केव्हां केव्हां काळ येतो. आणि केव्हां केव्हां होतां होईल तों मिश्रण टाळून पार्थक्य टिकवणेंच इष्ट वाटूं लागतें. जेव्हां दोन समाज समकक्ष आणि तुल्यबल असतात आणि दोघांनीं मिळून नवीन पुरुषार्थ करावयाचा असतो अथवा नवीन संस्कृतीला जन्म द्यावयाचा असतो तेव्हां समान आदर्श, समान विचारसरणी आणि समान पुरुषार्थ पाहून संमिश्रणाला उत्तेजन देणें हेंच योग्य आहे. उलटपक्षीं जेव्हां परस्पर परिचय नसतो अथवा फार थोडा असतो, दोन्ही पक्ष तुल्यबल नसतात, आणि एक पक्ष दुसऱ्याच्या आहारीं पडण्याची भीति असते, तेव्हां तेजोवधकारी संमिश्रण टाळणें हेंच इष्ट असतें. अशा वेळीं पार्थक्याला महत्त्व दिलें पाहिजे. नेपोलियनचें

लष्करी वाक्य येथें निराळ्या अर्थानें लागू पडते. We unite to strike; and separate to live.

जगांतील विवाहसंस्थेचा इतिहास पहातां सर्व प्रकारच्या समाजांमध्यें जर महत्त्वाचें विचारसाम्य कोठें दिसून येत असेल तर तें या बाबतींत कीं सख्ख्या बाप–कन्येचा किंवा आई–पुत्राचा किंवा भावा–बहिणीचा विवाहसंबंध सर्वत्र निरतिशय निंद्य मानला गेला आहे. प्राचीनकाळीं इराणांत, उत्तर हिंदुस्थानांत आणि अन्यत्र भावा–बहिणीचे विवाह होत असत, पण सर्वत्र असे विवाह लौकरच त्याज्य ठरले. आणि मनुष्यहृदयांत अशा विवाहासंबंधानें अतोनात घृणा कमावली गेली.

यापुढें जवळच्या नात्यांत विवाह करणें घातुक आणि निंद्य आहे हा विचार कमी अधिक प्रमाणानें सर्वत्र पसरला. या अभिप्रायाच्या मुळाशीं अलिखित असा जबरदस्त आणि कटु अनुभव सार्वत्रिक असला पाहिजे. जवळच्या संबंधांत वैवाहिक प्रेम उत्पन्न होऊं शकत नाहीं, टिकूं शकत नाहीं. उन्माद असला तर तो क्षणिक ठरतो, असें अनुभवास आलें आहे. मानसदृष्ट्या ही स्थिति झाली.

वैद्यकीयदृष्ट्या अतिजवळच्या विवाहाची प्रजा निःसत्त्व, भेकड, संयमशून्य, कुष्टरोगी आणि मंद–बुद्धि अशी तयार होते. आणि पुढें पुढें संतानवृद्धीहि क्षीण होते असा अनुभव आला.

संस्काराच्या दृष्टीनें भिन्नकुळांतील संस्कारांचा जो इष्ट संयोग अपत्यांना लाभला पाहिजे तो लाभत नाहीं. यामुळें कूपमंडूकवृत्ति अथवा सांचलेल्या तळ्यांतील कुजक्या पाण्याची स्थिति त्या कुटुंबाची होते.

आरोग्यदृष्ट्या भिन्न कुटुंबांतील विवाहापासून झालेली प्रजा आनुवंशिक रोगांशीं झगडण्यास जशी समर्थ असते तशी एक कुटुंबीय विवाहाची प्रजा समर्थ नसते.

सामाजिकदृष्ट्या एक कुटुंब आंतल्याआंत विवाह करूं लागलें तर

समाज म्हणून तयार होणें कठिण होईल. समाज म्हणजे परस्परावलंबन. हें योग्य मर्यादेंत जितकें व्यापक आणि विविध असेल तितका समाज जोमदार होणार. ' स्वात्मनि एव समाप्त--व्याप्ति ' अशा एककुटुंबी समाजाची स्थिति समाजशास्त्राला असह्य झाली पाहिजे.

शास्त्रधर्माच्या बाहेर असलेले, मागसलेले किंवा रानटी गणले जाणारे लोक देखील जवळच्या संबंधाचीं लग्नें निषिद्ध मानतात. एकाच गांवांतील मुलेंमुलीं भावाबहिणीप्रमाणें समजलीं पाहिजेत अशी समजूत पुष्कळ ठिकाणीं आहे. सामाजिक व्यवहार निर्धास्त आणि निश्चित चालण्यास देखील नजीकचे विवाह निषिद्ध असले पाहिजेत. जेथें दिवसरात्र मोकळा व्यवहार असणें इष्ट आहे तेथें जर घोंटाळे होऊं लागले आणि त्याला विवाहाची मान्यता द्यावी लागली तर सामाजिक व्यवहार संकुचित आणि शंका-कलुषित होईल. एका गुरूच्या हाताखालीं संस्कार प्राप्त करणारे युवक आणि युवतींमध्यें भावा--बहिणीचेंच नातें समजलें पाहिजे, हा नियमहि या दृष्टीनें इष्टच आहे.

एका गोत्रांत लग्नें होऊं नयेत; सपिंड, सगोत्र, सप्रवर यांचा विचार केल्यावांचून लग्नें करूं नयेत ही धर्माची मर्यादा येथवर वर्णिलेल्यां धार्मिक मीमांसेमधूनच निघाली आहे.

धर्माची ही दृष्टि आणि ही मर्यादा आतां थोडीशी वाढविण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. जातिबहुल हिंदुसमाजांत पोटजातींचें प्रस्थ फार माजलें आहे. हजार हजार कुटुंबांच्याच लहान लहान जाती पडणें हें सर्वथैव अनिष्ट आहे. आणि आज तर शंभर सव्वाशें कुटुंबांच्या जातीहि दृग्गोचर होतात. गुजराथमध्यें ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. ज्याप्रमाणें शेतामध्यें वरचें पाणी खालीं वाहून जाऊं नये म्हणून लहान लहान वाफे वा गादे तयार करितात, त्याप्रमाणें गरीबांच्या मुली श्रीमंत घरांत वाहून जाऊं नयेत म्हणून लहान लहान

पोटजाती नव्यानें निर्माण करण्याकडेहि तेथें प्रवृत्ति आहे. मोठ-मोठीं ज्ञातिभोजनें करण्याचा खर्च पडूं नये यासाठीं देखील लहा-नग्या आटपशीर जाती करण्याची प्रवृत्ति तिकडे आहे. वरील विवाहमीमांसेंत जवळच्या संबंधांतील विवाहाचे जे दोष दाखविले आहेत ते सर्व या पोटजातींतील विवाहांत दृग्गोचर होऊं लागले आहेत. तेव्हां धर्माची दृष्टि, समाजशास्त्राचा अनुभव आणि भावी प्रजेचें कल्याण यांचा विचार करून आतां कडक नियम केला पाहिजे कीं, स्वतःच्या पोटजातींत विवाह करणें हें एका कुटुंबांत किंवा एकाच गोत्रांत लग्न करण्याइतकें सख्ख्या भावा–बहिणीच्या लग्नासारखें निंद्य आणि महापातक आहे.

आजकाल ज्या सामाजिक सुधारणा सुचविल्या जातात त्यांहून ही सुधारणा निराळी आहे. इतर सुधारणा धर्ममर्यादा शिथिल करण्याच्या दृष्टीनें सुचविल्या जात असतील. ही सुधारणा धर्मदृष्टि अधिक जागृत करण्याच्या दृष्टीनें सुचविली आहे.

कोणी म्हणतील तुम्ही जातिभेद मोडूं पहात आहां. जातिभेद मोडणें इष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न बाजूस ठेवून उत्तर देतां येईल कीं, सगोत्राबाहेर लग्नें करण्यानें जर गोत्रें बुडत नाहींत, भिन्न कुटुंबियांच्या विवाहांमुळें जर कुटुंबें तुटत नाहींत, तर पोटजातींच्या बाहेरच विवाह झाला पाहिजे असा नियम केल्यानें पोटजाती तरी कशा तुटतील! आणि पोटजाती तुटल्याच तरी त्या जातींचें काय अनिष्ट आहे! वर्णव्यवस्थेला तर कोणत्याहि रीतीनें धोका नाहीं. संघटनप्रिय काळानें तरी या सुधारणेस विरोध करतां कामा नये.

येथें सुचविलेली सुधारणा व त्याच्या मुळाशीं असलेली विचारसरणी अत्यंत महत्त्वाची आहे, तिचा खोलवर विचार झाला पाहिजे.

# सावकार

ज्याप्रमाणें मिशनरी लोकांनीं आपल्या समाजव्यवस्थेची एका-काळीं पोटभर निंदा करून घेतली आणि समाजाला विस्कळित करण्याचें श्रेय पदरीं बांधून घेतलें, त्याचप्रमाणें सरकारी अम्मलदार आणि समाजहितैषी पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ यांनीं, एक दोन पिढ्या होत आल्या, सावकारांची निंदा चालविली आहे. मिशनऱ्यांच्या टीकेमुळें विस्कळित झालेला समाज खडबडून जागा होऊन ज्या-प्रमाणें आतां पुनः जोमदार होऊं पहात आहे, त्याचप्रमाणें सावकार ही संस्थाहि स्वतःचे पिढीजात दोष टाकून देऊन नव्या जोमानें आणि नवीन पद्धतीनें समाजाची सेवा करण्यास आणि सेवा करून समाजाचें पुढारीपण स्वीकारण्यास तयार झाली तर त्यांत नवल नाहीं. राज्य गेलें म्हणजे ज्याप्रमाणें जुनी सेना बेकार होऊन समाजाला भारभूत होते, नवीन संस्कृतीच्या नव्या संस्था राजाश्रयाच्या जोरावर प्रतिष्ठित झाल्या म्हणजे जुन्या संस्कृतीच्या जुन्या संस्था जशा कुजा-वयास लागून अथवा झुरणीस लागून घातुक बनतात, त्याचप्रमाणें सावकार या संस्थेचें झालें आहे.

जुन्या काळीं सावकार म्हणजे लोकांना व्याजानें पैसे कर्जाऊ देणारा केवळ दुकानदार नव्हता. सावकाराजवळ भांडवल असे, लोकांना त्याच्या भांडवलाची जरूर असे व व्याज घेऊन लोकांना तो भांड-वल देई हेंहि खरें, पण आजचा सावकार ज्याप्रमाणें नीतिशून्य कलाल बनला आहे तसा पूर्वींचा सावकार नव्हता. सावकार म्हणजे गांवचा पुढारी, सामाजिक नीतिमत्ता जिवंत ठेवण्याची जबाबदारी त्याची. अडीअडचणीच्या वेळेला तो लोकांना पैसे देत असे, एवढेंच नव्हे तर सल्लामसलतहि देत असे. तो जबरदस्त व्याज घेत असे हें

खरें पण इतकें व्याज घेऊन तो कधीं पाश्चात्य सराफासारखा लक्षाधीश झालेला नाहीं. तो व्याज कितीहि घेवो पण आपल्या गांवांतील कोणालाहि बुडूं द्यावयाचें नाहीं, मोडूं द्यावयाचें नाहीं असा त्याचा बाणा म्हणा, अथवा सामाजिक आदर्श म्हणा, असे. यामुळें त्याचें सर्व कर्ज वसूल होत असेच असें नाहीं. त्याला बुडित कुळांमुळें जें नुकसान सोसावें लागें तें जबर व्याजांतून तो भरून काढीत असे एवढेंच.

सावकार आणि रयत एकाच समाजांतील असल्यानें व दोघांचा अन्योन्याश्रय स्वभावसिद्ध असल्यानें सावकाराचा रयतेला अनेक बाजूंनीं पाठिंबा असे. सावकार हा प्रजाभक्षक नसून पित्यासारखा प्रजारक्षक असे. कोणी अनाचारी निघाला तर त्याची उघडपणें कानउघाडणी करून त्याला ताळ्यावर आणण्याचें काम सावकाराचें असे. गरीबांच्या घरच्या वैवाहिक अडचणी, घरगुती भांडणतंटे, आजार अथवा इतर अडचणी अशा सर्व प्रसंगीं लोकांना सावकाराची ऊब असे. सार्वजनिक कामामध्यें पुढाकार घ्यावयाचा तोहि सावकारानेंच; गोर-गरीबांच्या लहानसहान ठेवी ठेवण्याची जागा देखील सावकारच. सावकारानें एखाद्यास कर्ज देण्याचें नाकारलें तर त्याची आर्थिक पत नाहींशी होई, एवढेंच नव्हे तर तो मनुष्य सामाजिक नीतीच्या दृष्टीनेंहि नालायक ठरत असे. ज्याप्रमाणें एखाद्याकडे स्वतःचें बिल थकलें आहे एवढ्यासाठीं खरा डॉक्टर औषध देण्याचें नाकारत नसतो, त्याचप्रमाणें एखाद्याची आर्थिक स्थिति संशयांत येऊन पडली आहे एवढ्यासाठीं सावकार कर्ज देण्याचें नाकारीत नसे. मनुष्य व्यवहारबुद्धीनें भ्रष्ट झाला अथवा त्याची दानत बिघडली अशी खात्री झाली अथवा तो व्यसनांत चांगलाच बुडाला असला तरच सावकार त्याला कर्ज नाकारणार! अर्थात् कर्ज बंद होणें ही सामाजिक नाचक्की असे.

वरील चित्र केवळ आदर्श नसून अशा प्रकारची समाजसेवा करणारे सावकार सर्वत्र असत. सावकार हे समाजाचें आवश्यक व

महत्त्वाचें अंग असल्यानें त्यांचा कोणास हेवा वाटत नसे. वरील आदर्श टिकविणें हें अर्थात् प्रत्येकाच्या धर्मबुद्धीवर अवलंबून असे. सावकार केवळ पैशाकडे पाहूं लागला, लोकांना पिळून स्वतःचें उखळ पांढरें करूं लागला तर त्याला अडविण्याचें अथवा रोकण्याचें सरळ साधन कांहींच नसे. त्याची धर्मबुद्धि, कुलपरंपरेची चाड, सामाजिक प्रतिष्ठा आणि समाजाच्या स्थूल न्यायबुद्धीच्या पुण्यप्रकोपाची दहशत, हेच अंकुश सावकारावर असत व यामुळें सावकाराची सेवा अव्याहत चाले.

आधुनिक सरकारानें सामाजिक पुण्यप्रकोपाची नांगी मोडून टाकिली आहे. कायदेकोर्टांनीं सामाजिक जबाबदारीविषयीं आंधळेपणा स्वीकारला आहे, आणि नागड्या स्वार्थाला राजमान्यता दिली आहे; व इतकें केल्यानंतर सावकार म्हणजे प्रजेला लागलेल्या जळवा अशी हाकाटी सुरू करून सावकाराची लोकप्रियता अगदीं तोडून टाकिली आहे. एकीकडे सावकाराला बिघडण्यास उत्तेजन देणें व दुसरीकडे सावकार हा वर्गच प्रजाद्रोही आहे असें युक्तीनें लोकमत तयार करणें असा हा आश्चर्यकारक खेळ चालू आहे.

सावकाराला उडवून देऊन त्याच्या जागीं पतपेढ्या स्थापून खेडेगांवांतील लोकांचा सर्व आर्थिक व्यवहार सरकारी वळणांत आणावयाचा, कर्ज देण्यांत उदारता आणिली तरी माणुसकीचा संबंध त्यांतून काढून टाकावयाचा व खेडेगांवाचें सांपत्तिक जीवन शहराच्या सांपत्तिक जीवनाच्या शेपटास बांधून टाकावयाचें, अशी ही सगळी नीति जमली आहे.

या सर्व प्रकारांत अत्यंत कींव वाटते ती कर्ज काढणाऱ्या गरीब रयतेची नव्हे, पण आपल्या हातानें अथवा आपल्या आंधळेपणानें आणि मूर्खपणानें बिघडत चाललेल्या आणि नाश पावणाऱ्या सावकारवर्गाची.

सामाजिक नीतिमत्ता खालावत चालल्यामुळें, त्याचप्रमाणें खेडे-गांवांतील उत्पन्नाच्या बाबी कमी होऊन खर्चाच्या बाबी वाढूं लागल्या-मुळें सावकाराच्या धंद्यांतहि आतां बरकत राहिली नाहीं. खेडेगांवांतील उद्योगधंदे नष्ट झाल्यानें दिलेलें कर्ज उत्पन्न वाढविण्याकडे वापरलें जात नाहीं. शेतकऱ्यांमध्यें पेरलेले पैसे उगवून हातीं परत येणें दुरा-पास्त झालें आहे. घोरणी सावकारानें हात आखडता घेऊन शहरचा रस्ता सुधारला आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं सावकारींत कस राहिला नाहीं म्हणून सावकारांनीं जीं क्षेत्रें सोडून दिलीं तेथें काबुलीवाले किंवा इतर दंडेलीचा कायदा चालविणारे क्रूर लोक सावकार म्हणून घुसले आहेत आणि प्रजा अधिकाधिक हवालदील होत चालली आहे.

प्राचीन काळची स्मृतिरम्य चित्रें रेखाटणें हें निराळें आणि प्राचीन काळचा पुनः उद्धार करूं पहाणें निराळें. जो काळ गेला तो पुनः न येण्यासाठीं गेला आहे हें विसरतां कामा नये. प्राचीन समाज-व्यवस्था अथवा त्यांतील प्राचीन संस्था या पुनः चालू करितां याव-याच्या नाहींत. तसें करणें शक्य असलें तरी नवीन काळांत प्राचीन गोष्टी कार्यकारी होणार नाहींत आणि तेंहि शक्य झालें तरी जुन्या गोष्टींना फिरून चालन काय म्हणून द्यावें ! नवीन पिढीची स्वतःची म्हणून कांहीं जीवनप्रतिभा असेल कीं नाहीं !

प्राचीन व्यवस्थेंतील जीवनपोषक तत्त्वें ओळखून नवीन रूपानें तीं अमलांत आणिलीं पाहिजेत.

व्यक्तीला ज्याप्रमाणें टेक असते, चारित्र्य असतें, जीवन कृतार्थ करण्याची वेळ आली म्हणजे सर्वस्वाचा त्याग करण्याचें वीरकर्म प्रगट करण्याची धर्मबुद्धि असते, त्याचप्रमाणें संस्थांनाहि टेक, चारित्र्य व धर्मबुद्धि हीं सर्व असतात व समाजाची सर्वांगीण उन्नति करण्याचीं हीं तत्त्वें प्रगट करण्याचें युग आतां प्राप्त झालें आहे. ज्या लोकांचें जीवन परस्पर ओतप्रोत आहे, अथवा

ओतप्रोत होणें संभवनीय आहे अशांचे संघ बनवून त्या संघांनीं सावकारकी चालविली पाहिजे व त्या सावकारीमध्यें केवळ आर्थिक व्यवहाराचे नव्हे तर समग्र जीवनव्यवहाराचे सिद्धांत ग्रथित केले पाहिजेत. अशा संघावर सरकारचा ताबा नसावा, मग तें स्वदेशी सरकार कां असेना ! समाजांतील घटकांचा ताबा असावा, व तोहि बहुमताच्या पद्धतीनें न ठरवितां निःसंशय समाजमान्य अशा चारित्र्यशील व्यक्तींचा व कायमचा असावा. पिढीजात राजाचे सामान्य दोष प्रजा ज्याप्रमाणें सहन करते, त्याप्रमाणें अशा पुढाऱ्यांचे दोष सहन करूनहि समाजानें त्यांच्या व्यवस्थेस स्थैर्य आणलें पाहिजे. मात्र अशा व्यवस्थेंत वंशपरंपरेचें तत्त्व घुसूं न देण्याची खबरदारी घ्यावी.

अशा संघांत जुन्या वळणाच्या समाजहितैषी सावकारांना प्रथम स्थान दिलें पाहिजे. म्हणजे सहकारी पतपेढ्यांतील इष्ट तत्त्वें आणि पिढीजात सावकारींतील इष्ट तत्त्वें यांचा मिलाफ होईल.

वाटल्यास महासभेसारख्या मध्यवर्ति संस्थेनें चारित्र्यवान व ग्रामसेवक तरुणांना थोडेंसें भांडवल पुरवून व नियम लावून देऊन खेडेगांवांतील लोकांमध्यें सावकारी करावयास सोडून द्यावें, आणि अशा सावकारी भांडवलाच्या मदतीनें खेडेगांवांतील नव्या जुन्या धंद्यांचें पुनर्जीवन कसें होईल याकडे लक्ष द्यावें. आळस, अव्यवस्था, अप्रामाणिकपणा आणि पक्षपात या चार गोष्टी टाळल्या तर नव्या सावकारीच्या द्वारां ग्रामोद्धार बराच करतां येईल.

# कर्ज

हिंदुस्थानमध्यें मोठमोठे कारखाने, जंगी भांडवलें, शेंकडों मैलांची शेती आणि परदेशी वाढता व्यापार, असलें वातावरण चालूं द्यावयाचें किंवा नाहीं हें आपल्याला एकदां कायमचें ठरवावें लागणार. हिंदुस्थान संस्कारी, सुधारलेलें व संघटित राष्ट्र आहे. यानें इंग्लंड, अमेरिका, जर्मनी किंवा जपानचें अनुकरण करण्याचें ठरविलें तर योग्य काळीं तें सहज शक्य आहे. रशियाला जर दहा-वर्षांत असाधारण परिवर्तन करतां आलें आणि रशिया आज जर वर सांगितलेल्या सर्व राष्ट्रांनां भयंकर प्रतिस्पर्धी वाटूं लागला आहे तर हिंदुस्थानांत हीच प्रगति त्याहून थोड्या वर्षांत करून दाखविणें अशक्य नाहीं. पण हिंदुस्थाननें तो मार्ग स्वीकारावयाचा किंवा नाहीं याचा विचार केला पाहिजे.

मनुष्यसमाजाचें आर्थिक संघटन त्यांच्या जीवन–सिद्धांतावर अवलंबून असतें. जर्मनीचें, इंग्लंडचें किंवा रशियाचें अनुकरण करावयाचें तर त्यांची फिलसुफी स्वीकारली पाहिजे. मग समाज-रचनाहि त्यांच्या वळणावर आपोआप जाणारच. जशी अर्थनीति तशीच धर्मनीति. तेव्हां इतर देशांचें अनुकरण करावयाचें म्हणजे हिंदुस्थानानें भारतीयत्वाला मुकावयाचें. ही आपली तयारी आहे किंवा नाहीं ?

जर भारतीयत्व म्हणजे कांहीं अलौकिक वस्तु नसली तर ती सोडून देण्याची आपली केव्हांहि तयारी असली पाहिजे. केवळ आपलेपणा किंवा जुनेपणा याची जीवनदृष्ट्या किंमत केवढी ! पण जर भारतीय जीवनदृष्टि कल्याणाची असेल, जगांतील माणुसकीचा नाश करणारे स्वभावदोष टाळण्याची शक्ति जर भारतीयत्वांत असेल

तर आपण अनुकरणाचा मार्ग कधींहि स्वीकारतां कामा नये. दुसऱ्याच्या आहारीं पडलें काय किंवा दुसऱ्यांच्या मागोमाग गेलें काय अनुकरण हें मरणच होय. इतर राष्ट्रांतील बाजार काबिज करून देशदेशांतरीचा पैसा हिंदुस्थानांत खेंचण्याची आणि मागसलेल्या देशांत दुष्काळ, बेकारी आणि परतंत्रता पाठविण्याची दुर्बुद्धि जर आपल्यांत नसेल तर आपण 'यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः' या तत्त्वावरच आपली समाजनीति व अर्थनीति रचली पाहिजे. भांडवल, प्राकृतिक शक्ति आणि सामाजिक सत्ता यांचें अवाढव्य केंद्रीकरण करणें म्हणजे सामाजिक जीवनांत साम्राज्यवाद उत्पन्न करणें आहे; मग तें साम्राज्य अमेरिकन पद्धतीचें असो किंवा रशियन पद्धतीचें असो. संपत्तीमुळेंच गरीबी उत्पन्न होते हें अर्थशास्त्राचें सूक्ष्म तत्त्व रशियाला पटूनहि न पटल्यासारखें आहे. यांतून जर मार्ग काढावयाचा असेल तर हिंदुस्थानची ग्रामसंस्कृति लक्षांत घेऊन आपली अर्थनीति ठरविली पाहिजे. प्रजेचें संघटन राजकीय पायावर न करतां संस्कृतीच्या पायावर केलें पाहिजे. म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य कायम राहून मनुष्याचा आत्मगौरव टिकेल.

ही गोष्ट जर आपल्याला पटली तर खेडेगांवाच्या आर्थिक जीवनाची स्पष्ट कल्पना आपल्याला येईल.

लहान लहान कुटुंबें किंवा मोठीं कुटुंबें आपापलीं शेतें नांगरून सुखानें रहात आहेत, फावल्या वेळीं समाजोपयोगी लहानमोठे धंदे करीत आहेत, सर्व प्रकारचे उद्योगहुन्नर सर्वत्र लहान प्रमाणावर ठिकठिकाणीं चालले आहेत आणि सार्वजनिक हिताचीं मोठमोठीं कामें लहान लहान घटक समजूतदारपणानें एकत्र होऊन मोठ्या पायावर पार पाडीत आहेत असेंच समाजाचें स्वरूप असणें आपल्याला इष्ट आहे. प्रत्येकाजवळ नांगरावयाला थोडीफार जमीन,

उद्योगहुन्नर करावयास आऊतें व अवजारें, ठराविक गिऱ्हाइकी आणि वर्षभरचा व्यवहार सुरळीत चालावयास लागणारें भांडवल प्रत्येकाजवळ असावें हा आपला आदर्श आहे. अशा स्थितींत कोणालाहि कर्ज काढण्याची पाळी येऊं नये. प्रसंगविशेषीं अधिक पैशाची जरूर पडलीच तर समान व्यवसायी लोकांकडून वर्गणीच्या रूपानें उसनवार पैसे मिळाले पाहिजेत.

पण ही स्थिति मोठ्या प्रयत्नानेंच आणतां येईल. तोंपर्यंत कर्ज काढण्याची आवश्यकता ही रहाणारच.

कर्जें दोन प्रकारचीं असतात. शेती, व्यापार, उद्योग, हुन्नर, दलाली अथवा सामाजिक हिताचीं मोठमोठीं कामें यांसाठीं काढलेलें कर्ज निराळें आणि आजारीपणाचा खर्च भागविण्यासाठीं, मुलीला हुंडा देण्यासाठीं, कोर्टें लढण्यासाठीं, उपासमार टाळण्यासाठीं अथवा व्यसना-साठीं काढलेलें कर्ज निराळें. मनुष्य जर अकलेनें वागला तर पहिल्या प्रकारचें कर्ज हें ओझें नाहीं. उलट भांडवल वाढल्यानें अशा कर्जांच्या योगानें अल्पांशानें कां होईना मनुष्याचें सामार्थ्य त्यायोगें वाढतेंच. दुसऱ्या प्रकारचें कर्ज हें जीवनांतील अडचणी अपरिहार्य आहेत असें समजूनच करावयाचें.

दोन्ही प्रकारच्या कर्जांच्या योगानें कर्ज देणारा इसम तें घेणा-ऱ्यांच्या जीवनावर आपला काबू प्रस्थापित करतो. कर्ज घेणारा जितका लहान, जितका दुर्बळ अथवा अज्ञान तितका तो कर्ज देणाऱ्याच्या कह्यांत जाऊन अगदीं गुलाम बनतो. कर्जाच्या सर्व शर्ती न्यायाच्या असोत किंवा पिळून काढणाऱ्या असोत धनकोच्या इच्छेप्रमाणें ठरल्या जातात आणि ठराविक शर्तीबाहेरहि ऋणकोला किती तरी बाबतींत धनकोची भर करावी लागते. ऋणकोच्या दुःस्थितीचा फायदा सगळ्या बाजूंनीं घेऊन धनको न्यायाचा टेंभा मिरवितो एवढेंच नव्हे पण परोपकार केल्याचाहि तो आव आणतो. आणि

या सर्वांला मान तुकविणें ऋणकोला प्राप्त होतें; म्हणून म्हण पडली आहे कीं, ‘ गरजवंताला अक्कल नसते. ’

व्यापार-उद्योगासाठीं काढलेल्या कर्जात ऋणको जर सावधान नसेल तर व्यापार-उद्योग करून लोणी लोणी सर्व धनकोस मिळावयाचें आणि ऋणकोच्या वांट्यास केवळ ताकाचें पाणी रहावयाचें. ज्याप्रमाणें लोक गुरें बाळगतात, गुलाम बाळगतात, मधमाशा बाळगतात आणि त्यांच्या मेहेनतीचा सर्व फायदा आपलासा करतात त्याप्रमाणें भांडवलवाले आपल्या भांडवलाचा उपयोग करून त्यांतून दूध आणि मध तयार करून देणारे ऋणको बाळगत असतात.

आणि जर घेतलेलें कर्ज द्रव्यवृद्धीसाठीं नसून अडचणींतून मुक्त होण्यासाठीं घेतलेलें असेल तर मग काय विचारावें ! असलें कर्ज म्हणजे शुद्ध गुलामगिरीच होय.

यासाठीं खेडेंगांवांतील लोकांनीं होतां होईल तों कर्ज न काढण्याचाच निश्चय करावा. कर्ज काढल्यानें काटकसर नाहींशी होते, कशाचाच अंदाज रहात नाहीं आणि सगळाच आंधळा दरबार होतो.. पण कर्ज काढावेंच लागलें तर कमींत कमी व्याजानें, स्वतःच्या सोयीच्या शर्तीनें मिळेल अशी नजर ठेवावी. कर्ज फेडण्याचे हप्ते अथवा वेळा स्वतःच्या सोयीच्याच ठेवाव्यात. कर्जापायीं बुडून जावयाचें नसेल तर कर्ज काढणाऱ्यानें आपला हिशोब अगदीं चोख आरशासारखा ठेवला पाहिजे. पुष्कळदां वर्षांची बेगमी वेळीं करून न ठेवल्यानेंच कर्ज काढावें लागतें. गोर-गरीबांना वर्षाची बेगमी करून ठेवणें बहुधा कठीण असतें. अशांनीं आपल्या विश्वासाच्या समजुतदार व चारित्र्यवान अशा लोकांशीं मिळून आर्थिक संघ तयार करावेत आणि संघाच्या रूपानें वार्षिक बेगमी करून ठेवावी. व्यक्तीला कर्ज काढावयाचें असेल तर तें स्वतंत्रपणें न काढतां संघामार्फत काढावें. असें केल्यानें कर्ज देणारास उत्तम तारण मिळतें, आणि कर्ज घेणारास कर्ज

सोयीनें मिळून काढलेले पैसे कसे वापरावेत, त्यांचा हिशोब कसा ठेवावा वगैरे बाबतींत संघाकडून मूल्यवान असा सल्लाहि मिळतो. संघाची देखरेख व संघाचा अंकुश व्यक्तिगत जीवन सुसंघटित आणि पाया-शुद्ध करण्याला खूप उपयोगी असतो. आणि कर्जामुळें येणारी गुलामी तर याच मार्गानें टाळणें शक्य आहे. कर्ज काढावयाचेंच तर तें काढण्याचें शास्त्र तयार करून सशास्त्र पद्धतीनें तें काढावें. सांघिक जीवनामध्येंच हें शक्य असतें, व म्हणून संघ खूप विचारानें तयार केले पाहिजेत.

अशा संघाचा उद्देश वस्तुतः आर्थिक असला तरी संघ हा जीवन-संघ आहे हें विसरतां कामा नये. जातीच्या किंवा धर्माच्या तत्त्वांवर हा संघ करूं नये. पण ज्यांच्यामध्यें मित्रत्वाचें नातें आहे, प्रेमाचा जिव्हाळा आहे, आर्थिक व्यवहार चोख असल्याबद्दल परस्पर विश्वास आहे, एकमेकांना व्यवहारांत सल्लामसलत देण्याची संवय आहे, अशांचेच संघ करावेत. संघांत नवीन मनुष्य घ्यावयाचा तो जुन्यांच्या मोठ्या बहुमतानेंच घेण्याची पद्धत ठेवावी. संघाच्या मुख्य चालकांच्या अभिप्रायाला नेहमीं मान द्यावा. आणि हे मुख्य संचालक पसंत करावयाचे ते त्यांच्या केवळ चलाखीकडे पाहून पसंत न करितां समाजहितैषिता, निःस्पृहता आणि व्यवहाराचा कडकपणा हे गुण पाहून त्यांना पसंत केले पाहिजेत.

ज्याप्रमाणें आपण एन्जिन चालवणाऱ्यांवर आणि गार्डावर सबंध आगगाडीचा विश्वास टाकून रात्रीं आपापल्या डब्यांत घोरत पडतों, त्याप्रमाणें विश्वासानें नव्हे, तर आळसानें संचालकांकडे सर्व गोष्टी सोंपवून संघांतले लोक पडून असतात. अशानें संघाचा मूळ उद्देशच मारला जातो. संघांत सामील होणाऱ्या प्रत्येक मनुष्यास उत्तमपणें जगावें कसें व स्वार्थ, परार्थ व परमार्थ संपादन करावा कसा याचें उत्तम शिक्षण आणि उत्तम तालीम मिळणें हा संघाचा मुख्य उद्देश. हा उद्देश

पार पाडण्यास सर्वांनीं संघकार्यांत ध्यान दिलें पाहिजे. एकमेकांच्या व्यवहारांत ढवळाढवळ न करतां जेवढें लक्ष देतां येईल तेवढें देण्याची कला ही अत्यंत उपयोगी जीवनकला आहे. या कलेच्या जोरावर समाज समर्थ होणार आहे. असें सामर्थ्य एकदां मिळविलें म्हणजे कर्जाचा व्यवहारच काय, सर्वच जीवनव्यवहार सुव्यवस्थित होणार आहे.

ही सर्व पुढची तयारी झाली. आज खेडेगांवांतून जो कर्जबाजारीपणा व्यापून राहिला आहे त्याला उपाय काय? आजची स्थिति ही स्वाभाविक नसून सामाजिक महारोगाची निशाणी आहे. जी वस्तु समाजव्यापी आहे ती स्वाभाविकच आहे व अशीच नेहमीं असावयाची असें वाटणें हें जडतेचें लक्षण आहे.

या महारोगाचा उपायहि वरील संघांतच आहे. संघ जसजसा विशाळ व समर्थ होईल त्या मानानें त्याला गांवांतील सर्व कर्जव्यवहाराची माहिती एकत्र करून त्याची तपासणी करण्याची शक्ति येईल. एखाद्याचें कर्ज बुडणें हें जितकें अयोग्य आहे तितकेंच कर्जापायीं समाज व त्याचा पुरुषार्थ बुडणें हेंहि अयोग्य आहे. हें तत्त्व ध्यानांत ठेवून समदृष्टीनें कर्जव्यवहाराची छाननी झाली पाहिजे, आणि तीसुद्धां कोर्टी न्यायाच्या पद्धतीनें नव्हे, तर सामाजिक न्यायाच्या पद्धतीनें. सर्व पक्षांना वांचवून घेऊन आजची गुंतागुंत उकलली पाहिजे. असाधारण परिस्थितींत उपयोजण्याचे उपायहि असाधारणच असतात. सरकारनें व संघानें मध्यें पडून कांहीं विशिष्ट पद्धतीनें शेतकऱ्यांच्या कांहीं कांहीं गरजांचा बोजा उचलल्याशिवाय आणि बाकीचें कर्ज वितळवून टाकण्यासाठीं शेतकऱ्यांस मदत केल्याशिवाय शेतकरी तगणें शक्य नाहीं. एकदां अशी झडती केल्यानंतर पूर्वीच्या चुका न होतील, अशासाठीं कांहीं व्यवस्था लावून द्यावी लागेल. नुसते कायदे कडक करून व व्यवहाराच्या पावलोंपावलीं परवानगी मिळविण्याची आडकाठी उत्पन्न करून हें काम व्हावयाचें नाहीं. संघानेंच

सामुदायिक जबाबदारीच्या योगानें व्यक्तीला मजबूत केलें पाहिजे.

आजच्या सावकारवर्गाला परिस्थितीचें यथार्थ आकलन करून देणारें कडकडीत शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आहे ही स्थिति चालणें शक्य नाहीं. ज्याप्रमाणें रात्रीं निजून म्हणजे एक रीतीनें मरून दुसरें दिवशीं आपण नव्या दमानें उठतों त्याप्रमाणें सावकारवर्गानें आजच्या अंकावर पडदा पाडून व तसें करतांना सोसावी लागणारी कळ सोसून सुरवातीला सांगितल्याप्रमाणें नवीन अंकाला सुरवात केली पाहिजे. ही नवी घडी बसविण्यास संघाची मदत पुष्कळ होईल.

जीवनच जर निःसत्व झालें तर कायदे काय आणि संघ काय, धर्म काय आणि धुरीण काय, कशानेंच गाडा चालता व्हावयाचा नाहीं. खेडे-गांवांतील उद्योगधंदे पुनः चालते केले पाहिजेत. तेथेंहि नवीन दिशा आणि नवीन वळण हीं आवश्यक आहेतच.उद्योगधंदे वाढले,सामाजिक पुरुषार्थ वाढला म्हणजे वाहतें जीवन आपोआप शुद्ध आणि जोम-दार होतें. उद्योगी राष्ट्रांतील विचारी लोक स्वतःस लागणारा माल उत्तम रीतीनें कसा तयार होईल याचा विचार करीत असतात. देशांत बाहेरून येणारा माल मूळ कोठें तयार होतो, कसा तयार होतो, त्याचें रूपांतर कोण व कसें करतें, मालाची ने-आण कोण करतें, आणि त्या मालाला दिलेल्या किमतींत कोणाकोणाचा कसा नफा विभागला जातो या सर्व गोष्टींचा छडा लावतात. त्याचप्रमाणें देशांतून बाहेर जाणारा माल कोण कशासाठीं कोठें घेऊन जातो, त्याचें रूपांतर कसें होतें, तो माल कोणत्या कामीं लागतो व शेवटीं कोठें पोहोंचतो याचीहि त्यांनीं माहिती काढलेली असते व या सर्व व्यवहारांत कोणता भाग आपल्याकडे असणें योग्य आहे, किती नफ्याचे आपण धनी आहोंत याचें ज्ञान ते मिळवितात. गुजराथ-मधील एक शेतकरी दर वर्षी हजारों रुपयांचीं फळें पैदा करतो इतकेंच नव्हे तर कराची, लाहोर, दिल्ली, मद्रास वगैरे दूरवर प्रवास करून

ग्रंथ संग्र
स्थळ प्रत
सं.

तेथील गिऱ्हाइकांच्या घरीं माल पोहोंचेपर्यंतचा सर्व नफा स्वतःला कसा मिळेल याच्या तजविजींत असतां त्याच्या वृद्ध पित्याला हिंदुस्थानांतून विलायतचें टपाल विमानांतून जातें असें सांगितल्याबरोबर तो चटकन उद्गारला, 'तर मग आमचे आंबे, चिकू आणि बोरें विमानांतून विलायतेला कां पाठवूं नयेत ! माझीं फळें मोसम सुरू होण्यापूर्वीं पिकावयास लागतात, व कांहीं झाडें मोसम संपल्यानंतर पाडास येतात, त्यांना भाव चांगला आलाच पाहिजे.'

सर्व जगाचा व्यापार करण्याची हाव मनांत न बाळगतां, जर आपले शेतकरी वरील वृद्धाप्रमाणें जागरूक झाले तर हिंदुस्थानचें दैन्य दूर होईल. जागरूक व कर्तबगार शेतकऱ्यांनीं काढलेलें कर्ज त्यांना बुडवत नाहीं. उलट, पोहण्याच्या फुग्याप्रमाणें, रबरी कड्याप्रमाणें अथवा बुचाच्या जाकिटाप्रमाणें तरून जाण्यास मदतच करतें.

---

# कोर्टबाजी

हिंदुस्थानांत पराक्रम गाजविणाऱ्या कोठल्याशा एका गोऱ्या सेनापतीच्या चरित्रांत वाचल्याचें आठवतें कीं, तो आपली फौज घेऊन बंगाल्यांत प्रवास करीत असतां एका गांवांतील लोक आपल्या सर्व चीजवस्तूनिशीं जीव घेऊन पळत आहेत असें त्यानें पाहिलें. लोकांना थांबवून त्यानें विचारलें, ‘ तुमच्यावर असें काय संकट आलें आहे कीं, गांव सोडून तुम्ही पळत आहांत ! आमची एवढी मोठी फौज आहे, आम्ही तुमचें सहज रक्षण करूं शकूं.’ लोकांनीं उत्तर दिलें ‘ तसाच कोणी शत्रु असता तर आम्हीं तुमचें रक्षण मागितलें असतें. आम्ही आमचें गांव सोडून जातों आहोंत याचें कारण निराळें आहे. आम्हीं ऐकलें आहे कीं, आमच्या येथें ब्रिटिश अदालत स्थापन होणार आहे. एवढ्यासाठीं आम्ही देशत्याग करीत आहोंत. ’ हा अनुभव नमूद करतांना त्या गोऱ्या सेनापतीला काय काय वाटलें असेल ! ब्रिटिश लोकांना त्यांच्या न्यायाबद्दल नेहमीं अभिमान वाटत असतो. सतराव्या शतकाच्या सुरवातीला मद्रासकडील एका संस्कृत कवीनें ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेची मुक्त कंठानें स्तुतिच केली आहे. असें असतांना लोकांनीं कोर्टांना कां भ्यावें !

ब्रिटिश न्याय कितीहि काटेतोल असला तरी तो फार खर्चाळ आहे, सोपा नाहीं. त्याचें शेपूट लवकर संपत नाहीं आणि कोर्टांत जाणाऱ्या लोकांची नीतिमत्ता वाढते असा अनुभव नाहीं. त्यामुळें धोपटमार्गी न्यायानें स्वतःचा व्यवहार चालविणाऱ्या पंचप्रमुख प्रजेला त्याची भीति वाटणें स्वाभाविक आहे. ब्रिटिश न्यायकोर्टांमध्यें कायद्याच्या तत्त्वाची जी छाननी केली आहे ती खरोखर प्रशंसेस पात्र आहे. पण त्याच्या मुळाशीं ज्याप्रकारचा सामाजिक स्वभाव कल्पिलेला आहे तसला

स्वभाव आपल्या लोकांचा नाहीं. हा केवळ संस्कृतिभेदाचा प्रश्न आहे. आपलें जीवन अधिक सामाजिक आहे. लहानशा वर्तुळांत कां होईना आपले लोक परस्परावलंबनानें राहतात व ज्या समाजांतील व्यवहाराचा झगडा असेल त्याच समाजांतील शहाण्यासुरत्या व दोन्ही पक्षांना ओळखणाऱ्या अशा पंचांमार्फत न्याय मिळविण्याची आपल्याला पूर्वीपासूनची संवय आहे व या न्यायांत तराजू घेऊन बसलेल्या व डोळे बांधून तरवार उपसणाऱ्या न्यायदेवतेला संतुष्ट करावयाचा विचार नसून, व्यवहार सुरळीत चालेल, सामाजिक संबंध संभाळले जातील आणि लफंग्या लोकांस गुन्हा करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं एवढीच बाळबोध दृष्टि ठेवण्यांत येते. प्रेम आणि सहकार यांना विसरून जाणारा तागडीचा न्याय आपल्या लोकांनीं मानलेला नाहीं; हा संस्कृतीचा मोठा फरक आहे.

ज्याप्रमाणें लहान व्यापाऱ्यांना भांडवल व्याजीं देऊन सावकार त्यांच्या धंद्यांतील बहुतेक सगळा कस चोखून घेतो त्याचप्रमाणें कोर्टें आणि कोर्टांच्या दारांत बसलेले वकील हे भांडणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देतां देतां अगदीं सोलून काढतात. आणि या न्यायाचें विधि-विधान इतकें लांबलचक असतें कीं, कोर्टाच्या चक्रांत मनुष्य एकदां सांपडला म्हणजे त्याला नित्याच्या व्यवहाराकडे लक्ष देणेंहि जवळ जवळ दुरापास्त होतें. खेडेगांवांतील लोकांना तर फिरत्या कोर्टांच्या मागोमाग जातां जातां नाकीं नऊ येतात; आणि आजारांत चांगला डॉक्टर मिळविणें हें जसें धनवंताच्या भाग्यांतच लिहिलेलें असतें त्याचप्रमाणें चांगला वकील मिळविणें हें देखील मोठ्या थैलीचेंच भाग्य आहे.

ज्याप्रमाणें धर्मप्रचारक, मिशनरी लोक स्वतःच्या धर्माची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं गोरगरिबांना औषधें देण्याची सोय अगदीं फुकट व पुष्कळ वेळां कळकळीनें करतात, त्याप्रमाणें आपल्या देशांतील

बऱ्याचशा धर्मनिष्ठ कायदेपंडितांनीं मिशनरी बनून लोकांना न्याय मिळवून दिला पाहिजे आणि त्याबरोबर न्यायाचें शिक्षणहि दिलें पाहिजे. खरा डॉक्टर ज्याप्रमाणें रोग्याला औषध देऊन स्वस्थ बसत नाहीं पण रोगाचीं कारणें समजावून देऊन रोग न होण्यासाठीं काय काय केलें पाहिजे हें समजावून सांगतो, त्याप्रमाणें खरा कायदेपंडित समाजाला कायद्याचीं कलमें चुकविण्यासाठीं उलट्यासुलट्या कशा उड्या माराव्यात आणि कोणत्याहि घटनेला बुद्धीच्या शिताफीनें हवा तो रंग कसा द्यावा हें शिकविण्याच्या ऐवजीं आपला व्यवहार कसा चोख करावा याचेंच शिक्षण देईल. विद्यादानाचा ज्याप्रमाणें किफायतशीर धंदा होऊं शकत नाहीं, समाजसेवेचा तो एक पवित्र भाग आहे, त्याचप्रमाणें व्यवहारांत बुद्धिदान किंवा न्यायदान हेंहि अडचणींत सांपडलेल्या लोकांकडून पैसे उकळण्याचें साधन न होतां समाजाचें कल्याण करण्याची ती एक तपश्चर्या झाली पाहिजे.

इतिहास-संशोधनाच्या बाबतींत ज्याप्रमाणें प्रथम पाश्चात्यांनीं सुरवात केली पण आतां या देशांतील विद्वानांनीं येथील संस्कृति यथार्थपणें समजून घेऊन या विषयांत स्वदेशी पाया घातला आहे, त्याच-प्रमाणें वैद्यक व न्यायखातें या दोन्ही बाबतींत पूर्वपरंपरा ओळखून समाजाची नाडी तपासून, स्वदेशी पद्धत चालू केली पाहिजे. आजचे डॉक्टर आणि वकील केवळ अनुसरण करणारे शिष्य आहेत. या लोकांनीं मनावर घेतल्यास या दोन्ही क्षेत्रांतील सबंध पायाच बद-लणें अशक्य नाहीं. पण तसें करण्यास असाधारण स्वार्थत्याग हवा आहे. देवांनींच यज्ञांचा विरोध केला तर त्यांची चंगळ कशी चालेल?

पुष्कळदां असें होतें कीं, चालत्या स्थितीविषयीं ज्यांच्यां हृदयांत असंतोष आहे, चालू पद्धतीचे दोष ज्यांना बरोबर समजले आहेत, आणि नवी घडी कोणत्या पद्धतीची असली पाहिजे याचीहि ज्यांना थोडीफार कल्पना आहे अशा लोकांमध्यें जुनें बदलून नवें चालू

करण्याइतकें बुद्धिसामर्थ्य नसतें, तशी धमक नसते. अशा लोकांमध्यें आपापसांत सूक्ष्म मतभेद असल्यानें त्यांचें संघटनहि होऊं शकत नाहीं. आणि जुनी पद्धति तर संघटित, दृढमूळ व प्रतिष्ठित असते. अशा स्थितींत सुधारकांची ओरड खरी असूनहि तिचा परिणाम होत नाहीं. आणि अशांनीं केलेला दुर्बळ विरोध जुन्या पद्धतीचें नुकसान करण्याऐवजीं तिला मजबूतच बनवितो. शिक्षण, वैद्यकी व न्याय या तिन्ही क्षेत्रांत असें झालेलें आहे.

मनुष्यानें जर अतिलोभाला बळी न पडतां, सज्जन लोकांशींच व्यवहार करावयाचें ठरविलें तर त्याला दोन्ही बाजूंच्या हिताहिताचा आणि स्वार्थाचा विचार करण्याची संवय सहज पडेल. इतकें असून जर मतभेद राहिलाच तर तिऱ्हाईत तटस्थ पंचांमार्फत तो सोडवून घेणें मुळींच कठीण पडणार नाहीं. पण मनुष्य लोभाला बळी पडतो; आणि दोन्ही पक्षांनीं आपापला स्वार्थ ताणावा असा नियम होऊन बसतो. एक दोन पिढ्या गेल्या, आपण म्हणत आलों आहोंत कीं कोर्टाच्या ऐवजीं लवाद-पंचायतीची स्थापना व्हावी. पण मांजराच्या गळ्यांत अजून घांट बांधली गेली नाहीं. खरोखर पहातां पंचायतीची स्थापना होण्यास समाजांतील व्यवहारच अधिक शुद्ध व म्हणून मर्यादित होण्याची आवश्यकता आहे. शहरांतील व्यापारी वातावरणाला असें करणें कदाचित् जड जाईल; पण खेडेगांवांतील व्यवहार सोपे व साधे असल्यानें आणि परस्पर संबंध केवळ कराराचे नसून जीवनसंबंध असल्यानें वरील सुधारणा खेडेगांवांतून सहजच झाली पाहिजे. कज्जे कोर्टांत न्यावयाचे नाहींत असें जर कोणी व्रत घेईल तर त्याला लवकरच पस्तावावें लागेल. कारण स्वतःचें भांडवल बुडवून सामाजिक सुधारणा करण्याचा दूरदृष्टी स्वार्थ फारच थोड्या लोकांत असतो. पण कधीं काळीं कोर्टांत जावें लागेल अशा प्रकारच्या व्यवहारांत पाऊलच टाकावयाचें नाहीं असें व्रत घेणें माल

मनुष्याला शक्य आहे. आणि हाच खेडेगांवांसाठीं एकमात्र मार्ग आहे.

कोर्टांत खऱ्याचें खोटें केल्यावांचून निभाव लागत नाहीं असें सर्वच म्हणतात. पण जर मनुष्य दृढतापूर्वक आणि डोळ्यांत तेल घालून खरीखुरी वस्तुस्थितीच कोर्टापुढें नमूद करील तर कोर्टें कशींहि असोत, खाजगी व्यवहारांत तरी खराखुरा न्याय देण्याची कोर्टांची नैतिक जबाबदारी कोर्टांस आपोआपच जाणवूं लागेल. मात्र यासाठीं जो कालावधि लागेल तेवढा त्यागपूर्वक सोसला पाहिजे. अस्मानी (ईश्वरी कोपाचें), सुलतानी (राजाच्या जबरदस्तीचें) कारणांमुळें होणारें नुकसान आपण मुकाट्यानें सोसतों आणि तें जमेस धरूनच व्यवहार करतो, त्याचप्रमाणें रुहानी ( आध्यात्मिक ) कारणांसाठीं सोसण्यास कां तयार होऊं नये ? अस्मानी-सुलतानी कारणें असूनहि जर व्यवहार सर्वस्वी बुडाला नाहीं तर रुहानी कारणें कबूल केल्यानें तो बुडेल असें मानण्यास कारण काय आहे ? वकील असोत किंवा समाजाचे पुढारी असोत त्यांच्या हातून लोकांपुढें ही बाजू फारच थोडी मांडली जाते. शिक्षक किंवा प्रोफेसर ज्याप्रमाणें ठराविक पगार घेऊन काम करतात त्याप्रमाणें ठराविक वेतनावरच वकिलांनीं काम करण्याची पद्धत सुरू झाली पाहिजे. आणि अपिलावर अपिलें करण्याची पद्धत अगदींच संपुष्टांत आणिली पाहिजे.

हें सर्व होईल तेव्हां होवो; आज खेडेगांवांतील प्रत्येकानें आपला व्यवहार सुधारून कोर्टें टाळण्याचाच प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे वसति सोडून जाण्याचा प्रसंग येणार नाहीं.

५००८

# व्यसनें

दारूपेक्षां अफू वाईट, खोडकरपणापेक्षां ऐदीपणा वाईट, घोडे उडविण्याच्या हौशीपेक्षां पालखीमेण्याची हौस वाईट, एवढें जर लोकांना पटलें तर समाजांतील व्यसनांची मीमांसा करणें आपल्याला अधिक सोपें जाईल. रजोगुण अतिशय चुळबुळ करतो, तमोगुण कोणाच्याहि आध्यांत ना मध्यांत-स्वस्थ पडून असतो, म्हणून तो सत्त्व-गुणास अधिक जवळ असल्याचा भास होणें स्वाभाविक आहे. पण तमोगुण हा सर्व बाजूंनीं अधिक घातुक आहे; अभ्युदय आणि निःश्रेयस दोन्ही बुडवणारा आहे; हें समजलें तर व्यसनांत देखील उजवें डावें ठरविणें लोकांना साधेल.

व्यसनें सर्व येथून तेथून वाईटच, पण कांहीं व्यसनांमध्यें डोकें चालवावें लागतें, हिकमती योजाव्या लागतात, आणि निरनिराळ्या कला अवगत करून घ्याव्या लागतात. उलटपक्षीं कांहीं व्यसनें मनु-ष्याला त्याच्या माणुसकीचा व सर्व शक्तींचा विसर पाडतात. हीं दुसऱ्या प्रकारचीं व्यसनें ज्या समाजांत बोकाळलीं त्या समाजाची धडगत नाहीं; कारण तें जिवंतपणींच मरण आहे.

आपल्याला येथें खेडेगांवांतील खास व्यसनांचा विचार कर्तव्य आहे. दारू, अफू, गांजा वगैरे व्यसनांचा विचार करण्यापूर्वी कांहींहि न करतां वायफळ गप्पा मारणें आणि आड्ड्यांत (मजलशींत) हजर नसलेल्या लोकांची निंदा करण्यांत वाटेल तेवढा वेळ घालविणें हें व्यसन सर्वांत मोठें आहे. वायफळ गप्पानें मनुष्याचा पुरुषार्थ जितका क्षीण होतो तितका विषयसेवनानेंहि कदाचित् होत नसेल. वाक्पात हा वीर्यपाताहून देखील अधिक अशक्ति उत्पन्न करणारा आहे, असें बोलून बोलून थकणाऱ्यांविषयीं वैद्यकशास्त्रानें म्हटलें आहे. ' वाक्-

पातो वीर्यपातात् गरीयान् ' हीच गोष्ट आध्यात्मिक अर्थानेंहि खरी आहे. खेडेगांवांतील हें व्यसन काढून टाकण्यासाठीं खेडेगांवांतील तरुणांमध्यें एक जबरदस्त चळवळ चालविली पाहिजे. सामाजिक संस्कृति टिकवण्यासाठीं टीकाशस्त्र अत्यावश्यक आहे, असें म्हणतात व तें बऱ्याच अंशीं खरेंहि आहे. पण वायफळ गप्पा आणि हजर नसलेल्यांची कुटाळकी हें कांहीं सामाजिक उन्नतीचें शस्त्र नव्हे. यायोगें समाज दिवसेंदिवस खालावतच जातो. भल्या पहाटें उठून न्याहारी आटोपून शेतावर पोहोंचणें हें एक शेतकऱ्याचें भूषण मानलें जात असे. रात्रीं जागरण कितीहि होवो, शेतकरी म्हटला म्हणजे भल्या पहाटेंच उठावयाचा. त्याऐवजीं आतां उशीरानें उठणें शिष्टपणाचें लक्षण मानलें जाऊं लागलें आहे. न्याहारीच्या ऐवजीं जेथें चहाचा प्रचार सुरूं झाला आहे तेथें अर्धीमुर्धी सकाळ जवळ जवळ फुकटच जाते. हें व्यसन आहे हेंच लोकांच्या लक्षांत अजून आलें नाहीं.

आपल्या पूर्वजांनीं शेंकडों पिढ्यांच्या कडक आग्रहानें स्वच्छता आणि शुचिर्भूतपणा यांच्या संवयी समाजांत रूढ केल्या होत्या; त्याहि आतां ढिल्या होत चालल्या आहेत, या गोष्टीकडे पुरेसें लक्ष गेलें नाहीं. आहारशुद्धि, शरीरशुद्धि, वस्त्रशुद्धि आणि वाणीची शुद्धि या गोष्टी संस्कृतीच्या अगदीं पायाशीं आहेत. कदाचित् कपडे पूर्वीपेक्षां आजचे लोक अधिक साफसूफ ठेवीत असतील, पण बाकीच्या बाबतींत शिथिलता वाढत आहे.

[ पूर्वीचे लोक कपडे वापरतच फार थोडे. बाहेर जातांना घालण्याचे कपडे, धोतरसुद्धां निराळें असे व तें जपून घडी करून ठेवलेलें असे. आपल्या देशांत कपडे कमी वापरणाराला क्षयरोग आणि चामडीचे रोग बरेच कमी होतात असा वैद्यकीय अनुभव आहे. कपड्याची फॅशन वाढवून आपण खर्च वाढविला, रोगराई वाढविली, अस्वच्छतेचें एक साधन वाढविलें आणि कपडे खेडेगांवांत तयार

होत नसल्यानें दारिद्र्यवृद्धीचें साधनहि वाढविलें. उगीचच्या उगीच कपड्यांवर कपडे चढविणें याला व्यसन कां म्हणूं नये हाहि एक प्रश्नच आहे. ]

कांहीं व्यसनें इतकीं रूढ आणि दृढमूल झालेलीं असतात कीं, त्यांच्या विरूद्ध लोकांची धर्मबुद्धिच बोथट झालेली असते. अश्लील शब्द वाटेल तेव्हां वाटेल तसे वापरणें, एकमेकांला घाणेरड्या शिव्या देणें आणि स्त्रियांच्या समोर आणि मुलामुलींच्या समोर देखील न लाजतां विचकट बोलणें याचें खेडेगांवांतील लोकांना कांहींच वाटत नाहीं. हा दोष सर्व जगभर पसरलेला असला तरी तो काढण्याजोगा नाहीं असें मात्र नव्हे.

आणि जणूं काय अश्लील शब्दांचें शब्दभांडार रिकामें होईल, शब्द न वापरल्यानें गळून पडतील या भयानें शिमग्यासारखे सण रूढीनें चालू ठेविले आहेत. शिमग्याचा सण हा गुलामगिरीचें द्योतक आहे. तो बदलून टाकला पाहिजे, त्याचें शुद्धीकरण झालें पाहिजे.

समाजाला आंतून पोंखरून खाणारें व्यसन म्हणजे वैवाहिक नीति-संबंध भ्रष्ट करण्याचें होय. एकाकाळीं वेश्यागमन आपल्या देशांत अमर्याद बोकाळलेलें होतें. हल्लीं तें बरेंच कमी झालें आहे असें म्हणत येईल. व्यभिचाराविषयीं असें म्हणतां येईल किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. तरुणांमध्यें स्वतःला नामर्द करण्याचें व्यसन पूर्वी कितपत होतें याची कल्पना करणें कठीण आहे. आज हें व्यसन शहरांत काय व खेडेगांवांतून काय बरेंच पसरलेलें आहे. या व्यसनाला आळा घालण्याचें काम शाळामास्तर आणि आखाड्यांतील वस्ताद केव्हां केव्हां करतात. पण केव्हां केव्हां शेताच्या राखणीस घातलेलें कुंपणच शेत खाऊन जातें. आईबापांची बेदरकारी न समजण्याजोगी आणि अक्षम्य आहे. फॅशनचा नाजूकपणा वाढल्यामुळें शरीरसंवर्धनाकडे लक्ष कमी दिलें जातें. वाढत्या अंगाच्या तरुणवयीं, निर्दोष व पौष्टिक आहार

मिळावयास पाहिजे आणि शरीरांतील सर्व वीर्यांचा अगदीं घाम होऊन जाईतोंपर्यंत मेहनत व कसरत मिळाली पाहिजे. त्याऐवजीं जिभेला केवळ चटक लावणारा असा निःसत्त्व आहार, कपड्यांचा आणि केसांचा थाट, आणि अकालीं वार्धक्य आणणारे बैठे खेळ यांचेंच वातावरण वाढलेलें आहे. पूर्वी खेडेगांवांतून तरुणांमध्यें पक्षा-पक्षांच्या मारामाऱ्या होत असत. आज मारामाऱ्या कमी झाल्या असल्या तरी पक्षापक्षी कमी झालेली नाहीं.

तंबाखूचें व्यसन वाढत्या प्रमाणावर आहे असें म्हणावें लागतें. या व्यसनामुळें दांत बिघडतात, गळ्याचे रोग होतात, फुप्फुसाचे रोग कायमचें घर करून बसतात, आणि टॉल्स्टॉयचें म्हणणें तर असें आहे कीं, सदसद्विवेकबुद्धि आणि चारित्र्याची दृढता या दोहोंचा चेंदामेंदा करून टाकण्याची शक्ति दारूपेक्षां तंबाखूंत अधिक आहे. त्यानें उदाहरण दिलें आहे कीं, एका इसमाला खून करण्याची हिंमत होईना म्हणून त्यानें प्रथम बाटल्या झोंकल्या, पण खून हें निंद्य कर्म आहे, तें आपण करूं नये अशी आंतील टोंचणी कांहीं केल्या मरेना, शेवटीं त्यानें चिरूटाचा आश्रय केला. मग मात्र न्यायबुद्धि, धर्मबुद्धि, दयाबुद्धि सर्व लयास जाऊन तो 'मर्द' बनला, आणि त्यानें योजलेलें नीच कृत्य केलें.

तंबाखूची शेती करणें यांत कांहीं चूक आहे असें शेतकऱ्यांना क्वचित्च वाटतें. राज्यकर्त्यांनीं ज्या वस्तूला फॅशनेबल ठरविलें तिचा विरोध करण्याची लोक हिंमतच सोडून देतात. आणि तंबाखू तर मोंगल काळापासून राजमान्य होऊन बसली आहे. ज्यांना घरीं पोट-भर खावयास मिळत नाहीं, अर्धपोटीं उठणाऱ्या पोटच्या लेकरांची केविलवाणी तोंडें ज्यांना प्रत्यहीं निदान वर्षांतून पांचसात महिने पहावीं लागतात, त्यांना देखील तंबाखूसाठीं पैसे खर्च करतांना पाहून दुःखाइतकेंच आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांत दरवर्षी किती रुपयांची

तंबाखू वापरली जाते याचा आंकडा प्रत्येकानें घोकून ठेविला पाहिजे.

अफू, गांजा, दारू, कोकेन वगैरे पदार्थ तर व्यसनांचा राजा. त्यांचें साम्राज्य इतकें मजबूत आहे कीं, तें तोडण्यासाठीं धर्मनिष्ठांचें एक मोठें पथकच उत्पन्न झालें पाहिजे. मनुष्य अफू खातो कां अफू मनुष्याला खाते हें सांगणें कठीण आहे. रजपूत, गराशिया, जमीनदार वगैरे लोकांत अफूचें व्यसन बोकाळल्यामुळें देशांतील एक मोठा कर्तबगार वर्ग अगदींच निःसत्व व महत्त्वाकांक्षाशून्य होऊं लागला आहे. सर्व सामाजिक शक्तींचा ओघ हीं व्यसनें दूर करण्याकडे लावला पाहिजे. कपट आणि हिंसा एवढें टाकून बाकीच्या उपायांनीं दारू, अफू, आदि व्यसनांचा नायनाट करितां येईल त्या बाजूनें केला पाहिजे.

दारूमुळें शरीरप्रकृति, धनसंपत्ति, अब्रू आणि नीति सर्वांचाच नाश होतो. समाजाचें समाजत्वच नष्ट करण्याची दारूची प्रवृत्ति आहे. हें बालंबाल अनुभवास आलें असूनहि जगांतील लोक दारूच्या नाशास प्रवृत्त होत नाहींत याचें आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांत या व्यसनांचा नायनाट करणें इतर किती तरी देशांपेक्षां सोपें आहे. प्रयत्नच झाले पाहिजेत.

घोड्यांच्या शर्यती व तेथें चालणारा जुगार या व्यसनांमुळें युरेशियन लोकांची अगदीं पायमल्ली झाली आहे. पण सामान्य जुगार ठिकाठिकाणीं दिसून येतो. कोठें कोठें तर जन्माष्टमीच्या शुभ मुहूर्तीं जुगाराला सुरवात होते किंवा भरती येते. जुगार हें चांगलेंच जुनें स्वदेशी व्यसन आहे. त्याला नष्ट करण्यास जालीम उपायच योजले पाहिजेत.

# उधळपट्टी

अवास्तव खर्च अथवा उधळपट्टी खरोखर दोष आहे किंवा काय असा प्रश्न विचारण्याइतकीं कांहीं राष्ट्रें आज माजलीं आहेत. त्यांचा प्रश्न बाजूस ठेवूं व दरिद्री हिंदुस्थानाचाच विचार करूं. देशांत लोक उपासमारीनें मरत असतांना, हातीं साधन आलें आहे एवढ्या-साठीं उधळपट्टी करणें हा खरोखर समाजद्रोह आहे. पण आपल्या येथें कांहीं जुन्या चालीरीतींमुळें मनुष्याला इच्छा नसतांनाहि उध-ळपट्टी करावी लागते याचें अतिशय दुःख वाटतें. याचें अगदीं प्राथ-मिक स्वरूप म्हणजे घरांतील लोकांच्या आवश्यकतेहून अधिक अन्न रोज शिजविलें पाहिजे अशी जुन्या कुटुंबांमधून धार्मिक समजूत आहे. तुपासारखा खाण्याचा पदार्थ दिवे लावण्याकडे किंवा जाळण्याकडे वाप-रणें हेंहि धर्माच्या नांवानेंच घडत असतें. यांत उधळपट्टी असून त्याखेरीज हवा बिघडविणें आणि ज्या वासरांच्या तोंडांत मारून आपण दूध काढून घेतो त्यांचा द्रोह करणें हे अधिक दोष येतात. उत्सवप्रसंगीं दरवाजांत दुधाच्य घागरी चिखल होईतों ओत-ण्याचा रिवाज होता असें आपण वाचतों. हाहि याच प्रकारचा दोष होय. उधळपट्टी हा श्रीमंती दाखविण्याचा एक प्रकार आहे. अज्ञा-नानें होणारी उधळपट्टी याहून निराळी असते. खताच्या उपयोगीं पडणारें मूल्यवान शेण, जळण म्हणून आपण वापरतों ही उधळपट्टी अज्ञानमूलक आहे.

वर्षभर राबल्यानंतर घरांत जेव्हां धान्याची रास येते तेव्हां शेत-कऱ्याचे डोळे दिपून जातात, व तो खुषींत येऊन राजा बनतो आणि मागचापुढचा विचार सोडून चार दिवस हवी तशी उधळपट्टी करतो याचें कारण त्याला हिशेब येत नसतो, मागचापुढचा अंदाज नसतो

हें होय. याचप्रमाणें घरांतील ब्रायकाहि भांडींकुंडीं किंवा भपकेदार मोहक वस्तू विकत घेण्यासाठीं घरांतील धान्य व जुने कपडे फुकां सवंग देतात. या उधळपट्टीच्या मुळाशींहि अंदाजाचा अभाव हेंच मुख्य कारण आहे. हातांत पैसा नसणें आणि सरळ खर्च करण्याची मोकळीक नसणें हींहि गौण कारणें आहेत.

नोकरी मिळवितांना, लग्नसंबंध जुळवितांना, वशिल्यानें कामें करून घेतांना, अथवा मोठीं मोठीं कंत्राटें पदरांत पाडून घेतांना पुष्कळदां आपण आहोंत त्याहून अधिक श्रीमंत आहोंत असें भासविण्याची आवश्यकता असते. कर्ज काढतांना देखील लोकांना हाच प्रकार करावा लागतो; व यामुळें तोलाबाहेर उधळपट्टी होत असते. पुढच्या फायद्याच्या आशेवर लोभांत गुंतलेला मनुष्य आज खर्च करून मोकळा होतो व ब्रेरेच वेळां पुढें पेचांत येतो. पाहुणचार हें प्रेमाचें अथवा समाजसेवेचें तत्त्व देखील घमेंड आणि बडेजावीचें साधन होऊन बसलें आहे.

उधळपट्टीचे हे सर्व प्रकार स्पष्ट दिसत असून देखील त्यांचा कोणी निषेध करीत नाहीं. समाजामध्यें एकानें उधळपट्टी चालविली तर दुसऱ्यास वाहत्या गंगेंत हात धुवून घेतां येतात. अशा स्थितींत समाज समजून असला तरी स्पष्ट बोलण्याची इच्छाच करीत नाहीं. जेव्हां उधळपट्टी हा एक रिवाज होऊन बसतो तेव्हां मात्र एकाच्या चढाओढीनें दुसऱ्यास अवास्तव खर्चांत उतरावें लागतें, आणि मग मात्र लोक कुंथूं लागतात.

उधळपट्टी हा सृष्टिरचनेविरुद्ध जसा गुन्हा आहे त्याचप्रमाणें तो समाजाविरुद्धहि गुन्हा आहे; हें ओळखून लोकांनीं उधळपट्टी करणाऱ्यांची कानउघाडणीच केली पाहिजे. उधळपट्टी करणाराची दाता, दानशूर, हौशी, रसिक, आस्थेवाईक, मनुष्यप्रेमी, वगैरे शेलक्या विशेषणांनीं खुशामत न करितां उधळपट्टीमध्यें प्रतिष्ठा मुळींच नाहीं

असें समाजधुरीणांनीं त्याला बजावून सांगितलें पाहिजे. द्रव्य ही सामाजिक वस्तु आहे, तिचा दुरुपयोग समाजाला सर्व बाजूंनीं बाधक होतो हें ओळखून द्रव्याच्या दुरुपयोगाला समाजानें आळा घातला पाहिजे. उत्सव, यात्रा, लग्नमुंजी, इत्यादि सार्वजनिक प्रसंगीं देखील निष्कारण होणारा खर्च आणि मेजवान्यांत होणारा अन्नाचा अपव्यय हीं सर्व असंस्कारितेचीं लक्षणें आहेत असें लोकमत नेहमीं तयार करीत राहिलें पाहिजे. आजारीपणाच्या वेळीं घाबरून जाऊन प्रेमातिरेकानें हवा तसा खर्च करणें यांतहि असंस्कारिता, भित्रेपणा, किंबहुना नास्तिकपणा आहे हीहि बाजू लोकांपुढें वारंवार मांडली पाहिजे; व ज्यांचेसाठीं असा फाजील खर्च होतो त्यानीं स्वतःची लज्जा व नापसंति व्यक्त केली पाहिजे. उधळपट्टी ही अधार्मिक आहे.

---

# दारिद्र्य

हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति दिवसेंदिवस खालावत चालली आहे या निर्विवाद गोष्टीविषयीं देखील एक प्रतिपक्ष उत्पन्न झाला आहे. पण हिंदुस्थानांतील खेडीं दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होत चाललीं आहेत याविषयीं मात्र कोठेंहि दुमत नाहीं. या दारिद्र्याचीं कारणें अनेक आहेत. त्या सर्वांची चर्चा येथें न करतां शेतकऱ्यांच्या स्वतःच्या हातीं जीं कारणें दूर करणें आज आहे तेवढ्यांचाच येथें आपण विचार करूं.

एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, लोकांचा खर्च हळूहळू वाढत आहे. आवश्यक वस्तु महाग होणें, आणि अनावश्यक वस्तूंची चटक लागणें हीं खर्च वाढण्याचीं दोन कारणें आहेत. अनाठायीं खर्च आणि शेतसारा व कर्ज यांचा बोजा वाढणें हेंहि खर्च वाढण्याचें एक कारण आहे. खर्चाच्या मानानें जर उत्पन्न वाढत गेलें तर खर्चाचें ओझें भासणार नाहीं. उलटपक्षीं खर्च आहे तेवढाच राहिला आणि उत्पन्न मात्र कमी झालें तर पूर्वीचा स्वाभाविक खर्च आज अस्वाभाविक भासूं लागतो आणि परोपरीनें जाचूं लागतो. आपल्या शेतकऱ्यांची फसगत दुहेरी आहे; खर्च वाढला आहे आणि उत्पन्न कमी होऊं लागलें आहे. शेतकरी नसलेले असे जे कारागीर, मजूर किंवा आश्रित धंदे करणारे इतर लोक खेडेगांवांस अजून चिकटून राहिले आहेत, त्यांची दैना शेतकऱ्यांहूनहि अधिक आहे. कारण शेतकऱ्याचें उत्पन्न कमी झालें तरी त्याला तें वाढविणें केव्हां केव्हां शक्य असतें, आणि शेतकऱ्याला महागाईचा फायदाहि मिळूं शकतो. पण बाकीचे उद्योगधंदे पार ठार झाले आहेत. जीवनास लागणाऱ्या लहानमोठ्या सर्वच वस्तू शहरांतून किंवा परदेशांतून येऊं लागल्या

आहेत आणि लोकांची अभिरुचि बदलल्यानेंहि खेडेगांवांतील बरेचसे धंदे बसत चालले आहेत.

दारिद्याचें दुसरें एक महत्त्वाचें कारण आपल्या उद्योगधंद्याची आणि गृहसंसाराची गबाळी पद्धति हें होय. बाहेरील पुरुषार्थ व पराक्रम कमी झाला म्हणजे आपापसांत विनाकारण तंटे उपस्थित होतात, आणि स्वतःच्या नालायकीचा राग एकमेकांवर काढला जातो. हा अनुभव सार्वत्रिक आहेच. पराक्रम वाढत असल्यावेळीं लोक वेगळे वेगळे राहिले तरी चालतें. पण अशा वेळींच लोकांना एकत्र रहाणें सोपें जातें. उलटपक्षीं जेव्हां स्थिति खालावलेली असते तेव्हां पुष्कळांनीं एकत्र राहून अंधपंगून्यायानें एकमेकांच्या आश्रयानें रहाणें अत्यावश्यक असतें, अशा वेळींच जीवनकलह असह्य होऊन सहजासहजीं भांडणें उत्पन्न होतात.

आपल्या लोकांचें जीवन बऱ्याच अंशीं देशस्थी थाटाचें असतें. उत्पन्न कितीहि कमी झालें तरी खर्च कमी करण्याचें आपल्यास सुचत नाहीं; अथवा खर्च कमी होतच नसेल तेथें सर्वांनीं जिवापाड मेहनत करून उत्पन्न वाढविलें पाहिजे, हेंहि कुटुंबांतील बहुतेकांना सुचत नसतें. सावकारांनीं कुळांना वांचवून त्यांची शक्ति वाढवून त्यांच्या वाढत्या उत्पन्नांतून वाढता नफा मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी; तसें न करितां ते कुळांना पिळून काढून नफा करण्यांत कुळांच्या जिवावरच उठतात. महाभारतांत जें सांगितलें आहे कीं, प्रजेशीं वागतांना माळ्याप्रमाणें नफा मिळवावा, कोळसेविक्या लोणाऱ्याप्रमाणें नव्हे, ती गोष्ट आजचे लोक पारच विसरले आहेत. एक मिळवता मनुष्य असला म्हणजे तो नेहमीं पाठबळ आणि मनुष्यबळ याची अपेक्षा करीत असतो, बाहेरून मिळवून आणून घरांत टाकलेल्या संपत्तीची नीट व्यवस्था लावणारा आणि तिचें चीज करणारा जर घरांत कोणी असला तर मिळविणाऱ्याला दुप्पट उमेद येते.

जिवाला जीव देणाऱ्या जिव्हाळ्याच्या व कर्तबगार लोकांचा संघ वाढला तर तें संघसामर्थ्य जवळ जवळ दुर्जय होतें. पण आपल्या समाजांत एकजण उत्साहानें काम करूं लागला म्हणजे इतरांना मत्सर तरी आठवतो किंवा आळस तरी आठवतो. पुढें जाणाऱ्याचे पाय ओढावेत, पोहणाऱ्याच्या गळ्यांत धोंड होऊन पडून रहावें, एक कर्ता दिसला म्हणजे शेवाळाप्रमाणें आश्रितांनीं त्याच्या भोंवतीं जमावें आणि आपापले क्षुद्र हेतू साधण्याचा प्रयत्न करावा असा अनुभव निदान खेडेगांवांतून तरी आहेच. खेडेगांवांतील महत्त्वाकांक्षा खेडेगांवांतील या स्थितीला कंटाळून साधनसंपत्तिनिर्शी शहराकडे धांव घेते, असा अनुभव सार्वत्रिक आहे; पण याचें पृथःकरण मात्र अजून झालें नाहीं.

खेडेगांवांमध्यें जुनी सामाजिक संस्कृति कुजकट रूपानें कां होईना अजून जिवंत आहे. ती ज्या प्रकारच्या जीवनाची आणि जबाबदारीची अपेक्षा व्यक्तींकडून करिते, ती टाळणें शक्य नसते. जुन्यासंस्कृतीचा हा आग्रह क्षीणवीर्य समाजांत भाररूप होऊन बसतो. शहरांतील लोकांनीं जुनी संस्कृति पार झुगारून दिली आहे. शहरांमध्यें मनुष्याला भीडमुर्वत सोडून स्वतःचा बिनजबाबदार स्वार्थ साधणें शक्य असतें. शहरांमधून सामाजिक संघटन अगदींच ढिलें झालें आहे व त्यामुळें व्यक्तीला व्यक्तिगत प्रगति साधणें फार सोपें जातें. राज्य मोडकळीस आलें म्हणजे ज्याप्रमाणें किंचित्काळ राज्यांतील सरदार लोक बळावतात, पण सरतेशेवटीं संघसामर्थ्याच्या अभावीं सर्वांचाच नाश होतो, त्याचप्रमाणें सामाजिक बंधनें तोडून टाकलीं म्हणजे व्यक्तींचीं वढती भराभर होते; पण पुढें ही वाढ उच्च पोषणाच्या अभावीं खुरटून जाते. शहर आणि खेडेगांव यांमधील हा सांस्कृतिक भेद ध्यानांत घेतला पाहिजे. ग्रामोद्धाराची दिशा ठरविण्याच्या कामीं हा महत्त्वाचा आहे.

निदान हिंदुस्थानांत तरी शहरें खेडेगांवांवर उपजीविका करितात

असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण ही उपजीविका माळ्याप्रमाणें न होतां लोणाऱ्याप्रमाणें चालली आहे. खेडेगांवांतील कच्चा माल, खेडेगांवांतील कर्तबगारी आणि साधनसंपत्ति हीं शहरांत येतात. खेडेगांवांतील उद्योगधंद्यांना शहरें कांहींच आश्रय देत नाहींत. स्वतःला लागणारा माल परदेशांतून जसा येईल आणि बाजारांत जसा मिळेल तसा घेण्याची जडता लोकांमध्यें वाढली आहे. पूर्वी जमीनदार, जहागिरदार आणि इतर श्रीमंत लोक स्वतःला हवा असेल तसला माल सुद्धां कारागीर हुन्नरी लोक राखून तयार करवीत, आणि इतर लोक त्यांचें अनुकरण करीत असल्यानें संस्कृतीला वळण लागे आणि त्याबरोबर देशांतील कारागिरांना सार्वत्रिक उत्तेजन मिळून त्यांची भरभराट होत जाई. आजचा हिंदुस्थान आयत्या तयार होऊन आलेल्या मालाचा आंधळा गिऱ्हाईक झाला आहे. यामुळें देशाचें दारिद्र्य झपाट्यानें वाढत आहे. आणि लोकांना वातावरणांतूनच जें शिक्षण आणि संस्कृति मिळावयास पाहिजे, ती मिळणें अशक्य झालें आहे.

स्वतःच्या रहाणीकरणींविषयीं समाजानें खोलवर विचार केलेला असणें, त्या रहाणीप्रमाणें वापरण्याच्या वस्तू कशा असाव्यात हें नक्की केलेलें असणें, जीवनाच्या आदर्शाप्रमाणें वागण्याचे नियम, शिष्टाचाराची पद्धति, सामाजिक धर्म ( कर्तव्यें ) आणि सामाजिक संस्था या नक्की होणें व त्याबरोबर स्वतःस लागणारा माल स्वतःच्या देखरेखीखालीं स्वतःच्या आवश्यकतेनुरूप आणि अभिरुचीनुरूप तयार करविणें हें जिवंत समाजाचें लक्षण आहे. यांत कसलाहि तयार माल पडेल त्या किंमतीला विकत घेऊन चालविण्याची संवय असंस्कारितेचें लक्षण आहे. आपल्याला हवा असलेला माल आपल्याच लोकांकडून स्वतःच्या देखरेखीखालीं तयार करविणें यांत शिक्षण आहे, पुरुषार्थ आहे, आनंद आहे आणि यांतच जीवनाची संस्कृति आहे. आपला समाज जर उठवळ झाला नसता तर त्याला हें सहज पटलें

असतें. उठवळ समाजाचें दारिद्र्य दूर करणें कुबेरालाहि शक्य नाहीं.

दारिद्र्य दूर करण्याला अनेक उपाय केले पाहिजेत. पण त्यांतील मुख्य उपाय म्हणजे सर्वच लोकांना विशेषतः पांढरपेशांना हातपाय वापरण्याची संवय लावणें हा आहे. हातपाय असून तुम्ही बसून कसे राहिलां आहांत अशी महाभारताची वाणी टाहो फोडीत आहे. 'हस्तपादादि संयुक्ताः यूयं किमवसीदथ ?'

लक्ष्मीचें आद्य निवासस्थान शिरकमळ नसून करकमळ आहे. करकमळांनीं उद्योग आणि पुरुषार्थ केल्यावांचून शिरकमळावर मुकुट चढावयाचा नाहीं. पांढरपेशा लोकांनीं उद्योगाची, शारीरिक श्रमाची गोडी चाखली तर त्यांचीं शरीरें जोमदार होतील, प्रजा वीर्यवान होईल, त्यांचें डोकें व्यवहारकुशल होईल, शंकाकुशंका व भांडणें बरींच कमी होतील, त्यांचें वातावरण समाजांत पसरेल, उच्चनीचभावाचा रोग नाहींसा होईल, तेजस्वी जीवनानंद सर्वांना प्राप्त होईल आणि दारिद्र्याच्या रोगाचा नायनाट होईल.

---

## मजूरवर्ग आणि बेकारी

हिंदुस्थानांतील उद्योगधंदे कमी झाल्यानें बऱ्याचशा लोकसंख्येचा बोजा शेतीवर पडला आहे; आणि इतक्या लोकसंख्येचा भार सहन करण्याची कुवत शेतीमध्यें नाहीं; म्हणूनच खेडेगांवांतील लोकांना शेतीच्या बरोबर दुय्यम पोटधंदे शोधून काढून दिले पाहिजेत, असें सरकारी अंमलदार आणि देशसेवक दोघेहि म्हणतात. सरकारी आंकड्यांवरून अनेक गोऱ्या अंमलदारांनीं ही गोष्ट सप्रमाण सिद्ध केली आहे. सरकारनें नेमलेल्या बादशाही कमिशननें विचार करूनहि हेंच अनुमान स्वीकारलेलें आहे.

उलटपक्षीं शहरांतच मुख्यत्वें दिवस काढणारे आणि सुगीच्या दिवसांत अथवा गुन्हाळाच्या दिवसांत खेडेगांवांत जाऊन येणारे बरेचसे पांढरपेशे लोक चर्चा करितांना म्हणतात कीं, ' आजकाल मजुरी कोण महाग झाली आहे. मजूर मिळणेंच कठीण झालें आहे. आणि भरपूर मजूरी देऊनहि पुरे आठ तास काम करितील तर शपथ! येतांना उशीरानें येतात, उशीर कां केला म्हणून रागें भरावें तर परत जाण्याची धमकी घालतात. चिलिमतंबाखूच्या पायीं तासचे-तास घालवतात, आणि काम पुरें न करतांच केव्हां केव्हां दुसरीकडे जातात असा आमचा अनुभव आहे. आणि तुम्ही म्हणतां मजूर लोकांना काम नाहीं, हें कसें ? '

सुगीच्या दिवसांत मजुरांना सर्वच ठिकाणीं बोलावणें असतें; सर्वांना आपापली मळणी वेळेवर आटोपून घ्यावयाची असते; म्हणून थोडे दिवस कामाची चणचण असते खरी; पण पावसाळ्यांत मजुराचे हाल कुत्रा खात नाहीं. असें उत्तर दिलें असतां शहरी

स्थळ प्रत ११५

लोक पुनः म्हणतात, "अहो, पावसाळ्याचा अनुभव देखील आम्हांला आहे. कौलांतून पाणी गळून घराच्या भिंती पडूं लागल्या तरी देखील कौलें शाकारणारे लोक मिळत नाहींत. आजकाल पांढरपेशा कारकुनांचीच दैना आहे. जिकडे तिकडे मजूर माजुरी झाले आहेत. स्वयंपाक्यास जेवून खाऊन पंधरा रुपयावर रहा म्हटलें तर तो म्हणतो 'मला कारकून समजलांत कीं काय!'" तेव्हां हें गौडबंगाल आहे तरी काय!

मजूर वेळेवर कामास येत नाहींत, मन लावून काम करीत नाहींत, बरीच टंगळमंगळ करितात ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. शहरांत पावसाळ्यांत घर शाकारणारे मजूर मिळाले नाहींत एवढ्यावरून सर्वच ठिकाणीं मजूर मिळणें मुष्कील आहे असें अनुमान शहरी लोकांनीं काढणें स्वाभाविक आहे. स्वतःच्या थोड्याशा अनुभवावरून जगांत सर्वत्र असेंच आहे असें ठरविणें हा मनुष्यस्वभावाचाच दोष आहे.

खरोखरच पावसाळ्याच्या दिवसांत पोटाला न मिळाल्यानें अर्थात् मजूरी नसल्यानें उपासमार होऊन लोक मृत्युमुखीं पडल्याचीं उदाहरणें आहेत. आधुनिक पद्धतीचे लहानमोठे कारखाने जेथें चालतात तेथें बाजारभावापेक्षां अधिक मजुरी दिली जाते आणि काम अगदीं पिळून घेतलें जातें. त्यामुळें कारखान्याच्या आसपासच्या प्रदेशांत शेतीचीं कामें अडून रहातात, मजूर मिळत नाहींत आणि शेतीचा कसहि दिवसेंदिवस कमी होतो. कारखान्याच्या शहरांतून प्लेग किंवा इन्फ्ल्युएंझा सुरू झाला म्हणजे मजूर पटापट मरूं लागतात. कारखानदार कारखाना बंद न पडावा यासाठीं मजुरीचे दर वाढवत जाऊन आसपासच्या खेड्यांतून नवे नवे मजूर आणवतात. सांथीच्या रोगाला तेहि बळी पडले म्हणजे पुनः थोडी मजुरी वाढवितात.

अशा रीतीनें सांथीच्या दिवसांत शहरी कारखाने म्हणजे मजूरांचा बळी देण्याचीं मजूरसत्रेंच बनलीं आहेत असें भासूं लागतें.

अमदाबाद, मुंबई, कानपूर, कलकत्ता, जमशेटपूर, मदुरा वगैरे ठिकाणीं मागाव्या तितक्या मजुरांचा प्रवाह एकसारखा चालूं शकतो ही गोष्ट हेंच दाखवितें कीं, खेडेगांवांतून बेकारी यथेच्छ असून फालतू मजूर रिकामे पडलेले आहेत. शहराच्या आसपासच्या खेडेगांवांतून बेकारी कमी असल्यानें शहरी लोकांना खेडेगांवाचीं दुःखें दिसत नाहींत इतकेंच. हिंदुस्थानांत असे किती तरी भाग आहेत कीं, जेथें गरीब लोकांनीं चवली पावलीहून मोठें चांदीचें नाणेंच पाहिलें नाहीं. कोठें कोठें गाई म्हशी असल्या तरी दुधातुपास गिऱ्हाईकच नाहीं.

अशा भिन्न भिन्न परिस्थिति असलेल्या देशाच्या खेडेगांवांतील मजूरवर्गाचा विचार करावयाचा आहे.

खेडेगांवांतून शेतीवांचून बाकी सर्व धंदे बसल्याकारणानें मजुरांना बाराहि महिने काम मिळेल अशी सोय कोठेंच नाहीं. शेतीच्या हंगामांत शेती करून इतर वेळीं मजुरीसाठीं शहरांत जाणें हें शहरांना परवडत नाहीं, आणि शेतकी पेशाच्या कुटुंबानांहि असलें भटकें जीवन परवडत नाहीं. कोकणांतील बेकार लोक घरची शेती संभाळून मुंबईच्या गिरण्यांत कामास येऊं लागले तेव्हां गिरणीवाल्यांनीं हाकाटी चालविली कीं, हा मजूरवर्ग मुंबईत स्थायी रहात नाहीं, त्यामुळें आमचें फार नुकसान होतें. खेडेगांवांत रहाणाऱ्या प्रत्येकाला थोडी तरी जमीन आणि गाई बैल कांहींतरी असलें पाहिजे. शहरांत कारखाने काढून शेती आणि ग्रामसंस्कृति या दोहोंचा नायनाट करण्यापेक्षां घरबसल्या चालूं शकतील असे सर्व प्रकारचे धंदे खेड्यांत पुनः नेऊन पेरले पाहिजेत.

असें होण्यास ज्यांना थोडीबहुत ऐपत आहे, अक्कलहुषारी

आहे अशा पांढरपेशावर्गांतील लोकांनीं खेडेगांवांत जाऊन रहाण्याचें पसंत केलें पाहिजे. आज निकृष्ठ स्थितींतहि पांढरपेशी कुटुंबें खेडेगांवांत जाऊन राहिलीं आणि त्यांनीं जर पोटभर अन्नवस्त्रांत समाधान मानलें आणि खेडेगांवांतच मिळणाऱ्या आरोग्य आणि जीवनानंदाची त्यांना गोडी लागली तर हें सर्व शक्य आहे. खेडेगांवांत पांढरपेशांचा चरितार्थ त्यांनीं सेवावृत्ति स्वीकारल्यास सुखानें चालूं शकेल. खेडेगांवांतील बिचाऱ्या शेतकऱ्यांना व इतर लोकांना दरेकप्रकारची सेवा फारच महाग मिळते. बाजारांत विकत घ्यावयाचे जिन्नस, औषधपाण्याची मदत, वकिलाचा सल्ला, शेतकीचा माल विकतांना लागणारा व्यापारी सल्ला, रोगराईच्या वेळीं देवादैत्यांना संतुष्ट करण्यासाठीं लागणारा धार्मिक सल्ला, भुतेंखेतें काढण्यासाठीं लागणारा मांत्रिक सल्ला, जिवाच्या समाधानासाठीं आवश्यक वाटणारे ब्राह्मणांचे आशीर्वाद, सर्वच कांहीं त्यांना महाग पडतें. जरूरीच्या वेळीं कर्जाऊ घेतलें जाणारें भांडवल महाग पडेल यांत नवल तें काय !

खेडेगांवांतील शेतकऱ्यांना वर्षभर शेतकीचें काम नसलें तरी कांहींना कांहीं उद्योग शोधून काढणें शक्य असतें. त्यानें पोट न भरलें तरी वेळ भरते. पण मजुरांचें तसें नाहीं. मजुरांना व शेतकऱ्यांना स्वतःची स्थिति सुधारण्याइतका पोंच नाहीं व उत्साहहि नाहीं. तेव्हां समजुतदार लोकांनीं त्यांचा पुढाकार घेऊन त्यांना बारीकसारीक उद्योगधंद्यास लावलें पाहिजे. लक्षावधी रुपयांचीं यंत्रें आणून मोठमोठे कारखाने काढण्यांत व्यक्तींचें स्वार्थसाधन असेल पण हिंदुस्थानांतील गरीब प्रजेचें त्यांत मुळींच कल्याण नाहीं. आणि लक्षावधी रुपयांचें भांडवल गोळा करण्याची शक्तीहि फार थोड्यांत असते. पण लक्षावधी समजुतदार देशसेवकांनीं खेडेगांवांत जाऊन राहून तेथें कोट्यावधी लोकांना बारीकसारीक उद्योगधंदे शिकविणें व अशा

रीतीनें क्षुधितांना कायमचे अन्नास लावणें मात्र सहज शक्य आहे; व म्हणूनच प्रजाकीय शिक्षणामध्यें बौद्धिक विकासाचें स्तोम कमी करून उद्योगहुन्नराचें तत्त्व सुरू करण्याची आवश्यकता आहे. ज्यांना परोपकारासाठीं जगावयाचें आहे त्यांनीं तरी निदान बौद्धिक विकासाचे चोचले बाजूस ठेवून गरीबांच्या हितासाठीं उद्योगाकडे हात वळविले पाहिजेत. अशांना लागणारा बुद्धियोग सर्वांतर्यामी परमात्मा स्वतः देईल. त्याचें तसें वचन आहे.

---

# ग्रामव्यवस्था

कारू, नारू, अलुते, बलुते हे शब्द आतां अगदीं परके वाटतात. पण यांच्या मुळाशीं आपल्या पूर्वजांनीं घडविलेली एक विशाळ संस्कृति आणि समाजव्यवस्था होती, हें आपण विसरतां कामा नये. समाजरचनेचे भिन्नभिन्न सिद्धांत जगापुढें मांडणाऱ्या हौशी तत्त्वज्ञांच्या कानीं जर आपली ही व्यवस्था पडेल तर ते आश्चर्यचकित होऊन म्हणतील कीं, आजच्या जगाला असलीच कांहींशी व्यवस्था हवी आहे. आपली वर्णव्यवस्था आणि ग्रामव्यवस्था या दोन्हींचीं तत्त्वें नीट समजून घेऊन तीं जगापुढें मांडलीं पाहिजेत. सर्वांना सुख व्हावें, सर्वांत सलोखा नांदावा, प्रत्येकाला विकासाचा अवकाश मिळावा, आणि अधिकाधिक सामाजिक उन्नति व्हावी या दृष्टीनें या अंतःशासित संस्था आपल्या पूर्वजांनीं तयार केल्या होत्या. सामुदायिक जबाबदारी आणि समाजांतील श्रेष्ठ लोकांच्या हातीं अधिकार या दोन्हींचा समन्वय देखील यांत उत्तम साधला होता. सामाजिक कल्याणाला ‘ धर्म ’ असें नांव देऊन त्याच्या अंकुशाखालीं आर्थिक व्यवस्थेची मांडणी केल्यामुळें स्थैर्य आणि प्रगति या दोहोंमध्यें मेळ बसला होता. आपल्या पूर्वजांच्या समाजरचनेंत कायदा, (constitution )राजा, परंपरा, अंतिमसत्ता, स्वदेशभावना, सर्व कांहीं हा धर्मच होता. सामाजिक सुव्यवस्थेच्या अखिल तंत्राला ‘ धर्म ’ हें नांव देऊन प्रत्येक व्यक्तीनें करावयाच्या सर्व कर्तव्यांना ‘ स्वधर्मपालन ’ असें नांव दिलें होतें. सर्व जगाच्या सुरळित रहाटीसाठीं स्वधर्माचें हें प्रेरक तत्त्व जगाला केव्हां तरी स्वीकारावें लागणार आहे.

# ओनामा

साहित्य हें ज्ञानाचें मोठें सोईस्कर साधन असल्यानें साहित्याचा उपयोग करतां येणें, अर्थात् लिहितां वाचतां येणें, हें त्याचें एक मोठें अंग आहे. मनुष्याला लिहितां वाचतां आलें म्हणजे ज्ञानप्राप्ति आणि स्वतःच्या मतांचा प्रचार या दोन्ही बाबतींत तो स्वतंत्र होतो; म्हणून शिक्षणाच्या सुरवातीसच शिक्षणाचें साधन म्हणून लिहिण्यावाचण्याची कला शिकविण्यांत येते. याचा परिणाम असा झाला आहे कीं, लोक साधनालाच साध्य म्हणून मानूं लागले आहेत. लिहितां वाचतां येणें म्हणजेच शिक्षण अशी कल्पना जवळ जवळ सार्वत्रिक आहे.

लेखनकलेचें महत्त्व कोणत्याहि रीतीनें कमी न करितां त्या कलेस शिक्षणांत मिळणारें स्थान अवास्तव आहे असें म्हणणें शक्य आहे. पण लोकांना या कलेचा मोह इतका आहे कीं, हिच्या उपयुक्ततेच्या मर्यादा जर कोणी सांगूं लागला अथवा दुसरी बाजू यत्किंचित्‌हि मांडूं लागला तर त्याला साक्षरतेचा, साहित्याचा, शिक्षणाचा, विद्वत्तेचा, किंबहुना सर्व ज्ञानाचा शत्रु ठरविण्यास बरेचसे लोक मागेंपुढें पाहणार नाहींत. इटलीमध्यें ज्याप्रमाणें मुसोलिनीच्या विरुद्ध अवाक्षर काढण्याची सोय नाहीं, त्याचप्रमाणें आपल्याकडे साक्षरताप्रसाराच्या आग्रहासंबंधानें आहे. आणि यांत विशेष दुःखाची गोष्ट अशी कीं साक्षरतेच्या अंध अभिमानाच्या या युगांतहि साक्षरताप्रसाराचे प्रत्यक्ष जोरकस प्रयत्न क्वचितच होतात.

अक्षरांचा, लिपीचा शोध झाला नसतां तर भाषा नामशेष झाली असती असें जसें म्हणतां येत नाहीं, तसेंच लिपीच्या अभावीं साहित्य संभवलेंच नसतें असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. साहित्यानें निराळें स्वरूप ग्रहण केलें असतें एवढें खरें; आणि मनुष्याला स्मरणशक्ति

अधिक तीव्र करावी लागली असती. पण सुदैवानें लिपीचा शोध झाला आणि मोठी सोय घरीं आली.

शिक्षणाच्या बाबतींत मात्र अनुभव असा आला आहे कीं, शिक्षणाच्या सुरवातीस लिपीकार ' गणेश ' आणून बसविल्यामुळें तो विघ्नहर्ता स्वतःच एक मोठें विघ्न होऊन बसला आहे. शिक्षण म्हणजे सर्व इंद्रियांची योग्य काळीं योग्य रीतीनें शक्ति वाढविणें; विश्वासंबंधाची त्या त्या काळीं आवश्यक अशी माहिती मिळविणें; निरीक्षण, परीक्षण, प्रयोग, अनुमान वगैरे ज्ञानप्राप्तीच्या साधनांत तरबेज होणें; आणि जीवन कृतार्थ करण्यासाठीं विचार, विकार, वासना, आकांक्षा या सर्वांना इष्ट तें वळण लावणें. हें सर्व योग्य व्यक्तींच्या देखरेखीखालीं लिपीच्या आधारावांचूनच सुरू झालें पाहिजे. बालक लहान असो वा मोठें असो, ज्याप्रमाणें आईच्या ऐवजीं रबराच्या बोंडाच्या बाटलीनें त्याचें भागावयाचें नाहीं त्याचप्रमाणें ज्ञानदात्या गुरुजनांच्या ऐवजीं मुलांपुढें रोचक आणि विविध साहित्य पसरून काम भागावयाचें नाहीं. ज्ञानाच्या वाढत्या भुकेला जेव्हां शिक्षक अपुरे पडतील तेव्हांच साहित्य-ग्रंथांची ओळख आवश्यक होते. यासाठीं शिक्षणाची सुरवात लिपिज्ञानापासून न करितां श्रवण, अनुकरण आणि निरीक्षण यांपासूनच केली पाहिजे. कंठांतून निघणारा आणि कानांनीं ग्रहण होणारा ध्वनि, बोटांनीं निर्माण होणाऱ्या व डोळ्यांना दिसणाऱ्या रेखाद्वारां आणि आकृतिद्वारां व्यक्त करणें हा गुंतागुंतीचा व्यापार आहे. एखादा लोटा पाहून तशी आकृति काढणें हें स्वाभाविक आहे. पण ' ढ ' असा आवाज काढल्याबरोबर तो व्यक्त करण्यासाठीं ज्ञानदात्या गणपतीच्या सोंडेचें चित्र कां काढावें ! आवाज आणि आकृतीचा हा संबंध कोठून आला, हें त्या बिचाऱ्या बालकास कसें समजावें ! आकृति पाहून ध्वनि ओळखणें आणि ध्वनि ऐकून त्याची आकृति ठरविणें ही जादू अथवा कसरत विद्यार्थ्याला

साधली नाहीं म्हणजे त्याला हळूहळू वाटूं लागतें कीं, आपण खरो-खरच ' ढ ' आहोंत. आणि शिक्षकहि सांगतो कीं, ' अरे ठोंब्या, तुला म्हणावें तरी काय ? तुला तर 'ढ' हि ओळखतां येत नाहीं!''

शिक्षणाच्या सुरवातीसच बालकांमधील आत्मविश्वासाचा वध करून त्यांच्यामध्यें कनिष्टकांति (Inferiority complex) उत्पन्न करणें याहून अधिक प्रजाद्रोह दुसरा कोणता असेल ?

आजवर शिक्षणाचे संस्कार पांढरपेशा लोकांतच असत. त्यांच्या मुलांना घरींदारीं लेखन–पठनाचें दर्शन अहर्निश होत असतें. शिकल्यावांचून पोट भरावयाचें नाहीं असा बोधहि त्यांना अगदीं बालपणापासून मिळत असतो. यामुळें त्यांना अक्षरज्ञान प्राप्त करून घेणें कांहींसें सोपेंहि जातें आणि आवश्यकहि वाटतें. पांढरपेशीं मुलें अक्षरज्ञान सहज करून घेतात. श्रमजीवी जातींच्या मुलांना स्वाभाविक-पणें हस्तकौशल्य अधिक असतें. त्यांचे हातपाय धडधाकट असतात. कान, डोळे, जीभ वगैरे ज्ञानेंद्रियें तीव्र असतात. पण अक्षरग्रहणाच्या बाबतींत पांढरपेशांच्या मुलांपेक्षां सुरवातीला तीं मंद भासतात. यामुळें खऱ्या शिक्षणाच्या बाबतींत खेडेगांवांतील श्रमजीवी वर्गाचीं मुलें वरचढ असूनहि मठ्ठ ठरतात; कारण शिक्षणाच्या सुरवातीसच लिपीची धोंड ' गणेशायनमः ' म्हणून आडवी पडलेली असते.

खरें पाहतां खेडेगांवचें शिक्षण म्हणजे ब्राह्मणेतरांचें शिक्षण; श्रम-जीवी जातींचें शिक्षण; शेतकरी, हुन्नरी, कारागीर व मजूर यांचें शिक्षण; या दृष्टीनेंच खेड्यांतील शिक्षणाचा विचार केला पाहिजे. व याचसाठीं शिक्षणाची सुरवात लिपिज्ञानापासून न करितां सामान्य ज्ञानापासून केली पाहिजे. पुष्कळशी माहिती तोंडीं सांगणें, बरेचसे प्रयोग हातून करून घेणें, कलाकौशल्याचें महत्त्व वाढविणें, कर्तब-गारीच्या कामांत भाग घेणें व प्रसंगोपात्त सुंदर साहित्य श्रवण करणें येथूनच शिक्षणाची सुरवात झाली पाहिजे. बरेंचसें ज्ञान विद्यार्थ्याला

पोहोंचलें, ज्ञानाच्या प्रवाहांत गटांगळ्या न खातां तो सुखानें पोहूं लागला व अधिकाधिक ज्ञानाची तहान लागूं लागली म्हणजे मग त्याला लिपीची ओळख करून द्यावी. यापूर्वींच साहित्यश्रवणामुळें लिपीचें महत्त्व त्याला कळून, मला हें केव्हां वाचावयास येईल असें त्याला होऊन गेलेलें असतें. दृष्टीचा तरबेज, विविध हस्तकौशल्य-पटाईत, प्रयोगांत चिकाटी व खंत असलेला असा विद्यार्थी, आत्म-विश्वासाची आणि उत्साहाची महत्त्वाकांक्षेनें मुसमुसणारी मूर्तीच असतो. त्याला अक्षरज्ञानाची प्राप्ति अशा काळीं सहज लीलेनें करून घेतां येते.

खेडेगांवांतील शिक्षण म्हणजे केवल बालकांचेंच शिक्षण नव्हे. आबालवृद्ध स्त्री-पुरुष सर्वांनांच आधुनिक करून सोडलें पाहिजे. यासाठीं खेडेगांवांतील शिक्षण म्हणजे प्रधानतया शालेय शिक्षण नसून लोकशिक्षण हेंच होय.

येथेंहि लेखनाच्या पूर्वीं ज्ञानकथन व साहित्यश्रावण (ऐकविणें) यांचा पुरस्कार केला पाहिजे. अशा रीतीनें शिक्षणाची सुरवात गुरु-मुखानें व श्रौत पद्धतीनें झाल्यास शिक्षण बरेंच सुलभ होऊन प्रजेचे श्रम बरेच वांचतील. ज्यांच्यामध्यें गरीबांची कळकळ आणि सेवा-भाव असेल त्यांचीच छाप प्रजेवर पडेल.

या पद्धतीचा साहित्यावर फारच इष्ट असा परिणाम होईल. ज्या-प्रमाणें कांहीं नाटकें रंगभूमीवर येण्याच्या लायकीची नसतात, कांहीं कविता मुळींच गेय नसतात, त्याचप्रमाणें बरेंचसें साहित्य सुबोध असूनहि सुवाच्य अथवा सुपाठ्य असत नाहीं. गद्य म्हणजे कर्ता, कर्म, क्रियापद असलेलीं आणि अर्थ होणारीं ओबडधोबड वाक्यें नव्हेत. भाषाभिज्ञ आणि त्या त्या विषयाची माहिती असलेला मनुष्य मोठ्यानें वाचूं लागला असतां जें वाचून त्याला कंटाळा किंवा थकवा न येईल आणि ऐकणाऱ्यांना देखील श्रवणरुचिर, व्यवस्थापूर्ण, प्रमाण-

बद्ध अशा उत्कृष्ट कलाकृतीचें आपण पान करीत आहोंत असें वाटेल, त्याचें नांव गद्य. साहित्याचें श्रवण-श्रावण सामाजांत वाढेल तेव्हांच साहित्याची ही बाजू खुलेल. उत्कृष्ट गद्यांत एक प्रकारचा सहज ओळखूं न येणारा पण गळ्याला व कानाला सुखावह असा ताल असतो; भाषेच्या प्रवाहांत कधीं लहान लहान लहरी असतात; कधीं मोठ्यामोठ्या लाटा असाव्या लागतात, तेच ते शब्द पुनःपुनः ऐकावेसे वाटतात; हा विचार, ही कल्पना, ही माहिती, अथवा हें विवेचन दुसऱ्या शब्दांत मांडणेंच शक्य नाहीं असें हळूहळू वाटूं लागतें व शेवटीं शेवटीं ती रचना पद्याप्रमाणें कंठस्थ होऊन जाते.

असलें गद्य नाटकांतूनहि जेथें सार्वत्रिक नाहीं तेथें सामान्य लेखांत त्याची अपेक्षा कशी करावी ? श्रवण–श्रावणाच्या परिपाठानें साहित्याचें रूप, लावण्य आणि ओजस् हीं सर्व वाढतील, आणि त्याचा जनतेच्या चारित्र्यावर व संस्कारितेवर परिणाम होईल.

खेडेगांवांतील लोक साहित्य-शौंड नसले तरी साहित्यरसिक स्वभावतःच असतात. रुचिर साहित्य व तेजस्वी विचार यांची बहुधा ते फारकत करीत नाहींत. साहित्य ग्रंथांतरीं वाढणें बस्स नाहीं. लोकांच्या बोलण्याचालण्यांत, सल्लामसलतींत, ऊहापोहांत व विवेचनांत साहित्याची संस्कारिता मुरली पाहिजे. म्हणजे साहित्यानें आपलें काम केलें असें होईल. वर आंखलेलें ग्रामशिक्षण थोडीं वर्षें चाललें तरी हा परिणाम डोळ्यांत भरण्याइतका दिसून येईल.

# खेडेगांवांमधील शिक्षणाचा प्रश्न

इंग्लंड, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, फ्रान्स, बेल्जम, कांहीं अंशीं इटली आणि पूर्वेकडे जपान एवढे देश वगळले असतां, बाकीची दुनिया ग्रामप्रधान आहे. आज काल पाहूं जातां वर सांगितलेले नगरप्रधान देशांचेंच अधिराज्य जगावर आहे. नगरजीवन उद्योगधंद्यानें म्हणजे यांत्रिक कारखान्यांनीं भरभराटलेलें आहे, ही गोष्ट खरी असली तरी त्यांचें अधिराज्य आणि त्यांची कल्पनातीत संपत्ति, हीं यंत्रप्रधान संस्कृतींत ज्यांनीं पुढाकार घेतला नाहीं आणि म्हणून ज्यांना सुधारलेले असें कोणी म्हणत नाहीं, अशा देशांना पिळून काढण्यावर अवलंबून आहेत. पण ही स्थिति कायम टिकणार नाहीं. ग्रामसंस्कृतीचा भाग्योदय आतां नजीक आहे. मनुष्यजातीचा मोठा भाग खेड्यापाड्यांतून रहातो, खेड्यापाड्यांतच त्याला सुखासमाधानानें रहाणें शक्य आहे. नगरांवांचून खेडीं टिकूं शकतील पण खेड्यांवांचून नगरें तीन वर्षें देखील टिकाव धरूं शकणार नाहींत. जळवांप्रमाणें खेड्यांचा कस शहरें शोषीत आहेत. म्हणूनच शहरें आज इतकीं माजलीं आहेत.

एकाकाळीं शेजारच्या देशांतील लोकांना मारून, त्यांची जमीन, गुरेंढोरें व बायकापोरें लुटून घेण्याचा धंदा मनुष्यजातीनें केला. पुढें हजारो आणि लाखो लोकांना पकडून गुलाम करून गुरांप्रमाणें त्यांच्याकडून जबरदस्तीनें काम घेण्याचा धंदाहि करून पाहिला. आज अज्ञान, दुर्बळ, भोळसट अथवा दुःस्थित अशा लोकांच्या मेहनत–मजुरीचा गैरफायदा घेऊन धूर्तांनीं स्वतःच्या वाट्याला लोणी व त्यांच्या वाट्याला ताक असा धंदा चालविला आहे. याला इंग्रजींत exploitation असें म्हणतात. आपण त्याला ‘ नवनीत–कर्षण ’

असें म्हणूं. जगद्व्यापी रोग किंवा द्रोह जर एखादा असेल तर तो जबरदस्त व धूर्त अशा लोकांनीं केलेलें हें मधुकर्षण हा होय.

पण या परिस्थितीकडे गरीबांचें लक्ष गेलें आहे. त्यांना आत्मपरिचय झाला आहे. स्वसामर्थ्याचा साक्षात्कार होऊं लागला आहे. गरीबांचा देव जागृत झाला आहे. तेव्हां यापुढें शहरांना स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे. अथवा खरें म्हणावयाचें तर शहरांनीं आजवर आपल्याच हातांनीं आपले पाय तोडण्याचा जो आत्मघाती उपक्रम केला तो आतां टाकून दिला पाहिजे. खरोखर पहातां खेडींपाडीं हींच शहरांचे लुले पडलेले पाय आहेत. त्यांचें संरक्षण व संवर्धन केलें तर शहरें अधिक सुटसुटीत होऊन मजबूत पायावर उभीं रहातील.

आपण हेंहि दूरदृष्टीनें ओळखलें पाहिजे कीं, जगाचे यापुढील पुढारी खेडेगांवांतील असतील. जनतेचे धुरीण जानपदच असतील.

' जिच्या हातांत पाळण्याची दोरी तीच जगाला तारी ' या म्हणीचा थोडासा व्यापक अर्थ करून आपण असें म्हणूं शकूं कीं, खेडेगांवचें शिक्षण ( यापुढचें ) ज्यांच्या हातीं असेल तेच जगाला नवीन वळण लावणार आहेत. या येत्या पन्नास वर्षांत जी एक जगद्व्यापी संस्कृति स्थापन होणार आहे अथवा ज्या जगद्व्यापी प्रेरणेच्या योगानें जगांतील प्रत्येक संस्कृतीची एक एक अभिनव आवृत्ति तयार होणार आहे, ती संस्कृति अथवा ती प्रेरणा ग्रामशिक्षणाच्या एका नवीन सामर्थ्यशाली आणि निष्पाप अशा शिक्षणपद्धतींतून निघणार आहे. जगाचा पुढाकार खेड्यांना मिळणार तो या नवीन शिक्षणाच्या जोरावर. म्हणून खेडेगांवांतील या नवीन शिक्षणाचें स्वरूप कसें असणार त्याचें थोडेंसें दर्शन येथें करूं.

आजवर प्रतिष्ठा पावलेलें शहरी थाटाचें शिक्षण बरेंचसें खर्चिक, कर्जाऊ, अलंकारिक आणि चारित्र्यशून्य आहे. शिक्षणाच्या पायीं

पैसा पाण्यासारखा खर्चला जातो ही एका रीतीनें आनंदाची गोष्ट असली तरी शिक्षणानें मनुष्य ज्ञानपूत होतो, चारित्र्यसंपन्न होतो, सर्वभूतहितेरत होतो, स्वार्थविस्मृत होतो, 'यासाठीं कोणी शिक्षणाविषयीं इतके लोलुप झाले नाहींत. शिक्षणांत सामर्थ्य आहे, संपत्ति आहे, सत्ता आहे, भोगैश्वर्य आहे आणि भोगैश्वर्यांचा किळसवाणा नागवेपणा झांकण्याची कलाकौशल्यप्रधान संस्कारिता आहे; व यासाठीं लोकांना आजचें शिक्षण हवें आहे. धर्मशक्ति आज क्षीण झाली असल्याकारणानें आणि जगांतील राजकीय पुढारी पट्टीचे दांभिक झाले असल्याकारणानें, जगाच्या कल्याणाच्या गोष्टींची चर्चा करण्याचें काम शिक्षणक्षेत्राकडे आलें आहे. पण सर्व मांगल्याची ही कळकळ शिक्षित समाजानें पुरेपुरी सिद्ध करून दाखविली नाहीं. शिक्षणशास्त्रानें तयार केलेल्या जीवनरसायनांत अमुक तोळे मांगल्याची इच्छा घातली असतां तें चवदार होतें आणि आपला गुण ताबडतोब दाखवितें एवढेंच आज कळलेलें आहे.

सामान्य जनतेला सदाचारहि हवा आहे, आणि भोगैश्वर्यहि हवें आहे. लुबाडलेलें धन हातचें जाऊं नये आणि अधर्महि घडूं नये अशी आंधळी धृतराष्ट्री वृत्ति सामान्य लोकांत दिसून येते. त्यामुळें लोक शिक्षणाग्रणींना म्हणतात, 'तुम्हांला सुचतील त्या सर्व सुधारणा शिक्षणांत करा आणि जुन्या शिक्षणांतील फायदेहि त्यांत असूं द्यात.' जुने फायदे हे फायदे नसून ती महत् हानि आहे, लोकांचें रक्त शोषून पुष्ट होण्याचा तो प्रकार आहे, हें अजून लोकांना पटलें नाहीं. यामुळें 'भुक्ति मुक्तिच विंदति' असलें आशाळभूत तत्त्वज्ञान सर्वत्र पसरलेलें आहे. ईस्ट इंडिया कंपनीचे भागीदार डायरेक्टर्स लॉर्ड क्लाइव्हला आणि वॉरन् हेस्टिंग्जला लिहीत असत कीं, न्यायानें राज्य करा; नेटिव्हांना दया दाखवा; पण अधिक पैसा पाठवीत चला.' आणि या शेवटच्या वाक्यावर सर्व भर असे.

आजकाल पुढारलेल्या देशांतून शिक्षणापायीं जो पैसा पाण्यासारखा खर्चला जातो, तो परदेशांतून पिळून आणलेला असतो. मागसलेल्या देशांचें तेल काढून त्या चरबीवर स्वकीयांना पोसण्याचें काम सुरवातीस सांगितलेल्या देशांतच होत असतें.

खरें शिक्षण या तेली राष्ट्रांतील शिक्षणपद्धतीहून भिन्न असलें पाहिजे. खरें शिक्षण या तेली शिक्षणाइतकें भडक, तकाकित व रामबाण दिसणार नाहीं हेंहि खरें; व यामुळेंच खरें शिक्षण घेऊं लागलें असतां, मिरची मसाला नसलेल्या सात्विक, पौष्टिक व पवित्र हविष्यान्नाप्रमाणें तें प्रथम प्रथम मिळमिळीतच लागणार; आणि तें घेत असतांना अव्यवहार्य अशा ध्येयवादाला बळी पडून आपण संपत्ति, सामर्थ्य, सत्ता आणि प्रतिष्ठा यांना बावळटपणानें मुकतों आहोंत कीं काय अशी शंका वारंवार अथवा अहर्निश येऊं लागणार. सतीच्या दरवाजांतील मिणमिणीत वत्तीची सर कुलटेच्या दरवाजांतील झुलत्या हत्तीला यावयाची नाहीं, ही जुनी म्हण ज्यांच्या हृदयापासून रोमापर्यंत भिनली असेल, त्यांनाच हें जीवनपरिवर्तन व शिक्षणपरिवर्तन पचणार आहे.

अकृत्वा परसंतापं अगत्वा खलनम्रताम् ।
अनुसृत्य सतां वर्त्म यदल्पमपि तद्बहु ॥

'कोणालाहि गांजल्यानाडल्यावांचून, नीच लोकांसमोर कोणत्याहि रीतीनें मान वाकविल्यावांचून आणि सज्जनांनीं घालून दिलेल्या मार्गाच्या बाहेर पाऊल टाकल्यावांचून, आपल्या परिश्रमानें जें कांहीं थोडेंहि फळ मिळेल तें नीतिदृष्ट्या आणि परिणामदृष्ट्या पुष्कळ आहे असें समजावें.' या श्रद्धेवांचून युगांतर व्हावयाचें नाहीं.

आजकालचें वैद्यकशास्त्र असें कांहीं विचित्र रीतीनें वाढलें आहे कीं प्रत्येक गरीबाला पश्चात्ताप वाटत असतो. 'मजजवळ पुरेसे पैसे असते तर थोरल्या डॉक्टरला बोलावून अतिशय मूल्यवान्

औषधें आणून माझ्या मुलाला किंवा सहधर्मचारिणीला मीं बरें करून घेतलें असतें. पण काय करावें ! गरीबाची ही दुनियाच नव्हे.' असा निषाद गरीबाच्या घरांतील दरेक मरणामागें राहून जातो. शिक्षणाचेंहि असेंच झालें आहे. संपत्ति आणि संस्कारिता हीं एकमेकांवर अवलंबून आहेत अशी स्थिति अथवा भ्रांति सर्वत्र उत्पन्न झाली आहे.

खेडेगांवांतील सार्वत्रिक सर्वोदयकारी शिक्षणाचा विचार करीत असतांना शिक्षणांत आज माजलेल्या लोभाला प्रथम दूर लोटून दिलें पाहिजे. जगांत असलेली सर्व माहिती म्हणजे कांहीं ज्ञान नव्हे. आणि अमर्याद सामर्थ्य मिळविणें हा कांहीं शिक्षणाचा उद्देश नव्हे. शिक्षणाच्या योगानें मनुष्याला स्वतःच्या सर्व शक्तींचा परिचय व्हावा, परिस्थितीचें यथार्थ आकलन व्हावें, सर्वांच्या उदयांत स्वतःचा उदय आहे हें पटून हृदयांत अहर्निश चाललेला स्वार्थ-परार्थाचा झगडा कायमचा मिटावा, श्रेय आणि प्रेय हीं एक व्हावींत, हृदय उन्नत आणि व्यापक व्हावें, जीवन निरोगी, उद्योगपूर्ण, प्रसन्न, त्यागमय आणि कौशल्ययुक्त व्हावें, व अशा जीवनांतून सर्वकाळ व सर्व परिस्थितींत संतोष आणि आनंद यांचीं कारंजीं उडत रहावींत, आणि सरतेशेवटीं रसाळ फळाप्रमाणें जीवन परिपक्व होऊन तें अंतीं परमात्म्याच्या पदरीं पडावें. शिक्षणाचा असा व्यापक व उदात्त आदर्श आहे.

या आदर्शासाठीं आजचा प्रचलित विराट कार्यक्रम आवश्यक नाहीं इतकेंच नव्हे तर तो उपयोगीहि नाहीं. आधिभौतिक आणि आध्यात्मिक ज्ञान वाढवत बसणें ही एक प्रकारें विधात्याची, परमात्म्याची भक्ति किंवा उपासनाच आहे. पण हें सर्व ज्ञान शिक्षणक्रमांत कोंबलेंच पाहिजे असा आग्रह नसावा.

इतिहासानें मनुष्य दीर्घदर्शी व विनीत होतो हें खरें; पण इतिहासालाच अजून खरें शिक्षण मिळालें नाहीं, तो अजून दुर्विनीतच

आहे. आजच्या इतिहासानें आपला आडदांडपणा सोडून, नास्तिकता सोडून, तसेंच एकांगी आग्रह सोडून प्रयोगनम्र झालें पाहिजे; सत्यनिष्ठ आणि धर्मनिष्ठ झालें पाहिजे; तोंवर शिक्षणासारखें पवित्र कार्य या अहंमन्य हेकेखोराच्या हातीं जातां कामा नये.

जगाचें ऐक्य होण्यास प्रत्येकानें जगांतील प्रत्येक देश पाहिला असला पाहिजे, आणि तेथील भाषा व साहित्य यांच्याशीं त्याचा परिचय असला पाहिजे असें म्हणणें हास्यास्पद होईल. आणि इतकें करूनहि ऐक्य वाढेल का लोभमूलक विग्रह वाढेल हें सांगणें कठीण आहे. मांजर जसें सगळीं घरें धुंडाळतें त्याप्रमाणें जगांतील सर्व देशांत ज्यांचे पाय पोहोंचले आहेत अशीं राष्ट्रें जगाचें ऐक्य साधीत आहेत असा अनुभव नाहीं. जगांतील सर्व जातींशीं गुण्यागोविंदानें रहाण्याची सात्विक वृत्ति अथवा माणुसकी जन्मभर एका खेडेगांवांत राहून देखील वाढवितां येईल. गीतांजलीसारख्या ग्रंथांत सगळ्या जगाचा इतिहास नाहीं पण तो ग्रंथ सर्व देशांतील लोकांना आपलासा वाटतो. कारण त्या गीतांतील हृदय शुद्ध आणि सार्वभौम आहे. शिक्षणामध्यें अखिल सृष्टि सिद्ध करावयाची नसून व्यापक आणि उदार दृष्टि सिद्ध करावयाची असते, एवढें ध्यानांत ठेविलें तरच शिक्षणक्रम बहुजनसमाजाच्या जीवनाजोगता आटोपशीर होईल. राष्ट्राच्या ऐक्यासाठीं हिंदी भाषा शिकली पाहिजे; धार्मिक साहित्याच्या प्रत्यक्ष परिचयासाठीं संस्कृत आणि आरबी भाषा शिकल्या पाहिजेत; इस्लामी राष्ट्राच्या दोस्तीसाठीं फारशी भाषा शिकली पाहिजे; आशियाच्या संघटनासाठीं चिनी आणि जपानी भाषांचा परिचय साधला पाहिजे; युरोपची आद्यप्रेरणा ओळखण्यासाठीं लॅटिन आणि ग्रीक साहित्याचा मासला पाहिला पाहिजे; आधुनिकतेसाठीं आणि भौतिक शास्त्रांच्या आकलनासाठीं जर्मन आणि इंग्लिश किंवा फ्रेंच या भाषा आपल्याशा केल्या पाहिजेत; आणि पुढच्या पिढींतील राजकारण

यशस्वी रीतीनें चालविण्यास रशियन भाषेचा परकेपणा मोडला पाहिजे; अशा तऱ्हेनें जर आपण भाषांचा भार भरीत गेलों तर जन्मभाषेला घर सोडून पळावें लागेल, आणि या भाराखालीं उंट चेंगरून जाईल तें निराळेंच. राष्ट्रीयतेच्या दृष्टीनें हिंदीला स्थान भलें असो, पण सर्व शिक्षण एका भाषेंत–देशभाषेंत, स्वभाषेंत–देतां आलेंच पाहिजे. आणि असा आग्रह जर नसेल तर देशभाषा दुबळीच राहील आणि तिचा शाप लागून प्रजा क्षीणपुरुषार्थ होईल.

कोणत्याहि भाषेंतील साहित्य हें ती ती भाषा बोलणाऱ्या प्रजेचें अत्यंत मूल्यवान असें भांडवल आहे. कोणी कोणी त्याला आजन्म आवश्यक असलेलें दूधहि म्हणतात. प्रजेच्या बहुविध पुरुषार्थांचा जसा तो सांठा आहे त्याचप्रमाणें नवीन पराक्रमाचेंहि तें एक क्षेत्र होऊं शकतें. एवढें ठाऊक असून आणि स्वीकारूनहि म्हणावें लागतें कीं, शिक्षण साहित्यप्रधान होणें हें अनिष्ट आहे. आणि आपलें शिक्षण तर साहित्यप्रधान आहे, एवढेंच नव्हे तर तें साहित्यपरायण आहे. शिक्षणाची आणि जीवनोद्देशाची फारकत झाली असल्याकारणानेंच ही कृत्रिम परिस्थिति आजवर टिकली आहे. साहित्य म्हणजे शिक्षण नव्हे. साहित्य हें शिक्षणाचें एक साधन आहे, किंमती आणि उपयोगी साधन आहे; आणि विशेष गोष्ट अशी कीं, शिक्षणाचें साधन या दृष्टीनेंहि साहित्य उत्तम कमावलें गेलें असल्याकारणानें साहित्याच्या द्वारां शिक्षण देणें फार सोपें होऊन बसलें आहे. परिणामीं, सर्व शिक्षणाचा मक्ता साहित्यालाच मिळालेला आहे. यामुळें शिक्षणाचीं अन्य साधनें अगदींच मागें पडलीं आहेत. किंबहुना तीं शिक्षणाचें साधन होऊं शकतील याविषयीं शिक्षणशास्त्र्यांमध्यें आणि लोकधुरीणांमध्यें बरीच नास्तिकता आहे.

बुद्धीचा विकास कितीहि होवो आम्हांस त्याची पोटदुखी नाहीं; उलट केवळ बुद्धीच्या विकासासाटीं इतके आटोकाट प्रयत्न होत

असूनहि शिक्षणाच्या कृत्रिमपणामुळें, एकांगीपणामुळें आणि भाडोत्री-पणामुळें, बुद्धीचा विकास होण्याऐवजी ती बोथट व कुंठित होते; व पडलेल्या चाकोरीच्या बाहेर जाऊंच धजत नाहीं, या गोष्टीचा खेद वाटतो.

बुद्धीचा विकास झाला म्हणून मनुष्यानें पंगू, परोपजीवी, ऐतोबा व्हावें हा न्याय कोठला! स्वातंत्र्य, हिंमत व सुचणूक यांच्या पोषणासाठीं, व सामान्यपणें सर्व प्रकारच्या कर्तबगारीसाठीं, कौशल्य, योजनाशक्ति, व्यवस्थाशक्ति व सर्जनशक्ति यांचा विकास झाला पाहिजे. या उद्देशांच्या पूर्तीसाठीं शिक्षणानें साहित्य व तत्त्वचर्चा यांची कोंडी फोडून बाहेर निघालें पाहिजे. उद्योगहुन्नर, कलाकौशल्य, समाज-सेवेचीं कामें, पराक्रमांत पुढाकार वगैरे नवीन क्षेत्रांतून हें शिक्षण घेतलें पाहिजे. व त्या शिक्षणांत सामाजिक जबाबदारी, अध्यात्मिक आदर्श, सर्वहिताची नजर या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे; व माणु-सकीच्या या संवयी अंगवळणी पडण्यासाठीं व्यायामशाळेंत शरीर कसल्याप्रमाणें जीवनक्रम उत्तम रीतीनें कसला पाहिजे. ‘ पडीलें वळण इंद्रियां सकळां, भाव तो निराळा नाहीं तुझा. ’ अशी स्थिति झाली पाहिजे.

# साहित्योपासना

एखाद्याची परीक्षा पास झाली, एखाद्याला मुलगा झाला, एखाद्याचा सांडलेला भाऊ सांपडला, अथवा सोडतीमध्यें एखाद्याला बक्षीस मिळालें अशी जर तार आली तर ती आणणाऱ्याला तो बक्षिसी म्हणून कांहींतरी देत असतो. तारेचें महत्त्व मालकाला जितकें अधिक तितकी तारवाल्याविषयीं एक प्रकारची उपकारबुद्धि त्याच्या मनांत वसत असते, आणि म्हणून चांगलीशी बक्षिसी देऊन तो उतराई होण्याचा प्रयत्न करीत असतो. खरोखर पहातां तार आणणाऱ्याचे उपकार ते कसले? तारेंतील बातमी घडवून आणण्यांत त्याचा थोडाच हिस्सा असतो! तरी आनंदमूढ होणें हा मनुष्यस्वभावच आहे.

पण या मनुष्यस्वभावामुळें बक्षिसीचे पैसे खिशांत टाकणारा तारवाला जर स्वतःचें महत्त्व मानून घेऊं लागला तर त्याच्यासारखा मूर्ख तोच. मनिऑर्डर किंवा पार्सल आणून देणाऱ्या पोस्टमनविषयीं देखील असेंच समजावयाचें.

अध्यापकाच्या खुर्चीवर बसून सुंदर साहित्य विद्यार्थ्यांपुढें वाढण्याचें काम ज्यांच्याकडे असतें त्यांच्याविषयींहि विद्यार्थ्यांमध्यें अशाच प्रकारची कृतज्ञता वास करीत असते. साहित्यक्षेत्रांतील उत्तम फळें निवडून काढण्यांत अध्यापकाची कुशलता, सदभिरुचि आणि विद्यार्थ्यांचें कल्याण करण्याची सद्बुद्धि याला महत्त्व आहे यांत शंका नाहीं. पण जणूं काय या परिपक्व साहित्यफळांना स्वतःच जन्म दिला आहे अशा प्रकारचा अभिमान अथवा मोटेपणा जर तो अध्यापक आपल्याकडे घेईल तर त्याचें तें करणें हास्यास्पद होईल.

आपल्यास ज्या वस्तूपासून आनंद झाला त्याच वस्तूचा आपल्या सांगण्यानें आस्वाद घेऊन दुसरा मनुष्य तितकाच आनंदित झाला तर तसें करून त्यानें आपला आनंद द्विगुणित करण्यांत मदत केली हे त्याचेच आपल्यावर उपकार आहेत असें मानणें कदाचित् अधिक योग्य होईल.

तें कसेंहि असो. जगाकडे पाहण्याची दृष्टि आणि जीवन उन्नत करण्याचा मार्ग ज्या साहित्यांत विशद आणि सुभग रीतीनें व्यक्त झाला असेल असें साहित्य नुसतें वाचून सोडण्यासाठीं नसतें; पण अमृतमय रसायनाप्रमाणें त्याचें विधिपुरस्सर आदरयुक्त सेवन करावयाचें असतें. पण जो एकदां साहित्यसेवी म्हणून ठरला त्याला तूप किंवा खीर वाढण्याच्या दर्वी ( पळी ) प्रमाणें केवळ वाढण्याचाच आनंद मिळवून स्वस्थ बसण्याची संवय लागते. आणि हें पक्वान्न कशा रीतीनें लोकांपुढें वाढलें असतां हुषार वाढप्याला मिळणारी वाहवा मला मिळेल याचाच विचार तो करीत असतो. हें दर्वीव्रत निष्काम असो किंवा सकाम असो जीवनाला उन्नतीकडे नेणारें खास नाहीं.

साहित्य— उच्च साहित्य —हें खरोखर पाहतां हृदयाला आभिजात्य अर्पण करणारें आणि जीवनाला उन्नत करणारें एक साधन मात्र आहे. उत्तम साहित्याचा नुसता प्रचार करण्यापेक्षां तें साहित्य पचवून स्वतःचें जीवन उन्नत करून त्या जीवनाचा सुवास सेवाद्वारां पसरवून समाजाला व स्वतःला कृतार्थ केलें पाहिजे. अशी सेवा करीत असतांना कधीं कधीं आपल्यालाहि सरस्वती—वैखरीचा उपयोग करावा लागतो आणि आपल्या हातून अथवा तोंडून प्रसन्न साहित्य निर्माण होतें. अशा रीतीनें झालेला साहित्याचा प्रचार अपरिहार्य, सहज आणि शुभपरिणामी असतो.

चांगलें साहित्य पाहून मनामध्यें केवळ वाढप्याची वृत्ति जागतां

ग्रंथ संग्रहा
स्थळ प्रत

कामा नये, तर ‘इष्टैः सह भुज्यतां’ या प्राचीन आज्ञेप्रमाणें अथवा सामाजिक मनोवृत्तीप्रमाणें त्याचें सेवन करून इष्टमित्रांसहित स्वतःचें जीवन उन्नत आणि परिपुष्ट करण्याकडेच आपला ओढा असावा.

येथवर केलेल्या विवेचनांत कांहीं असाधारण गोष्ट सांगितली आहे असें नव्हे. पण वाढपी वृत्तीचा दोष आजकालचे अध्यापक, लेखक, प्रचारक, कवी आणि पत्रकार, यांच्यामध्यें फारच वाढला आहे व त्यामुळें साहित्याचें सेवन करून साधनाद्वारां तें पचवून जीवन उन्नत करण्याकडे इतकें कांहीं दुर्लक्ष होऊं लागलें आहे कीं, शहाण्या लोकांना देखील ही लहानशी सूचना देणें जरूर आहे.

* * *

कोणताहि ग्रंथ वाचतांना ग्रंथकाराच्या वृत्तीशीं आणि दृष्टीशीं तदाकार होऊन तो वाचावा; मात्र केव्हांहि ग्रंथप्रामाण्यबुद्धि उत्पन्न होऊं देऊं नये. ज्ञान कोठूनहि कसेंहि मिळालें तरी तारतम्यबुद्धि ही केव्हांहि स्वतःचीच असावी. दरेक ग्रंथाचें कालिक, देशिक आणि वैय्यक्तिक संस्करण करावेंच लागतें. हें ज्याला करितां येतें त्याचेंच वाचन सफळ आणि कृतार्थ होतें.

# शरीरसंवर्धन

महाराष्ट्रीयांचा स्वभाव म्हणा अथवा हनुमानाची व आखाड्यांची स्थापना करणाऱ्या समर्थांची कृपा म्हणा, महाराष्ट्रांतील खेड्यांतून शरीरसंवर्धन उत्तम होत असे. कर्नाटक व इतर प्रांतांतहि हें वातावरण दिसून येत असे. उत्तरेकडे शरीरसंवर्धनाची विशेष आस्था पंजाबांत पहावयास मिळते. जीवनाचा उत्साह कमी झाल्यामुळें आणि दारिद्य व परावलंबिता वाढल्यामुळें या बाबतींतहि अनास्था झपाट्यानें वाढत आहे.

जुन्या आखाड्यांचा पुनरुद्धार करणें अशक्य नाहीं. पण या जुन्या संस्थेंतील बरेचसे दोष दूर करण्याचा निश्चय करूनच हा पुनरुद्धार केला पाहिजे. स्वच्छ आणि मुबलक हवा व प्रकाश यांचें शारीरिक व आध्यात्मिक महत्त्व ओळखलें पाहिजे. शरीरविकासाच्या मार्गे लागलेल्या लोकांनीं बाकीच्या विकासाकडे लेशमात्र दुर्लक्ष करतां कामा नये. तालिमबाज म्हणजे मानवदेहधारी पोळ असा अर्थ होऊं नये. भांडणें उकरून काढून तीं भांडण्यांत पुरुषार्थ आहे, अशी कल्पना खेडेगांवांतून रूढ आहे ती गेली पाहिजे; व आखाड्याचा संकुचित अभिमान धरून मत्सरास व भांडणास पेटणें यांत स्वतःची व आखाड्याची बेअब्रू आहे असेंच सर्वांस वाटलें पाहिजे. गवई आणि मल्ल जोंवर स्वःतच्या फुशारक्या आणि इतरांची निंदा करीत रहातील तोंवर त्यांना शिष्ट समाजांतून बहिष्कृत गणलें पाहिजे.

आखाड्यांतील विद्या ही सर्कशीसाठीं नाहीं, पण शरीरसंवर्धनासाठीं आहे हें विसरतां कामा नये. मॅक्फिडन आदि पाश्चात्त्य तज्ज्ञांनीं सौंदर्य आणि नटवेपणावर जो भार दिला आहे त्याचें अनुकरण होऊं नये. आखाडा म्हणजे तऱ्हतऱ्हेच्या महाग व मोहक

साधनांचें प्रदर्शन होतां कामा नये. कावळ्याच्या शंभर उड्यांपेक्षां हंसाची एक उडी चांगली, हा सिद्धांत ध्यानांत असावा.

आज किंवा उद्यां प्रसंग पडल्यास युद्ध करितां यावें अशा रण-नीतीच्या दृष्टीनें आखाड्याकडे पाहूं नये. आजच्या कालांत युद्ध-दृष्ट्या ढाल–तरवार, जंबिया–बरची वगैरे वस्तू कुचकामाच्या आहेत. बलसंवर्धन, स्फूर्ति व मर्दानी ऐट या दृष्टीनें त्यांचा उपयोग आहे. प्राचीन काळच्या एका राष्ट्रीय विद्येचा जिवंत म्यूझियम म्हणून देखील त्या कलेला कांहीं महत्त्व आहे.

आखाड्यांनीं यापुढें बॉयस्काउटच्या (बालवीरांच्या) धर्तीवर थोडासा फेरफार केला पाहिजे. लांबलांबचे प्रवास करणें; तंबू ठोकून किंवा झोंपड्या बांधून शिबिरजीवनाचा अनुभव घेणें; जत्रा, उत्सव, परिषदा वगैरे प्रसंगीं स्वयंसेवक होऊन काम करणें; तात्कालिक रुग्णसेवेचीं पथकें उभारणें; रस्ते, विहिरी वगैरे तयार करण्याच्या कामीं स्वतः अंगमेहनतीनें पुढाकार घेणें; प्रवास करून खानेसुमारीसारख्या, व तऱ्हतऱ्हेच्या तपासण्या करून कोष्टकें भरण्यासारखीं कामें करणें; दरोड्याची वगैरे भीति असते तेव्हां चौकी पाहारा करणें; मोठमोठे दरोडे, चोऱ्या, खून वगैरेंचा तपास करणें; रोगाची साथ पसरली असतां सार्वजनिक शुश्रूषेची व्यवस्थ करणें; गांवांत काबुली, बलुची वगैरे आडदांड लोकांची अथवा चोर-भिकाऱ्यांची टोळी येऊन पडली असतां त्यांच्यावर देखरेख ठेवणें; वगैरे वगैरे कामें आखाड्यांकडून झालीं पाहिजेत; व याला लागणाऱ्या आवश्यक विद्या आणि कला यांची उपासनाहि आखाड्यांमार्फतच झाली पाहिजे. ताऱ्यांवरून वेळ ओळखणें, रात्रीच्या प्रवासाची दिशा नक्की करणें, प्रवास करितां करितां सर्व्हेचा नकाशा तयार करणें, तात्पुरता पूल बांधणें, घायाळ लोकांस मलमपट्टी वगैरे करणें, जंगलांतून रस्ता कापणें, झेंडा व हेलिओ यांच्या मदतीनें संदेश पाठविणें किंवा घेणें वगैरे कामें

आखाड्यांतील मुलांना आणि मोठ्यांनाहि मोठ्या हौसेनें आणि आस्थेनें शिकविलीं पाहिजेत. आखाड्यांत ज्यांना सुतारी काम येत असेल त्यांनीं आसपासच्या प्रदेशांत हिंडून आजारी रहाट, आजारी जातीं वगैरे अडून बसलेल्या उपकरणांना चालतीं करून देण्याचें कामहि केलें पाहिजे.

आखाड्यांतील सेवक हे प्रजेचे सेवक आहेत, लष्करी दमामानें फिरणारे तिस्मारखान नाहींत हें स्पष्ट करण्यासाठीं आखाडाबहाद्दुरांचा पोशाख खाकी नसावा. खाकी रंगाचे गुण कितीहि असले तरी लोकहृदयांत ठसलेला खाकीचा अर्थ निराळाच आहे. युनिफॉर्म तयार करण्याच्या नादीं लागून खर्च आणि छानछोकीपणा याला उत्तेजन देऊं नये. फार झालें तर उपरण्यासारखा एखादा कपड्याचा तुकडा कमरेभोंवतीं गुंडाळलेला असावा. त्याचा रंग सर्वत्र एकच असावा. निळा रंग पसंत करण्याजोगा आहे.

शरीरसंवर्धनाच्या बाबतींत स्त्रियांची बिलकुल उपेक्षा होतां कामा नये. त्यांनाहि समाजसेवेच्या कामाची गोडी लावली पाहिजे.

दोघांमध्येंहि साधेपणा व काटकपणा, तसेंच समयसूचकता वाढेल इकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. सर्वत्र कल्पकतेची यथेच्छ कदर केली पाहिजे.

पोहण्याच्या कलेची आवश्यकता वर लिहिण्याची राहून गेली आहे. एका रीतीनें हें बरेंच झालें. तिला स्वतंत्र स्थान दिल्या तिचें महत्त्व वाढेल. पुष्कळ लोकांच्यासाठीं स्वयंपाक तयार करणें, शौचाची व्यवस्था करणें, घोड्यावर बसणें, वाहनें हाकतां येणें वगैरे गोष्टीहि आवश्यक आहेत.

शरीरसंवर्धनासाठीं आखाडा किंवा सेवादल जें काढावयाचें त्याच्या मुळाशीं लष्करी तयारीची वृत्ति नसावी हें जसें वर सांगितलें आहे, त्याचप्रमाणें त्यांत राजकीय उद्देशहि मुळींच नसावा.

राजकीय उद्देशानें केलेल्या कामांत पक्षापक्षी शिरणें स्वाभाविक असतें. आणि मग ज्याप्रमाणें फंडासाठीं मारामारी होते आणि वैमनस्य उत्पन्न होतें त्याप्रमाणें शरीरसंवर्धक संघाचें सामर्थ्य कोणीं वापरावें हा प्रश्न उद्भवून वैमनस्यें सुरू व्हावयाचीं. फरक इतकाच कीं, फंडाचा पैसा जो त्याला हातांत घेईल त्याच्या हातांत मुकाट्यानें जाऊन पडतो. कारण पैशाचें मन वळवावयाचें नसतें. पण सेवासंघांतील तरुणांना मनें असतात. भिन्नभिन्न पक्ष त्यांना आपल्याकडे वळवून घेऊं लागले म्हणजे समाजांत सर्वत्र हीनवृत्ती जागृत होतात, आणि सार्वजनिक नीतिमत्तेचा चुथडा होतो.

सेवासंघांत हिंदु संघटनेचा विचारहि नसावा. नाहीं तर सेवासंघापासून समाजाची सेवा होण्याच्या ऐवजीं असेवाच व्हावयाची.

# आरोग्य

१ मनुष्याची विष्टा गांवांतून नाहींशी केली पाहिजे. चराचे शौचकूप तयार करून त्यांवर साटे (फ्रेमी) ठेवावेत. ह्यापासून तयार होणारें खत वापरलेंच पाहिजे.

२ जनावरांची विष्टा (शेण) सारविण्यास किंवा जाळण्यास वापरूं नये. गायऱ्या व उकिरडे गांवांतून बाहेर काढविले पाहिजेत. जमिनी मातीनें सारविल्या जाव्यात. खत ढीग करून उघडयांत न ठेवितां, खड्डा खणून त्यांत तें टाकावें व राखावें; नाहीं तर खताच्या दृष्टीनें त्यांतील पौष्टिक द्रव्यें उन्हानें व हवेनें उडून जातात, व खतें निःसत्त्व होतात. जनावराचें मूत हें तेज खत आहे. त्याचा आपण उपयोग करीत नाहीं, तो केला पाहिजे.

३ सांडलेलें पाणी खड्डयांमध्यें नरकाचीं कुंडें करून न ठेवितां मेथी, कोथिंबीर, मोहरी, मुळे, वगैरे भाजीपाल्याकडे नेहमीं त्या पाण्याचा उपयोग करावा. पाणी जास्ती असल्यास आळू, सुरण, केळीं यांची लागवड करावी. कारण यांचीं मोठीं पानें जमिनींतील ओलावा शोषून मोठ्या प्रमाणांत हवेंत सोडून देतात. मात्र या पानांच्या मुळांत डांस-मच्छर होण्याचा संभव असतो. म्हणून घरापासून दूर सांडपाणी नेणें शक्य तेथेंच ही लागवड करावी.

सामान्य सिद्धांत ध्यानांत ठेवावा कीं वापरून घाण झालेलें पाणी मोरी करून दूर नेण्यापेक्षां उघडा पाट करून तें नेलेलें बरें. आणि उत्तम उपाय हा कीं पाणी दूर नेऊनच तें तेथें वापरावें. आंघोळीची जागा, कपडे धुण्याची जागा, भांडीं घासण्याची जागा, आंचवण्याची जागा आणि तोंड धुण्याची जागा, रहात्या घराहून आणि विहिरीहून शक्य तितकी दूर असावी. स्वयंपाक घरांतील पाणी कोपऱ्यांत एका

खड्यांत गोळा करावें व तें वेळचे वेळीं उपसून दूर नेऊन टाकावें.

भिंतीला भोकें पाडून मोरीवाटें पाणी काढण्याची पद्धत अतिशय वाईट. कारण तेथें नेहमीं ओलावा रहातो, दुर्गंधी सुटते, रोगाचे जंतू घर करून रहातात, आणि साप, पाली, झुरळ इत्यादि प्राण्यांना तें कायमचें आमंत्रण होऊन बसतें. आणि इमारत कमजोर होते ती निराळीच.

४ आंथरुणें पांघरुणें : जे कपडे वारंवार धुणें शक्य आहे ते वारंवार धुवावेत. बाकीचे उन्हांत घालावेत. पिंजणकाम व शिवण-काम घरच्या लोकांस आलें पाहिजे. तसें झालें म्हणजे रजया, गाद्या वगैरे उसवून आंतील कापूस उन्हांत टाकून पुनः भरणें व शिवणें शक्य आहे. आजाऱ्यांसाठीं आणि लहान मुलांसाठीं दरेक घरांत मेण-कापड असावें. गादी आणि पलंगपोस यांच्यामध्यें मेणकापड ठेवि-ल्यानें गादी सुरक्षित राहते.

५ घरांतील हवा : स्वच्छ हवेचें महत्त्व अजून फारच थोड्या लोकांस पटलें आहे. आपल्या देशांतील प्रखर ऊन सर्व रोगांचा नाश करण्यास समर्थ आहे. पण आपण त्याचा उपयोग करून घेत नाहीं. जुनीं घरें बदलणें शक्य नाहीं. पण त्यांत पुष्कळशा खिडक्या पाडणें शक्य आहे. हवा खेळणें व प्रकाश मिळणें हे दोन्ही प्रकार रोगनाशक आहेत. दर वर्षी ऐन उन्हाळ्यांत घरावरील कौलें आळी-पाळीच्या पद्धतीनें काढून छपरांतून मुबलक उन आंत येऊं द्यावें. याचा फायदा कल्पनातीत आहे. एरव्हीं पावसाळ्याच्या सुरवातीला घर शाकारावें लागतेंच. तेंच दोन महिने आगाऊ केल्यानें शाकार-णीचा खर्चहि कमी येतो, आणि आरोग्यवृद्धि अनायासें होते. ज्या खोलींत खिडकी पाडून किंवा छपरावाटें प्रकाश आणि हवा आणणें शक्य नसेल, तेथें उपरणें किंवा पासोडी घेऊन बोथाटीसारखे हात-वारे करावेत. म्हणजे आंतील हवा घुसळली जाऊन बाहेर जाते,

आणि ताजी हवा आंत येते. डांबर, राळ आणि गंधक यांचा धूप रोगनाशक आहे. खोली कितीहि हवाशीर असली तरी कोनाकोपऱ्यांत हवा कोंदट असतेच. तेथें वर सांगितल्याप्रमाणें कपड्यानें झाडून हवा ताजी केली पाहिजे.

खोलींतील हवेचे प्रवाह कसे चालतात, याची स्पष्ट कल्पना प्रत्येकास असली पाहिजे. खोलींत लहानशा शेगडींत धूप टाकून धुराचे लोळ कसे जातात, कोठें जातात याचें निरीक्षण केल्यास हें शास्त्र उत्तम अवगत होईल. सामान्यपणें खोलीला एकच दरवाजा असल्यास खोलींतील बिघडलेली गरम हवा दरवाजाच्या वरच्या भागांतून जात असते आणि बाहेरील चांगली, स्वच्छ, थंड हवा खालून आंत येत असते. [ याच कारणास्तव आग लागलेल्या घरांत हिंडावें लागल्यास अगदीं ओणव्यानें हिंडण्याची शिफारस केलेली असते. ]

# स्त्रीशिक्षण

मोठमोठ्या शहरांतून देखील स्त्रीशिक्षणासंबंधानें खरी आस्था त्रेताचीच असते. सामान्य लोकांना जेथें स्त्रीशिक्षण पटलें आहे तेथेंहि स्त्रीशिक्षणाचा उद्देश स्त्रियांची उन्नति हा क्वचितच असतो. लग्नाच्या बाजारांत ठेवावयाचा माल जर चांगला चकचकीत असला तर तो खपवणें सोपें जातें. हीच एक दृष्टि प्रधान असते. घरांत मुलींचा त्रास नको, त्या शाळेत जाऊन बसलेल्या बऱ्या, हीहि कल्पना नसते असें नाहीं. आणि पुष्कळांच्या बाबतींत तर आजकाल मुलींना शाळेंत पाठविण्याचा रिवाज पडला आहे म्हणून मुलींना शिकावयास घालावयाचें, याहून अधिक विचारच केलेला नसतो.

गरीब मध्यम वर्गाहून ज्यांची स्थिति चांगली आहे, ज्या कुटुंबांत बायकांना घरचीं कामें करावीं लागत नाहींत, अशा ठिकाणीं स्त्रीशिक्षणाचा उद्देश याहून जरा निराळा असतो. नवरा चांगल्या रीतीनें वागवील किंवा न वागवील, मुलें होतील किंवा न होतील, मुलीला आपला जन्म कंटाळवाणा जाऊं नये, शिष्टमान्य करमणुकीचें कांहीं साधन मुलीजवळ असलेलें बरें, या उद्देशानें विरंगुळा ( मनोविनोद ) म्हणून कविता व साहित्य यांची गोडी, थोडेसें गायन, वादन, चित्रकला-कशिदा, जरीचें काम, सभेंत जाण्याचा सराव, एखाद्या सार्वजनिक संस्थेची चिटणिसी करण्याइतका उत्साह व बेताची माहिती, प्रसंग पडल्यास सडे प्रवास करण्याची हिंमत व समाजांत, देशांत व परदेशीं काय चाललें आहे हें समजून घेण्याची जिज्ञासा एवढें असलें म्हणजे जीवन निरुपयोगी आहे असें वाटावयास कारण नाहीं. प्रचलित चर्चेच्या विषयावर स्वतःचें म्हणून कांहीं अभिप्राय गोळा केलेले असले तर शिक्षणांत तेवढी दुधांत साखर. अशा प्रकारची

आजची स्त्रीशिक्षणाची वास्तविक स्थिति आहे असें म्हटल्यास कांहीं लोक चिडून आपणास अनास्थावादी (cynic) म्हणावयाचे ही भीति आहे खरी; पण समाजांतील सामान्य परिस्थिति उघड्या डोळ्यांनीं तपासतां, वरील वर्णन अगदीं यथार्थ आहे, असाच निर्णय निघेल.

शहरांतून ही स्थिति असल्यावर खेडेगांवांत राष्ट्रीय दृष्ट्या स्त्री-शिक्षणाचा विचार कोण करणार ? काठेवाडांतील एका राजानें आपल्या संस्थानांत केवळ स्त्रीशिक्षणच सक्तीचें केलें आहे. याचा तेथें अमल कसा चालतो व राजाची सामान्य नीति कशी आहे याची माहिती मिळविल्याशिवाय त्या राजाचें अभिनंदन करण्याची घाई आपण न करावी. पण कल्पना उत्कृष्ट आणि दीर्घदर्शी आहे एवढें आपण पाहून घेतलेंच पाहिजे. कारण ग्रामशिक्षणाची गुरु-किल्ली येथेंच आहे.

शिक्षणांत पुढारलेल्या देशांचा अनुभव असा आहे कीं प्राथमिक शिक्षण, बालशिक्षण उत्तम रीतीनें चालविण्यास पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक योग्य आहेत. आपल्या या गरीब देशांत सार्वत्रिक शिक्षणाचा विचार करीत असतां, खर्चाच्या ओझ्याचा विचार करितां छाती दडपून जाते. संपन्नतेवांचून शिक्षणप्रचार शक्य नाहीं; आणि शिक्षण प्रचारावाचून संपन्नता साध्य होणें नाहीं. या विषम अन्यो-न्याश्रयामधून मार्ग कसा काढावा हें एक मोठें कोडेंच आहे. या कोडींतून फुटून निघण्याचा मार्ग आपणांस स्त्रीशिक्षणांत सापडतो. आपल्या देशांत पुनर्विवाह प्रतिष्ठित नसल्यानें आणि वैवाहिक निष्ठेचा आदर्श स्त्रियांपुरता तरी सर्वोच्च असल्याकारणानें लक्षावधि विधवा आमरण वैधव्य स्थितींतच रहाणें पसंत करतात. अशांच्या जीवनाला आजवर कोणीं उपयोगी वळण लाविलें नसल्यानें अहिल्याबाई, झांशीची लक्ष्मीबाई, इ० उज्वल अपवादांचे गोडवे गात स्वस्थ बसावें लागतें. आजच्या समाजसुधारक विधवांच्या कैवाऱ्यांना विध-

यांच्यासाठीं वैद्यकीचा किंवा परिचारिकेचा ( नर्सिंगचा ) धंदाच विशेष पसंत पडलेला दिसतो. हे धंदे आजच्या समाजाला उपयोगी आहेत हें खरें, पण स्त्रियांचें जीवन सर्वतोपरी कृतार्थ करण्याची कुवत या धंद्यांमध्यें अजून दिसून येत नाहीं. ज्यांना शिक्षण मिळालें नाहीं अशा विधवांना नातेवाइकांच्या घरीं काबाडकष्ट करण्याचें स्वस्थ पण अप्रतिष्ठित असें स्थान पत्करावें लागतें. तेंहि शक्य नसलें म्हणजे कुणाच्या तरी घरीं पोळ्या लाटणें आणि पितळी कानानें इकडच्या तिकडच्या चहाड्या पुरविणें हाच काय तो धंदा त्यांना रहातो.

स्त्रियांना व विशेषतः विधवांना स्वतःचें जीवन कृतार्थ करण्यासाठीं अपत्यसंगोपनासारखा दुसरा अनुकूल, आवडता व पवित्र व्यवसाय नाहीं. आज विधवांना आजीविकेसाठीं—केवळ आजीविकेसाठीं— जे काबाडकष्ट करावे लागतात आणि आश्रितासारखें रहावें लागतें त्यांनाच जर प्रेमळपणानें शिकवावयास मुलें मिळालीं, प्रतिष्ठितपणें आजच्या इतकीच आजीविका मिळाली तर त्यांचें जीवन धन्य होईल, आणि राष्ट्रापुढील प्रजाव्यापी प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचा बिकट प्रश्न बऱ्याच अंशीं सुटेल.

यासाठीं होतकरू विधवांना खेडेगांवांतील प्राथमिक शिक्षणासाठीं तयार करणारीं अध्यापनमंदिरें काढलीं पाहिजेत. उत्साही व तरतरीत असें एखादें खेडेगांव पाहून तेथें सर्व प्रकारच्या जनहिताच्या प्रवृत्ती चालवून तेथेंच असें अध्यापनमंदिर सुरू केलें पाहिजे. खेडेगांवचेंच स्वाभाविक वातावरण आसपास असल्यानें शिक्षणाच्या दृष्टींत चुका होण्याचा संभव बराच कमी. संस्था खेडेगांवांत असल्यानें साधेपणा, काटकसर, अंगमेहनत वगैरे सर्व गोष्टी आपोआपच साधतील.

ही कल्पना व हें क्षेत्र अगदींच नवीन असल्यानें व प्रयोग नाजूक असल्यानें बऱ्याच अडचणी मार्गांत येतील हें निर्विवाद आहे. किती

तरी अडचणी कल्पनेच्या नजरेस आजच दिसत आहेत. पण दुसरा मार्ग नसल्यानें व हाच मार्ग खरा असल्यानें कसेंहि करून ही गोष्ट शक्य केलीच पाहिजे.

खेडेगांवांतील व्यापक प्राथमिक शिक्षण सिद्ध करण्यासाठीं हीं जीं अध्यापनमंदिरें काढावयाचीं व त्यांत स्त्रीपुरुषांना अध्यापनाचें शिक्षण देण्याची सोय असली तरी विधवांनाच विशेष उत्तेजन द्यावयाचें, त्या अध्यापनमंदिरांचा अभ्यासक्रम कसा असावा, त्यांत पुस्तकी शिक्षणाचें व औद्योगिक शिक्षणाचें प्रमाण कसें असावें हें पुढें ठरवूं. धर्मशिक्षण किंवा चारित्र्यशिक्षण म्हणजे केवळ उदात्त माहिती नसून ती एक जीवन–दृष्टि आहे. ती दृष्टि मनांत ठसविण्यासाठीं व ठसल्यानंतर दृढपणें आचरणांत आणण्यासाठीं बऱ्याचशा निरोगी संवयी रहाणींत व स्वभावांत दृढमूल व्हाव्या लागतात. असल्या धार्मिक शिक्षणाच्या अध्ययन–अध्यापनासाठीं काय काय केलें पाहिजे हाहि एक स्वतंत्र विषय आहे.

जेथें शिक्षणच खरें नाहीं, अर्थात् जीवनोपयोगी नाहीं, तेथें स्त्रियांचें आणि पुरुषांचें शिक्षण एकच प्रकारचें असावें कां भिन्न प्रकारचें असावें, या प्रश्नाला फारसा अर्थ रहात नाहीं. पुरुषांचें शिक्षण जसें सामाजिक प्रतिष्ठेसाठीं आहे त्याचप्रमाणें स्त्रियांचें शिक्षणहि सामाजिक प्रतिष्ठेसाठींच आहे. दोघांची प्रतिष्ठा जर एकच प्रकारची असली तर त्यांचें शिक्षणहि एकाच प्रकारचें असलें पाहिजे. आणि प्रतिष्ठेंत भेद असला तर शिक्षणांतहि भेद असला पाहिजे. अशी दृष्टि आजच्या शिक्षणापुरती तरी वरील प्रकारच्या प्रश्नाच्या उत्तराला बस्स आहे. पण शिक्षण जर व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन समर्थ व समृद्ध करण्याच्या दृष्टीनें द्यावयाचें असेल तर वरील प्रश्नाचा चांगला खोलवर विचार करावा लागेल.

ईश्वरानें स्त्रीपुरुषांच्या शरीरांत, स्वभावांत व कार्यक्षेत्रांत

भेद केला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण या गोष्टीचें अवास्तव स्तोम माजवून स्त्री-पुरुषांच्या जीवनांत जें साम्य आहे आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे जो सहकार आहे तिकडे दुर्लक्ष करणें म्हणजे जीवनाची स्वतःस कल्पनाच नाहीं, केवळ आग्रहाचेंच आपण मालक आहोंत, असें कबूल करण्यासारखें आहे.

मुलें बायकांच्या पोटींच होतात. लहानपणीं मुलांना दूध पाजण्याची जबाबदारी ईश्वरानें त्यांच्याकडेच टेविली आहे. मुलांना घेऊन घरींच बसणें बऱ्याच अंशीं बायकांना भाग असल्यानें व अपत्यसंगोपनाला लागणारी कोमलता व खंत बायकांमध्यें विशेष असल्यानें गृहकृत्याचा बराचसा भाग बायकांवरच पडला.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं, मनुष्यजीवनाची अंतिम कृतार्थता अहिंसासिद्धीमध्येंच आहे हें मनुष्याला फार पूर्वीं पटलें आहे. म्हणून त्यानें अहिंसेला धार्मिक व सामाजिक प्रतिष्ठा अर्पण केली. पण ही अहिंसा जीवनकलहामध्यें अमलांत आणणें दुरापास्त दिसल्यानें मनुष्यानें अहिंसेसाठीं स्वतंत्र क्षेत्र तोडून दिलें. घराच्या आंत अहिंसेलाच प्राधान्य असावें, स्वकीयांमध्यें अहिंसेचाच कायदा अमलांत यावा, धार्मिक गणल्या जाणाऱ्या आचारांतून हिंसेचा विटाळ शक्य तितका काढून टाकावा, अशी नीति मनुष्यानें चालविली आणि शेवटीं निदान घर संभाळणाऱ्या, प्रेम, सेवा, व आत्मविलोपन यालाच वाहिलेल्या अशा स्त्रियांनीं तरी अहिंसामूर्तीच असावें असें ठरविलें. मुलांना जन्म देणें, त्यांचें पालन करणें व युद्ध करणें या परस्परविरोधी प्रवृत्ती आहेत. म्हणूनच स्त्रियांनीं युद्ध सोडलें. स्त्रियांचा शारीरिक बांधाच नाजूक असल्यानें त्या युद्धक्षम नाहींत असेंहि वाटण्याचा बराच संभव आहे. निदान पशुजातीमध्यें तरी ही गोष्ट खरी ठरत नाहीं. नराहून मादीचा कडवेपणा कमी नसतो. आणि युद्ध करून आत्मरक्षण करणें अथवा विजय मिळविणें हें मनुष्ये-

तर प्राण्यांमध्यें नरापेक्षां मादीला कमी साधतें असें मुळींच नाहीं.

मनुष्यजातीमध्यें देखील युद्धकुशल व युद्धोत्सुक अशा कडव्या स्त्रियांच्या इतिहासांत उल्लेख आहे. ॲमॅझॉन स्त्रिया बाणाचा भाता पाठीवर बरोबर बांधतां यावा म्हणून एक स्तन कलम करून टाकीत असत असेंहि इतिहासानें नमूद करून ठेविलें आहे. महाभारतांत स्त्रीराज्यांत स्त्रियांचीं लढाऊ पथकें असत आणि या स्त्रिया असाधारण झुंझार असत असें लिहिलें आहे.

तेव्हां स्त्रियांनीं लढण्याचा पेशा सोडला, शिकारीचा व्यवसाय सोडला, याचें खरें कारण मुख्यत्वें मनुष्यजातीची अहिंसेची उपासनाच होय. इतर प्राण्यांपेक्षां मनुष्यांमध्यें विषयसेवन अधिक असल्यानें स्त्रियांची शक्ति फार लौकर क्षीण होते व म्हणून त्या अबला होतात हेंहि एक कारण असावें.

अर्थोत्पादक व्यवसाय पुरुषांनींच करावा व स्त्रियांनीं नुसतें घर संभाळून असावें अशी व्यवस्था पांढरपेशा वर्गांत अधिक दिसून येते. इतर वर्गांमध्यें कमी अधिक प्रमाणानें उद्योगधंद्याचें ज्ञान स्त्रियांसहि आवश्यक असतें. शेती, विणकाम, गोपालन, मेषपालन, कुंभारकाम व सामान्य दुकानदारी वगैरे धंद्यांत तर स्त्रीपुरुषांचा हिस्सा समसमान असतो. कोठें कमी असेल तर तेथें तेवढी व्यवस्थेची न्यूनता, असें म्हटलें पाहिजे.

हिंदुस्थानांत मांसाहार अप्रतिष्ठित ठरविल्यानें शिकारीचा व्यवसाय बराच मागें पडला आणि युद्धाची जबाबदारी एका विशिष्ट वर्गाकडे सोपविल्यानें बाकीचा जनसमुदाय बराचसा अहिंसक वृत्तीचा झाला. आजची चळवळ राष्ट्रांत दृढमूल झाली म्हणजे अहिंसावृत्ति हा भारतीयांचा स्वभावच होऊन बसणार आहे; व तसें झालें म्हणजे स्त्री–पुरुषांमधील हिंसापरायणतेमुळें पडलेला भेद नाहींसा होईल. लढाईचा पेशा व शिकार कमी झाली व उद्योगधंदे वाढले म्हणजे स्त्री–

पुरुषांच्या जीवनामध्यें साम्य बरेंच वाढेल. घर चालविण्याच्या बाबतींत सर्व जबाबदारी स्त्रियांवर टाकून व स्त्रियांची शिक्षणाच्या बाबतींत उपासमार करून आपण आपल्या गृहजीवनांतून सुखसमाधान, व्यवस्था, सुंदरता व काटकसर यांना अगदीं फांटा दिला आहे. गृहजीवनाचें सुख अधिकाधिक मिळविण्याच्या दृष्टीनें देखील घर चालविण्याच्या कामीं पुरुषांनीं मन घातलें पाहिजे व वेळ खर्चून श्रम करण्याची तसदी घेतली पाहिजे. घर चालविण्याचें ओझें स्त्रियांवर आज असाधारण पडत आहे. घरच्या स्वयंपाकांत देखील स्त्रियांच्या बरोबर पुरुषांनीं काम केलें पाहिजे. पुरुष पैसा मिळवून आणणारे ‘ जोडकार ’ झाले म्हणून त्यांना घरांत सर्व वेळ आळसांत रहाण्याचा व जिकडे तिकडे अव्यवस्था माजविण्याचा अधिकार मिळाला. व सर्वकाळ राबणाऱ्या स्त्रिया अर्थोत्पादक श्रम करीत नाहींत एवढ्याच कारणानें परावलंबी, आज्ञाधारक आश्रित बनल्या. या स्थितीमध्यें अथवा व्यवस्थेमध्यें न्याय नाहीं, खरें कौटुंबिक सुख नाहीं आणि कौटुंबिक सामर्थ्य अथवा शीलसंवर्धन यांपैकीं एकहि नाहीं.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गृहजीवनामध्यें पुरुषांनीं केवळ भोक्ता राहून चालावयाचें नाहीं. त्यानें घरांतील श्रम, देखरेख, व्यवस्था व अपत्यसंगोपन यांत भाग घेतलाच पाहिजे; व घरची राहणी साधी व काटकसरीची करून स्त्रियांचा वेळ व त्यांचें श्रम वांचविलेच पाहिजेत.

इतकें झालें म्हणजे स्त्रियांना घराबाहेरील जीवनामध्यें दृष्टिपात करणें शक्य होईल. आज किती तरी कुटुंबांमध्यें स्त्रियांना कुटुंबाच्या आर्थिक आणि औद्योगिक स्थितीचेंहि यथार्थ ज्ञान नसतें. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थिति, त्यांत होणारी विचारक्रांति व जीवनपरिवर्तनाचें वळण यांपैकीं कशाचेंच त्यांना स्पष्ट ज्ञान नसतें. जडसृष्टीमध्यें ज्याप्रमाणें आल्या परिस्थितीला अवशपणें वश होण्याचा

स्वभाव असतो तसाच प्रकार आपल्या स्वभावाचा झाला आहे. गफलत, बेफिकीरी, अनास्था आणि आर्थिक असहायता यांच्या योगानें आपल्या जीवनांत जो कांहीं फेरफार होईल तो होईल. याला प्रगति म्हणून त्याचें अभिनंदन करावें; कलीचा प्रादुर्भाव म्हणून वर तोंड करून श्वानवत् रूदन करावें; किंवा पराधीनतेकडे बोट दाखवून जबरदस्त लोक कधीं तरी क्षीण होतीलच अशा भवितव्यतेची आशा करीत रहावें एवढेंच आपल्या हातीं आहे.

जर आपलें सामाजिक जीवन मंगलमय व पराक्रमशाली करावयाचें असेल तर आपलें गृहजीवन शुद्ध, साधें, उद्योगपरायण, प्रसन्न, रसिक आणि सर्वतोभद्र केलेंच पाहिजे. व तसें करावयास स्त्रियांचें जीवन आज आहे तसें अज्ञानमग्न, संकुचित, परावलंबी व कावाडकष्टमय राहून भागावयाचें नाहीं. गृहजीवनाच्या आदर्शांची कल्पना आमूलाग्र बदलणार नाहीं तोंवर स्त्रीशिक्षणाला योग्य वळण लावणें अगदीं अशक्य आहे.

शिक्षणाचा उहापोह होण्यापूर्वीं जीवनाच्या अंगउपांगांचा मूलग्राही उहापोह प्रथम झाला पाहिजे. यासाठीं जुन्याचा अभिमान किंवा आग्रह उपयोगी नसून जुन्याची माहिती, जुनें ज्ञान व जुन्या आदर्शांचें यथार्थ आकलन हीं आवश्यक आहेत. समाजाची शक्ति व अशक्ति दोन्हींचें त्यांत प्रतिबिंब असतें. आजच्या जगाची परिस्थिति काय आहे, कोणते महान् महान् प्रश्न सर्व जगाला अस्वस्थ करीत आहेत याचेंहि ज्ञान असलें पाहिजे; व आजचा आपला समाज कसा आहे, त्यांत किती प्रकार आहेत याचेंहि प्रत्यक्ष व सूक्ष्म ज्ञान असलें पाहिजे.

आजवरची जीवनचर्चा सुधारक लोकांनीं, प्रार्थनासमाज अथवा ब्राह्मसमाज यांतील लोकांनीं अथवा स्वामी विवेकानंद आदि धार्मिक जागृति करणाऱ्यांनीं थोडीफार केली आहे. उत्तर हिंदुस्थानांत

आर्यसमाजानें व महाराष्ट्रांत सनातन धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांनींहि थोडीफार चर्चा केली. पण यांपैकीं बरीचशी कालग्रस्त झालेली आहे.

आपल्या लोकांच्या जीवनाविषयीं प्रथम टीका केली मिशनरी लोकांनीं. त्यांतच कांहीं युरोपियन अधिकारी व अध्यापक मिसळले. युरोपचा इतिहास व तेथील प्रजाकीय जीवनाची तेथील लोकांनीं केलेली चर्चा वाचून तशाच पद्धतीची उसनी चर्चा आपल्या येथील सुशिक्षितांनीं बरीच केली आहे; पण त्यांत उसनेपणाचे सगळेच दोष आहेत. इंग्लंडमधील पार्लमेंटचा इतिहास, युरोपमधील धार्मिक मठांचा अनुभव, फ्रान्स, अमेरिका, इटली आणि रशिया येथील राज्यक्रांत्यांचे प्रकार, औद्योगिक युगांतील परिस्थिति, वगैरे पाश्चात्य देशांतील अनुभव व पुरुषार्थ आपल्या देशाला लागूं करून केलेली टीका अथवा विवेचन कितीहि आकर्षक असलें तरी तें आपल्या परिस्थितीस लागूं पडत नाहीं. आणि आतां तर उसना माल आणण्याचें क्षेत्र रशिया होऊन बसला आहे. एखादी सार्वभौम कल्पना जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्यें कशी कार्य करूं शकते याचा तपशील जे कोणी तयार करून देतात ते सहजपणें समाजाचे पुढारी होतात. समाजाचा स्वभाव कोणत्याहि प्रकारची तसदी न घेण्याचा, विशेषतः बुद्धीस तसदी न देण्याचा असतो. पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून आणि सर्व आक्षेपांस उत्तरें देऊन व त्याचप्रमाणें नवीन स्मृति, कायदेकानू, व्यवस्थापत्रें इ० तयार करून सामाजिक क्रांतीची नवीन कल्पना लोकांपुढें मांडली म्हणजे अशा कल्पनेचा शिष्य होणें हें सोप्या बहाद्दुरीचें असतें. अशा कल्पनेचा स्वीकार केला म्हणजे उसने अवसानहि सहज येऊं शकतें. रशियन विचार ग्रहण करण्यांत आपल्या देशांत कित्येकांची अशीच स्थिति झाली आहे.

प्रत्येक समाजाचें सामर्थ्य त्याच्या प्राचीन काळापासून चालत

आलेल्या पुरुषार्थांच्या भांडवलांत असतें. हें भांडवल उसनें घेतां येत नाहीं, ही गोष्ट बरीचशी विसरली जाते. कोणत्याहि समाजाला कोणतेंहि वळण लावणें अशक्य नाहीं. पण इतिहासप्रसिद्ध स्वभावाच्या विरुद्ध जातांना जुन्याचें दिवाळें वाजतें व भयानक विकृतीच्या रोगराईतून समाजाला पसार व्हावें लागतें. हा विनाकारणचा अनर्थ टाळण्यासाठीं स्वभाव व स्वधर्म हीं ओळखून तदनुषंगानें स्वतंत्र, जिवंत व परंपरानुकूल असेंच परिवर्तन केलें पाहिजे.

अशी स्वतंत्र, स्वदेशी जीवनमीमांसा केल्यानंतरच शिक्षणाची दिशा नक्की करितां येईल.

## २

दोन पिढ्यांपूर्वीची आपली सामाजिक स्थिति निराळी होती. आजची निराळी आहे. धार्मिक आचारद्वारा, तसेंच संस्कार, व्रत, उत्सव आणि पुराणश्रवण यांच्या द्वारा आबालवृद्ध स्त्रीपुरुष सर्वांना धार्मिक शिक्षण मुबलक मिळत असे. मग त्यांत भोळसटपणाचा व संकुचितपणाचा कांहीं भाग असेना का. गृहजीवन आजच्यापेक्षां अधिक समाधानाचें असे; व परिवर्तनाची जबाबदारी नसल्यानें परंपरा सुखानें चालत असे. मुलांमुलींना गृहशिक्षण घरींच मिळे. कुलधर्म, जातिधर्म वगैरेंचे संस्कार सहजासहजीं मिळत असत. चातुर्वर्ण्याच्या आग्रहामुळें घरच्या पिढिजाद धंद्याचें शिक्षण घरच्याघरींच अत्यंत आस्थेनें मिळत असे. उरले सुरलेलें शिक्षण देवळांत, बाजारांत, यात्रेंत, सार्वजनिक उत्सवांत मुलांना प्राप्त होई. निरनिराळ्या विषयांचे तज्ज्ञ समाजांतील होतकरू तरुणांना आपल्याकडे खेंचण्याचा प्रयत्न करीत, आणि तेथें गुरुशुश्रूषाद्वारां उस्तादी पद्धतीनें त्यांच्या कलांचें तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण उत्तम रीतीनें प्राप्त होई. श्रीमंतांचीं मुलें घरींच उस्तादांना ठेवून शिकत असत व त्यांच्याबरोबर बऱ्याच आश्रित मुलांचीहि सोय होई.

संस्कृत विद्येच्या पाठशाळा असत तेथें ब्राह्मणी विद्येचें शिक्षण गांवाच्या संस्कारितेच्या मानानें कमी अधिक होई. शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे आईबाप व विद्यार्थ्यांना मोठेपणीं आश्रय देणारे कर्तबगार लोक सर्वच एका धर्माचे, एका सामाजिक आदर्शाचे आणि व्यापक अर्थानें एकाच राहणीचे असल्यानें शिक्षण आपोआप सर्वांगीण होत असे, व शिक्षणांत समाधान प्राप्त होत असे. मुसलमानी राज्यांत फारशी भाषेचें व साहित्याचें शिक्षण उस्तादांकरवीं मोठ्या आस्थेनें करविण्यांत येत असे. फारशी साहित्याची संस्कारिता व रसिकता हिंदु विद्यार्थ्यांना सहज आकर्षीत असे. पण तिनें हिंदुजीवन कधींहि अस्वस्थ केलें नाहीं. इस्लामी संस्कृतीपैकीं मूर्तिपूजानिषेध आणि ईश्वराचें अद्वैत या दोन गोष्टी हिंदूंच्या कानीं आदळावयाच्या; पण त्या बाबतींत दोन्ही धर्मांतील साधुसंतांनीं लोकांमध्यें उच्च सहिष्णु वृत्ति तयार केली असल्यानें तेथेंहि उभयपक्षीं अडचण पडत नसे.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत हिंदू मुसलमानांची व्यावहारिक दृष्टि बरीचशी समान होती. निदान अनास्थेच्या बाबतींत तरी समान होतीच !

इंग्रजी राज्यापासून मिशनरी आणि सरकारी शाळा आपल्याला व्यावहारिक शिक्षण देऊं लागल्या. सामाजिक जडतेमुळें कौटुंबिक जीवनांत अनास्था, प्रवाहपतितता आणि अनुत्साह हीं होतींच. सरकारी शिक्षणांत धार्मिक शिक्षण येणें शक्य नव्हतें. आणि मिशनरी संस्थांतून मिळणारें धार्मिक शिक्षण आपल्या समाजाच्या उपयोगी नाहीं. अशा स्थितींत देशांतील धार्मिक शिक्षण व धार्मिक जीवन दोन्हीं क्षीण झालीं. आर्यसमाजानें धार्मिक व व्यावहारिक शिक्षणाची संगति लाविली खरी, पण तो वादप्रिय असल्यानें मुसलमानी, खिस्ती व सनातनी तीन्ही समाजांशीं त्यानें हुजत सुरू केली. त्या-

मुळें आर्यसमाजाच्या वीर्याच्या मानानें फार थोडें काम झालें. आणि त्याला भविष्यकाळची दिशा व्यापकपणें आंखतां आली नाहीं. हिंदुस्थानांतील क्रांतीचा खरा अधिकार ब्रह्मसमाजाचा आहे, प्रार्थना समाजाचा आहे. पण या दोन्ही समाजांत क्रान्तदर्शी शिक्षणशास्त्री कोणी तयारच झाला नाहीं. त्यामुळें एक महान् प्रेरणा अल्पप्राणच ठरली.

स्वामी विवेकानंदांना राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना होती; पण त्यांचे मठ कांहींसे ऐदी बनून, सेवाश्रम स्थापणें व पुस्तकें प्रसिद्ध करणें यांच्या बाहेर त्यांना अजून फारसें सुचलेलें दिसत नाहीं.

अशा स्थितीमुळें शिक्षणाचें कार्यक्षेत्र बरेंच व्यापक केलें पाहिजे. धर्मसंस्था, गृहसंस्था व उद्योगहुन्नर या सर्वांचें कार्य कमी अधिक प्रमाणानें शिक्षणानें आपल्या हातीं घेतलें पाहिजे. अर्थात् स्त्रीशिक्षणाचा देखील असाच जीवनव्यापी विचार केला पाहिजे. समाज म्हणजे काय, समाजाचा अंतिम आदर्श कोणता, जगांतील समाजांत आपल्या लोकांचा दर्जा कोणता आहे, आपल्या प्रजेचा आजवरचा पुरुषार्थ कोणत्या प्रकारचा आहे व यापुढची याला कोणत्या दिशेला व कोणत्या शिखराचें ध्यान धरून करावयाची आहे, याची सामान्य कल्पना आपल्या स्त्रियांना असलीच पाहिजे. हिंदी स्त्रिया म्हणजे समाजाचें आंधळें अंग अशी स्थिति रहातां कामा नये.

शारीरिक जीवन, कौटुंबिक जीवन व राष्ट्रीय जीवन या तिहींचें शास्त्र त्यांना अवगत असलें पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, समाजशास्त्राचे मोठे व गहन ग्रंथ त्यांनीं अभ्यासले पाहिजेत. पण आपल्या समाजशास्त्राची दृष्टि, दिशा व पद्धति यांचें त्यांना सोपपत्तिक व डोळस ज्ञान असलेंच पाहिजे. तरच त्यांना भावी जीवनांत हातभार लावणें शक्य होईल.

आपणांला पसंत असो वा नसो—पण पसंत नसण्याचें कारणच

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत १५५

नसावें–येथून पुढें समाजव्यवस्थेमध्यें स्त्रिया पुरुषांइतकाच भाग घेऊं लागणार आहेत. मुलांना जन्म देणें व त्यांचें संगोपन करणें या जबाबदारीमुळें स्त्रियांना इतर जबाबदारी हातीं घेणें शक्य नाहीं ही दलील यापुढें चालावयाची नाहीं. स्त्रियाच उलट म्हणतील कीं, ‘ या जबाबदारीमुळेंच समाजव्यवस्था आमच्या हातीं विशेष असली पाहिजे. समाजाला जन्म आम्हीच देतों व प्राथमिक वळण लावण्याचें कामहि आमचेंच आहे. लग्नसंस्था, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि धर्मजीवन यांमध्यें आमची विशिष्ट दृष्टि अतिशय कामाची आहे. समाजाचें धुरीणत्व आजवर पुरुषांकडे राहिलें म्हणूनच राजकारण व शिक्षण या दोन्हीं क्षेत्रांत हडेलहप्पीला प्राधान्य मिळालें. माणसानीं माणसाचा खून करावा व त्याला न्याय अथवा शौर्य म्हणावें हा जंगलीपणा समाजांतून काढून टाकण्यासाठीं तरी समाजतंत्र आम्हांस हातीं घ्यावयास हवें.’

स्त्रियांची ही बाजू रास्त नाहीं असें कोण म्हणेल ! आणि त्यांची ही बाजू जर खरी असली तर त्यांचें शिक्षण त्या तोलाचेंच असलें पाहिजे. आपण आजवर मध्यम वर्गाच्या शिक्षणाचाच विचार केला. सामान्य वर्गाला ज्याप्रमाणें वेदोक्त कर्मांचा अधिकार नव्हता त्या-प्रमाणें शिक्षणाचाही अधिकार असल्याचें दिसून येत नाहीं. यापुढें शिक्षणाचें तोंडच फिरवावयाचें आहे. जगांतील अधिकांश संख्या पुरुषांची असो वा स्त्रियांची असो, श्रमजीवी लोकांची आहे. शारीरिक श्रम सर्वांना योग्य प्रमाणांत करावे लागले तर तो शाप नसून आनं-दाचें तें एक निरोगी व पौष्टिक साधन आहे. श्रम न करितां साव-लींतच राहणाऱ्या लोकांचें जीवन स्वाभाविक नसून अपवादात्मक व कृत्रिम आहे एवढें कबूल झाल्यानंतर शिक्षणामध्यें महत्त्वाचे फेर-फार झालेच पाहिजेत.

धार्मिक शिक्षणानें जीवनाचा उद्देश व राहणीची ढब एकवार

बरोबर जमली म्हणजे बाकी राहिलेलें शिक्षण मुख्यत्वें औद्योगिकच रहातें. औद्योगिक शिक्षणाचें सामर्थ्य एकदां पटल्यानंतर आज ज्याप्रमाणें मताधिकारासाठीं लोक हापापलेले असतात त्याचप्रमाणें सार्वत्रिक औद्योगिक शिक्षणासाठीं लोक हापापलेले दृष्टीस पडतील. आणि हें औद्योगिक शिक्षण म्हणजे मुठभर लोकांना लक्षावधि रुपये मिळवून देणारें शिक्षण नव्हे तर लक्षावधि लोकांच्या अंगावर मुठभर मांस अधिक येईल, त्यांच्या जीवनांत कौशल्य, समाधान व स्वाभिमान हीं नांदतील असें शिक्षण होय. आणि असें शिक्षण म्हणजे खेड्यापाड्यांतून चालण्याजोग्या राष्ट्रव्यापी व राष्ट्रीय महत्त्वाच्या धंद्यांचें शिक्षणच होय.

गेल्या पंधरा वीस वर्षांत स्त्रियांच्या कैवाऱ्यांनीं स्त्रियांच्या उन्नतीचा जो विचार केला आहे त्यामध्यें स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचा विचार प्रधानपणें आहे. पण त्याच्या मुळाशीं अशी कल्पना आहे कीं, कुटुंबामध्यें स्त्रीला न्याय मिळणें दुरापास्त आहे; जुन्या वळणाचे लोक स्त्रियांना राबणाऱ्या आश्रित म्हणूनच ठेवूं पहातात; तेव्हां कुटुंबापासून फटकून राहून स्वतंत्रपणें आजीविका मिळविण्याचें साधन स्त्रियांना पाहिजे.

हा विचार घातुक आहे. कुटुंब तोडण्यासाठीं, कुटुंबाशीं असहकार करण्यासाठीं आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याची कल्पना असामाजिक आहे. कुटुंबांत राहून, कुटुंबाशीं सहकार करून अर्थोत्पादनांत स्त्री जर भाग घेईल तर तिचें कुटुंबांतील महत्त्व आपोआपच दृढमूल होईल. शेतकरी व विणकर यांच्या बायका पुरुषाइतक्याच राबतात. हे दोन्ही धंदे स्त्रियांच्या सहकारावांचून बरोबर चालावयाचे नाहींत; आणि म्हणूनच शेतकरी व विणकर यांच्या घरांत स्त्रियांचा दर्जा मानाचा व अधिकाराचा असतो. त्यांत जेवढा उणेपणा दिसेल तो बाकीच्या समाजाच्या संसर्गामुळें आहे.

यावरून स्पष्ट होईल कीं आनंद, आरोग्य व अधिकार तीन्ही दृष्टींनीं विचार करितां स्त्रीशिक्षणांत औद्योगिक कौशल्याला प्राधान्य दिलेंच पाहिजे. स्वयंपाक कसा करावा, घरांत उपकरणांची व्यवस्था कशी ठेवावी, घर कसें शृंगारावें, घरांतील हिशोबठिशोब कसा ठेवावा, वर्षाचें अंदाजपत्रक ठरवून त्याबरहुकुम खर्च कसा चालवावा, अतिथिसत्कार आणि सामाजिक उत्सवादि प्रसंगीं वागण्याचें धोरण कसें ठेवावें, घरांतील मुलांचें आरोग्य-सामर्थ्य, नैतिक वर्तन व शिक्षण यांवर देखरेख कशी ठेवावी, इत्यादि विषयींचें ज्ञान स्त्रियांना आज आहे त्याहून किती तरी पटीनें वाढलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर घरकामांत लागणारीं उपकरणें प्रसंग पडल्यास स्वतःच तयार करण्याइतकें हस्तकौशल्य पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि असणें इष्ट आहे. या शक्तींचा नैतिक उपयोग किती आहे याची आजच्या समाजाला कल्पनाच नाहीं. कपडे शिवतां येणें ही जशी स्त्रियांनीं स्वतःची कला म्हणून ठरविली आहे, पक्वान्नें तयार करणें याचा ज्याप्रमाणें त्यांनीं जवळ जवळ मक्ताच घेतला आहे, त्याप्रमाणें त्यांना इतर प्रकारच्या कौशल्यामध्यें देखील सर्व प्रकारचे गम्य असलें पाहिजे. उपकरणें बिघडलीं असतां दुरुस्त करतां आलीं पाहिजेत; कोठें काय बिघडलें हें ओळखतां आलें पाहिजे. आज ज्याप्रमाणें आपण डॉक्टरकडे स्वतःचें शरीर घेऊन जाऊन त्याला म्हणतों कीं, 'पहा हो मला काय झालें आहे! मला कांहीं समजत नाहीं. शरीर माझें पण तुम्ही त्याला ओळखा. माझ्या शरीराला काय झालें आहे हें मला समजून देण्याची तसदी तुम्हांला व मला नको. कसें तरी करून त्याला चालतें करून द्या म्हणजे झालें. पुनः बिघडल्यास पूर्वीच्याच आंधळेपणानें तुमच्याकडे पुनः येईन व तुमचें देणें भरीत राहीन.' त्याचप्रमाणें प्रत्येक क्षेत्रांत तज्ज्ञांचें जोखड स्वीकारून आपण अज्ञानाची आणि पंगूपणाची मिरास आपल्याकडे ठेविली आहे. ही

स्थिति बदललीच पाहिजे.

बुद्धीचा विकास करण्यासाठीं औद्योगिक कौशल्याचा जसा उपयोग आहे त्याचप्रमाणें व्यवस्थाशक्तीचाहि उपयोग आहे. स्त्रियामध्यें व्यवस्थाशक्ति कांहीं अंशीं उपजतच असते; ती वाढवून तिला सर्वसमर्थ केली पाहिजे. प्रसंगविशेषीं स्त्रियांच्या हाताखालीं पुरुषांना वागावें लागेल. या स्थितीची पुरुषाला चीड नसावी. किंवा कौतुकादाखल त्यांना आपण सहज उत्तेजन देत आहोंत असा मोठेपणाचा आवहि पुरुषांनीं आणणें योग्य होणार नाहीं. गृहव्यवस्था व लग्नसोहाळे यांमध्यें ज्याप्रमाणें गृहलक्ष्मी हीच पुढारी असते त्याप्रमाणें ही गृहलक्ष्मी उद्यां समाजलक्ष्मी होणार आहे हें आतांपासूनच कबूल केलेलें बरें.

कला आणि विलासिता या वस्तू परस्परभिन्न आहेत, परस्परविरोधी आहेत. असें असूनहि कलेची यथार्थ कल्पना नसल्यानें आणि संस्कारी विलासिता तोतया कला म्हणून मिरवूं शकत असल्यामुळें समाजांत मोठा घोंटाळा झाला आहे. पुष्कळ विलासी लोक थोडीशी संस्कारिता प्राप्त होतांच स्वतःच्या विलासितेला कलेच्या पांघरूणाखालीं झांकतात; अथवा विलासितेलाच प्रतिष्ठित करूं पहातात. खरेखुरे पण कच्चे व भाबडे कलारसिक व कलाधर लोक अशांच्या नादीं लागून स्वतःला व स्वतःच्या कलेला कायमचे बुडवितात. आणि मग संभावित जनसमाज कलेलाच पादत्राणांप्रमाणें अगदीं दूर टेवूं पहातात. एवंच समाजांत कलेची अगदीं दैना होते आणि समाज उन्नतीच्या श्रेष्ठ व आनंददायी अशा साधनाला आंचवतो.

आपल्या देशांत मध्ययुगांत असा एक काळ येऊन गेला कीं, जेव्हां कलेनें आपलें हीनांतलें हीन रूप प्रकट केलें आणि शेवटीं समाजाला कलेची इतकी कांहीं शिसारी आली कीं संभावित लोकांनीं

गायनवादन, नर्तन, काव्य, नाटक, कशाशीं संपर्क ठेवतां कामा नये असा निरख केला. 'नटाचें तोंड पाहूं नये,' 'रंडागीतानि काव्यानि,' वगैरे वचनें त्याच काळचीं होत. समाजानें आत्मरक्षणासाठीं असा कासवी उपाय अंमलांत आणिल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें! पुरुषवर्गानें जर कलेची अशी बोळवण केली तर स्त्रियांची गोष्ट काय विचारावी! कला आणि पावित्र्य यांमध्यें आठवा चंद्र आहे असें लोकांनीं ठाम ठरविलें. नाहीं म्हणावयाला राजवंशी लोकांना जनसमाजानें अपवाद म्हणून सोडून दिलें होतें. या फारकतीनें पावित्र्य संभाळलें गेलें किंवा नाहीं तें त्या पतितपावन प्रभूलाच ठाऊक! पण कला मात्र अधिकाधिक क्षीण झाली आणि राजरोसपणें हीनतेमध्यें मुरलेल्या लोकांच्या हातीं जाऊन स्वतःची निर्व्याज मनोहारिता व कुलीन व्रीडा दोन्ही विसरली.

आज ही स्थिति पालटून कलेचा व समाजाचा सारखाच उद्धार करण्याची आवश्यकता आहे. खरी कला जेव्हां समाजांत वाढेल आणि खऱ्याखोट्याचा भेद ओळखण्याइतकी कुलीन संस्कारिता जेव्हां लोकांना प्राप्त होईल तेव्हां समाजांतील सात्विक आनंद वाढून सामाजिक पावित्र्य एक मजला वर चढेल. याची सुरुवात स्त्रीशिक्षणापासून केल्यास कलेची शुचिर्भूतता संभाळण्यास बरीच मदत होईल. याची सुरवात स्त्रीशिक्षणामध्यें काव्यपरिचयाला महत्त्वाचें स्थान देऊन करितां येईल. सामाजिक सद्गुण नेहमीं हृदयाच्या आश्रयानें रहात असतात; बौद्धिक विवेचनानें त्यांना फार तर ओप चढविली जाईल. पण त्यांना पुष्टि मिळावयाची नाहीं. आर्यत्वपूर्ण अशा काव्यपरिशीलनानें हृदय उन्नत होतें व सर्व सद्गुणांना आपोआपच जीवन मिळतें.

काव्याबरोबर गायन—वादन यांचाहि प्रारंभ केलेला बरा. गायनवादन हें चित्तवृत्तीला स्वतंत्रपणें प्रसन्नता देऊन निरोगी ठेव-

ण्याचें उत्कृष्ट साधन आहे. शास्त्रीय संगीत सर्वत्र चालू करावें असा आमचा आग्रह नाहीं. दरेक प्रांतामध्यें उच्च लोकसंगीत अजून थोडें बहुत उरलें आहे. हृदयांतील सर्व प्रौढ, ललित व सात्विक भाव जागृत करून हृदयाची तार हलवून सोडणारे व हृदयभूमिकेच्या सर्व नाजूक व खोल विभागांचा परिचय करून देणारे लोकसंगीत पुनः छेडलें पाहिजे. कल्पलतेप्रमाणें तें अनेक रीतीनें फलदायी होईल.

कलेच्या दृष्टीनें आणि शास्त्रीय शिक्षणाच्या दृष्टीनें चित्रकला ही तितकीच उपयोगी आहे. औद्योगिक शिक्षणाला चित्रकलेची मदत फारच मोलाची आहे; आणि आपण हेंहि विसरतां कामा नये कीं, चित्रसृष्टि ही शब्दसृष्टीप्रमाणेंच स्वतंत्र भाषा आहे;व ती मानवी विचार, विकार, कल्पना व भावना यांची समर्थ वाहक आहे. या दृष्टीनेंहि चित्रकलेचा साहित्याइतकाच शिक्षणांत गौरव झाला पाहिजे.

साहित्य–संगीत–चित्रकला एवढेंच कलेचें क्षेत्र नाहीं. रहाणी, करणी, वागण्याचा शिष्टाचार सर्वच गोष्टींत कलेचें आर्यत्व प्रगट करणें शक्य आहे. धर्मविधि, उत्सव, यात्रा वगैरे सर्व प्रवृत्तींमध्यें कलामय जीवन व्यक्त करणें शक्य आहे.

‘ आपापाचा माल गपापा ’ या पद्धतीनें जर कोठें काम चालत असेल तर तें सरकारी खात्यांमधून. लोक सुखी व्हावेत, खर्च कमी यावा, काम उत्तम व्हावें या दृष्टीपेक्षां वरिष्ठाचे हुकुम तत्परतेनें पाळलेले दिसावेत, कोष्टकें व पत्रकें यथेच्छ भरलीं जावींत, वर वार्षिक रिपोर्टासाठीं भरपूर सामग्री असावी इकडे लक्ष अधिक असतें. सरकारी दवाखान्यांत आजाऱ्यापेक्षां नियमाकडे विशेष लक्ष दिलें जातें. सर्वच खात्यांमधून कामाच्या उत्तमतेपेक्षां टापटिपीकडे आणि अधिकार गाजविण्याकडे लक्ष अधिक असतें. ही स्थिति जगांतल्या सर्व सरकारांची कमी अधिक प्रमाणानें आहे. तरी मनुष्याचें सामाजिक जीवन सर्वस्वी सरकारच्या ताब्यांत सोंपविण्याच्या सूचना तत्त्वज्ञ

समाजवादी करीत असतात. एवढें खरें कीं, दुसरा मार्गच राहिला नाहीं म्हणजे मनुष्य कोणतीहि संस्था गोड करून घेतो आणि ती सुधारण्याचा प्रसंगविशेषीं प्रयत्नहि करतो. आणि या नियमाप्रमाणें कालेंकरून सरकारेंहि सुधारलीं जातील. पण आजचा मनु सुधारणेचा नसून परिवर्तनाचा आहे. नवीन रचना, नवीन संस्था, नवीन तत्त्वज्ञान अजमावण्याचा आहे. तेव्हां सरकार ही संस्था उत्कृष्ट असो वा नसो, सर्वांचें लक्ष तिजकडे आहे. एवढ्यासाठींच जें तें काम सरकारनें करावें असें लोकांना वाटतें. लग्न करून घेण्यास योग्य कोण, त्यानें कोणाशीं लग्न करावें, त्यांना मुलें व्हावींत किंवा नाहीं, दरेक व्यक्तीनें कोणता धंदा करावा, इत्यादि खाजगी गोष्टी देखील सरकारनेंच ठरवाव्यात अशी मागणी कांहीं लोक करूं लागले आहेत. सरकारप्रमाणेंच, किंबहुना त्याहून अधिक सर्वकर्मसमर्थ व सर्व आशांचें आधारस्थान अशी दुसरी संस्था म्हणजे सार्वजनिक शिक्षण ही होय. समाजाला जें जें कांहीं हवें आहे तें तें शिक्षणामार्फत मिळालेंच पाहिजे; शिक्षणाला अशक्य असें कांहींच नाहीं अशी श्रद्धा लोकांमध्यें डोकावूं लागली आहे.

आश्चर्याची गोष्ट ही कीं, सर्वदेशांतील सरकारांना शिक्षणाचें हें महत्त्व अधिकाधिक पटूं लागलें आहे. व म्हणून शिक्षण आपल्या ताब्यांत घ्यावें, शिक्षणापायीं पाण्यासारखा पैसा खर्च करावा आणि शिक्षणामार्फत सरकारला जें इष्ट असेल तें वातावरण, तें तत्त्वज्ञान व तें सामर्थ्य उत्पन्न करावें, असा प्रयत्न चालू आहे.

[ शिक्षण सरकारच्या हातीं जाऊन विकृत होऊं लागलें आहे; व त्यामुळें जगाची बुद्धि वेठीस धरली जात आहे. अशी जरी आजची स्थिति असली तरी शेवटीं हेंच शिक्षण सरकारांना बाधणार आहे. शिक्षण व राज्यतंत्र या दोन्ही स्वयंभू व सार्वभौम संस्था आहेत. या दोहोंमध्यें कितीहि सहकार दिसला तरी तत्त्वतः या पर-

स्परविरोधी वस्तू आहेत. आणि शिक्षण ही अधिक सूक्ष्म व आध्यात्मिक वस्तु असल्यानें क्रियांप्रमाणें पड खाऊन विजयी होण्याचें तिला साधणार आहे. कौटुंबिक जीवन, राजसत्ता, तुरुंग, उद्योग-हुन्नर व सामाजिक जीवन या सर्वांचेंच रहस्य शिक्षणाच्या हातांत येणार आहे. शिक्षण सार्वभौम होईल व शिक्षणाच्या प्राणानें हीं बाकींचीं सर्व प्राणित होतील; शिक्षण जेवढा प्रभाव देईल तेवढ्यानें प्रभावित होतील. शिक्षणाची प्रतिष्ठा स्वयंभू आहे. इतर वस्तूंना शिक्षणाकडून जेवढी प्रतिष्ठा मिळेल तेवढी खरी ! ]

समाज स्वतःची जी जी कामना असेल ती ती शिक्षणामार्फत तृप्त होण्याची आशा आज बाळगून आहे. त्या इच्छा तृप्त करण्यासाठीं शिक्षणक्रमांत दरवर्षी नवीन नवीन विषय वाढविले जातात. व म्हणूनच चांगल्या चांगल्या शिक्षणशास्त्र्यांना भीति वाटूं लागली आहे कीं, नव्या नव्या विषयांच्या ओझ्याखालीं शिक्षणरूपी उंटाची कमर आतां मोडावयास आली आहे. शिक्षणावरचें हें वाढतें ओझें कमी करण्यासाठीं आजकाल एक नवा प्रयत्न सुरू झाला आहे. परीक्षेचा व वर्गांतील विषयांचा अभ्यासक्रम शास्त्रोक्त व आटोपशीर ठेवावयाचा आणि 'शाळेचें जीवन,' 'वातावरण,' 'अन्य प्रवृत्ती,' वगैरे नांवांखालीं शाळेकडूनच बाकीचे विषय करून घ्यावयाचे. वाग्वर्धिनी सभा, नाटकें, चर्चा, परिषदा, उत्सव, समाजसेवेचीं पथकें, बालचमू, सुट्टीचे प्रवास, मुलांचीं मासिकें, मुलांचीं दुकानें, मुलांचें स्वराज्य, लुटपुटीचें पार्लमेंट, बालशासित न्यायमंदिरें, प्रदर्शनें, समाजनिरीक्षण करून आंकडे मिळविणें वगैरे असंख्य प्रवृत्तींचें जगल इतकें माजलें आहे कीं, केंद्रस्थ अभ्यासक्रम अगदींच कोपऱ्यांत जाऊन पडला आहे. इंग्लंडमध्यें एका प्रख्यात पुढाऱ्यानें वार्षिक उपदेशाच्या वेळीं विद्यार्थ्यांना सांगितलें कीं, 'बाबांनो, तुमचे अभ्यास तुमच्या शिक्षणाच्या आड येऊं देऊं नका.' याचा परि-

गाम कोठें कोठें असा झाला आहे कीं, शिक्षणामध्यें अभ्यासालाच जागा उरली नाहीं. बुद्धिहीनतेचा आरोप टाळण्याकरितां मध्यरात्री-नंतर दरवाजे बंद करून आणि खिडक्याच्या तावदानांना काळे कागद लावून चोरून मारून करण्याचा कार्यक्रम तो अभ्यास! अशी स्थिति झाली आहे.

ही झाली शिक्षणसंस्थांची आणि विद्यार्थ्यांची दशा. अध्यापक विषयांच्या वाढत्या ओझ्याखालीं दबून गेल्यानें समाजापासून अलग राहून व्यवहारशून्य तरी होतात किंवा दरेक शास्त्राचे केवळ परिभाषा जाणणारे आणि खेळकरपणानें प्रतिष्ठा मिळविणारे कुक्कुटमिश्रपाद तरी होतात. ज्या पिढींत बरेचसे लोक अशा मार्गांचे असतील, तेथें कोणीं कोणास हंसावयास नको, कोणीं कोणाची परीक्षा घ्यावयास नको.

शिक्षणाचे विषय वाढतात याला इलाज नाहीं. आजची रहाणीच अशी आहे कीं, जीवन समृद्ध न होतां केवळ त्याची जटिलताच वाढत आहे. जीवन जेव्हां स्वाभाविक व म्हणूनच साधें होईल तेव्हांच शिक्षणांत स्वास्थ्य येईल.

जीवनाला जी जी वस्तु आवश्यक असेल त्या त्या वस्तूचें शास्त्र करून टाकण्याची खोड आजच्या युगाला लागलेली आहे. दरेक वस्तूचें पृथःकरण करून एकेका अंगाची मीमांसा करणें हें बुद्धीच्या दृष्टीनें सोयीचें आहे. पण जीवनाच्या दृष्टीनें ही पद्धत अवजड आहे, निर्जीव आहे. शिक्षणाचें ओझें कमी करण्यास शिक्षणाची पद्धतच बदलली पाहिजे. आजचें शिक्षण तर्कप्रधान, बुद्धिप्रधान असल्यानें जीवनाचीं इतर अंगें वठून गेलीं आहेत. आणि बुद्धीचा भार कृत्रि-मतेच्या योगानें वाढल्यामुळें बुद्धीचा ताजेपणा व प्रतिभा याहि उरल्या नाहींत. शहरांत ज्याप्रमाणें घरांची गर्दी झाल्यामुळें जीवन गुदम-रून गेलें आहे, त्याचप्रमाणें शिक्षणाच्या पृथःकरणशील शास्त्रीय-पद्धतीनें व विषयबाहुल्यानें बुद्धि गुदमरून गेली आहे. शिक्षणपद्धति

बदलल्यावांचून ही स्थिति बदलणें शक्य नाहीं.

स्त्रीशिक्षण–आणि त्यांतहि विधवाशिक्षण–स्वतंत्र रीतीनें महत्त्वाचें आहेच. पण आपण येथें त्याचा उपयोग राष्ट्रव्यापी प्राथमिक शिक्षणाकडे करूं इच्छित आहोंत व म्हणून या दृष्टीनें कांहीं अगत्याचे विषय स्त्रीशिक्षणांत दाखल केले पाहिजेत. कांहीं उत्साही शिक्षणशास्त्री बालशिक्षणाच्या अनुभवानें अस्वस्थ होऊन आईबापांना शिकविण्याच्या शाळा काढूं पहात आहेत. स्त्रीशिक्षणांत मातृपदाची लायकी आणून देणारे विषय असलेच पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांचें हें म्हणणें स्वीकारलें तर प्राथमिक शिक्षणाच्या उपयोगाचे विषय ‘ जास्तीचे विषय ’ मानण्याचें कारण नाहीं. तेहि सार्वत्रिक स्त्रीशिक्षणांत आलेच पाहिजेत.

लहान मुलांना कसें शिकवावें यापेक्षां त्यांना कसें वागवावें हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. अनादि काळापासून आईबाप आणि घरची इतर मंडळी लहान मुलांना वागवीत आलीच आहेत. पशुपक्षी देखील आपल्या पिलांना लहानाचीं मोठीं करीत असतात. पण आईबापांच्या हातून हें काम योग्य रीतीनें होतें असें म्हणतां यावयाचें नाहीं. लहान मुलांना कठोरतेनें वागविणें हें जितकें वाईट आहे, तितकेंच त्यांना नाजुकपणानें वागविणें हेंहि वाईट आहे. पदोपदीं अपमान आणि पाणउतारा केल्यानें मुलें जशीं बिघडतात तशीं तीं लाड केल्यानेंहि बिघडतात. मुलांकडे दुर्लक्ष केल्यानें त्यांचें जीवन विषम अथवा विषमय होतें. आणि कधीं कोमल, कधीं तीव्र; कधीं लक्ष, कधीं दुर्लक्ष; असलें वागणें तर मुलांना कायमचें बिघडविण्याचें असेल तरच ठेवून पहावें. आईबाप आणि शिक्षक अनेकवेळां मुलांना शिक्षा करितात, त्यांची अवास्तव स्तुति करितात, त्यांच्याशीं अथवा त्यांच्यादेखत खोटें बोलतात आणि कधीं कधीं स्वतःच्या लबाडींत त्यांचा सहकार घेतात. अशा रीतीनें जीवनाचा

ङराच आपण विषारी करून टाकीत आहोंत हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. बाल्यकाल हा सर्वांगीण अनुकरणासाठींच असतो. सर्व शक्तींचा विकास अनुकरणानेंच होत असतो. अगदीं जन्मल्यापासून अर्भकामध्यें अनुकरणशक्ति दिसून येते; अशा वेळीं त्याच्याशीं बेजबाबदारपणें, कृत्रिमतेनें अथवा दंभानें वागणें हें किती भयानक आहे याची लोकांना कल्पना नसते. ज्यांना मुलें झालीं अथवा ज्यांच्याजवळ शिकावयास मुलें आलीं त्यांनीं स्वतःच्या जीवनाची ती एक नवीन दीक्षा आहे असें मानलें पाहिजे. उपनयन होतांच अथवा संन्यास घेतांच मनुष्य ज्याप्रमाणें स्वतःच्या जीवनाला बुद्धिपुरस्सर जबाबदारीचें आणि आदर्शपरायणतेचें वळण लावतो, त्याप्रमाणें येथेंहि झालें पाहिजे. अध्यात्मदृष्ट्या गुरू करण्याला जितकें महत्त्व आहे तितकेंच जीवनदृष्ट्या आणि शिक्षणदृष्ट्या शिष्य करण्याला महत्त्व आहे.

ही जबाबदारी व हें महत्त्व ज्यांच्या हातून बालशिक्षण अथवा प्राथमिक शिक्षण सफळ करावयाचें आहे, त्यांच्यामध्यें उत्पन्न करण्याचा आटोकाट प्रयत्न झाला पाहिजे. मुलांच्या बऱ्यासाठीं, त्यांना चांगलें वळण लावण्यासाठीं म्हणून त्यांच्याशीं खोटें बोलणारे व खऱ्या नियमांचीं खोटीं कारणें सांगणारे आईबाप व शिक्षक किती तरी दृष्टीस पडतात. आणि मुलें तर वडील माणसांच्या तोंडी उपदेशापेक्षां आचरणांतील उपदेश ग्रहण करण्यांत अगदीं पटाईत असतात. हत्तीच्या छाव्याप्रमाणें दाखवावयाचे दांत कोणते व खावयाचे कोणते हें त्यांना उपजतच कळत असतें. लहान मुलांचें व मुलींचें मानस कसें असतें, त्यांना काय काय शिकविलें पाहिजे, कशा पद्धतीनें शिकविलें पाहिजे, कोणत्या क्रमानें शिकविलें पाहिजे, शिक्षणशास्त्रानें मान्य केलेले शिस्तीचे प्रकार कोणते, वगैरे गोष्टींची माहिती सोपपत्तिक पण अवडंबररहित अशी दिली पाहिजे. याच्या योगानें गृहजीवन व संस्थाजीवन दोन्हीं कृतार्थ होतील. आणि शिक्षण

देण्याघेण्याची क्रिया जेवणें, निजणें, फिरणें, खेळणें, गाणें, सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण करणें वगैरे प्रवृत्तींइतकीच स्वाभाविक व समाधानदायक होईल.

'जग दुष्ट आहे,' 'मनुष्यस्वभाव हीन आहे,' 'जगांत फारसा फरक व्हावयाचा नाहीं,' 'जग हें असेंच चालावयाचें,' 'मनुष्यस्वभावांतील बरेंवाईटपणा शेवटपर्यंत असाच रहावयाचा,' 'अशा जगांत आपण आपले दिवस कसेबसे बरेपणानें काढून आपला व आपल्यांचा अधिकाधिक फायदा करून घ्यावा म्हणजे मिळविली!' अशा प्रकारचें तत्त्वज्ञान बऱ्याच लोकांचें असतें. आणि इतर बरेच लोक तोंडानें असें तत्त्वज्ञान प्रतिपादित नसलें तरी त्यांच्या रहाणीच्या आणि विचारसरणीच्या मुळाशीं असेंच तत्त्वज्ञान असल्याचें दिसून येतें. उलटपक्षीं कांहीं ध्येयवादी, मनुष्यस्वभाव मुळांत साधुतेनेंच भरलेला आहे अशा कृत्रिम श्रद्धेवर जगं पहातात. पण हें तत्त्वज्ञान किंवा ही वृत्ति मांजरानें किंवा शहामृगानें डोळे मिटून कसलेंहि संकटच नाहीं असें म्हणण्यासारखीच आहे.

खरोखर म्हणजे शिक्षणाची श्रद्धा अशी पाहिजे कीं, मनुष्यस्वभावांत सत् आणि असत् हीं दोन्हीं तत्त्वें असतात पण त्यांचें प्रमाण कधींहि स्थिर नसतें. असत्‌हि वाढूं शकतें आणि सत्‌हि वाढूं शकतें. शिक्षणाचा एकमात्र उद्देश सत् तत्त्व वाढविण्याचा आणि तें मजबूत करण्याचा असला पाहिजे.

शिक्षणानें ज्याप्रमाणें व्यक्तीच्या स्वभावांत इष्ट रूपांतर अथवा उन्नति घडवून आणणें शक्य आहे, त्याचप्रमाणें सर्व समाजाचा स्वभाव देखील क्रमाक्रमानें बदलणें, सुधारणें व चढविणें शक्य आहे. अशा प्रकारचा मनुष्यजातीचा क्रमविकास इतिहासांत दिसून येतो. केव्हां केव्हां साधलेला विकास ढासळतोहि; पण अखंड जागृतीनें व सतत प्रयत्नानें मनुष्यजातीला नारायणस्वरूपापर्यंत पोहोंचणें शक्य आहे अशी श्रद्धा शिक्षण देणाऱ्यांमध्यें अजरामर असली पाहिजे व ती त्यांच्या विद्यार्थ्यांमध्यें उतरली पाहिजे.

---

# औद्योगिक शिक्षण

खेडेगांवांत पुस्तकी शिक्षण मुळींच नको असें म्हणण्याचा आमचा आशय आहे, असें अनुमान जर कोणी काढील तर तो येथील सर्व योजनेला अन्याय करीत आहे असें म्हणावें लागेल. पुस्तकी शिक्षणांत मुरून जाऊन ज्यांचें अगदीं लोणचें झालें आहे, असे लोक स्वतः पुस्तकी शिक्षण आपल्या मुलांबाळांना देण्याव्यतिरिक्त त्याच्या प्रचारासाठीं, विशेषतः खेड्यांतील प्रचारासाठीं, कांहींच करीत नाहींत. आणि खेड्यांतील जनतेच्या कल्याणासाठीं शिक्षणक्रमांत पुस्तकी ज्ञानाला जर कोणी दुय्यम स्थान देऊं पाहील, तर त्याला ते ज्ञानाचा शत्रु, विद्वत्तेचा विरोधी, बुद्धिविमुख, परागतिक वगैरे शेलकीं विशेषणें देऊन एकच कोल्हेकुई सुरू करतील. यांना खरें पहातां खेडेगांवांतून विद्येच्या प्रसाराचा उत्साह बेताचाच असतो. पांढरपेशा धंद्यांच्या मागें लागलेल्या आपल्या मुलांच्या शिक्षणक्रमांत शारीरिक श्रमाचें तत्त्व येऊं नये एवढीच काळजी त्यांच्या सुप्त मनांत ( subconscious mind ) वसत असते, आणि हा कौटुंबिक अथवा स्वज्ञातिगत स्वार्थ जनकल्याणाचें रूप धारण करतो एवढेंच. बूर्झ्वा लोकांचा हा स्वभावच आहे. आजकालचें शिक्षण पंगू बनवितें, बुद्धिमांद्य उत्पन्न करतें वगैरे सर्व दोष आपण पोपटाप्रमाणें बोलून जातों; पण पुराणप्रियतेमुळें गेलीं दीडशें वर्षें अंगवळणी पडलेली शिक्षणपद्धति सोडण्याचें मात्र आपल्या जिवावर येतें. युरोप, अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादि देशांप्रमाणें उद्योगधंदे आपल्याकडे चालविले पाहिजेत; त्यासाठीं मोठमोठे कारखाने काढले पाहिजेत असें म्हणणाऱ्या लोकांना हिंदुस्थानांत शहरांची संख्या वाढवावयाची आहे आणि खेडेगांवांचा सत्यनाश कराव-

याचा आहे; आणि उद्योगधंद्यांची सुरवात करावयाची म्हणजे बूर्झ्वा तरुणांना परदेशांत पाठवून शिक्षण द्यावयाचें एवढाच त्याचा अर्थ होतो. आधींच मरणोन्मुख झालेल्या खेड्यांना पार धुळीस मिळविण्याचा हा मार्ग आहे.

खेडेगांवांमध्यें खेड्यांच्या परिस्थितीला अनुकूल असे धंदे चालविले पाहिजेत. खेड्यांतील भांडवल, खेड्यांतील मजूरी, खेड्यांतील कारागिरी आणि खेड्यांतीलच गिऱ्हाइकी अशी स्थिति उत्पन्न केली तरच खेड्यांचा उद्धार होणार आहे. पूर्वी खेडेगांवांतून लहान लहान असे दहा वीस धंदे चालत. झोपड्यांतून चालणाऱ्या धंद्यांची गळचेपी दोन रीतीनें झाली आहे. पैसेदार पांढरपेशे बूर्झ्वा लोक शहरांत जाऊन राहिले, तेथें राहून परदेशी माल विकत घेऊं लागले, खेड्यांत तयार होणाऱ्या मालापेक्षां परदेशी माल स्वस्त पडतो असें पाहून परदेशी माल खेडेगांवांत सुरू करण्याचा पापी धंदा त्यांना सुचला व खेडेगांवांतील कारागिरांच्या पोटावर पाय देऊन स्वतःची खळी भरण्याचा उपक्रम त्यांनीं केला. त्यांनीं खरोखर पाहतां खेडेगांवांत तयार होणारा माल सोप्या रीतीनें व सुबक कसा होईल याचा विचार करून खेड्यांतील कारागिरांचीं हत्यारें व अवजारें सुधारून द्यावयास पाहिजे होतीं. खेड्यांतील तरुणांना हस्तकौशल्याचें शिक्षण द्यावयास पाहिजे होतें. आपलेपणानें व आंतड्याच्या कळकळीनें खेडेगांवांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन द्यावयास पाहिजे होतें. व परदेशी मालाचे एजंट बनण्याच्या ऐवजीं खेड्यांतील उद्योगधंद्यांचे पोशिंदे बनावयास हवें होतें.

महाराष्ट्रांतील आजवरची स्वदेशी म्हणजे शहरांतील गरीब पांढरपेशांना कसेबसे चालणारे लहान मोठे शहरी धंदे चालविण्यास दिलेलें उत्तेजन असेंच म्हणावें लागतें. आणि कपड्याच्या बाबतींत तर, मुंबई अमदाबादकडील स्वराज्याविषयीं जवळजवळ उदासीन अस-

लेल्या लक्षाधीशांना आणि कोट्याधीशांना अधिक श्रीमंत करून पाश्चात्य पद्धतीची रहाणी वाढविण्यास मदत करणें होय. महाराष्ट्रांतील मोडकळीस आलेल्या खेडयांतून किती तरी लाचार लोक घरदार, शेती, खेडयांतील धंदे, जातगोत, आणि जुना घरंदाजपणा, हीं सर्व सोडून देऊन मुंबई अमदाबादकडे गिरणीची मजूरी करण्यासाठीं जातात, चहादारूला आश्रय देतात, अल्पायुषी होतात आणि पुनः खेडेगांवाचें दर्शन क्वचितच करतात. महाराष्ट्रांतील गिरणीच्या स्वदेशीचा हा अर्थ आहे. आज देशामध्यें सर्वांत मोठा द्रोह जर चालू असेल तर तो लक्षावधि खेडेगांवांतील कोट्यावधि गरीबांच्या उद्योगधंद्यांचा द्रोह होय.

स्वदेशवासीयांविषयीं जर खरें प्रेम असेल तर खेडेगांवांत रहाणाऱ्या सर्व जातींच्या व धर्मांच्या श्रमजीवी तरुणांना खेडेगांवांत उपयोगी पडेल असें औद्योगिक शिक्षण दिलें पाहिजे. शेतीमधील मोलमजूरीची प्रतिष्ठा वाढविली तर तीं कामें जास्त उत्साहानें, अधिक नियमित व चांगल्या प्रकारें होऊं लागतील; शेतीच्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढेल; कवि शेती आणि शेतकऱ्याचें जीवन याविषयीं कविता लिहूं लागतील; जनसमाज उत्साहानें तीं गीतें गाऊं लागेल; शेतीकडे भांडवलाचा प्रवाह वाहूं लागेल व अशा रीतीनें खेडेगांवांची आबादी वाढून लोक सुदृढ, सुखी व दीर्घायु होतील.

अन्न, वस्त्र व आश्रय या तीन गरजा प्राथमिक व सार्वभौम आहेत. तेव्हां शेती, विणकाम, गवंडीकाम, सुतारकाम व लोहारकाम हे धंदे प्राप्तीच्या दृष्टीनें सामान्य असले तरी मोठ्यांतल्या मोठ्या संख्येला पोसण्याच्या दृष्टीनें आणि राष्ट्रीय उपयोगितेच्या दृष्टीनें फार महत्वाचे आहेत. एवढ्या धंद्यांचें शिक्षण सर्व जातींच्या तरुणांना देणें शक्य आहे, इष्ट आहे, अत्यावश्यक आहे. सबंध राष्ट्राची बुद्धि

या धंद्यांकडे वळल्यास या धंद्यांत सुधारणा होऊन ते ऊर्जितावस्थेस पोहोंचतील. बुद्धिवंतांनीं राष्ट्रीय उद्योगाकडे दुर्लक्ष करणें यासारखी राष्ट्रीय आपत्ति नाहीं. देशांतील लोकांना उपाशी मरूं देऊन परदेशांतील माल हौसेनें विकत घेणें यासारखा दुसरा प्रजाद्रोह नाहीं. हा प्रजाद्रोह जेथें अखंड चालतो आणि शिष्टमान्य होतो तें राष्ट्र क्षीणवीर्य झालेंच पाहिजे.

या प्रश्नाचा आर्थिकदृष्ट्या विचार करूं तेव्हां खेडेगांवांतून भांडवल जें अगदींच कमी झालें आहे, शहराकडे पळून गेलें आहे, तें खेडेगांवांत परत कसें येईल याचा विचार करूं. कारण शरीराला जसें दूध, तूप तसें खेडेगांवांतील उद्योगधंद्यांना भांडवल आहे. येथें आपणांस फक्त शिक्षणदृष्ट्या विचार करावयाचा आहे.

'ज्यांना सुतार किंवा लोहार व्हावयाचें असेल त्यांना त्या त्या कलेचें शिक्षण द्या. सार्वत्रिक शिक्षणास त्याचा काय उपयोग ?' असें म्हणणारे लोक पुष्कळ आहेत. त्यांना माती, लाकूड, लोखंड, यांच्या सहवासांत कौशल्य प्राप्त केल्यानें हाताचीं बोटें, डोळे व शरीरांतील सर्व स्नायू यांना केवढें महत्वाचें शिक्षण मिळतें याची कल्पना नाहीं. राष्ट्रव्यापी व सामाजिक महत्वाचे उद्योगधंदे लहानपणींच शिकून ठेविल्यानें विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास किती वाढतो व सामाजिक जीवनाचें यथार्थ स्वरूप किती उत्तम समजतें व या सर्वांची समाजशास्त्र समजण्यास व समाजसेवा साधण्यास किती मदत होते याची त्यांना कल्पना नसल्यामुळेंच ते वरील आक्षेप घेतात.

'ज्याला कवि व्हावयाचें असेल त्याला कविता शिकवा, ज्याला इतिहासकार व्हावयाचें असेल त्यालाच इतिहास शिकवा, ज्याला संपादक व्हावयाचें असेल त्याच्याकडूनच निबंध लिहवून घ्या, ज्याला

मोजणीदार व्हावयाचें असेल त्यालाच क्षेत्रमापन शिकवा, ज्याला चित्रकार व्हावयाचे असेल त्यालाच ड्रॉइंग शिकवा, ज्याला पोलिसांत किंवा लष्करांत जावयाचें असेल त्यालाच कवाईत शिकवा, सर्वांच्यामागें या सर्व विषयांचें शुष्ककाष्ठ कशाला!' असें जर या लोकांना कोणी म्हटलें तर मात्र चिडून ते लोकांना म्हणावयाचे, 'तुम्हांला व्यापक व संस्कारी जीवनाची कल्पनाच नाहीं.' काबाडकष्ट, शारीरिक श्रम, व उपजीविकेसाठीं हातपाय हलविणें यांचा ज्यांना कंटाळा, त्यांची विचारसरणी अशीच असावयाची! दुसऱ्याच्या निढळाच्या घामाचा फायदा घेण्यास सोकावलेले व खांद्यावर उचलून घेणारासच लाथा मारणारे हे पांढरपेशे लोक खेडेगांवांतील राष्ट्रीय शिक्षणाचा विचारच करूं शकत नाहींत.

ज्याप्रमाणें औद्योगिक कौशल्य आणि नफानुकसानीची दृष्टि ही जीवनच्या पूर्णत्वाला आवश्यक आहे, त्याचप्रमाणें मोजमापाचा बिनचूकपणाहि अत्यंत आवश्यक आहे. आपल्या समाजांत गबाळेपणा आणि अनुमानधबक्याचा व्यवहार यांच्या योगानें जीवन जितकें महाग पडत आहे तितकें परराज्याच्या ओझ्यानेंहि महाग पडत नसेल. सर्वांत मोठी उधळपट्टी म्हणजे वेळेची व आयुष्याची होय. कोणत्याहि कामाला किती वेळ लागेल, काय साधनें पाहिजेत, किती खर्च येईल, किती नफा किंवा नुकसान होईल आणि त्या कामाचा कोठें कोठें संबंध बांधला जाईल याची बरोबर अटकळ असणारे लोक समाजांत किती असतील? ज्यांना शंभरापर्यंत बिनचूक मोजतां येत नाहीं असे प्रौढ वयाचे अथवा म्हातारे लोक पाहून समाजशिक्षणाचा भार वहाणाऱ्या लोकांचा महान् प्रजाद्रोह असह्य वाटूं लागतो. लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांना दोन मार्गांनीं प्रतिष्ठित व संपन्न होतां येतें. आपलें ज्ञान आपल्याकडेच ठेवून, सामान्य जनतेला अज्ञानांत खितपत ठेवून त्यांच्या अज्ञानाचा व दुर्दशेचा सर्व बाजूंनीं फायदा घेणें

आणि त्यांना सहजासहजीं लुटून खाणें हा एक मार्ग आहे. दुसरा मार्ग म्हणजे जनसमुदायाची ज्ञानाच्या बाबतींत, कर्तबगारीच्या बाबतींत सर्व प्रकारें लेव्हल वाढविणें, त्यांना सामर्थ्यसंपन्न करणें व अशा संपन्न लोकांचा पुढाकार घेऊन त्यांची सेवा करतां करतां स्वतःची बहुविध उन्नति साधणें हा होय. पहिला मार्ग नामर्दांचा व नास्तिकांचा आहे. दुर्दैवानें तोच मार्ग आपल्या लोकांना अधिक पटलेला दिसतो.

आज प्रजाकीय शक्ति जागृत करावयाची असेल, लोकांची दृष्टि निर्मळ व डोळस करावयाची असेल, तर यच्चयावत् लोकांना गणितामध्यें प्रवीण केलें पाहिजे. गणितावांचून कौशल्य, कर्तबगारी व काटकसर हीं वाढावयाचीं नाहींत. आळस, दैववाद व वृत्तीचें म्हातारपण हीं जाणार नाहींत. व्यवहार्य गणित आणि जमाखर्चाची माहिती हा खरोखर राष्ट्रीय महत्त्वाचा विषय आहे. याच्या योगानें श्रमजीवी प्रजेचें सामर्थ्य वाढणार आहे. सुधारलेलीं हत्यारें अवजारें वापरणें, नवीन नवीन शोध लावणें, लहानमोठे कारखाने चालविणें, या सर्वांसाठीं सूक्ष्म गणिताची माहिती व सराव आवश्यक आहे. जरा कांहीं खुबीची वस्तु पाहिली म्हणजे 'आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं' अशी आपल्या लोकांची स्थिति होऊन जाते. पण आंत खुबी खरोखर आहे काय, हें ओळखण्याचा पुरुषार्थ फारच थोड्यांत दिसून येतो. प्रजेमधील ती बाजूच आपण अर्धांगपीडित होऊं दिली आहे. 'श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।' निरीक्षण करणें, परीक्षण करणें, प्रयोग करणें, अनुभव टिपून ठेवणें, दरेक वस्तूचें मोजमाप करणें, साधर्म्य वैधर्म्य तपासणें, कार्यकारणसंबंध नक्की करणें आणि सर्व जीवनांतून अनुमानधबक्याला फांटा देणें हें प्रजाकीय शिक्षणाचें सर्वांत महत्त्वाचें काम आहे. गणित आणि कौशल्य यांच्या पायावरच हें होणें शक्य आहे.

# ग्रामवृद्ध आणि अधिकारन्यास

कांहीं प्राणी स्वतःचीं अंडीं जमीनींत घालून स्वतः मरून जातात. त्यांच्यामध्यें आईबाप आणि मुलें यांचें परस्पर दर्शन होतच नाहीं. प्रत्येक पिढीला स्वतंत्रपणें स्वयंभू संसार थाटावा लागतो. मनुष्य-प्राण्याचें तसें नाहीं. मनुष्य जन्माला आल्यानंतर देखील बराच काळ पंगू असतो. त्याला जुन्या पिढीच्या हातीं शिक्षण घेऊन तयार व्हावें लागतें. त्याचप्रमाणें दुसऱ्या टोकाला मनुष्याची उपयोगिता संपली तरी तो जिवंत राहून पुढील पिढीचा आश्रित होऊन राहतो. जीव-नाच्या सुरवातीचा कांहीं भाग आणि शेवटचा कांहीं भाग प्रत्यक्ष कार्यासाठीं उपयोगी नसतो. सुरवातीला त्याची शक्ति अपुरी असते. शेवटीं शेवटीं क्षीण झालेली असते. लहानपणीं त्याला जबाबदारी पेलत नाहीं आणि म्हातारपणीं झेपत नाहीं.

ही परिस्थिति दुःख करण्यासारखी मुळींच समजतां कामा नये. या व्यवस्थेनें भूत—भविष्य—वर्तमान या तीन पिढ्यांची साखळी जुळविली जाते, आणि सर्व प्रकारची प्रगति शक्य होते. इतर प्राणी केवळ दिग्दृष्टि असतात. मनुष्यप्राणीच असा आहे कीं, ज्याला दिग्-दृष्टि असून कालदृष्टीहि आहे. मनुष्याला ठाऊक आहे कीं, प्रत्येक क्षण हा भूत आणि भविष्य यांच्यामधील एक संधि आहे. प्रत्येक क्षणीं भूत आणि भविष्य दोहोंचा संबंध ओळखूनच त्याला वर्तमान काळांत वागावें लागतें. लहानपणचें शिक्षण हें भूत काळ समजण्यासाठीं आणि पचविण्यासाठींच मुख्यत्वें असतें. भूतकाळाचें अध्ययन—आक-लन ज्यांनीं केलें नाहीं त्यांना वर्तमानकाळचें कर्म कुशलतेनें आणि जबाबदारीनें करितां यावयाचें नाहीं.

येथवरचें विवेचन सर्वांना कबूल होण्यासारखें आहे. पण वर्तमान-

काळची जबाबदारी वहन करण्यास भूतकाळची दृष्टि असणें हें जितकें जरूरीचें आहे तितकेंच अथवा त्याहून अधिक जरूरीचें भविष्यकाळची दृष्टि असणें, भविष्यकाळचें धोरण असणें हें जरूरीचें आहे. ही दृष्टि ज्यांनीं कमावली नाहीं, भविष्यकाळाशीं—पुढच्या पिढीशीं—ज्यांना जुळतें घेतां येत नाहीं ते अर्धशिक्षितच म्हटले पाहिजेत. भविष्यकाळ कोणत्या दिशेनें जात आहे, कोणते नवीन नवीन प्रश्न त्यानें उत्पन्न केले आहेत, हें तर उत्तम रीतीनें समजलें पाहिजेच. पण पुढच्या पिढीची आवडनिवड, बौद्धिक बनावट आणि सामर्थ्यांचें वैशिष्ट्य हीं ओळखून पुढच्या पिढीला योग्य शिक्षण देणें, दिशा दाखविणें आणि काम करण्यास वाव देणें हें प्रत्येक पोक्त व्यक्तीचें आणि पिढीचें काम आहे. ज्याचें प्रत्येक पाऊल भविष्यकाळांत पडत नाहीं त्यानें जगांतील व्यवहाराचा तावा सोडून दिलाच पाहिजे. मनुष्य जर अजरामर असता तर त्यानें नव्या पिढीला नांदूंच दिलें नसतें. इच्छा असो वा नसो, मरण आलें म्हणजे सर्व कांहीं ऐहिक गोष्टी पुढील पिढीला सोंपवून दिल्यावांचून गत्यंतर नसतें. नव्या पिढीनें जुन्या पिढीच्या हातून सर्व हक्क हिसकावून घेण्याची पाळी येणें हें दोघांनाहि शोभत नाहीं. ईश्वरानें नव्या पिढीचें शिक्षण जुन्या पिढीच्या हातीं टेविलें आहे, या गोष्टीचा फायदा घेऊन तेवढ्या वेळांत नवीन पिढीवर जे कांहीं संस्कार पाडावयाचे असतील ते पाडून घ्या. तुम्हांला मिळालेल्या संधीचा अधिकाधिक फायदा घेण्याची तुम्हांला पूर्ण मुभा आहे. पण तो काळ उलटला म्हणजे भावी पिढींत जें कांहीं उगवेल तें गोड करून घेणें यांतच तुमची शोभा आहे. भावी पिढी स्वतंत्र झाल्यानंतरहि तिला काम करावयास अवकाश न देणें, तिचे अधिकार कबूल न करणें, हें स्वतःच्या नालायकीचेंच लक्षण आहे. मनुष्य शत्रूशीं जसा वागतो, विरोध्याशीं जसा वागतो, तसाच जर पोटच्या गोळ्याशीं वागेल, पोटच्या पिढीशीं वागेल तर त्याच्या योग्यतेचें

दिवाळेंच वाजलें असें म्हटलें पाहिजे. मनुष्यानें आपल्या हातांत अधिकार ठेवावयाचा तो स्वतःची उत्कट सेवा, स्वतःचा समजूतदारपणा आणि कार्यक्षेत्रांत पाऊल टाकणाऱ्या नवीन पिढीशीं सहकार करण्याची तयारी, यांच्या जोरावरच टिकविला पाहिजे. आपल्याला अधिकारारूढ ठेविण्याची गरज आपल्यापेक्षां आपल्या पुढच्या पिढीला असेल असेंच आपलें वर्तन असावें. खेडेगांवांतून या गोष्टीचा विचार फारच थोडा झालेला असतो. मनुष्यजीवनांत प्रगति म्हणून कांहीं तत्त्व आहे याची बातमी नसलेल्या लोकांना सर्व कांहीं स्थिर असावें असें वाटतें. आपल्या मुलांनीं आपल्या इच्छेबरहुकुम सर्व व्यवहार चालवावा व आपल्या मागेंहि जग आहे तसेंच चालावें अशी त्यांची इच्छा असते. दुर्बळ लोक परिस्थितीच्या प्रवाहांत वाहतांना कसलींच तक्रार करीत नाहींत. धर्मबंधनें शिथिल झालेलीं जे लोक उघड्या डोळ्यांनीं पहातात, तेच लोक कोणी ज्ञानपूर्वक धर्मव्यवस्थेंत इष्ट असा बदल करूं लागला तर त्याचा कसून विरोध केल्यावांचून रहात नाहींत. खेडेगांवांतून सामाजिक प्रश्न आणि आर्थिक प्रश्न आतां अधिकाधिक निकरास येऊं लागले आहेत. खेडेगांवांमध्यें स्वतंत्र विचार फारसा नसल्यानें खेडेगांवांचें पुढारीपण सध्यां तरी शहरांकडेच आहे. मात्र त्यांत दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, खेडेगांवांतील जनता देशांतील दूरदृष्टि शहाण्या लोकांचा विचार न घेतां शहरांतलि मतलबी लोक जसे नाचवितील तसें नाचण्यास तयार होतात. शहरांमध्यें कोणींहि कोणताहि धंदा केला तरी चालतो. खेडेगांवांत मात्र खालच्या जातीवर पिढीजात धंदा न सोडण्याची जबरदस्ती करण्यांत येते.

[ कोणींहि आपला पिढीजात प्रामाणिक धंदा होतां होईल तो सोडूं नये असेंच आमचें मत आहे. पण त्याबरोबर प्रत्येकाला त्याच्या धंद्याच्या विकासाला आवश्यक अशी स्वतंत्रता असली पाहिजे. आणि प्रत्येकाला स्वतःच्या धंद्यापासून स्वतःचा संपूर्ण विकास करून

घेण्याचा अवकाश मिळाला पाहिजे. वर्णव्यवस्था म्हणजे कांहीं सामाजिक गुलामगिरी नव्हे. प्रत्येक व्यक्ति आणि वर्ग स्वेच्छेनें धर्म-परतंत्र असो, पण सामाजिक जुलमाचें जोखड कोणाच्याहि मानेवर नसावें. खेडेगांवांमध्यें बौद्धिक दास्य, आर्थिक दास्य, आणि तंत्रदास्य टिकविण्याचे प्रयत्न अजून चालू आहेत. मजुराला प्रामाणिक मजूरी करूनहि अगदीं आश्रिताप्रमाणें ओशाळे रहावें लागतें. ही स्थिति सबंध समाजाला घातुक आहे. ]

खेडेगांवांतील तरुण पिढीला नवीन परिस्थिति समजावून सांगण्याचें काम कोणीं तरी व्यवस्थित रीतीनें केलें पाहिजे. जुन्या पिढीचा पाणउतारा न करितां, त्यांच्या सामर्थ्याचा बीमोड न करितां केवळ सेवेच्या जोरावर, समजुतदारपणा आणि जबाबदारीच्या जोरावर, तरुण पिढीला सर्व सामर्थ्य कसें अजमावतां येईल हें त्यांना दाखवून दिलें पाहिजे. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला अधिकारप्राप्ति झाली पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा आहे. या अधिकारदानाला उपनिषदांत ‘ संप्रक्ति ’ असें म्हटलें आहे. बापानें मुलांना बंडखोर बनविण्यापेक्षां त्यांना हाताशीं धरून त्यांच्यावर जबाबदारी टाकून आपल्या मदतीसाठीं आपल्याकडे ते पहात रहातील अशी स्थिति ठेविली पाहिजे. याला म्हातारपणचें जीवन साधें, संयमी व स्वावलंबी बनविलें पाहिजे. यांत वृद्धांचा सर्व बाजूंनीं फायदाच आहे. अशा जीवनामुळें त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ती शेवटपर्यंत टिकतील, म्हातारपण सुखाचें जाईल, त्यांचा भार इतरांवर कमींत कमी पडेल आणि शेवटची सुटका अगदीं अनायासें होईल. खेडेगांवांतून मुलाच्या मिशा पांढऱ्या झाल्या तरी बाप त्याला कौटुंबिक किंवा सामाजिक बाबतींत स्वतंत्रपणानें मुळींच विचार करूं देत नाहीं. हा आंधळा अरेरावीपणा त्यांनीं सोडून दिलाच पाहिजे.

तरुण पिढीविषयीं असें म्हणतां येईल कीं, ज्यांना काम करावयाचें आहे, ज्यांना सुधारणा करण्याची हिंमत आहे ते ती बिनबोभाट व दृढतेनें करून मोकळे होतात. जुन्या पिढीचा दोष काढीत कुंथत बसणें हें कांहीं नव्या जोमाचें लक्षण नव्हे. बेजबाबदारपणा हाहि कांहीं नव्या जोमाचें लक्षण आहे असें म्हणतां येत नाहीं. उद्धटपणा म्हणजे कांहीं स्वतंत्र बाणा नव्हे. नम्र मनुष्य आणि सेवापरायण मनुष्य अधिकाधिक अधिकार घेऊं शकतो आणि पचवूं शकतो.

# फंड

हिंदुस्थानसारख्या देशांत जेथें लोकांच्या हातांत पैसा फारच कमी खेळतो आणि जेथें कांहींहि वेतन न घेतां केवळ पोटावारी उत्कृष्ट प्रकारची सेवा करण्याची धार्मिक भावना आपल्या पूर्वजांनीं सिद्ध केली आहे आणि जेथें धर्मकार्याला वाहून घेतलेल्या प्रत्येक इसमाच्या योगक्षेमाची काळजी घेण्याचें कर्तव्य समाजानें स्वीकारलेलें आहे, तेथें मोठेमोठे फंड गोळा करण्याची प्रवृत्ति होतां होईल तों टाळावी. स्थायी फंडावांचून मोठमोठ्या संस्था कशा चालवाव्यात व जाहिराती घेतल्यावांचून वर्तमानपत्रें कशीं चालवावींत हें महात्मा गांधींनीं प्रत्यक्ष उदाहरणानें दाखवून दिलें आहे. हरिजनसेवेसारख्या कार्यासाठीं हरिजनांकडूनच सर्व मदत मिळविण्याचे दिवस अजून आले नाहींत. त्या लोकांविषयीं अन्याय झाला आहे. त्यांना स्वतःच्या पायांवर उभे रहाण्याची संधीच मिळालेली नाहीं. म्हणून हरिजन-कार्यासाठीं स्पृश्य समाजानेंच सढळ हातानें मदत केली पाहिजे. असे अपवादाचे प्रसंग बाजूस ठेवितां सामान्यपणें म्हणतां येईल कीं, धर्मतः ज्या लोकांचा ज्या कामाशीं संबंध येतो त्यांनींच त्या कार्याचा खर्च निभावला पाहिजे.

तरुण स्वयंसेवकांनीं होतां होईल तों स्वतःच्या जबाबदारीवर फंड गोळा करूं नये. घर बांधावयाचे म्हणजे जसे हवा उजेडाची मुबलक सोय केलीच पाहिजे, त्याचप्रमाणें फंड गोळा करावयाचा म्हणजे त्याच्या उद्देशाचें स्पष्टीकरण आणि प्रचार आणि अगदीं चोख हिशोब या गोष्टी असल्याच पाहिजेत. हे हिशोब वेळोंवेळीं तपासून घेऊन प्रसिद्धहि केलेच पाहिजेत.

फंड म्हणजे सार्वजनिक पैसा. हा अशाच्याच हातीं खजिनदार

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. १७९

म्हणून ठेवावा कीं, जो गफलतीनें पैसे गहाळ [illegible]ल्यांस स्वतःच्या पदरचे पैसे देऊन सार्वजनिक कार्यांचें नुकसान होऊं देणार नाहीं. असें केल्यानें लोकांचा विश्वास टिकेल.

पैशाची अफरातफर होऊं नये, पैशाचा दुरुपयोग होऊं नये यासाठीं सर्व खर्चांवर बारीक नजर ठेवणें हें आवश्यक आहे खरें. पण कार्यकर्ते लोक व्यवस्थित रीतीनें व काटकसरीनें खर्च करीत असतांहि त्यांच्यावर पदोपदीं सासूपणा मिरवून पैशाला मुळींच न सोडण्याची वृत्तीहि संस्थेतील वरिष्ठ लोकांनीं ठेवितां कामा नये. प्रामाणिकपणा, हिशोब ठेविण्यामध्यें नियमितपणा, काटकसर व दक्षता इतके गुण असलेल्या सेवकाला कधींहि असें भासूं देतां कामा नये कीं, सेवकापेक्षां पैशाची किंमत अधिक आहे. पैशाला अवास्तव मान देण्यापेक्षां पैशावांचून अडचणी भोगलेल्या पतकरल्या. सेवकानें हीनपणा पतकरून घेऊन द्रव्यसंचय व कामाचा व्याप वाढविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. फंड ही उपयोगी वस्तु आहे. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, पायांतली वहाण पायांतच बरी, तिला डोक्यावर घेतां कामा नये.

सासूच्या वेड्यावांकड्या वागण्यानें जशा सुना बिघडतात, शिक्षकांच्या अनाडीपणामुळें जसे विद्यार्थी बिघडतात, त्याचप्रमाणें फंड गोळा करण्याचें शास्त्र न पाळल्यानें दान देणारे लोक देखील बिघडतात. अधिकाधिक पैसे मिळणें ही जरी फंडभिक्षेची फलश्रुति असली, तरी सर्व चांगल्या कार्याला तारतम्याप्रमाणें सर्व काळीं आवश्यक तितकी मदत मिळत राहील अशा पद्धतीनें काम करितां आलें पाहिजे. यासाठीं दान देणाऱ्या वर्गाला आपल्या प्रवृत्तीनें योग्य शिक्षण व वळण लागेल याची काळजी घेतली पाहिजे. आपल्या कार्यांचें महत्त्व, त्या कार्याला दिलेल्या दानापासून होणारा प्रत्यक्ष कार्यभाग व एकंदर समाजाची परिस्थिति या गोष्टी दान देणाऱ्यांना योग्य रीतीनें समजावून सांगि-

तल्या पाहिजेत. दान देणाऱ्यांची खुशामत करतां कामा नये. अन्य कार्यांची निंदा करतां कामा नये. दात्यांना कोणत्याहि प्रकारची ऐहिक किंवा पारलौकिक फायद्याची लालूच दान मागणाऱ्यानें दाखवितां कामा नये. आणि दात्यांनीं कांहीं न दिलें तरी निराश होऊन चिडून जातां कामा नये.

पुष्कळशा संस्थांमधून संस्थेच्या मुख्य माणसाला आपल्या वेळेचा अधिक भाग फंड मिळविण्याकडे द्यावा लागतो. यामुळें संस्थेला उत्तम मनुष्याच्या सर्व वेळेचा लाभ मिळत नाहीं. दुय्यम प्रतीचा मनुष्य फंड आणावयास गेला तर लोक त्याला पैसे देत नाहींत. समाजाचीहि अशीच खोड आहे.

उलट, संस्थेमध्यें सुद्धां मुख्य कोणीहि असो व तो कितीहि श्रम घेवो, जो कोणी संस्थेसाठीं पैसा घेऊन येतो त्याचेंच प्रस्थ संस्थेंत दिवसेंदिवस वाढत जातें. त्याच्या इच्छेलाच मान दिला जातो. या दोन्ही खोडी सारख्याच घातक आहेत. चांगल्या संस्थांना परिमित प्रचार करून आवश्यक तितकें पैसे सहज मिळाले पाहिजेत.

# स्वदेशी नवविचार

एका काळीं परकीय लोकांच्या टीकेनें अस्वस्थ होऊन व जुन्या रहाणी-करणीनें चालल्यास राष्ट्राला अपयश आहे म्हणून मध्यम वर्गाच्या लोकांनीं स्वतःच्या जीवनक्रमांत कांहीं फेरफार करून बरीचशी सोय आणली व तिला सुधारणा असें नांव दिलें. सुधारकांनीं सुचविलेल्या कांहीं सुधारणा खरोखरच इष्ट होत्या. सनातनी समाजानें त्यांचा कसून विरोध करण्यांत स्वतःची बरीचशी शक्ति व्यर्थ खर्च केली. कोणतीहि नवीन वस्तु दिसली कीं, बुजून जाऊन तिचा विरोध करावयाचा व नव्या शक्तीशीं दोन हात करून तिचा परिचय झाला, तिचा अपरिचितपणा मोडला म्हणजे तीच गोष्ट आत्मसात् करावयाची हा मनुष्यस्वभावच आहे. प्रथम संयोग, नंतर विरोध व अंतीं एकीकरण हा जीवनप्रगतीचा नियमच होय, असें तत्त्वज्ञान्यांनीं ठरविलें आहे. असें असलें तरी या नियमापायीं सामाजिक शक्ति आणि प्रजाकीय जीवनाचा काळ यांचा अपव्यय होऊं नये, एवढें पाहिलेंच पाहिजे.

जुन्या काळच्या सुधारकांनीं जुन्यांतील स्थायी जीवनपोषक तत्त्वें पाहिलीं नव्हतीं. व नव्यांतील दोष त्यांच्या दृष्टीपुढें प्रगट नव्हते. त्यामुळें स्वदेशी तें टाकाऊ व परदेशी तें ग्राह्य अशा पद्धतीची त्यांची वृत्ति दिसून येत असे.

जुन्या सुधारकांची तिसरी उणीव ती ही कीं, त्यांच्या सर्व सुधारणा मध्यम वर्गाच्या सुखसोयीपुरत्याच होत्या. समस्त जनसमाजाची जबाबदारी आपली आहे हें त्यांना समजलें किंवा पटलें नव्हतें. त्यामुळें सुधारणेच्या प्रत्येक बाबीबरोबर दीर्घोद्योगाची चळवळ चालली पाहिजे, मागासलेल्यांना पुढें आणलें पाहिजे, समस्त प्रजेच्या प्रश्नांना

प्राधान्य दिलें पाहिजे, या गोष्टी त्यांच्या लक्षांत आल्या नाहींत.

आतां हा मनु पालटला आहे. आतां सुधारक–उद्धारक असा भेद राहिला नाहीं. आतां जीवनव्यापी आणि आर्यतत्त्वज्ञानाला अनुसरणारा असा सार्वभौम नवविचार देशांत फांकला आहे. आतां परकीयांच्या टीकेला तोंड द्यावयाचें नसून स्वकीय जीवनक्रमांतील दोषांचा बींमोड करावयाचा आहे. दुर्बळांचें आणि पराजितांचें समाजकारण निराळें, आणि समर्थ व स्वातंत्र्योन्मुख राष्ट्राचें समाजकारण निराळें. आज या दुसऱ्या प्रकारचें समाजकारण प्रवर्तलें आहे. याची शक्ति अमोघ आहे. याचा प्रचार जर सर्वत्र सारखा न झाला तर मागासलेल्या भागांतून दैन्य व दुर्बळता दबा धरून बसेल, व आपली प्रगति क्लेशकारक होईल. यासाठीं नवा विचार व त्या विचाराचें नवजीवन खेडेगांवांतील लोकांना नव्या पद्धतीनें समजावून सांगितलें पाहिजे.

आपल्या आर्य तत्त्वज्ञानापैकीं कांहीं उदात्त तत्त्वें आपल्या पूर्वजांनीं व्यक्तिगत जीवनांत अमलांत आणिलीं पण सामाजिक जीवनांत त्यांचें वावडें मानलें. आपला धर्म समानता सुचवितो व शेवटीं ऐक्याकडे घेऊन जातो. पण आपली शास्त्रोक्त समाजरचना असमानतेलाच जीवनतत्त्व समजते. या तत्त्वावर सबंध समाजाची उभारणी केली, पण ती कृत्रिमपणें टिकवून ठेविली तोंपर्यंतच टिकूं शकली. पुढें आतां सर्वच बाजूंनीं ती कोसळून पडूं लागली आहे. आपल्या समाजरचनेंत आपल्या धर्माचें मुख्य तत्त्व आतां आपण दाखल केलें पाहिजे.

समाजरचना आणि अर्थव्यवस्था ( सांपत्तिक धोरण ) यांची गट्टी फार जुनी आहे. जगांतील यापुढील अर्थव्यवस्था समानतेच्या धोरणावर जाणार आहे. हा फेरफार जबरदस्तीनें राजसत्तेच्या जोरावर रशियाप्रमाणें न करितां, जीवनपरिवर्तनानें, धर्मतेजाच्या प्रतापानें तो बदल आणला पाहिजे. आजचा प्रश्न जुने रिवाज टिक-

विण्याचा व संभाळण्याचा नसून आपल्या धर्माचीं प्रधान व आर्य तत्त्वें अमलांत आणण्याइतकें शिक्षण व परिवर्तन समाजांत पोहोंचवावयाचें हा आहे. तत्त्वदृष्ट्या विचार करण्याची व आचारांत फेरफार करण्याची हिंमत लोकांमध्यें आणावयाची आहे.

या नवीन विचारांमध्यें सर्व धर्म समान, सर्व जाती समान, सर्व वर्ण समान, सर्व धंदे समान, स्त्रीपुरुष समान, सर्वांच्या वेळेची बाजारी किंमत समान, असें नवीन शास्त्र चालू करावयाचें आहे. या सर्व गोष्टी आपल्या धर्मांत आहेतच. पण त्या राष्ट्रीय जीवनांत प्रत्यक्ष अमलांत आणावयाच्या आहेत. या वस्तूंचें यथार्थ आकलन केलेले लोक किती आहेत ? त्यांची संख्या वाढली पाहिजे; त्यांची शक्ति व त्यांचा निर्धार हींहि वाढलीं पाहिजेत.

# आश्रमांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम

प्रथमपासून जीवनाविषयीं विचार करण्याची संवय पाडली व उघड्या डोळ्यांनीं जगांत वावरण्याची उत्कटता उत्पन्न केली म्हणजे मनुष्याला बरेचसें बौद्धिक व नैतिक शिक्षण सेवेंतूनच मिळूं शकतें. पुस्तकी शिक्षणांत दुसऱ्यांच्या विचारांवर, अनुभवांवर आणि कल्पनांवर पोट भरावयाचें असतें. हीं पुस्तकें कितीहि महत्त्वाचीं असलीं आणि तीं लिहिणारे कितीहि थोर पुरुष असले तरी त्यांचा अनुभव तो आपला अनुभव होऊं शकत नाहीं. आणि पुष्कळदां स्वतःच्या अनुभवावांचून कोणत्याहि विचारास आपल्याला उपयोगी पडण्यासारखी वास्तविकता ( reality ) येऊं शकत नाहीं. वाचनाची उपयुक्तता बरीच आहे. त्याच्यावांचून प्रगति बरीच कुंठित होईल हें खरें आहे; तरी पण एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, बौद्धिक विकासासाठीं वाचन हा दुय्यम प्रकारचा खुराक आहे.

सेवेसाठीं स्थापन झालेल्या संस्थेमध्यें बूर्झ्वा संस्कारिता प्राप्त करून देणाऱ्या आळशी विषयांची सोय नसणें हेंच योग्य आहे. बूर्झ्वा बौद्धिक शिक्षण हें कांहीं अंशीं अफूच्या व्यसनासारखें आहे.

या शिक्षणानें सामाजिक कल्याणाची बुद्धि जागृत होते व पुढारीपणाचे गुण अंगीं येतात, असें मानण्यांत येतें. डॉ. आर्नोल्डच्या शिक्षणपद्धतीचा साम्राज्यवादी इंग्लंडला जो फायदा झाला, त्यामुळें या पद्धतीची प्रतिष्ठा विशेषच वाढली आहे. पण जगाला यापुढें ज्या प्रकारचे प्रजाहितचिंतक पुढारी हवे आहेत त्यासाठीं हें शिक्षण मुळींच पोषक नसून कांहीं अंशीं घातकच आहे.

संस्कारिता आणि सेवासामर्थ्य हीं एकत्र होतील आणि सर्व जगाला

लागून राहिलेला मोठा रोग म्हणजे नवनीतकर्षणा (exploitation) ची वृत्ति ही अंगीं बाणणार नाहीं, अशा प्रकारचें जें शिक्षण तेंच यापुढें प्राधान्येंकरून दिलें पाहिजे. ही गोष्ट ज्यांना पटेल त्यांनाच प्रजाकीय शिक्षणाची नवीन दिशा सुचेल.

आपण कार्ल मार्क्सचे अनुयायी नसून भारतीय आध्यात्मिक संस्कृतीचे वारस आहोंत. रशियन लोकांप्रमाणें आपल्याला वर्गावर्गांमधील विरोधाचें वातावरण उत्पन्न करावयाचें नाहीं;आणि समाजाला केवळ अर्थपरायण चार्वाकहि बनवावयाचें नाहीं. एवढी गोष्ट ध्यानांत घेतल्यानंतर कबूल केलें पाहिजे कीं, भारतीय उद्धाराचा पाया आजच्या युगांत जितका शिक्षणावर अवलंबून आहे, तितकाच तो आर्थिक उन्नतीवर अवलंबून आहे. यासाठीं शिक्षणावर आर्थिक सामर्थ्याच्या अंगाचीं पुटें चढविल्यावांचून गत्यंतर नाहीं. भारतीयांना पैसे मिळविण्याचें शिक्षण देण्यापूर्वीं हातीं असलेला पैसा कसा वापरावा व कसा वांचवावा याचें शिक्षण आधीं दिलें पाहिजे. काटकसर आणि चोख हिशोब या दोन गोष्टी शिक्षणाच्या पायांतच ठेवून दिल्यानें वरील उद्देश बराचसा सफळ होईल. सोनें आटविणारा सोनार ज्याप्रमाणें सोन्याचा सूक्ष्मातिसूक्ष्म कण देखील वायां जाऊं देत नाहीं, गहाळ होऊं देत नाहीं, त्याप्रमाणें मानवी शक्ति, पार्थिव शक्ति, संपत्तिरूप असलेले पदार्थजात आणि वेळ, यांची डोळ्यांत तेल घालून जोपासना करणें, काटकसर करणें आणि प्रगतीची कोणतीहि संधि न दवडण्याइतके अखंड जागरूक असणें हें संस्थागत शिक्षणाचें सहज ध्यानांत येणारें लक्षण झालें पाहिजे. दैववादी, आळशी, उठवळ, आणि 'ततः किम् ' वृत्तीच्या वृद्ध समाजांत वरील तत्त्व आणणें सोपें नाहीं. हा प्रयत्न जो कोणी करील तो प्रथम प्रथम तरी लोकांना चांगलाच अप्रिय होईल. पण या तपश्चर्येवांचून समाजांत जोम यावयाचा नाहीं आणि तारुण्यहि यावयाचें नाहीं.

संस्थेंतील विद्यार्थी प्रजासेवक होणार व प्रजेचा किती तरी पैसा त्याच्या हातीं खेळणार. तेव्हां या पैशाचा योग्य हिशोब ठेवून वाटेल त्याला वाटेल तेव्हां हिशोबाची फोड करून त्याला सांगतां आली पाहिजे आणि लहानमोठ्या संस्थांचा गुंतागुंतीचा हिशोब तपासून त्यांतील चुका शोधून दाखवितां आल्या पाहिजेत. आजच्या समाजांत संस्था चालविणाऱ्या लोकांना हें अंग बहुतेक नसतें, व स्वतःच्या उणीवांचीं दया करण्यास शिकल्यानें या विषयाचें महत्त्व ते कबूलहि करीत नाहींत. हा विषय कारकुनी शिक्षणाला आवश्यक असेल, त्याच्यावांचून आमचें फारसें अडावयाचें नाहीं अशी वृत्ति ते धारण करितात. संस्थापक आणि चालकच असे उपेक्षक असले तर शिक्षणांत हा विषय रुजणार नाहीं हें स्पष्ट आहे. पण या ज्ञानाच्या अभावीं संस्थांचा विकास खुंटला जाईल अथवा सर्वच डोलारा कोसळून जाईल. केवळ सेवकांचा शंकातीत प्रामाणिकपणा हा हिशोबी ज्ञानाची गरज भागवूं शकणार नाहीं.

मोठमोठ्या कारखान्यांनीं जगाचें दळणवळण वाढविलें आहे व अशा रीतीनें जगाला लहान करून एक केलें आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे. पण एकत्र आणणें म्हणजे एक करणें नव्हे, हें त्रैराशिकी वृत्तीला कसें कळावें! मोठमोठ्या कारखान्यांनीं एकाच सांचाच्या असंख्य वस्तू तयार करून त्या सर्व जगाला पुरविण्याची महत्त्वाकांक्षा धारण केल्यानें थोड्या लोकांच्या हातांत जगाची संपत्ति केंद्रित झाली आहे. आणि साम्यवादी साम्राज्य स्थापन झाल्यास ती सरकाच्या हातांत केंद्रित होईल. पण त्यायोगानें जनतेची संस्कृति, जनतेचा आनंद व जीवनसमृद्धि हीं पार लयाला जाऊं लागलीं आहेत, हें आतां कोठेंसें थोडेंसें लोकांच्या लक्षांत येऊं लागलें आहे. त्यांतहि साम्राज्यवादाचा विरोध करणारे साम्यवादी स्वतः एक नवीन प्रकारचें साम्राज्यच स्थापन करूं पहात आहेत हें फारच थोड्यांच्या

लक्षांत आलें असेल. साम्यवादी साम्राज्यांत जुन्या साम्राज्याचे बरेचसे दोष नसणार हें खरें; पण त्याच्या मुळांतहि जीवनविनाशक तत्त्वें आजच दिसून येत आहेत. [ अतिविस्तरविस्तीर्णं न तत् भवेत् चिरायुषम् । ]

आपला देश म्हणजे घरोघर लहान लहान उद्योगधंदे व छोटे खानी कारखाने यांचें माहेरघर होता. प्रत्येक धंदेवाईकाची जात निराळी, त्याचें संघटन निराळें. दरएक जात स्वतःचेच नियम करून अंतस्थ संघटन हवें तसें करण्याला मुखत्यार होती. जातीचे झगडे जातीच्या लोकांपुढेंच निवडले जात. रोटीबेटी व्यवहाराचा तुसडेपणा जर वाढला नसता तर ही स्थिति उत्कृष्ट होती. भिन्नभिन्न जातींमध्यें संबंध कसे असावेत व सर्व जातींचें मिळून संघटन कसें असावें याची व्यवस्था शहाण्या व निःपक्षपाती लोकांच्या हातीं सोंपविलेली असल्यानें विग्रहाला कारण रहात नसे. लहान लहान जातिसंघांचें अंतस्थ स्वराज्य आणि विराट समाजाची व्यवस्था सामाजिक धर्मांच्या ताब्यांत, अशी उत्कृष्ठ व्यवस्था असे. आजचें जग देखील अनेक प्रयोग करून टक्केटोणपे व ठेंचा खाऊन शेवटीं याच व्यवस्थेकडे येणार आहे अशी आशा करण्यास जागा आहे.

या दृष्टीनें विचार करून लहानमोठे उद्योगधंदे लहान पायावर समाजांत पुनः चालू केले पाहिजेत. कोट्यावधि लोकांचा ज्यांत संबंध येतो, कोट्यावधि लोकांना ज्यांत आश्रय मिळतो आणि ज्याच्या योगानें देश स्वावलंबी व समृद्ध होणार आहे तो खादीचा धंदा प्रथम हातीं घेऊन त्याची उत्कृष्ट जोपासना करून तो पुनः समाजांत पेरला पाहिजे. ही व्यापक पायाची तयारी झाली म्हणजे इतर धंदे आपोआप घेतले जातील. पण आश्रमांत खादीच्या अनुषंगानें कांहीं धंदे आतांपासूनच सुरू केले पाहिजेत ! धंदा शिकावयाचा तो संकट प्रसंगीं दोन घास मिळवितां यावेत अशा उद्देशानें नव्हे, तर त्याच्या

मध्यें कर्तबगारी, आनंद, संस्कारिता आणि समाजसेवा आहे म्हणून. आणि म्हणूनच आळशी ऐद्याप्रमाणें लुटपुटीचा धंदा शिकून भागावयाचें नाहीं. कौशल्यांत, कामाच्या वेगांत, काटकसरींत आणि व्यवस्थाशक्तींत तज्ज्ञ व निष्णात लोकांशीं जर टक्कर देतां न आली तर आश्रमानें लाजलें पाहिजे.

तेव्हां बारिकसारीक आणि खेड्यांत सहज चालूं शकणारे असे धंदे विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारें शिकविले पाहिजेत.

आपल्या लोकांना आज कोणत्या कोणत्या वस्तूंची आवश्यकता आहे, त्यांपैकीं कोणत्या खेडेगांवांतून झाल्याच पाहिजेत, याचा तपास केला पाहिजे. त्याचप्रमाणें गेल्या पन्नासपाऊणशें वर्षांत खेडेगांवांतून जे धंदे बुडाले त्यांपैकीं कितींचें रूपांतरानें कां होईना पुनर्जीवन होणें इष्ट आहे याचाहि तपास झाला पाहिजे.

शिक्षणाचें एक महत्त्वाचें अंग म्हणजे प्रवास होय. आजकाल प्रत्येक विषयावर परदेशी भाषांतून हवें तेवढें साहित्य मिळत असतें. प्रवासवर्णनाचीं पुस्तकें हजारांनीं मोजतां येतील. प्रकाशलेखनाची (फोटोग्राफीची) कला इतकी वाढली आहे कीं, चांगल्या मासिकांतील चित्रें पाहूनच घरबसल्या अनेक प्रवास केल्याचें पुण्य सहज मिळवितां यावें. इतकें असलें तरी ज्याप्रमाणें विज्ञानाचीं पुस्तकें वाचून प्रत्यक्ष प्रयोग करण्याची गरज भागवितां येणार नाहीं त्याप्रमाणें जातीनें प्रवास केल्याची सर कशालाच येणार नाहीं.

निदान हिंदुस्थानांत तरी सेवकवृत्तीच्या तरुणाचा प्रवास बिनखर्चानें किंवा अत्यंत अल्पखर्चानें झाला पाहिजे. सेवेला वाहिलेला वेळ प्रवासाकडे देणें हाच मोठा खर्च आहे. याहून त्याला इतर खर्च फारसा पडूं नये.

प्रवासाहून कमी दर्जाची पण फारच महत्त्वाची अशी सोय म्हणजे ज्यांनीं उघड्या डोळ्यांनीं पुष्कळ प्रवास केला आहे व ज्यांनीं लोक-

कल्याणाच्या आधुनिक कल्पनांचा चांगला विचार केला आहे, अशांशीं संभाषण, सहवास ही होय. प्राचीन काळचे राजे आणि संस्कार-लोलुप इतर गृहस्थ ज्याप्रमाणें मोठ्या आतुरतेनें नारदादि ऋषिमुनींना आणि परिव्राजकांना स्वतःच्या घरीं पाहुणे म्हणून बोलावीत आणि त्यांच्याकडून जग कसें आहे, जगांत काय चाललें आहे हें सर्व जाणून घेत, त्याप्रमाणें आजहि चारित्र्यधन, समाजहितैषी आणि अनुभवचतुर अशा प्रवाशांना संस्थेंत वारंवार आमंत्रण देऊन त्यांच्या ज्ञानाचा फायदा विद्यार्थ्यांना दिला पाहिजे. अशा लोकांना मुद्दाम दुरून बोलावणें फारसें शक्य नसतें. शक्य असलें तरी कितपत इष्ट आहे याचाहि विचार करावयास हवा. पण सहजासहजीं असले प्रसंग किती तरी मिळतात. त्यांचा फायदा घेण्यास चुकूं नये.

ज्याप्रमाणें घरच्या बायकामुलांच्या सहवासांत येणाऱ्या मनुष्याचें नैतिक चारित्र्य कशा प्रकारचें आहे हें आपण डोळ्यांत तेल घालून पहातो, त्याचप्रमाणें घरांत प्रवेश करणाऱ्या रोचक साहित्याचें नैतिक वातावरण कसें काय आहे हें आपण काळजीपूर्वक पाहिलें पाहिजे. रोज वाचल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांतील उपदेश आणि त्यांत छापल्या जाणाऱ्या जाहिराती घरांतील तरुणांच्या मानस सरोवराला गढूळ करितात कीं काय, हें पहाणें जसें आवश्यक असतें, तसेंच संस्थेंत आदरानें बोलाविलेल्या पाहुण्याची बौद्धिक छाप विद्यार्थ्यांवर कशी काय पडते, ती निरोगी आहे किंवा नाहीं, हेंहि पाहिलें पाहिजे. मात्र संस्थेला बौद्धिक अंतःपुर करून टाकितां कामा नये. चारी बाजूचा मोकळा वारा येऊं देणें यांतच आरोग्य आहे.

हिंदुस्थानांतील सामाजिक पुनर्जीवन हिंदुस्थानच्या परंपारत स्वभावाला अनुसरूनच होणार आहे. रशियाचें अनुकरण करूं गेल्यास सफलता मिळावयाची नाहीं; स्वभावांत मात्र विकृति उत्पन्न व्हावयाची. पण आपल्या देशाचा स्वभाव व स्वधर्म यांच्यावरील उडून गेलेला

विश्वास परत बसविण्यास निरनिराळ्या देशांतील अशा प्रकारच्या प्रवृत्तींचा इतिहास समजून घेणें अपरिहार्य झालें आहे. यासाठीं आश्रमांतील पोक्त शिक्षकांनीं इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, रशिया, चीन, जपान, मिसरदेश (इजिप्त), इराण, इत्यादि देशांच्या इतिहासांतील ते ते भाग वाचून त्यांचें रहस्य आश्रमवासीयांना समजावून सांगितलें पाहिजे. कार्थेजचा इतिहास, नेदर्लंडचा इतिहास, मेक्सिको आणि पेरू या देशांचा इतिहास, यहुदी लोकांचा इतिहास वगैरे विषयींची महत्त्वाची हकीकत पुस्तकांवांचून विद्यार्थ्यांना तोंडींच सांगितली पाहिजे. इतिहासाचा लांबलचक अभ्यासक्रम आश्रमशिक्षणाच्या कल्पनेच्या बाहेरचा आहे.

हिंदुस्थानचा इतिहास धांवत्या पद्धतीनें सांगून नंतर चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचण्याची विद्यार्थ्यांना मोकळीक दिली पाहिजे.

संस्थेंत येथवर वर्णिलेल्या शिक्षणक्रमाची सोय होवो न होवो, —ती होणें अत्यंत इष्ट आहे— पण एक सोय जर नसेल तर ती संस्था चालविण्याचा विचारच सोडून द्यावा. ती सोय म्हणजे संस्थेंत रहाणाऱ्या लहानमोठ्या सर्वांना संस्थेच्या प्राणरूप व्यक्तीशीं स्वतःचें हृदय उघडें करण्याची संधि मिळणें आणि प्रथा असणें ही होय. सेवेला वाहून घेतलेली संस्था केव्हांहि आध्यात्मिक संस्थाच असणार; मग तिचा धार्मिक संप्रदाय कसलाहि असो अथवा नसो. अशा संस्थेंत जे लोक येणार व रहाणार त्यांची सेवाशक्ति आध्यात्मिक हृदयशुद्धीवरच अवलंबून असणार. जीवन अखंड कर्मयोगांत गढलेलें असलें तरी कर्मांची परिपाटी आंधळी न व्हावी व जीवन केवळ रुढिमय होऊन न जावें यासाठीं हृदयजागृति व विचारजागृतीचें त्रिकाल स्नान घडलें पाहिजे. संस्थेला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तीचा सहवास तीर्थरूप झाला पाहिजे. यासाठीं अशा व्यक्तीनें सहानुभूतिपूर्वक व निःस्पृहतेनें प्रत्येकाचें म्हणणें ऐकून घ्यावें, निरनिराळे प्रश्न विचारून दरे-

काच्या जीवनाला उज्ज्वल करावें, इष्ट असें वळण लावावें. तरुणांना द्विज करण्याचें खरें उपनयन म्हणजे हेंच. हें एकाच दिवशीं करून टाकावयाचें नसतें. दुधाचें लोणी होईतोंपर्यंत हें चाललें पाहिजे.

लोकांमध्यें तरतऱ्हेचे नवीन भ्रम उत्पन्न करून बुद्धीला जवळ-जवळ कायमची कलुषित करून टाकणारें एखादें शास्त्र जर आज असेल तर तें संपत्तिशास्त्र होय. तें अर्थशास्त्र नसून अनर्थशास्त्र आहे. तें शास्त्र इतकें घातक आहे म्हणून त्याचा बहिष्कार करावयास गेलें तर सुरक्षितता नाहीं. अशी त्याची विचित्रता आहे. तेव्हां ज्यांनीं या शास्त्राचें स्वरूप ओळखलें असेल अशांनीं विद्यार्थ्यांना याचा चांगला परिचय करून दिला पाहिजे. विशेषतः राष्ट्रीय जमाखर्चाचीं मूलतत्त्वें समजावून सांगितलींच पाहिजेत. दुसऱ्या बाजूनें संपत्तीची समाजांत जी विभागणी होते तिचें स्वरूप ओळ-खण्याइतकें ज्ञान विद्यार्थ्यांना होणें इष्ट आहे.

सकाळसंध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं आणि जयंत्या, व्रतें, उत्सव वगैरे प्रसंगीं धर्मतत्त्वांची व धार्मिक परंपरेची सोपपत्तिक माहिती करून देण्याचा परिपाठ असावा.

संपत्तिशास्त्र ज्याप्रमाणें आज जवळजवळ सार्वभौम झालें आहे त्याचप्रमाणें दुसऱ्या एका शास्त्राचा जगभर सुळसुळाट होऊं पहात आहे. हें शास्त्र म्हणजे कामशास्त्र हें होय. या शास्त्रानें समाजशास्त्र, संपत्तिशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि धर्मशास्त्र यांच्या मालिकेंत स्वतःला स्थान मिळ-विलें आहे. वैद्यकशास्त्र व मानसशास्त्र हीं शास्त्रें तर कामशास्त्राची स्वाभाविक मिरास. अशा सर्वव्यापी कामाची उपेक्षा करून चाला-वयाचें नाहीं. तरुणांना योग्य दिशा लावण्यासाठीं निरोगीपणें यथा-काळीं जागृत केलेंच पाहिजे.

भुगोलाची माहिती आवश्यक आहे. पण विषय म्हणून न शिक-वितां विविध प्रकारें हिंदुस्थानाची व जगाची माहिती विद्यार्थ्यांना अधि-

काधिक मिळत जाईल याकडे लक्ष ठेविलें पाहिजे. हें साधणें शक्य नसल्यास विषय म्हणून अभ्यासक्रमांत त्याला स्थान द्यावें. वर्तमान-पत्रें आणि मासिकें वाचतांना भुगोलाचें ज्ञान वाढत राहील तर तें फारच उत्तम.

## संस्थेची व्यवस्था कशी असावी ?

संस्थेची व्यवस्था कशी असावी हें जबाबदार लोकांनीं वेळोंवेळीं एकत्र बसून ठरविलें पाहिजे. तंत्रामध्यें स्थिरताहि असावी व अखंड सूक्ष्म परिवर्तनेंहि होत रहावींत. संस्थेचें तंत्र वाढत्या शरीरासारखें चाललें पाहिजे.

सेवेला वाहून घेतलेली संस्था आध्यात्मिक संस्था असते. तिच्या-मध्यें चारी वर्णांचीं लक्षणें दिसलीं पाहिजेत. नम्रता आणि उद्यम-शीलता, काटकसर आणि व्यवहारदक्षता, तेजस्विता आणि परोपकार, तपस्विता आणि ज्ञाननिष्ठा, या सर्व गोष्टी तींत असल्या पाहिजेत. अशी संस्था संन्यासी वृत्तीनें चालणारी असल्यानें तिला आर्थिक साहाय्य करणाऱ्यांनीं स्वतःच्या हातांत अधिकार ठेवण्याइतकें अश्रद्धाळू बनून संस्थेची व स्वतःच्या पैशाची नासाडी करूं नये. सेवकांमध्यें आश्रि-तभाव आला म्हणजे सर्व प्रकारचा हीनपणा त्यांच्यांत शिरावयाचाच. संस्थेच्या ट्रस्टमध्यें व्यवहारदक्ष लोक असावेत. ते श्रीमंत असले तरी हरकत नाहीं; पण संस्थेला मोठी आर्थिक मदत करणारे लोक त्यांत नसावेत. त्यांच्या पसंतीचे त्यागी व अनुभवी सेवक असणें इष्ट आहे.

संस्थेचे उद्देश अगदीं स्पष्ट असावेत. कार्यक्षेत्र आणि कार्यक्रम निश्चित असणें तितकेंच आवश्यक आहे. पण अनुभवाप्रमाणें आणि सामाजिक परिस्थितीप्रमाणें त्यांत फेरफार होण्यास अवकाश अस-लाच पाहिजे.

व्यवस्था एकहातीं असणें चांगलें. पण व्यवस्थेंत सत्तेचें तत्त्व

होतां होईल तों कमी ठेवावें. सत्य आणि सत्ता यांचें फारसें जुळत नसतें. आणि अहिंसा तर व्यक्तिगत स्वातंत्र्याला अधिकाधिक महत्व देणारी आहे. पण अहिंसेचा स्वभाव अधिकार उत्पन्न न करितां कर्तव्यें वाढविण्याचा आणि त्यांचें कडक रीतीनें पालन करविण्याचा आहे. सर्व व्यवस्था विश्वासपात्र, अनुभवी, कुशल आणि हिंमतवान अशा ध्येयवादी श्रद्धानिष्ठाच्या हातांत असावी. त्यानें सर्वांचा योग्य रीतीनें सल्ला घेऊन सर्वांचा विश्वास संपादून काम करावें.

अशाला व्यवस्थापकाच्या ठिकाणीं ठेवणें इष्ट आहे किंवा नाहीं याचा विचार सर्वांनीं करावा; पण त्याच्या अधिकारावर अश्रद्धामूलक अंकुश वाढवीत बसूं नये. या बाबतींत पाश्चात्यांचें अनुकरण करून आपण पुष्कळ बिघडविलें आहे.

संस्थेचे हिशोब वेळोवेळीं प्रसिद्ध झालेच पाहिजेत. संस्थेचीं कामें अगदीं वक्तशीर झालींच पाहिजेत. संस्थेला किंवा संस्थेच्या घटकांना कर्ज म्हणून नसावें. दरवर्षी सर्वांनीं एकत्र जमून चार पांच दिवस मोकळेपणानें सर्व बाबतींत विचारविनिमय करावा. याला चर्चा - मंडळाचें, पार्लमेंटचें - किंवा कॉंग्रेसचें स्वरूप येऊं न देतां कौटुंबिक संमेलनाचें स्वरूप मिळावें. प्रत्येक कामांतील मुख्यानें आपलें काम जबाबदारपणें सांभाळूं शकेल असा आपला कमींत-कमी एक तरी दुय्यम तयार केलेला असावा; पण तें काम त्यालाच दिलें जाईल असें ठरविलेलें नसावें.

## आश्रमाचें ध्येय.

समाजाची सत्य आणि अहिंसेच्या मार्गानें सेवा करून समाजांत सामर्थ्य, बंधुता व सदाचार यांचें वातावरण वाढविणें आणि समाजांत स्वराज्यवृत्ति स्थिर करणें हें आश्रमाचें ध्येय असावें. हा उद्देश अमलांत आणण्यासाठीं सेवापरायण लोकांचा संघ बनवून, त्यांचें जीवन सर्व बाजूंनीं सेवाक्षम करण्याचा प्रयत्न आश्रमानें करावयाचा आहे.

## आश्रमाचीं आधारभूत तत्त्वें.

'सत्य व अहिंसा' हेंच मुख्य धर्मतत्त्व आणि समाजधारणेचें एकमात्र साधन आहे.

असहायांना मदत करून त्यांना समर्थ बनविणें हीच उत्तम सेवा आहे. आणि सेवकांसाठीं सेवा हेंच सर्व प्रकारच्या उन्नतीचें साधन आहे. सेवा करतांनाच उत्कृष्ट शिक्षण मिळेल.

खादी, ग्रामसेवा, अस्पृश्यतानिवारण, आरोग्यसंवर्धन, हिंदी-प्रचार, लोकशिक्षण हीं कार्यें प्रधान असतील.

## आश्रमाचें कार्यक्षेत्र.

अखिल प्रान्तांतील सर्व धर्म, पंथ, मतांचे स्त्री-पुरुष हें कार्यक्षेत्र.

## आश्रमाचे विधिनिषेध.

संस्थेच्या व्यवहारांत कांहींहि गुप्त असा भाग नसावा.

संस्थेचा जमाखर्च स्थूल रूपानें दर सहा महिन्यांनीं प्रसिद्ध व्हावा. प्रसिद्ध करण्यापूर्वी तज्ज्ञांकडून तो तपासून घेतलेला असावा. हें काम जितकें नियमित व चोख होईल तितकीच संस्थेची भर-भराट होईल असें समजावें.

संस्थेमध्यें आहारशुद्धीकडे अखंड लक्ष असावें. शारिरिक श्रम केल्याशिवाय न खाणें हा आहारशुद्धीचा एक महत्त्वाचा नियम समजावा.

जे प्रत्यक्ष हजर नाहींत, जे स्वतःचीं सुखदुःखें बोलूं शकत नाहींत व ज्यांचें आपणांस कमींतकमी स्मरण, ध्यान किंवा आक-र्षण असतें, त्यांच्या सुखदुःखांचा आणि हक्कांचा आधीं विचार कर-ण्याचा प्रघात असावा. असें केलें तरच ईश्वराचा मंगलमय वरद-हस्त संस्थेवर राहील.

स्वच्छता, टापटीप आणि नियमितपणा या तीनहि नैतिक वस्तू

आहेत असें समजून त्यांच्याविषयींचा आग्रह केव्हांहि व कोठेंहि शिथिल होऊं देऊं नये.

श्रमजीवी लोकांच्या नजरेस संस्थेचें कार्य पडेल, त्यांना संस्थेसंबंधानें आपलेपणा उत्पन्न होईल असेंच संस्थेचें वळण असावें.

संस्थेंत न रहाणाऱ्या लोकांना पोसण्याची जबाबदारी संस्थेनें होतां होईल तों घेऊं नये.

संस्थेंतील शौचकूप साफ करणें अथवा अशाच जातीचें दुसरें काम करणें हें अस्पृश्य जातीच्या लोकांकडून होतां होईल तों करवून घेऊं नये;' मग ते लोक पगारदार असोत किंवा आश्रमवासी असोत. समाजांतून अस्पृश्यता नामशेष होईतोंपर्यंतच या नियमाचें महत्त्व आहे.

संस्थेच्या भोजनांत पदार्थांचे प्रकार अधिक न होतील याची नेहमीं काळजी घ्यावी. साधारणपणें आहार तीन वेळां घेण्याची पद्धति असावी. जेलच्या वेळा स्वाभाविक व योग्य आहेत असें वाटतें.

आहारांत तांदुळाचा उपयोग करण्याचें कारण दिसत नाहीं. दूधतूप मुबलक असल्यास डाळीलाहि फांटा द्यावा. खाण्यामध्यें भाजी किंवा फळें अगदीं थोड्या प्रमाणानें कां असेनात, ताजीं व न शिजविलेलीं असलेलीं चांगलीं.

शिजलेलें अन्न रात्रीं होतां होईल तों उरवूं नये. दुसऱ्या दिवशीं तें खाऊं नये. उष्टें कोणाहि माणसास खावयास घालूं नये. खाणाऱ्याची तयारी असली तरी आपली देणाऱ्याची नसावी.

आहारामध्यें मिरच्या व गरम मसाला अगदीं वर्ज्य करावा. धान्याहाराला मीठ आवश्यक आहे. तें कमी करूं नये.

सणावाराच्या दिवशीं किंवा अन्य प्रसंगीं आश्रमांत मिष्टान्न करावें किंवा नाहीं याविषयीं कांहींच निर्णय न देतां एवढें मात्र अवश्य

सुचवावेसें वाटतें कीं, मिष्टान्न केलेंच तर तें खाण्याविषयीं किंवा अधिक खाण्याविषयीं कोणीं कोणास आग्रह करूं नये. आग्रह करणें अपमानाचें समजावें. लांडग्याप्रमाणें बेसुमार खाणें यांत बहाद्दुरी न मानतां असंस्कारिता आहे असें वाटलें पाहिजे. मिष्टान्न केव्हांहि परिमितच वाढावें आणि खावें; व भुकेची तृप्ति सामान्य आहारानें करण्याचाच प्रघात ठेवावा.

संस्थेमध्यें केवळ सेवकच असते तर मिष्टान्नाची जरूर नाहीं, असेंच म्हटलें असतें. पण संस्थेमध्यें विद्यार्थी असणार, सेवकांचे नातेवाईक असणार. त्यांना मसाल्यावांचून तयार केलेल्या आहाराची गोडी लागेतोंपर्यंत मिष्टान्नाची वासना अनावर होणें स्वाभाविक आहे. त्याचा विचार करून मिष्टान्नसेवनाची कल्पना केली आहे.

आश्रमवासीयांनीं केवळ खादीच वापरावी एवढें बस्स नाहीं. त्यांच्या मालकीचें परदेशी कापड कोठेंहि नसावें आणि गिरणीचा कपडा अंथरुणापांघरुणांत वापरण्याची सूट सामान्य समाजास असली तरी आश्रमानें तसली सूट स्वतःस ठेवूं नये.

कपडे शक्य तितके कमी वापरण्याची संवय असली पाहिजे. निष्कारण लांबरुंद धोतरें, पायघोळ सदरे आणि बुरजासारखे रुमाल आश्रमवासीयांचे नसावेत.

खादीच्या प्रारंभीच्या दिवसांत अपल्या येथील स्त्रियांचे मोठे हाल होतात—जाड लुगडीं नेसणें धुणें म्हणजे शिक्षाच वाटते. यासाठीं बायकांच्या कपड्यांची पद्धतच बदलली पाहिजे. एक लांब लुगडें नेसण्यापेक्षां त्याचें सोईस्कर दोन तुकडे करून नवीन पद्धतीनें नेसण्यास सुरवात केली पाहिजे. ही नवीन पद्धत आटोपशीर असावी, लज्जारक्षणाच्या सोयीची असावी आणि आपल्याइकडील अभिरुचीस पटेलशी असावी. या बाबतींत अनेक प्रयोग झाले पाहिजेत.

शौचाच्या इतर व्यवस्थेबरोबर पाश्चात्य पद्धतींची एक खोली असावी. त्यांत पेटी ( कमोड ) असावी.

## आश्रमांतील प्रवृत्ती.

१. **खादीकार्य :** आश्रमाचें अस्तित्व व्यापक समाजसेवेसाठीं आहे. आज समाजाचे जे तुकडे पडले आहेत ते पुनः सांधण्याची शक्ति खादी-मध्यें आहे. सर्व देशभर खेडोखेडीं करण्याजोगी ही प्रवृत्ति आहे आणि खादीच्या प्रभावळींत इतर अनेक प्रवृत्ती बसविणें शक्य आहे. यासाठीं आश्रमांतील प्रत्येक विद्यार्थ्याला खादी तयार करणें व खादीचें केंद्र चालविणें यांत तरबेज केलें पाहिजे.

२. **जमाखर्च ठेवण्याचा प्रचार :** खादीकार्याला जोडूनच खेडेगांवांतील लोकांना स्वत:चे हिशेब ठेवण्याची पद्धत शिकवून तशी संवय लावणें शक्य आहे आणि इष्ट आहे.

३. **अस्पृश्यतानिवारण :** खादी आणि अस्पृश्यतानिवारण या दोन्ही प्रवृत्ती एकमेकींशीं जुळणाऱ्या आहेत. अस्पृश्यतानिवारण अत्यंत तांतडीनें व आत्यंतिक स्वार्थत्यागानें करावयाचें काम आहे. इतर प्रवृत्तींचें नुकसान सोसून देखील आश्रमानें हें काम केलें पाहिजे.

४. **मद्यपाननिषेध :** खेडेगांवांमध्यें व्यापक प्रमाणानें करण्याजोगें तितकेंच महत्त्वाचें काम म्हणजे मद्यपाननिषेध होय. पैसा, आरोग्य व अब्रू यांचा नाश टाळण्यासाठीं आणि माणसांना माणूस करण्यासाठीं हें काम घरोघर फिरून केलें पाहिजे, समजूत घालून केलें पाहिजे. जातींच्यामार्फत ठराव करून दारू पिणाऱ्यांस दंड करून दारू बंद करणें कोठेंकोठें शक्य असेल व त्याप्रमाणें कोणी करीत असल्यास तें अयोग्य नाहीं. पण आश्रमानें त्या पद्धतीच्या कामांत पडूं नये. व्यक्तीवर इष्ट असा नैतिक ताबा ठेवण्याची जातीची शक्ति बरीच क्षीण झाली आहे. राग, द्वेष, ईर्ष्या, मत्सर आणि पक्षापक्षीमुळें जातींचे पुढारी धीरोदात्त राहिले नाहींत. यामुळें जातीचा अधिकार गाजवूं जातां भांडणें वाढतात

व जात छिन्नभिन्न होते. यासाठीं तूर्त बरेच दिवसपर्यंत जातीचा अधिकार न वापरलेला बरा.

दारूचीं दुकानें घेणें, दारूचा व्यापार करणें वगैरे गोष्टी जातीला कमीपणा आणणाऱ्या आहेत असें लोकमत लहानमोठ्या सर्व जातींमध्यें उत्पन्न केलें पाहिजे. मद्यपाननिषेधाची प्रवृत्ति स्त्रियांच्या करवींच होईल असा प्रयत्न आश्रमानें केला पाहिजे. दारूची बाटली कुटुंबाचा आणि अब्रूचा नाश करते या दृष्टीनें त्यांनीं चळवळ करावी.

५. **हिंदीप्रचार** : हिंदीप्रचार ही आश्रमाची मुख्य प्रवृत्ति नसली तरी महत्त्वाची प्रवृत्ति असावी. आश्रमांतील सर्वांना उर्दूमिश्रित हिंदी समजणें व सामान्य हिंदी बोलतां येणें जरूरीचें आहे. विद्यार्थ्यांना हिंदी लिहितां वाचतां येणें आवश्यक आहे. इतर कामें संभाळून साधारणतः सहा महिन्यांत हिंदी शिकणें शक्य आहे.

आश्रमांत हिंदी वर्तमानपत्रें व मासिकें थोडीं तरी यावींत व पुस्तकालयांत चांगलीं चांगलीं हिंदी पुस्तकें असावींत.

समाजांत किंवा खेडेगांवांत हिंदीचा प्रचार करणें हें त्या कामासाठीं खास स्थापन केलेल्या संस्थेमार्फतच होणारें आहे. पण आश्रमानें हिंदीचें महत्त्व ओळखून तें समजावून देण्याचें काम अवश्य केलें पाहिजे. खेडेगांवांतून हिंदी साहित्य, वर्तमानपत्रें वगैरे मागविण्याची लोकांना गोडी लावावी. हिंदी भाषणें करवून स्वभाषेंतून त्याचा सारांश लोकांना सांगावा व शक्य झाल्यास खादी, मद्यपाननिषेध, कोर्टबाजीचा निषेध अशा एखाद्या विषयावर हिंदींत नाटक बसवून तें ठिकठिकाणीं करवून दाखवावें.

६. **लोकशिक्षण** : लोकशिक्षणाचें क्षेत्र अतिशय व्यापक आणि तितकेंच अस्पष्ट आहे. या क्षेत्रांत काय काय येत नाहीं हेंच ठरविणें कठीण. शाळेंत जाणाऱ्या अथवा जाण्यालायक अशा मुलामुलींचें शिक्षण अर्थात् निराळें. संस्थेंत जाऊन किंवा शिक्षकाकडे रोज बराचसा वेळ देऊन

घेतलें जाणारें प्रौढांचें शिक्षण हेंहि निराळें. उद्योगधंदा किंवा अशीच एखादी सांसारिक अथवा समाजसेवेची प्रवृत्ति ज्यांच्या मागें लागली आहे व पुरेसें शिक्षण योग्य वेळीं मिळालेलें नाहीं म्हणून ज्यांना सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, राजकीय आणि जागतिक प्रवृत्तींचें रहस्य कळणें कठीण जातें, अशा प्रौढ अथवा वृद्ध स्त्रीपुरुषांना तोंडी माहिती देऊन, पुस्तकें अथवा नियतकालिकें वाचून दाखवून, उत्सव, सभा, नाटकें, प्रदर्शनें, पदार्थसंग्रहालयें, यात्रा, जत्रा, इत्यादि प्रवृत्ती आणि चळवळींच्या द्वारां विविध विषयांची गोडी लावून त्यांच्यामध्यें सर्व प्रकारच्या ज्ञानाची आवड उत्पन्न करणें, त्यांना सामान्य ज्ञान देणें, सर्व प्रवृत्तींचा जबाबदारपणें विचार करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं आणणें व संघटित कामें करण्याची त्यांना संवय लावणें याचें नांव **लोकशिक्षण**. हें ठराविक पद्धतीनें देणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं. लोकशिक्षणासाठीं खास अध्यापक नेमणेंहि सोपें नाहीं. विविध विषयांची ज्याला गोडी आहे, सर्वकाळ स्वतःच्या ज्ञानांत जो भर टाकीत असतो, प्रजोपयोगी प्रत्येक माहितीविषयींचा ज्याचा रस नेहमीं ताजाच आहे, आणि पाण्याला ज्याप्रमाणें प्रत्येक खळगा भरून काढण्याचा हव्यास असतो त्याप्रमाणें सकल जनांना शहाणे करून सोडण्याची ज्याला अखंड तळमळ असते आणि ज्याचें लोकांवरील प्रेम ज्ञानविषयाच्या प्रेमाहून कमी नसतें अशा मनुष्यालाच **लोकशिक्षक** होतां येईल. शिक्षण कसें द्यावें, कोणत्या क्रमानें आणि कोणत्या प्रमाणांत द्यावें वगैरे गोष्टींची माहिती व हातोटी त्याच्या कळकळीमधून आणि तळमळीमधून त्याला आपोआप प्राप्त होईल. कित्येकांचा हा उपजत अंगस्वभावच असतो. असे शिक्षक वाटेवर पडले नाहींत; बाजारांत मिळत नाहींत; यांची नवीन परंपरा उत्पन्नच केली पाहिजे.

लोकांमध्यें भ्रम, आळस आणि संकुचितपणा खंडोगणती आहे,

व त्यामुळें देशाचें द्रव्यबळ व मनुष्यबळ नष्ट होऊं लागलें आहे. यासाठीं लोकशिक्षणाची परंपरा शक्य तितकी लवकर स्थापन केली पाहिजे. मॅजिक लँटर्न, सिनेमा, रेडिओ वगैरे आधुनिक साधनें या कामीं वापरण्याची सूचना करण्याचा आणि तीं वापरण्याचा मोह स्वाभाविक आहे. पण आजच्या स्थितींत हिंदुस्थानांतील खेड्यांना हीं साधनें दुष्प्राप्य तर आहेतच पण नुकसानकारकहि आहेत.

७. **स्वच्छता व आरोग्य** : आरोग्यसंवर्धन या विषयावर कांहीं विचार पूर्वीच येऊन गेले आहेत. पंचमहाभूतांचा योग्य तऱ्हेनें मुबलक उपयोग करून जनतेचें आरोग्य उत्तम रीतीनें साधतां येईल.

या बाबतींत कांहीं करण्याजोगें आहे आणि तें अत्यंत आवश्यक आहे हेंच खेड्यांतील लोकांना पटविणें कठीण! घातुक संवयींमुळें आणि बेफिकीरीमुळें मनुष्यहानि किती होते याची त्यांना कल्पनाच होत नाहीं. शौचाची व्यवस्था, पिण्यासाठीं व आंघोळीसाठीं पाणी स्वच्छ ठेवणें, घरांत हवा उजेड पुरेसा असणें, घरांतील कोठारांत आणि दुकानांतून स्वच्छता राखणें, सार्वजनिक जलाशयें, रस्ते, मंदिरें, धर्मशाळा, खानावळी वगैरेंची देखरेख करणें, भाजीपाला व फळफळावळ खाण्यालायक आहेत किंवा नाहींत याचा तपास करणें, वगैरे गोष्टी खेडेगांवांतूनहि झाल्या पाहिजेत.

आजाऱ्यांना औषधोपचार करणें हें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच त्यांची शुश्रूषा करणेंहि महत्त्वाचें आहे. लहान मुलांचे रोग, स्त्रियांचें बाळंतपण यांकडे विशेष लक्ष देणें आवश्यक आहे.

खेडेगांवांतून गुरांच्या आरोग्याची आबाळच होत असते. त्याविषयीं पुष्कळ करण्याजोगें आहे.

८. **खेडेगांवची पहाणी** : 'ग्रामोद्धारासाठीं जी प्रवृत्ति अत्यंत आवश्यक आहे व जिचा उपक्रम लोकांनीं अजून केलाच नाहीं असें म्हणतां येईल ती प्रवृत्ति म्हणजे खेडेगांवांची

पहाणी होय. ही पहाणी अनेक दृष्टींनीं करावयाची असते. शेतीला आणि मनुष्यवस्तीला पाण्याचा पुरवठा मुबलक आहे किंवा नाहीं, नसल्यास ही अडचण कशी दूर करितां येईल याची पहाणी झाली पाहिजे. कोठें कोठें जमिनीमध्यें जरूरीपेक्षां अधिक पाणी असतें व त्यामुळें शेती बिघडते व वस्तींत रोगराई पसरते. अशा ठिकाणीं पाणी कसें काढून लावावयाचें हा प्रश्न असतो. औद्योगिक सामर्थ्य म्हणून पाण्याच्या ओघाचा उपयोग करणें शक्य असल्यास त्या दृष्टीनें-हि पहाणी करणें इष्ट होईल. मात्र असे उद्योग समाजाच्या म्हणजे गांवाच्या मालकीचे असावेत.

शेतीचें उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनें पहाणी करणें कदाचित् सरकारलाच शक्य असेल. लोकांची आर्थिक स्थिति कशी आहे व खर्चांत काटकसर करणें कोठें कोठें शक्य आहे, त्याचप्रमाणें आजच्या स्थितींत उत्पन्न वाढविण्याच्या बाबी कोणत्या याची व्यावहारिक दृष्ट्या पहाणी झाली पाहिजे. हें काम सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे आणि लोकजागृतीसाठीं याचा उपयोगहि अधिकाधिक होणार आहे.

खेडेगांवांतील असंख्य उद्योगधंदे बसून गेले आहेत. तसेंच अनेक नवीन उद्योगधंदे खेडेगांवांत चालू करणें शक्य असून ते चालू झाले नाहींत. त्यांचीहि पहाणी झाली पाहिजे. नुसत्या पहाणीनें खेडेगांवांतील प्रजेचे डोळे उघडणें शक्य आहे.

पहाणीचें एक महत्त्वाचें क्षेत्र लोकांच्या नजरेंतून राहूनच गेलें आहे. खेडेगांवांतील लोक अधिकांश हिंदू आहेत; पण ते सर्वच कांहीं शास्त्रधर्म पाळीत नसतात. त्यांच्यामध्यें रूढ असलेल्या कल्पना, मान्यता, विचार व भ्रम हीं सर्व बऱ्याच अंशीं स्वतंत्र व स्वयंभू असतात. शास्त्रांत लिहिलेल्या गोष्टींसंबंधानें लोकांमध्यें आंधळी प्रामाण्यबुद्धि असते. पण शास्त्रधर्म समजून घेण्याची आणि त्याप्रमाणें वागण्याची उत्कंठा किंवा पर्वा समाजाला क्वचितच असते. ज्या

कल्पनांप्रमाणें लोक चालतात त्यांनाच जिवंत धर्म असें म्हणतां येईल. दीर्घकालीन रूढीनें दृढमूल झालेल्या या जिवंत लोकधर्मांच्या शाखा प्रशाखा अनंत आहेत. या लोकधर्मांचा वृक्ष सनातन अश्वत्थाएवढा मोठा आहे. त्याच्या विविध मुळांचा थांग लावणेंहि कठीण. शास्त्र-धर्मानें जिची उपेक्षा केली आहे, सनातन धर्माच्या संरक्षकांनीं जिला आर्यधर्मापासून आजवर जवळ जवळ वंचित ठेविलें आहे अशा या जनतेचें जीवनतत्त्वज्ञान काय आहे, तिच्यामध्यें कोणतें समाजशास्त्र प्रवर्ततें, लोकहृदयानें निर्माण केलेलें तिचें साहित्य काय आणि कसें आहे, लोकसंगीत, लोककला, यांचे राहिलेले अवशेष कोणत्या तोलाचे आहेत या सर्वांची पहाणी झाली पाहिजे. जनतेमध्यें या लोकसंस्कृतीचे प्रवाह कसे वहात आले आहेत अथवा संस्कृतींच्या धाग्यांची गुंतागुंत कशी झाली आहे हेंहि तपासलें पाहिजे.

वर्णव्यवस्था आजीविकेच्या धंद्यावर रचलेली आहे हें जरी खरें असलें तरी आज वरच्या गणल्या जाणाऱ्या जाती वर्णशून्य झाल्या आहेत. वाटेल त्यानें वाटेल तो धंदा करावा व असें करून इतरां-च्या पोटावर पाय द्यावा, अशी स्थिति झाली आहे. पण अशिक्षित खेडवळ श्रमजीवी आणि खालच्या गणल्या जाणाऱ्या जातींमध्यें धंद्याचा स्वधर्म अजून बऱ्याच अंशीं चालू आहे. या जाती परंपरा-गत धंद्याला चिकटून रहातात; आपआपल्या जातींचें स्थूळ असें संघटन टिकवून स्वतःच्या धंद्याला विहित अशी नीति व सदाचार यांचें पालन करितात; दुसऱ्याच्या धंद्यांत शिरून तेथें चढाओढ उत्पन्न करणें व मूळच्या धंदेवाइकांची जीवनयात्रा विषम करणें हें हीन व पापाचें समजतात. ही स्थिति खरोखर उच्च आहे. चढा-ओढीचा जीवनकलह कमी करून स्वधर्मपरायण सहकार सर्व जगांत चालू केला पाहिजे असें जगाच्या सर्व शहाण्या लोकांना वाटूं लागलें आहे. तेव्हां या दृष्टीनें खेडेगांवांतील समाजाची पहाणी करणें आव-

श्यक आहे. प्राचीन समाजाच्या भव्य इमारतीचा हा अवशिष्ट पण मजबूत पाया कायम राखून याचेवर कांहीं बांधकाम होणें शक्य आहे किंवा कसें अथवा या अवशेषाचा लोभ सोडून व इरादापूर्वक हा पायाहि खणून काढून सर्वच इमारत अगदीं नव्या पायावर नव्या नकाशाप्रमाणें उभी करावयाची कीं काय हें ठरविण्यासाठीं देखील कुशल समाजशास्त्र्याच्या नजरेनें देशाची पहाणी झाली पाहिजे.

सामाजिक परिवर्तन सर्वस्वी मनुष्याच्या इराद्याप्रमाणें होत नसतें. जुन्या संस्था मोडण्याचा प्रयत्न केला म्हणजेच त्या किती दृढमूल व जिवंत आहेत याची प्रतीति येते. समाजशास्त्र्यानें अर्थशास्त्र, कामशास्त्र व धर्मशास्त्र यांचा अभ्यास केलेला असलाच पाहिजे. शिवाय, लोकहृदयाची त्याला उत्तम जाणीव असली पाहिजे.

समाज ही ईश्वराची कृति आहे. त्याच्या व्यवस्थेंत हस्तक्षेप करावयाचा तो विचारपूर्वक जपून व नम्रतेनें केला पाहिजे. त्याबरोबरच ईश्वर आपल्यासारख्या माणसांच्या हातूनच स्वतःचीं कामें करवून घेत असतो हें ओळखून जें कांहीं करावयाचें तें आस्तिक व भक्त अशा कर्मयोग्याच्या दृढतेनें व उत्साहानें केलें पाहिजे.

जनसेवा दीर्घकाल केल्यानंतरच अशा प्रकारची पहाणी करण्याचा अधिकार आश्रमाला प्राप्त होईल. तोंपर्यंत येईल त्या संधीचा फायदा घेऊन थोडें थोडें निरीक्षण जागृतपणें करीत असावें.

९. **भाषासेवा :** एखाद्या भाषेची उन्नति करावयाची ती, ती भाषा बोलणाऱ्या समाजाच्या किंवा लोकांच्या उन्नतीवर अवलंबून असते. जंगलांतील कातवडी किंवा वड्डर लोकांच्या भाषेंतील दंतकथा व साहित्य एकत्र केलें, त्या भाषेचे कोष, व्याकरण, इत्यादि ग्रंथ तयार केले, त्या भाषेंतील शब्दसंग्रह वाढविण्यासाठीं त्या भाषेंत गोडपणें मिसळूं शकतील असे हजारो नवीन शब्द तयार केले, आणि त्या भाषेंत आधुनिक शास्त्रें आणि इतर सांस्कृतिक विषयांचे ग्रंथहि लिहून काढलें व या

ग्रंथांचीं ग्रंथालयें ठिकठिकाणीं काढून व त्यांची किंमत कमी ठेवून कातवडी साहित्य लोकसुलभ केलें अथवा घरोघर फुकट वाटलें, तरी कातवडी भाषेची उन्नति झाली असें म्हणतां यावयाचें नाहीं.

तेंच जर त्या लोकांसाठीं शाळा काढल्या, आश्रम काढले, त्यांत त्यांच्या मुलींना आणि मुलांना शिकविलें, तयार केलें, सुधारलेली शेती कशी करावी, व्यापारधंदा कसा करावा, उद्योगहुन्नर कसा वाढवावा, शिष्ट समाजांत कसें मिसळावें, सरकारदरबारांत प्रतिष्ठा कशी मिळवावी, प्रवास करून कायकाय पहावें, घरची रहाणीकरणी कशी सुधारावी, सुख कसें भोगावें, विविधप्रकारें पराक्रम कसा करावा, जीवनांतील सूक्ष्मातिसूक्ष्म रस कसे चाखावेत, व त्याविषयींचा आपला अनुभव दुसऱ्यापुढें व्यक्त कसा करावा अथवा पुढील पिढीसाठीं तो कसा संग्रहून ठेवावा, लोकांचीं हृदयें व बुद्धिमत्ता काबीज करून नव्यानव्या संघटना व नवींनवीं सामर्थ्यें कशीं तयार करावींत आणि विराट मानवसमाजांतील स्वतःचें स्थान ओळखून स्वतःच्या वैशिष्ट्यानुरूप आपल्याकडून मानवी संस्कृतींत भर कशी घालावी हें सर्व जर त्यांना कळलें, साधलें आणि अंगवळणी पडलें तर कातवडी किंवा वडुर भाषेची उन्नति बरीचशी आपोआपच होईल; व अशा उन्नत भाषेला ओप चढवून, तिला संस्कारी व संस्कारक्षम, तशीच वाढत्या अंगाची कशी करावयाची हें त्या लोकांना आपोआपच कळूं लागेल. भाषा ही जीवनाची पडछाया आहे. जीवन जर समृद्ध, संस्कारी, बलाढ्य आणि पराक्रमी तसेंच सर्व जगाला कल्याणमय व आशीर्वादरूप झालें तर भाषाहि तशीच होणार. जीवनसेवा हीच खरोखर भाषेची सेवा असें जरी काटेतोलपणें म्हणतां न आलें तरी जीवनसेवेंतच भाषेची मोठी सेवा येऊन जाते.

मला माझ्या भाषेची उन्नति करावयाची असेल तर ती बोलणाऱ्यांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करून मला तें साधावयाचें नाहीं.

निदान प्रथम प्रयत्न संख्या वाढविण्याचा नसावा. प्रथम माझी भाषा बोलणाऱ्या लोकांचें जीवन गौरवान्वित केलें पाहिजे. माझी भाषा व तिचें साहित्य आकर्षक झालीं पाहिजेत. माझी भाषा शिकणें म्हणजे विविध प्रकारची आणि अमर अशी संपत्ति जीमध्यें आहे अशा तिजोरीची किल्ली मिळविणें आहे असें लोकांना वाटूं लागलें पाहिजे. आणि फुलांच्या परिमलाला मोहून न बोलावतांहि अथवा प्रत्यक्ष निषेध केला असतांनाहि ज्याप्रमाणें भृंग पुनः पुनः आस्वाद घेण्यासाठीं येतातच, त्याप्रमाणें आपली भाषा व साहित्य अन्य लोकांना आपल्या परिमलावर मिलिंदायमान होण्यास लावो अशीच आपली महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. म्हणजे येथेंहि रचनात्मक कार्यच महत्त्वाचें ठरतें.

भाषेच्या सेवेचें खरें रहस्य भाषाभिमानांत नसून भाषाभक्तीमध्यें आहे हें ज्या दिवशीं आपल्याला समजेल त्या दिवशीं आपल्यामध्यें वृत्तीची आर्यता आली असें समजावें. अभिमानाच्या मुळाचा शोध करितां, तेथें दुर्बळतेचें सुप्त भान, तें झांकण्याची तळमळ, पुरुषार्थाचा अभाव, दुसऱ्याच्या पुरुषार्थानें स्वतः मोठे होण्याची अपेक्षा, पंगू स्वार्थ, वगैरे वगैरे दोष दिसून येतील. भक्ति ही याहून भिन्न वृत्ति आहे. अभिमानांत यथेच्छ प्रवृत्ति असली तरी प्रगति नसते. कारण अभिमान रजोगुणाचा द्योतक आहे. सात्विक भक्तींत शांति, समाधान, आणि तन्मयता, त्याचप्रमाणें उत्साह आणि प्रसन्नता असल्यानें प्रगति झपाट्यानें होते.

एवंच, सेवा हाच सामर्थ्याचा मूलमंत्र आहे; जीवनशक्ति हीच खरी शक्ति आहे आणि सुवासाचा प्रसार हेंच खरेंखुरें साम्राज्य आहे. हीं तीन तत्त्वें जर निःशंकपणें पटलीं आणि अमलांत आलीं तर बाकीच्या गोष्टी आपोआप स्पष्ट होऊन अनाठायीं खर्चल्या जाणाऱ्या शक्तीचा संग्रह होईल.

सर्व जगामध्यें सामान्य जनांना इतरे जन, प्राकृत लोक, कृपण, जड, वगैरे विशेषणें लावून त्यांना गुलामांप्रमाणें किंवा पशूंप्रमाणें लेखण्याचा एक मनु होऊन गेला. ' निर्बुद्ध हा पंडिताचा पशु होय ' अशीं वचनें जुन्या साहित्यांत सांपडतात. सामान्य लोक हे शिष्ट लोकांच्या उन्नतीच्या उपयोगी पडले म्हणजे त्यांचें जीवन कृतार्थ झालें असेंच मानण्यांत येत असे. सामान्य लोकांची भाषा, त्यांचे धर्मविचार, त्यांची रहाणी करणी, याविषयीं सार्वत्रिक अनादरच असे. जें शिष्टाचाराला सोडून तें सर्व जंगली, गांवढळ, असंस्कारी असेंच मानलें जात असे. खेडेगांवांपेक्षां शहरें चांगलीं, सामान्य लोकांपेक्षां द्विजवर्ण चांगला, लोकभाषेपेक्षां राजभाषा चांगली, प्राकृतापेक्षां संस्कृत थोर, अशी मान्यता सर्वत्र असल्यानें, या थोरपणाचेंच अनुकरण सर्वत्र होत असे. या सर्व वृत्तीला फिल्सुफीचा पाया देऊन हेंच यथायोग्य आहे असें म्हणणारे नीत्सेसारखे तत्त्वज्ञहि होऊन गेले. पण तो मनु आतां पालटला आहे. आतां सामान्यजनांचा देव जागृत झाला आहे. पुढारलेल्यांची संस्कृति पूर्णपणें वापरली गेल्यानें, तिच्यांतील सर्व सत्त्व चोखलें गेल्यानें, ती आतां क्षीणवीर्य वाटूं लागलेली आहे. आतां सामान्यांचें सामर्थ्य उदयास येऊं लागलेलें आहे. सामान्यांच्या जीवनामध्यें कृत्रिमतेला स्थान थोडें. जोमदारपणा, स्वाभाविकपणा आणि म्हणूनच टिकाऊपणा हे जे त्यांचे विशेष गुण ते आतां दिसूं लागले आहेत. सामान्य लोकांमध्यें स्वातंत्र्य, स्वत्वपरिचय, आणि संघबल हीं आपोआप येऊं लागलीं आहेत. याचा परिणाम भाषेवर झाल्यावांचून रहाणार नाहीं.

आजवर ब्राह्मणादि पांढरपेशा जातींच्या रहाणी करणीचें आणि विचारसरणीचें अनुसरण होत असे. ही पांढरपेशी संस्कृति बरीच बळावून शेवटीं अपेशी ठरली आहे. आतां श्रमपरायण आणि म्हणूनच सत्यपरायण अशा स्वावलंबी संस्कृतीचा युगारंभ झाला आहे. आतां

श्रमजीवी आणि म्हणूनच आस्तिक अशा लोकांकडे समाजाचा पुढाकार येणार आहे व त्यांची भाषा—त्यांची जोमदार घरगुती सरळ भाषा—हीच पुढें येणार आहे. ही गोष्ट ज्यांनीं ओळखली त्यांच्या हातूनच भाषेची यापुढील सेवा होणार आहे.

आपण कर्नाटकाचें उदाहरण घेऊं. कर्नाटकांतील निरक्षर जाती जितक्या जोमदार आहेत तितक्या शिष्ट जाती जोमदार दिसत नाहींत. शेतकरी, मजूर, आणि कारागीर यांच्यामध्यें केव्हांहि मनगटाचा जोर असल्यानें त्यांना स्वाभाविकपणें कसलीच चिंता नसते. त्यांच्या डोळ्यांत बेफिकीरीचें तेज असतें, त्यांच्या वागण्यांत दिलदारपणाची प्रौढी असते. अशांचें जीवन आंत घुसून तपासलें पाहिजे. त्यांना प्रेरणा देणारीं तत्त्वें कोणतीं याचा ठाव पाहिला पाहिजे. त्यांच्यामध्यें जें साधेंभोळें लोक साहित्य प्रचलित असेल त्याचा संग्रह केला पाहिजे. त्यांचा शब्द संग्रह, त्यांचे वाक्प्रचार, त्यांच्या म्हणी, त्यांच्या विचारशृंखलेची लकब या सर्व गोष्टींचें श्रद्धापूर्वक अध्ययन झालें पाहिजे. प्रथम प्रथम शिष्ट-समुदाय या प्रवृत्तीला आंबटशोक्याचा रिकामटेकडा धंदा मानतील. पण आपल्याजवळ जर खऱ्या संस्कृतीची कसोटी असेल, भविष्य-कालीन प्रगतीची दृष्टि असेल, तर लोकवाणीचा आपण जो संग्रह करूं त्यांत आपल्या या नवीन दिव्य दृष्टीचें पाणी आपोआप पोहोंचेल आणि मग लोकांना स्वतःच्या जीवनांत एक नवीनच चमक असल्याचा आत्मसाक्षात्कार होईल.

हिंदुस्थानामध्यें क्षात्रधर्मी जाती पुष्कळ होत्या व आहेत. त्यांचा पराक्रम, त्यांचें प्राणार्पण व त्यांचे कुलधर्म हे आपल्याला केव्हांहि आदरणीयच असणार. पण आपण हें विसरतां कामा नये कीं या एवढ्या जाती वगळल्या म्हणजे बाकीचे लोक क्षात्रधर्माची कितीहि तारीफ करणारे असले तरी जीवनानें अहिंसकच आहेत असें आपल्याला दिसून येईल. हिंदुस्थानांतील सामान्य प्रजेंत जें तत्त्वज्ञान

मुरलेलें आहे तेंहि अहिंसापूजकच आहे. वैष्णव धर्म घ्या अथवा बौद्ध धर्म घ्या, जैन धर्म घ्या अथवा वीरशैवांचा लिंगायत धर्म घ्या, भक्तिसांप्रदाय घ्या अथवा मानभावी सांप्रदाय घ्या, कबीर सांप्रदाय घ्या अथवा वारकरी सांप्रदाय घ्या, सर्वत्र अहिंसेलाच प्राधान्य दिलेलें आहे. या अहिंसेचा उपयोग कसा करावा, तींत असलेलें तेज कसें ओळखावें व पाजळावें याची माहिती नसल्यानें कांहीं लोकांनीं हिंदुस्थानच्या या राष्ट्रीय स्वभावास पुळचटपणा ठरवून देशाची ही शरम धुवून काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असा आग्रह चालविला. राष्ट्राच्या सनातन स्वभावाची लाज वाटूं लागल्या-नंतर राष्ट्राचें सामर्थ्य संघटित तें कसें व्हावें ?

आतां आपण जैन, लिंगायत, वैष्णव, इत्यादि धर्मसांप्रदायांचा नवीन दृष्टीनें अभ्यास केला पाहिजे. त्यांतील जुनीं भांडणें मढ्या-प्रमाणें उकरून काढून नवीन नवीन पक्ष पाडण्याचा आणि समा-जाला छिन्नभिन्न करण्याचा समाजद्रोही मूर्खपणा टाळून भविष्याची दृष्टि सर्वत्र कायम ठेविली पाहिजे.

सर्व जनता—विशेषतः ग्रामनिवासी जनता—उत्सव, यात्रा, जत्रा, उरूस, मेळा वगैरे प्रसंगीं एकत्र होऊन स्वतःच्या जीवनाची उजळणी करीत असते. तेथें जाऊन, लोकहृदय तपासून, अशा संमेलनप्रसं-गाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें संशोधन करून, त्यांतील सदंश नव्या दृष्टीनें लोकांपुढें मांडला पाहिजे. भविष्यकालीन संस्कृ-तीचें चित्र जर आपल्या डोळ्यांपुढें स्पष्ट असेल तरच जुन्यांतील पोषक सदंश आपल्याला अचूक सांपडेल, आणि त्याचें चीज कसें करावें हेंहि आपल्याला समजेल. अशा रीतीची नव्या पद्धतीची समाजसेवा सुरू केली व त्यासाठीं जोमदार सामान्य वर्गांत आपण मिसळूं लागलों म्हणजे आपल्या हातून भाषेची मौलिक सेवा घडेल इतकेंच नव्हे तर सत्य, अहिंसा, सरळपणा आणि शुभाशंसा हाच

जिचा प्लॅन आहे अशी नवी भाषाशैली आपल्या हातून निर्माण होईल. या नव्या युगाची भाषणशैली नवीन, लेखनशैली नवीन, वक्तृत्व नवीन आणि कविताहि नवीनच असणार. आणि या नव्या कवितेचे छंद, तिचे अलंकार आणि तिची धाटी-रीती सर्व कांहीं नवीन आहे असा आपल्याला अनुभव येईल. सर्व प्रकारची संस्कारिता यांत असूनहि अवडंबर नसल्यानें या सर्व गोष्टी लोकग्राह्य व लोकसुलभ होतील. या नव्या संस्कृतीचा पाया हिंदुस्थानाएवढा विशाळ झाल्यानें हिचें शिखर हिमालयांतील तुंगोत्तुंग शिखरांना सहज लाजवील यांत शंका कसची !

* * * *

येथवर ज्या प्रवृत्ती सांगितल्या त्यांहून ग्रामसेवा कांहीं निराळी नाहीं. पण त्यांतल्यात्यांत गांवांतील लोकांशीं मिसळणें, त्यांचीं सुखदुःखें समजून घेणें, सार्वजनिक हिताचीं कामें सर्वांच्या संघटित शक्तीनें करण्याचा उपक्रम करणें, लोकांना हवी असलेली माहिती, दुष्प्राप्य साधनें, सामान्य औषधें वगैरे मिळवून देणें, लोकांचा उत्साह आणि पुरुषार्थ वाढेल त्याप्रमाणें त्यांना तज्ज्ञ सेवक तयार करून पुरविणें, ग्रामाचा संबंध सर्व देशाशीं असल्यानें देशांतील सर्व प्रवृत्ती ग्रामवासीयांना समजावून देणें व ग्रामाचें देशाशीं अनुसंधान घडवून आणणें, या सर्व गोष्टी ग्रामसेवेंत येतात. भिन्न धर्मांचे, भिन्न जातींचे व निरनिराळ्या धंद्यांचे लोक गुण्यागोविंदानें रहातील व त्यांचे तंटे व मतभेद कौटुंबिक न्यायानें सलोख्यानें मिटतील व समाजामध्यें प्रजाकीय अस्मिता व सामुदायिक जबाबदारी उत्पन्न होईल, इतकें तरी ग्रामसेवेनें साधलें पाहिजे. आणि लोकशिक्षणाचें काम तर अखंड चालू असलेंच पाहिजे; त्याला कोणतीच मर्यादा नाहीं. सरतेशेवटीं सर्व सामाजिक दुःखें व अन्याय दूर करण्याचें एकमात्र साधन म्हणजे लोकशिक्षण व लोकसेवा हेंच आहे,

असा सर्व जगास अनुभव होणार आहे.

सेवक जनतेशीं सेवेनें एकरूप झाला आणि दीर्घदर्शी उच्च ज्ञानानें तटस्थ व अलिप्त राहिला म्हणजे त्यानें व्यक्तिगत व सामाजिक मोक्ष मिळविला.

## आश्रमांत दाखल होण्याऱ्या विद्यार्थ्यांची पूर्वतयारी.

ज्या संस्थेनें जीवनाच्या सर्व अंगप्रत्यंगांची जबाबदारी स्वतःकडे घेतली आहे व ज्या संस्थेंत सेवेची दीक्षा घेतलेलीं कुटुंबेंच रहाणार आहेत तेथें विद्यार्थ्यांच्या वयोमर्यादेचा प्रश्न उत्पन्नच होत नाहीं. संस्थेंत युवान, युवती, बायका, मुलें, मुली सर्वच असणार. त्यांना शिक्षणासाठीं बाहेर पाठविणें म्हणजे आश्रमजीवन व आश्रमशिक्षण अपूर्ण आहेत अशी कबूली देण्यासारखें आहे. बाह्य जगाचा अनुभव घेण्यासाठीं आणि एखाद्या विद्येंत किंवा कलेंत निपुण होण्यासाठीं बाहेर जाणें योग्य आणि आवश्यक आहे. पण जीवनाचें शिक्षण प्रथमपासून सर्वच आश्रमांत होत असलें पाहिजे. तेव्हां विद्यार्थ्यांच्या पूर्वतयारीचा प्रश्न वास्तविक उद्भवतच नाहीं. आश्रमांतील मुलांमुलीं-साठीं जी कांहीं शिक्षणाची सोय व पद्धति ठरलेली असेल तिचा लाभ अधिकाधिक मुलांमुलींना मिळणें हें आश्रमाच्या मुलांच्या विकासाच्या दृष्टीनें व शक्तीच्या व्ययाचा पूरापूर फायदा घेण्याच्या दृष्टीनें इष्टच आहे.

तरी तात्कालिक समाजसेवा हा आश्रमाचा मुख्य उद्देश असल्यानें प्रौढ तरुणांची संख्या आश्रमांत अधिक असणें व त्यांना सेवेचें शिक्षण देण्याची विशेष व्यवस्था करणें स्वाभाविक आहे. अशा विद्यार्थ्यांची पूर्वतयारी किती असावी याचा विचार अवश्य कर्तव्य आहे.

वयाच्या बाजूनें विचार करितां अनुभव असें सांगतो कीं चौदा वर्षांच्या आंतील मुलें संस्कार घेण्यांत जितकी पटाईत असतात,

तितकीच संस्कार सोडून देण्यांतहि तीं तरबेज असतात. यासाठीं पंधरा वर्षांच्या आंतील मुलांना सेवा-विद्यार्थी म्हणून घेऊं नये.

समाजसेवेच्या तांतडीच्या दृष्टीनेंहि सोळा ते अठरा वर्षांचे विद्यार्थी घेतल्यास एकदोन वर्षांत ते तयार होऊं शकतात व सेवेचीं कामें त्यांना सोंपविणें शक्य होतें.

खर्चाच्या दृष्टीनें पहातां ज्याप्रमाणें शहरांत लहान वासरांचे बैल करणें खर्चाचें होतें व खेडेगांवांतून तयार बैल आणणेंच स्वस्त पडतें, त्याचप्रमाणें मुलें सोळा सतरा वर्षांपर्यंत आईबापांकडे किंवा नातलगांकडे राहिलीं तर त्यांचें शिक्षण कमी खर्चांत होतें.

आश्रमाच्या गृह्य प्रवृत्तींच्या दृष्टीनें देखील ज्या वयांत तरुण स्वत:चा भार स्वतः संभाळून उत्साहपूर्वक व जबाबदारीपूर्वक दुसऱ्याच्या मदतीस जाऊं शकतात त्या वयांतच त्यांना आश्रमांत घेतलेलें बरें. लहान मुलांचा सांभाळ हें गृह्य प्रवृत्तींत अवधानाच्या दृष्टीनें मोठें खर्चाचें खातें असतें.

विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनेंहि आईबापांची सत्ता, आशा व आर्थिक जबाबदारी सेवाशिक्षणास बाधक न होतील असेंच वय विद्यार्थ्यांचें असलेलें बरें. याहि दृष्टीनें सोळा ते आठरा हेंच वय योग्य आहे.

सर्व पुरुषार्थांचें मूळ जें ब्रह्मचर्य त्या ब्रह्मचर्याच्या दृष्टीनेंहि विद्यार्थी सोळाव्या वर्षाच्या आसपास आश्रमाच्या प्रभेनें प्रभावित होणें सर्वथा इष्ट आहे.

विवाहशृंखलेतून तरुणांना वांचविण्याचें काम आश्रमानें करावयाचें असल्यास आजचा मनु सोळा वर्षांचें वयच पसंत करील.

अशा रीतीनें व इतक्या दृष्टींनीं विद्यार्थी पसंत करण्याचें ठरविल्यानंतर त्यांची पूर्वतयारी किती असावी—अथवा खरें म्हणावयाचें तर, सामान्यपणें किती असते—याचा विचार करणें शक्य आहे. कारण

आश्रमानें ठरविलेली तयारी इरादापूर्वक करून मगच विद्यार्थी आश्रमाकडे येतील हें कमी संभवतें.

१. विद्यार्थी अविवाहित असावा. त्याचा कोठें वाङ्‌निश्चय झालेला असल्यास तो विधिपुरस्सर रद्द करवून घ्यावा.

२. विद्यार्थ्याच्या डोक्यावर कर्जाचें ओझें नसावें. विद्यार्थ्यावर ज्यांचा नैतिक, सामाजिक अथवा कायदेशीर तावा असेल त्यांच्याकडून हें स्पष्ट करून घ्यावें कीं, विद्यार्थी सेवामय अकिंचन जीवन पसंत करीत आहे व याचा विरोध त्यांच्याकडून उरला नाहीं.

३. जेणेंकरून त्याच्या हातून फारशी समाजसेवा होणार नाहीं असा रोग किंवा व्यसन विद्यार्थ्याला नसावें. आळस व ऐतोबापणा आणि छानछोकी व वावदूकपणा जर दृढमूल असतील तर त्यांचीहि रोग किंवा व्यसनांतच गणना करावी.

४. थंड पाण्याची आंघोळ व स्वतःचीं कामें स्वतः करण्याची संवय, दोन वेळच्या भोजनांनीं संतोष, सोवळेंओवळें, शिवाशीव वगैरे बाबतींत मनाचा आधुनिक उदारपणा, स्वच्छतेची, टापटिपीची आणि अंगमेहनतीची आवड, तसेच सर्व प्रकारचा साधेपणा हीं त्याच्या ठिकाणीं अवश्य असावींत.

५. स्वभाषेचा चांगला परिचय, गणिताचें सामान्य ज्ञान, भुगोलाची चांगलीशी माहिती, हिंदुस्थानांतील प्रमुख धर्मांची व सामाजिक रीतीरिवाजांची थोडीथोडी माहिती, एवढी तयारी असल्यास विशेष चांगलें. उच्चार, पठनशक्ति व अक्षर हीं चांगलीं असावींत.

मराठी ग्रंथ संग्र
स्थळ प्रत
सं.
ता.

## दोन प्रश्न

( १ ) खेडेगांवांमध्यें लोकसेवा करण्याच्या दृष्टीनें प्रारंभीं कोणतीं कामें हातीं घेण्याची तुम्ही शिफारस कराल ?

( अ ) खेडेगांवीं लागणाऱ्या किराण्या व इतर मालाचें एक दुकान नीट चालवून लोकांच्या सेवेला प्रारंभ करितां येईल. माल स्वच्छ, चांगला व स्वस्त म्हणजे फारसा फायदा न घेतां विकण्याचें काम या दुकानामार्फत केलें जावें. ज्या वस्तू लोकांच्या आरोग्यास किंवा नीतीस हानिकारक असतील त्यांचा खप या रीतीनें गांवांमध्यें हळूहळू कमी करितां येईल.

( आ ) लोकांना पत्रें वगैरे लिहून देण्याचें काम मोफत व काळजीपूर्वक केलें, तर त्यायोगेंहि लोकांच्या उपयोगी पडतां येईल. पण हें काम सेवकाला अंगभर पुरणें शक्य नाहीं.

( इ ) गांवांतील आजारी लोकांची शुश्रूषा करण्याची संधि केव्हांहि वाया जाऊं देतां कामा नये.

( ई ) लोकांना आपले कपडे— विशेषतः अंथरुणें पांघरुणें— उन्हामध्यें घालून सुकविण्याचें महत्त्व समजावून दिलें पाहिजे.

हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, खेडेगांवांतील संपत्ति आणि समृद्धि जशी शहरांत जाते, त्याचप्रमाणें त्यांच्या मागोमाग खेडेगांवांतील बुद्धिमत्ता, कर्तबगारी आणि म्हणून जबाबदारी यांचा ओघ आपोआप शहराकडेच वळतो; आणि केवळ अज्ञान, आळस, उठवळपणा, संकुचितता आणि गरीबांना नाडणारी दुर्जनता यांचाच गाळ मागें राहतो. अशा रीतीनें जीवनकलह बिकट आणि संकटमय झाल्यानें निर्दय धूर्तता आणि दास्यसहज निर्दयता यांच्या जोरानें खेड्यांत पक्षापक्षी माजून रहाते. पक्षापक्षीच्या भोंवऱ्यांत एकदां

समाज सांपडला म्हणजे आर्यत्व नष्ट झालेंच म्हणून समजावें.

( २ ) पतपेढ्यांसंबंधानें तुमचा काय अभिप्राय आहे ?

सावकार आणि कर्ज यांचा विचार केल्यानंतर पतपेढ्यांचा विचार करण्याचें फारसें रहात नाहीं. पतपेढ्यांची कल्पना उत्कृष्ट आहे; पण त्या सरकारी सहाय्यानें सुरू होतां कामा नयेत. लोकजीवनामधूनच त्यांचा उगम झाला पाहिजे. खेडेगांवांतील भांडवल खेडेगांवांतच राहील याची काळजी घेतली पाहिजे. शहरांतील भांडवल खेडेगांवांत येऊन व्याज उकळून शहरांत परत जातें. ही स्थिति घातुक आहे. जमिनीचा मालक कायमचा शहरवासी असणें हें जितकें वाईट आहे तितकेंच शहरी भांडवलानें बांडगुळाप्रमाणें खेडेगांवांतील व्यवहारावर पुष्ट होणें हेंहि वाईट आहे. खेडेगांवांत वापरलें जाणारें भांडवल खेडेगांवांतच स्थायी होईल तर तें आशीर्वादरूप होईल.

पतपेढ्या या जीवनपेढ्या झाल्या, अर्थात् शेतकऱ्यांचे व्यापक उद्देशाचे संघ स्थापन होऊन त्यांच्यामध्यें जीवनसंबंध उत्पन्न झाला, तरच परस्पर सहकाराचें तत्त्व कामधेनूप्रमाणें फळ देईल. आज सरकाराकडून जी मदत मिळते ती पेढ्यांच्या सभासदांच्या जीवनशुद्धीमधून, व्यवहारशुद्धीमधून आणि जीवनाच्या ओतप्रोतपणामधून मिळाली पाहिजे. असें न झालें तर दोन सावकारांपैकीं कमी व्याजाच्या दरानें पैसे कर्जाऊ देणाऱ्याचें भांडवल जसें अचूक बुडतें त्याप्रमाणेंच या पेढ्यांचेंहि व्हावयाचें; व पेढ्यांमधून लफंगे लोक शिरून प्रथम वशिलाबाजी व पुढें दगाबाजी चालावयाची. आणि सरकारची मदत कुचकामाची ठरून उलट लोकांचा खाजगी व्यवहार हांजीहांजीखोर लोकांच्या तावडींत जावयाचा.

ज्यांचें उत्पन्न व खर्च दोन्हीं सरकारच्या किंवा सरकारवजा एखाद्या जबरदस्त संस्थेच्या ताब्यांत असतील तेथें परस्पर-सहकारी पतपेढ्यांची पद्धति यशस्वी झालेली दिसत असल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं.

---

# खेडेगावांच्या पुनरुज्जीवनाचे प्रश्न[1]

## १. दारिद्र्य

कारणें:—

१ भांडवल आणि मशागत यांच्या अभावीं शेतीची उपज अगदीं निकृष्ट होणें.

( सा ) वाईट आऊतें.

( री ) गुराढोरांची दुर्बलता.

( ग ) अपुरें खत.

( म ) बियांची उत्तम निवड न करणें.

( प ) वर्षानुवर्ष तेंच तेंच पीक घेणें.

( ध ) पाण्याचा मुबलक पुरवठा नसल्यानें आलटून पालटून पिकें घेण्याकडे दुर्लक्ष.

( नी ) हातांत पैसा नसल्यानें व कर्जाऊ पैसे काढण्याची बरोबर सोय नसल्यानें शेतीच्या महत्त्वाच्या क्रिया वेळच्यावेळीं करितां न येणें.

२. प्राप्ति होण्याचा संभवच नाहीं अशी लहान लहान शेतें. ( प्राप्ति होण्याजोगी शेताची व्याख्या—सामान्य कुटुंबाचा चरितार्थ चालेल आणि बैलाच्या एका जोडीला वर्षभर पुरेसें काम मिळेल एवढें जें शेत तें प्राप्तीलायक शेत economic holding असें म्हणावें. )

---

१ खेडेगांवच्या पुनरुज्जीवनाच्या प्रश्नावर विस्तृत निबंधमाला लिहावयाची होती. पण तितका अवकाश मिळाला नाहीं. तेव्हां शेवटीं या प्रश्नांचें एक सूचक टांचण देऊनच येथें संतोष मानावा लागतो. हें टांचण तयार करतांना लोकजीवनाच्या अंगोपांगांची ज्यांच्याशीं अहर्निश चर्चा केली आहे असे माझे मित्र श्री. नरहरिभाई परीख यांचें एक कामचलाऊ टांचण आमच्या हातीं होतें, हें येथें नमूद केलें पाहिजे.

३. कौटुंबिक वाटणीमुळें अथवा अशा दुसऱ्या कारणांमुळें शेताचे तुकडे पडणें. असे तुकडे पडल्यानें वेळेचा दुर्व्यय होतो, आणि फुटक्या भांड्यांतून ज्याप्रमाणें पाणी गळून जातें त्याप्रमाणें बरीचशी मजूरी फुकट जाते.

४. काळीचा ( जमिनीचा ) बराच मोठा भाग जातीनें शेती न करणाऱ्या पांढरपेशांच्या ताब्यांत असणें.

अशा जमिनीकडे सामान्यतः दुर्लक्षच होतें. जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्याला स्वामित्वाच्या अभावीं कसून मशागत करण्याविषयीं उत्साह बेताचाच असतो.

वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळें शेतीचा खर्च वाढतो. त्यामुळें शेतीचा धंदा फायदेशीर पडत नाहीं.

याचा उपाय म्हणजे वरील कारणें दूर करणें हा होय.

## २. कर्जबाजारीपणा.

शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा सामान्यपणें वाटतो त्याहून बराच अधिक आहे. हिंदुस्थानांतील खालसा मुलुखांतील शेतकऱ्यांवर असलेलें कर्जाचें ओझें सहाशें कोटीपासून एक हजार कोटीपर्यंत असावें असा अंदाज आहे. म्हणजे कर्जाचें ओझें दर एकरीं तीस ते चाळीस रुपये सरासरी झालें. याचीं कारणें:—

( १ ) सामान्य कुटुंबाच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी नसणें. अर्थात् खर्चाच्या मानानें उत्पन्न पुरें पडत नाहीं.

( २ ) खेडेगांवांत चालणाऱ्या उद्योगहुन्नरांचा नाश. यामुळें—

( अ ) वर्षातून चार पांच महिने सक्तीची बेकारी सहन करावी लागते. याचा अर्थ असा नव्हे कीं, चार पांच महिने मुळींच काम नसतें. पण सात महिन्यांत होणारें काम रेंगाळत रेंगाळत वर्षभर केलें जातें. बेकारीचे दिवस कमीअधिक प्रमाणानें सबंध वर्षांवर

वाटले जातात. असें नसतें तर शेतकरी मजुरी (रोजगार) साठीं चार पांच महिने कसब्यांतून आणि शहरांतून तरी जाऊन आला असता. आजच्या परिस्थितींत शेतकऱ्याला शेतांत पुरेसें कामहि नाहीं आणि शेती सोडून जाणेंहि शक्य नाहीं. अशी दुःस्थिति प्राप्त झाली आहे.

(री) अंगभर काम नसल्यानें शेतकरी शहरांतील आणि परदेशांतील भांडवलवाल्यांच्या आहारीं पडतो. त्यांचा तो नेहमीं ओशाळलेला असल्याकारणानें ते लादतील त्या शर्ती त्याला स्वीकाराव्या लागतात; व अशा रीतीनें तो त्यांच्याकडून पिळला जातो.

(ग) बेकारांची संख्या वाढली म्हणजे खाणाऱ्या तोंडांचें ओझें जमिनीवर पडतें.

(३) सरकारी करांचें प्रमाण बेसुमार आहे आणि कर वसूल करण्याची पद्धत कडक आणि निर्दय आहे. शेतीचें पीक शेतकऱ्याच्या घरीं येऊन पडण्यापूर्वींच सारावसुलीची तारीख नेमण्यांत येते.

(४) तंबाखू, गांजा, अफू, ताडी, माडी, दारू वगैरे व्यसनें.

(५) कोर्टबाजी.

(६) सावकाराकडून घेतला जाणारा व्याजाचा जबरदस्त दर आणि लबाडीचा व्यवहार. या व्याजाच्या जबरदस्त दराचीं कारणें तीनः—

(सा) व्याजीं लाविलेले पैसे बुडण्याची भीति.

(री) खेडेगांवांतील बरेचसें भांडवल शहरांकडे वाहून गेलेलें आहे.

(ग) हिंदुस्थानच्या संपत्तीला स्राव (drain) लागला आहे.

या बाबतींत खालील गोष्टींचा ऊहापोह होणें जरूरीचें आहे.

१ शेतकऱ्यांचा बचाव म्हणून सरकारनें जे शेतसाऱ्याचे कायदे केले ते सर्व निष्फळ गेले आहेत. एवढेंच नव्हे तर, या कायद्यांच्या योगानें शेतकऱ्यांची स्थिति उलट हलाखीची झाली आहे.

२ सरकारकडून शेतकऱ्यांना देण्यांत येणारें तगाई-कर्ज.

३ सहकारी पतपेढ्यांचा कारभार आणि त्यापासून होणारे परिणाम.

४ अब्रूदार आणि प्रामाणिक सावकारांचा खेड्यांतील अभाव. चांगले सावकार खेडीं सोडून शहराकडे गेले आहेत. किंवा खरा सावकारधर्म सोडून पैसे उकळणारे व्याजखोर झाले आहेत.

याच ठिकाणीं स्वदेशी स्थानिक पेढ्यांचें आणि खऱ्या सावकारीचें पुनर्जीवन कितपत शक्य आहे याचा ऊहापोह केला पाहिजे. Rural banks म्हणजे जमीन गहाण घेणाऱ्या बँका स्थापन केल्यापासून शेतकऱ्यांना कितपत मदत होण्याचा संभव आहे याचीहि याच ठिकाणीं चर्चा केली पाहिजे.

( ७ ) पैशाच्या बाबतींत कुटुंबाला पेंचांत आणणारे सामाजिक रिवाज.

हुंडा व इतर लग्नखर्च, मरणोत्तर भोजनें, बायको विकत घेणें वगैरे बाबतींत होणारा खर्च, कुटुंबाच्या जुन्या किंवा काल्पनिक प्रतिष्ठेच्या धोरणानें केला जातो. आणि तो आजच्या आर्थिक स्थितीला मुळींच झेपत नाहीं. या कारणानें किती तरी कुटुंबें कर्ज-बाजारी होऊन धुळीस मिळालीं आहेत.

( ८ ) हिंवताप ( Malaria ) आणि अशाच इतर रोगांना दरवर्षी कुटुंबांतून बरींच माणसें बळी पडतात, आणि या संख्येच्या दसपट लोक प्रत्यक्ष मरून न गेले तरी शेतीच्या कामीं कुचकामाचे होतात.

इलाज:—

१ शेतीची सुधारणा.

२ खेडेगांवांतील उद्योगधंद्यांचें पुनर्जीवन.

३ शेतकऱ्याला त्याच्या परिस्थितीचें आणि विशेषतः आर्थिक स्थितीचें आकड्यांच्या पुराव्यानिशीं यथार्थ ज्ञान करून देणें.

सामान्यपणें वर सांगितलेलीं कारणें दूर करणें.

४ याच पोटीं शेतकऱ्यांवर असलेला आजचा कर्जाचा बोजा सूट देऊन आणि हप्तेबंदी करून देऊन दूर केला पाहिजे.

५ शेती न करणाऱ्या पांढरपेशा खातेदारांचा आणि जमीन-दारांचा जमिनीवर हक्क खरोखर कितपत पोहोंचतो याचा तपास होऊन या मालकीहक्काला बराचसा आळा बसला पाहिजे.

जमिनीच्या मालकीहक्काबरोबर योग्य जबाबदारीहि लावून दिली पाहिजे.

### ३. खेडेगांवांतील उद्योगधंदे.

( १ ) **खादी** : सक्तीची बेकारी दूर करण्याचा सार्वभौम आणि रामबाण इलाज.

( २ ) **गुराढोरांची जोपासना आणि संवर्धन:** शेतकऱ्यांनीं हा धंदा जवळजवळ सोडूनच दिला आहे. म्हशी बाळगण्याचा रिवाज वाढल्यामुळें दूध तूप मिळतें खरें, पण जमिनीची मशागत करण्यास लागणारे बैल माल घरीं तयार होत नाहींत. आणि रेड्यांचा फारसा उपयोग नसल्याकारणानें प्रथमपासून त्यांच्याकडे दुर्लक्ष होतें आणि ते लहानपणींच मरतात. म्हशींच्या ऐवजीं चांगल्या गाई बाळगल्यास घरीं दूध तूप होऊन घरच्या घरीं बैलहि होतील. आज-काल बैल अधिकाधिक महाग होऊं लागले आहेत. आणि चांगले बैल विकत घेणें हें सामान्य शेतकऱ्याच्या ऐपतीबाहेरचें झालें आहे.

( ३ ) **कुंभाराचा धंदा** : टिनचे पत्रे परदेशांतून येऊं लागल्या-

मुळें घराचीं छपरें आणि घरांत माल सांठवून ठेवण्याचीं साधनें अशा पत्र्यांचींच होऊं लागलीं आहेत. परिणामीं, कुंभाराचा धंदा बसला; आणि त्यांना आजीविकेसाठीं प्रत्यक्ष शेतींत पडावें लागलें. अशा रीतीनें जमिनीवरचा बोजा वाढला आहे.

( ४ ) **कातडीं कमावण्याचा धंदा :** या धंद्यांत पुष्कळ सुधारणा होणें आवश्यक आहे. अशी सुधारणा झाली, म्हणजे खेडेगांवांतील चांभाराचें जीवन सुधारेल, गोरक्षेला मदत होईल आणि त्याचा फायदा शेतकऱ्यालाहि मिळेल.

( ५ ) **कापसांतील सरकी काढणें आणि तेली बियांतून तेल काढणें :** गिरण्या स्थापन झाल्यापासून खेडेगांवांतील हे दोन्ही धंदे बुडाले आहेत.

दरेक शेतकऱ्यानें तेलाचा घाणा घरीं चालू ठेवणें शक्य नसल्यास निदान दोघाचौघां शेतकऱ्यांनीं मिळून समाईक घाणा ठेवावा, व दरेकानें आपल्या घरच्या बैलामार्फत किंवा रेड्यामार्फत तो चालवून घरच्या तेली बियांचें तेल व पेंड घरींच तयार करावीत. घरीं वापरून उरेल तो माल विकावा. या रीतीनें हें काम गिरणीहून स्वस्त पडेल. कारण सर्वच घरचें : कच्चा माल, साधनें, मजूरी, देखरेख.

( ६ ) **दळणकांडण :** तांदूळ कांडण्याच्या आणि पीठ दळण्याच्या गिरण्या आल्यानें दळणकांडण करणाऱ्या बायाबापड्यांच्या तोंडचा घांस काढून घेतला गेला आहे. व या धंद्याऐवजीं या अनाथ विधवांना दुसरा कोणताच धंदा न मिळाल्यानें त्यांना मृत्यूची वाट दाखविल्यासारखें झालें आहे.

( ७ ) **शेती व वाहतुक :** पाणी काढण्याचे पंप, जमीन नांगरण्याचे ट्रॅक्टर्स, आणि मोटारचे खटारे यांच्या योगानें खेडेगांवांतील वहातुकीचा धंदा बुडाला व त्यामुळें शेतीसाठीं बाळगलेल्या बैलांचा रिकाम्या दिवसांचा खर्च देखील शेतीवरच पडूं लागला आहे. शेतीमध्यें मजूरी

करणारे शेतकरी व बैल दोघांवर सक्तीची बेकारी येऊन पडल्यामुळें शेतकीच्या धंद्यांत किफायत मुळींच न राहून तो उलट आंतबट्ट्याचा धंदा झाला आहे.

याच प्रकरणीं कोंबड्या, बदकें वगैरे पाळणें, मधमाशा पाळून कृत्रिम पोळ्यांतून मध तयार करणें, बांबूकाम, वेतकाम, रेशमाची पैदास, काशिद्याचें काम, जरीचें काम, इत्यादि झोपडींत चालण्याजोग्या कितीतरी धंद्यांचा विचार करितां येईल.

## ४ स्वच्छता आणि आरोग्य.

( १ ) घरच्या आणि विहिरी तलाव वगैरेंच्या आसपासची घाण व चिखल दूर करणें.

उघड्यावर शौचास जाणें आणि मळ मातीनें झांकून न टाकतां हवा आणि पाणी दोन्हीं बिघडविण्यासाठीं त्याला तसाच उघडा राहूं देणें ही आजची स्थिति आहे. या स्थितींत योग्य सुधारणा केल्यास स्वच्छता आणि आरोग्य दोन्हीं सुधारतील व अत्यंत किंमती असें खत मिळेल.

( २ ) दिव्यासाठीं रॉकेलच्या भुसभुशा चिमण्या वापरणें. याच्या योगानें तेलाचा अतोनात खर्च होतो, कपडे बिघडतात, धूर पोटांत जाऊन आरोग्य बिघडतें आणि केव्हां केव्हां आगीही लागतात आणि सर्वांत मोठें नुकसान म्हणजे डोळे बिघडतात. आजवर कोणीं याकडे लक्ष दिलें नाहीं. उलट लोक म्हणतात कीं, आजवर कोणाचें नुकसान झालें नाहीं तें आतांच कां होऊं लागलें ?

( ३ ) घरांतून स्वच्छ हवा, पाणी आणि मुबलक प्रकाश खेळता रहाण्याची कांहींच व्यवस्था नसणें. यामुळें प्रजा दिवसेंदिवस क्षीणसत्व होऊं लागली आहे. फुप्पुसें कमजोर होऊं लागलीं आहेत. कोठें कोठें तर असल्या कोंडमाऱ्याच्या घरांत माणसें आणि गुरें एकत्रच निजतात.

( ४ ) खेडेगांवांत ठिकठिकाणीं डबकीं साचलीं असून त्यामुळें डासांचा आणि हिंवतापाचा उपद्रव वाढला आहे. अशीं डबकीं भरून काढलीं पाहिजेत. तात्पुरता इलाज म्हणजे डबक्यांतील पाण्यावर मुबलक रॉकेल ओतणें हा आहे. सांठलेल्या पाण्यावर डासांचीं अंडीं असतात. रॉकेलनें तो उपद्रव टळतो.

( ५ ) हातापायांत, गळ्यांत आणि नाकाकानांत नेहमीं दागिने राहूं दिल्यानें तेथें मळ सांचतो व घाणेरडेपणाच्या संवयी लागतात.

( ६ ) अंथरुणें-पांघरुणें, घरेंदारें स्वच्छ न ठेविणें; शरीरस्वच्छते-कडे देखील दुर्लक्ष करणें.

### ५ ग्रामपंचायत.

यापुढील हिंदुस्थानची जी कांहीं राज्यव्यवस्था होईल तीमध्यें ग्राम हेंच राज्यव्यवस्थेचें मूलघटक म्हणून धरलें गेलें पाहिजे. आणि ग्रामाला आपला कारभार आपणच चालविण्याची मोकळीक दिली पाहिजे. प्रांतरचना भाषावार होणार यांत शंकाच नाहीं. आज जिल्हे आणि तालुके हे कसे तरी बनविले गेले आहेत; त्यांच्या घटनेच्या मुळाशीं कांहींच तत्त्व नाहीं. यापुढें प्रांतांचे विभाग भूमीच्या आणि हवापाण्याच्या सारखेपणावर पाडले गेले पाहिजेत. हे प्रादेशिक विभाग आपल्या खर्चासाठीं आपल्या उत्पन्नापैकीं ७५ टक्के ठेवून घेतील आणि प्रांतीय सरकारला २५ टक्के म्हणजे रुपयांत चार आणे देतील. या प्रादेशिक विभागांचें व्यवस्थातंत्र कसें असावें व त्यांचीं कार्यें कोण-कोणतीं असावींत याची चर्चा येथें कर्तव्य नाहीं. फक्त ग्रामपंचायतीचें कार्य येथें देण्यांत येत आहे.

( १ ) न्यायखातें पंचायतीला सोंपवून देण्यांत यावें. गुंतागुंती-च्या खटल्यांत विभागीय सरकाराची मदत घेण्यास हरकत नाहीं. पण सामान्यपणें खेडेगावांतील सर्व मुलकी न्यायावर पंचायतीचा संपूर्ण ताबा असावा. फौजदारी खटले चालविण्यासाठीं खास मॅजि-

स्ट्रेट नेमावयास हरकत नाहीं, पण त्यांनीं देखील ग्रामपंचायतीची मदत घेतली पाहिजे.

( २ ) खेडेगांवांतील चौकीपहारा आणि पोलिसांचा बंदोबस्त ग्रामपंचायतीच्या ताब्यांतच असावा.

( ३ ) खेडेगांवांतील मुलामुलींच्या शाळा पंचायतीच्या ताब्यांत असाव्यात. दरेक शाळेला जोडून आखाडा असलाच पाहिजे.

साक्षरता आणि संस्कारिता यांचा लोकांत प्रसार झाला पाहिजे. आजकाल असें दिसून येतें कीं, ज्या मानानें अक्षरज्ञान वाढतें त्या मानानें संस्कारिता उलटी संकुचित होते. तसें न होतां लोकशिक्षण अर्थात् संस्कारिता खूप विशाल आणि व्यापक झाली पाहिजे.

## संकीर्ण प्रश्न.

( १ ) अस्पृश्यतानिवारण.

( २ ) स्त्रियांचा दर्जा वाढविणें.

( ३ ) शेतकी-मजुरांची स्थिति आज जवळजवळ आश्रिता-सारखी-अर्धगुलामा ( serf ) सारखी-आहे ती बदलून त्यांना आर्थिक व सामाजिक सामर्थ्य मिळवून दिलें पाहिजे.

( ४ ) बालविवाह.

( ५ ) धर्मसंस्करण—भ्रामक समजुती आणि धर्मांधता इत्यादि धर्मवेडें दूर करून धार्मिक आदर्श, धार्मिक संस्था, संस्कार व रिवाज यांचें संस्करण म्हणजे पवित्रीकरण झालें पाहिजे.

# दोन कार्यक्रमांची तुलना.

येथवर चर्चिलेल्या प्रजाकल्याणाच्या-विशेषतः ग्रामोद्धाराच्या-'सर्वोदयकारी' योजनेशीं आजकाल ज्याची सर्वत्र चर्चा होत आहे त्या साम्यवाद्यांच्या कार्यक्रमाची तुलना केल्यास ती बोधक होण्यासारखी आहे असें वाटून खालीं या दोन योजनांचे विशेष स्पष्टपणें कळून येतील अशा रीतीनें त्यांची तुलनात्मक मांडणी केली आहे. सर्वोदयकारी योजना बहुशः गांधीजींच्या जीवनसिद्धान्तांस अनुसरून आहे हें सहज दिसून येईल.

| साम्यवाद्यांचा कार्यक्रम | सर्वोदयकारी कार्यक्रम |
|---|---|
| १ सामान्य जनता पिळली न जावी. | १ तेंच. दरिद्रनारायणाचा उद्धार. |
| २ राष्ट्रानें इतर राष्ट्रांना पिळतां कामा नये. | २ तेंच. 'यस्मान्नोद्विजते लोको,' इत्यादीनें व्यक्त केल्या जाणाऱ्या वृत्तीचा व्यक्तीप्रमाणें राष्ट्राच्या ठिकाणींहि उदय व्हावा. |
| ३ भांडवलावरून खाजगी व्यक्तीची मालकी काढून टाकावी. | ३ सामान्यपणें प्रत्येक व्यक्तीजवळ आवश्यक तेवढें भांडवल असेल असें करावें. |
| ४ संपत्तीची सारखी वांटणी. | ४ सर्व सुखी रहातील अशा बेतानें संपत्तीची धर्म्य वांटणी. |
| ५ रहाणी – करणी, पगार, मजूरी वगैरे बाबतींत एकसारखें समान धोरण. | ५ या सर्व बाबतींत अन्याय किंवा द्रोह होणार नाहीं आणि सर्वांनाच सुख होईल अशा रीतीचा सर्व धोरणांचा परस्परानुकूल |

| | |
|---|---|
| | मेळ अर्थात् सर्वांची रहाणी-करणी एकमेकांच्या शेजारीं शोभेल अशी असावी. पोट-दुखी उत्पन्न होईल इतका भेद नसावा. |
| ६ समाजाची आर्थिक सुस्थिति हेंच सर्व प्रवृत्तींचें अंतिम ध्येय आहे. | ६ व्यक्तीची आणि समाजाची आध्यात्मिक उन्नति हेंच अंतिम ध्येय असावयाचें. |
| ७ मनुष्याच्या गरजा आणि सुखसोयींचीं साधनें जितकीं वाढतील तितकीं इष्ट. | ७ भौतिक गरजा आणि सुख-सोयींच्या साधनांवरील आधार किंवा आश्रय जितका कमी करितां येईल तितका इष्ट; असें केल्यानेंच मनुष्य परावलंबन आणि द्रोह या पापांतून मुक्त होऊन प्रेमधर्म शिकूं शकेल. |
| ८ सर्व प्रकारचें काम—शेतीचें, त्याचप्रमाणें उद्योगहुन्नराच्या कारखान्याचें सर्व काम—यांत्रिक करून टाकावें. | ८ शेतींत आणि सर्व उद्योगधं-द्यांत मनुष्याच्या हातापायांना जितकें काम देतां येईल तितकें इष्ट. या कामीं मनुष्याच्या श्रमा-बरोबर पाळलेल्या पशूंच्या श्रमा-चीहि गणना केली पाहिजे. अंग-मेहनतीमुळें कलाकौशल्य वाढतें; बौद्धिक विकास होऊन उद्यो-गांत आनंद व समाधान मिळूं लागतें; सर्वांना रोजी मिळते व |

| | |
|---|---|
| | मनुष्य स्वाभिमानी राहून स्वतंत्र जीवन अनुभवूं शकतो. |
| ९ कौटुंबिक जीवन मोडावें लागणार असें भाकित. | ९ कौटुंबिक जीवनाच्या महत्त्वावर भार; कौटुंबिक जीवनांतच सामाजिक सद्गुणांचा विकास होणें शक्य असतें. |
| १० वरील कार्यक्रम अमलांत आणतांना जबरदस्ती किंवा हिंसेचा उपयोग आवश्यक वाटल्यास तो निषिद्ध नाहीं. | १० कोणत्याहि प्रकारचा धाकदपटशा, दरारा, जबरदस्ती, पशुबळ, हिंसा, यांचा सर्व रीतीनें आणि सर्व प्रसंगीं निषेध; केवळ अहिंसेनेंच जें करणें शक्य असेल तें करावयाचें. |
| ११ संरकारच असूं नये असा अंतिम आदर्श असला तरी सामाजिक जीवनाच्या अथवा संपूर्ण मानव्यजीवनाच्या एकूणएक अंगप्रत्यंगांवर सरकारचा ताबा असावा. आणि या सरकारची सत्ता केंद्रीभूत झालेली असावी. | ११ स्थानिक स्वराज्य. |
| १२ स्थानिक आणि वर्गावर्गांचें स्वराज्य स्थापन करणें. | १२ तेंच. वर्णव्यवस्था. |

भाग दूसरा

# धर्म विचार

# महाभारताचा आस्वाद

महाभारत जसजसें वाचावें तसतसा त्याच्या संबंधींचा आदर वाढतच जातो. ' प्रतिपर्वं रसावहम् ' हें वर्णन अगदींच सामान्य वाटतें. भारताला जर एकच विशेषण द्यावयाचें असेल तर ' आर्यभव्य ' हेंच विशेषण त्याला शोभेल. रामायण वीणामधुर आहे. महाभारत मेघगंभीर आहे. भारतानें मनुष्यस्वभावाचा ठाव पाहिला आहे. चरित्रचित्रणामध्यें भारतकाराचें सर्व वैभव धृतराष्ट्राला हुबेहुब रंगविण्यांत खर्चें झालें आहे. हा आंधळा राजा कांहीं करीत नाहीं. हा सर्व कांहीं आणि सर्वांचें केवळ ऐकतो, तरीहि प्रथमपासून शेवटपर्यंत—अगदीं शेवटपर्यंत—याला आपल्या नजरेसमोरून दूर करणें शक्य नाहीं. पावलोंपावलीं ज्या दैवाची महती तो गात असतो त्या दैवाची प्रत्यक्ष मूर्तीच असा हा राजा आहे. सर्व जाणून उमजून दैव जसें आंधळें असतें, तसाच धृतराष्ट्र आहे. भीष्म, विदुर आणि संजय यांसारखे धर्मज्ञ सल्लागार त्याच्या आसपास आहेत; गांधारीसारखी धर्मनिष्ठ पतिव्रता ही त्याची कानउघाडणी करते; श्रीकृष्ण हा प्रत्यक्ष परमात्मा आहे हेंहि त्याला ठाऊक आहे; तरी पण या आंधळ्यानें डोळसपणा धरण्याचें साफ नाकारलें.

शेक्सपियरचा जसा हॅम्लेट तसा हा क्षीणसंकल्प धृतराष्ट्र 'आपल्या कडून कांहीं करावयाचेंच नाहीं. आपोआप जें होणार असेल तें होवो ' अशा वृत्तीनें राहतो. चेतनवान ( चेतनाधारी ) असूनहि ' जडवल्लोक आचरेत् ' या सूत्राचें त्यानें विकृत पालन केलें आहे. सर्व दोष दुर्योधनावर लादीत असूनहि याचा अधिकाधिक पाठिंबा दुर्योधनालाच. प्रसंगवशात् हा विदुराला दूर करील, पण दुर्योधनावर अंकुश चालविणार नाहीं. द्यूतामध्यें शकुनी जसजसा जिंकू

लागला तसतशा या म्हाताऱ्याला उकळ्या फुटूं लागल्या. ‘ कोणी जिंकलें ! काय जिंकलें ! पण काय होता ? ’ असें मोठ्या आतुरतेनें तो विचारीत असे. यांतच म्हाताऱ्याचा मूळ स्वभाव दिसून येतो. भारतीय युद्धाच्या अंतीं या कौरव राजानें लोहभीमाचें पिष्ट केलें यांतहि हाच स्वभाव शेवटपर्यंत पोहोंचल्याचा पुरावा आहे. धृतराष्ट्र हें असमर्थ मनोवृत्तीचें अतिसमर्थ चित्र आहे.

दरेक नाटकांत आणि कथेंत नायक उपनायक असतात. साहित्य-शास्त्रामध्यें यांचा स्वभाव कसा असला पाहिजे याविषयीं मर्यादा बांधल्या आहेत. पण केव्हां केव्हां कथानकामध्यें नायकाखेरीज एक मंगलमूर्ति असें पात्र असावें लागतें. व्हिक्टर ह्युगोच्या ले मिझरेबल या कादंबरींत बिशप ऑफ डी हें एक असें मंगलमूर्ति पात्र आहे. दीर्घ आणि विपुल अशा कथानकामध्यें बिशपचा संबंध फारच थोडा येतो. पण त्याची मंगल छाया शेवटपर्यंत पोहोंचलेली दिसते. आणि कथानकांतील कोणतेंहि पात्र बिशपहून श्रेष्ठ होऊं शकत नाहीं.

रवींद्रनाथ ठाकुर यांच्या ‘ घरे बाहिरे ’ मध्यें नायक आणि उप-नायक निखिल संदीप आहेत. पण मंगलमूर्ति, निखिलचा अध्यापक ‘ नत नयने अनिमेषे ’ त्याची चिंता वाहणारा, चंद्रशेखर आहे.

महाभारतामध्यें मंगलमूर्ती तीन : भीष्म, कृष्ण आणि व्यास. या त्रिमूर्तींमध्येंहि प्रधान स्थान भीष्मालाच दिलें पाहिजे. कृष्णाची विभूति बोलून चालून दिव्य असल्यानें भव्य ठरूं शकत नाहीं. व्यास एखाद्या वानप्रस्थाप्रमाणें दूरदूरच रहातात. सबंध महाभारता-वर आपली मंगल छाया पसरविणारा धर्मात्मा भीष्मच आहे. तो सागराप्रमाणें गंभीर, हिमालयाप्रमाणें प्रचंड आणि अनंत आकाशा-प्रमाणें शांत, निर्मल आहे.

भीष्म कृष्णाच्या उत्तम भक्तांपैकीं एक आहे. प्रल्हादनारद-पराशरपुंडरीकव्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् । रुक्मांगदार्जुन-

वसिष्ठबिभीषणादीन् पुण्यान् इमान् परमभागवतान् स्मरामि ॥
असें ज्यांचें आपण रोज सकाळीं उठून स्मरण करितों त्या परमभागवतांमध्येंहि भीष्माचार्यांचें स्थान न्यारेंच आहे. बाकीचे भागवत भगवंताला अधीन होऊन त्याच्या प्रेरणेनुरूप वागतात. भीष्मांच्या वाट्याला आपल्या या परमप्रभूचा अखंड विरोध करण्याचेंच आलें होतें. आणि इतकें असूनहि त्यांची विरोधी भक्ति नव्हती.

भीष्म आणि कृष्ण या दोघांचा राष्ट्रपुरुष म्हणून विचार केला तरी त्यांच्यामध्यें आत्यंतिक स्वभावभेद दिसतो. दोघेहि धर्मनिष्ठ, धर्मपरायण, आणि धर्मकार; परंतु दोघांचें जीवन–तत्त्वज्ञान अगदीं निराळें! भीष्माचें जीवनतत्त्व बरेंचसें प्रभु रामचंद्रासारखें आहे. दोघेहि मर्यादापुरुषोत्तम, स्वतःला धर्मपरतंत्र मानणारे आणि धर्मपालनार्थ कोणताहि त्याग शीतलवृत्तीनें करणारे. मनुष्यजातीला धडा घालून द्यावा तर यांनींच! उलटपक्षीं श्रीकृष्ण जसा प्रतिष्ठाभंजक तसा मर्यादाभंजकहि खराच. धममार्गांतील प्रत्येक नियमाला अपवाद कसे असूं शकतात, हें दाखविण्यासाठींच जणूं काय त्याचा अवतार! बंकिमचंद्रानें कृष्णाचें चारित्र लिहिलें आहे. चारित्र कसचें! कृष्णावर येणाऱ्या आरोपमालेचें एक मोठें खंडनच तें! न्यायनिपुणांनीं स्वतःचें बुद्धिसर्वस्व खर्चून बचाव केल्यावांचून श्रीकृष्णाच्या एकाहि कृत्याची योग्यता समजावयाची नाहीं. गांधींनीं ज्याप्रमाणें गाईचें वासरूं मारून अहिंसा–धर्माचें पालन केलें, त्याप्रमाणेंच श्रीकृष्णांनीं प्रत्येक वेळीं धर्माचें पालन केलें असावें असा भास होतो. धर्माच्या सिद्धांताच्या मुळाशीं जाऊन तत्त्वार्थाच्या पालनार्थ शब्दार्थाच्या विरुद्ध कसें जावें लागतें याचाच श्रीकृष्णांनीं अभ्यास केलेला असावा.

भीष्माचार्यांनीं ऐन तरुणपणीं एक भीष्मप्रतिज्ञा केली आणि राज्य आणि स्त्री यांचा त्याग केला. ही एक प्रतिज्ञा पाळण्यासाठीं

त्यांनीं सर्व बाजूंनीं हानि होऊं दिली. प्रतिज्ञेचें प्रयोजन संपल्यानतरहि त्यांनीं प्रतिज्ञा कशी ती सोडलीच नाहीं. आणि त्यांचें नशीबहि कसें विलक्षण ! त्यांनीं राज्याचा स्वीकार केला नाहीं तरी राज्याचा भार त्यांनाच वहन करावा लागला. भाऊबंदकीचा तंटा नको म्हणून स्वतः लग्न करण्याचें त्यांनीं नाकारलें; पण त्यांना किती तरी लग्नें आणि नियोग घडवून आणावे लागले ! फार काय सांगावें ? त्यांनीं स्वयं-वरांत भाग घेऊन तरण्याबांड मुलीहि जिंकून आणिल्या, आणि जी भाऊबंदकी टाळण्यासाठीं त्यांनीं आजन्म ब्रह्मचर्य स्वीकारलें त्याच भाऊबंदकीच्या पायीं इच्छेविरुद्ध असत्पक्षाच्या वतीनें लढून लाखों लोकांचा संहार करून स्वतःचे प्राण त्यांना खर्ची घालावे लागले. भीष्मप्रतिज्ञा ही जगाला आदर्शभूत आहे. भीष्माचें ब्रह्मचर्यहि तसेंच अलौकिक ! या ब्रह्मचर्याच्या जोरावर ते परमज्ञानी, परम-समर्थ आणि धर्मज्ञ झाले एवढेंच नव्हे तर इच्छामरणीसुद्धां झाले. पण त्याच्या त्या प्रतिज्ञेनें कौरवकुलाचा किंवा आर्यसंस्कृतीचा लाभ असा कोणता झाला ? निदान आपण सत्यासाठीं लढलों असें तरी समाधान त्यांस मिळावयास पाहिजे होतें. राज्यावरचा हक्क सोडल्या-नंतर ते राजाचे सेवक झाले. त्यांची निष्ठा राजगादीला वाहिली गेली. आपण जें खातों तें या गादीचें अन्न खातों, गादीची जी आज्ञा होईल ती शिरसावंद्य मानलीच पाहिजे, अशी सनदशीर वृत्ति धारण केली. भीष्मासारखा तन्त्रवादी (Constitutionalist) क्वचितच दुसरा असेल. पण तंत्रालाच देव समजून वागल्यानें त्यांनीं राष्ट्रहिताचें मात्र मातेरें केलें.

उलटपक्षीं, श्रीकृष्णानें दरेक प्रसंगीं बंडखोरपणाच कायम ठेविला. ज्या त्या प्रसंगीं त्यांची सर्वज्ञता व त्यांची धर्मवृत्ति जें कांहीं योग्य म्हणून ठरवील त्याचेंच निःशंकपणें पालन करावयाचें, हा श्रीकृ-ष्णाचा मार्ग. त्या मार्गानें पांडवांचें रक्षण झालें, त्यांना विजय

मिळाला हें खरें; पण हा विजय पिर्‍हसच्या विजयासारखा होता. धर्मराजाला शेवटीं अश्रुपूर्ण नयनानें म्हणावें लागलें:

जयोपि अजयाकारो भगवन् प्रतिभाति मे ।

राष्ट्रांतील क्षात्रकुळाचा ऱ्हास झाला. अर्जुनाला वाटलेली भीति खरी ठरली. सांबासारखे राजपुत्र नाच्या पोऱ्याचें काम करूं लागले. कश्यपासारखे वैद्यविशारद ब्राह्मणहि तक्षकाकडून लांच खाऊन राजसेवा सोडून परतले. क्षत्रिय राजे ब्राह्मणांच्या गळ्यांत सर्प घालूं लागले. अशी सर्व बेबंदशाही माजली. आणि श्रीकृष्णाच्या घरीं—तेथें तर सुरामत्त कलह चालून महान् कुलक्षय झाला. श्रीकृष्णानें धर्माची स्थापना केली यांत शंका नाहीं; कारण त्यानें अर्जुन—गीता, उद्धवगीता, अनुगीता यांसारखा सर्वोच्च धर्मोपदेश जगाला केला. पण श्रीकृष्णाच्या काळांत किंवा त्यानंतरच्या हजार वर्षांत कृष्णधर्माचा प्रचार किंवा त्यापासून होणारी मनुष्यसमाजाची भरभराट यांचा मात्र मागमूस नाहीं. राजसूय यज्ञ करून धर्मराजानें राजकुळाचा नायनाटच केला म्हणावयाचा. भीष्माचा मार्ग आणि कृष्णाचा मार्ग दोहोंची परीक्षा तात्कालिक परिणामाच्या दृष्टीनें करणेंच चुकीचें होईल. श्रीकृष्णनिधनानंतर जर धृतराष्ट्र जिवंत असता तर त्यानें खात्रीनें म्हटलें असतें कीं, काल हाच बलवान आहे, त्याचें इच्छित अन्यथा करण्याचें सामर्थ्य कोणासच नाहीं.

गीताधर्माप्रमाणें यथायोग्य चालून नम्रपणें कर्तव्य करणारा आणि मानवी प्राण्याला जेवढें समाधान मिळविणें शक्य आहे तेवढें मिळविणारा असा राष्ट्रपुरुष काय तो एक युधिष्ठिर आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्वर्गांचा त्याच्या ठायीं योग्य मिलाफ झाला होता. ऐहिक विजय, ऐहिक सुख आणि ऐहिक वैभव हीं सर्व बाहेरून आकर्षक आणि आंतून निःसार अशा कवंडाळाच्या फळांसारखीं असतात, हें समजून तो वागला आहे. 'धर्मो रक्षति रक्षितः' हें त्याचें ब्रीद-

वाक्य. धर्ममार्गावर युधिष्ठिराची जेवढी श्रद्धा तेवढी कोणाचीच दिसून येत नाहीं. धर्ममार्ग आपणांस कोठेंहि नेवो, निःशंकपणें तेथें जावयाचें आणि धर्माच्या हातीं आपण केव्हांहि सुरक्षितच आहोंत अशी श्रद्धा कायम ठेवावयाची, या वृत्तीनें धर्मराजाचें जीवन सर्व बाजूंनीं सफळच झालें आहे.

धर्माचा थोरला भाऊ कर्ण. जन्मापासून बिचाऱ्याला आर्य आणि शुभ असे संस्कार मिळालेच नाहींत. कर्ण निष्ठेचा धड, हृदयाचा उदार, रणांत शूर आणि आदर्श दाता असा होता. पण हीनत्वभाव ( inferiority complex ) त्याच्या हाडींमांसीं खिळलेला होता. कांहीं गोष्टी ज्या दुर्योधनाला समजत नसत त्या त्याला समजत होत्या. तरीहि त्या त्यानें दुर्योधनापुढें स्पष्टपणें मांडल्या नाहींत. मित्रनिष्ठा म्हणजे कांहीं अनुयायित्व नव्हे, छंदानुवर्तित्वहि नव्हे. कर्णानें निष्ठेचा अतिरेक करून दुर्योधनाच्या सर्व हीन वृत्तींना उत्तेजनच दिलें. त्यामुळें कर्णासारख्या अनन्य मित्रनिष्ठेची प्रतिनिष्ठा म्हणून दुर्योधनाला आपल्या अधर्म्य मार्गांत अधिकाधिक दृढ व्हावें लागलें.

कर्णाचा सर्वांत मोठा दोष म्हणजे त्याचा अभिमान व त्याचें अहंप्रेम. त्याच्याजवळ हिशोब असा तो कसलाच नव्हता. प्रत्यक्ष भारती युद्धापूर्वी अनेक वेळां पराभव पावून त्यानें आणि दुर्योधनानें स्वपरबलाबलाचा अनुभव घेतला होता. पण तिकडे अखंड दुर्लक्ष करणें यांतच बहाद्दुरी आहे असें कर्णास वाटत असलें पाहिजे. पांच पांडवांनीं मिळून जो दिग्विजय केला तो एकट्या कर्णानें करून त्यानें दुर्योधनाहातीं वैष्णव याग करविला आणि अशा रीतीनें घोषयात्रेमुळें दुर्योधन आत्मविश्वास गमावून बसला होता त्याला यानें पाणी चढविलें. परशुरामापासून अस्त्रें मिळविणें किंवा इंद्रास कुंडलें देणें या कृत्यांपेक्षां देखील कर्णाच्या त्या दिग्विजयाची किंमत अधिक आहे. पण महाभारतकारांनीं त्याला फारसें महत्त्व दिलें नाहीं. कदाचित्

पांडवांच्या दिग्विजयानंतर कर्ण गेल्यामुळें त्याला तो दिग्विजय जवळ जवळ फुकटांत पडल्यासारखा झाला असेल. हिताची गोष्ट ऐकण्यांत धृतराष्ट्र, दुर्योधन आणि कर्ण या तिघांचे प्रकार तीन तऱ्हेचे. धृतराष्ट्राला जें सांगावें तें चटकन पटे; पण त्याप्रमाणें वागण्याच्या नांवानें माल शून्य ! पांडवगीतेंत दुर्योधनाच्या तोंडीं जो श्लोक घातलेला आहे तो खरोखर धृतराष्ट्राच्या स्वभावाचा द्योतक आहे.

जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः
जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ॥

धृतराष्ट्राच्या वाट्याला देव आणि दैव यांच्यांत एका मात्रेचा देखील फरक नव्हता.

दुर्योधन पक्षाभिमानी, स्वार्थी आणि दीर्घद्वेषी असल्यानें त्याच्यांत अंतर्मुखता कशी ती नव्हतीच ! तो वारंवार उसळे, वारंवार स्वतःच्या कृत्यांचें समर्थन करी, बोध करणाऱ्याच्या हेतूविषयींच शंका व्यक्त करी, आणि आपल्या निश्चयांत सर्वांना पुरून उरे. तरी दुर्योधनाविषयीं एका बाबतींत आदरच वाटतो कीं, तो अंतर्बाह्य सारखाच होता. तो स्वतःच्या मनोवृत्तींशीं इमानदारीनें वागे. कर्णाविषयीं असें म्हणतां येत नाहीं. कित्येक गोष्टी कर्णाला एका रीतीनें समजत पण निष्ठेनें वागण्याच्या आग्रहाला बळी पडून तो दुसरीच बाजू ग्रहण करी व मग मनापासून तीच धारण करून तिला चिकटून राही. या त्याच्या स्वभावामुळें त्या थोर पुरुषाला हा प्रथमपंक्तीचा पुरुष नव्हे असें म्हणावें लागतें. भीष्म अगदीं प्रांजळपणें आपला अभिप्राय सांगत; तो त्यांचा अभिप्राय धर्मज्ञान आणि परिस्थितीचें संपूर्ण ज्ञान याला धरून असे. हा अभिप्राय अर्थात् दुर्योधन-

पक्षाच्या विरुद्ध असे. पण जेव्हां प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग येई तेव्हां शंभर टक्के निष्ठेनें ते लढत. ही भीष्मांची कर्तव्यनिष्ठा आणि राजनिष्ठा कर्णासारख्या दुय्यम प्रतीच्या माणसास कशी समजावी ? त्याला अनुयायामध्यें जी एकनिष्ठेची मुसंडी असते तीच एक अवगत; यामुळें त्यानें भीष्माचार्यांना प्रत्यहीं अन्यायच केला आहे; आणि त्यानें दुर्योधनाचें मन भीष्मांविषयीं अत्यंत कलुषित करून टाकलें आहे. भीष्म मनापासून लढत नाहींत, त्यांच्या मनांत पक्षपात आहे, म्हणून ते अंग चोरतात असें दुर्योधनास वाटण्यास कर्णच कारण. भीष्माच्या दहा दिवसांच्या युद्धांत शेवटीं शेवटीं त्या पितामहाला दुर्योधनाच्या तोंडून जीं टोंचून बोलणीं (unkindest cuts) सहन करावीं लागलीं आणि ज्यांच्या योगानें त्या वीराच्या डोळ्यांत आसवें आलीं त्याचें कारण कर्णच. स्वपरबलांविषयीं यथार्थ कल्पना नसणें आणि चिडीस पेटून रुसून बसणें हे जर युद्धकलेच्या दृष्टीनें मोठे दोष असले तर भीष्माचार्यांनें कर्णास अर्धरथी ठरविलें हें यथायोग्यच होतें.

रथीपणा हा केवळ शौर्यावर अवलंबून आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. 'युद्धे अपलायनम्' हा प्रत्येक क्षत्रियाचा स्वभावधर्म असला पाहिजे, हें जरी खरें असलें तरी कुशल योध्याला प्रसंगीं वळण घ्यावें लागतें, माघारहि घ्यावी लागते आणि पुढील धोरणाकडे नजर ठेवून पाठहि दाखवावी लागते. धर्मराजानें पुष्कळदां पाठ दाखविली आहे, दुर्योधनानें दाखविली आहे, मग कर्णानेंहि दाखविली असल्यास आश्चर्य कसचें ! निष्प्रभ होणें, हतबल होणें आणि पाठ दाखविणें हें निराळें आणि शत्रूचें बळ अजमावून पहातां या क्षणीं आपला निभाव लागणार नाहीं असा अंदाज करून वेळ टाळणें हें निराळें, हें ज्याला समजत नाहीं आणि जो आंधळेपणानें मरण पतकरतो त्याला विरक्त म्हणतां येईल; कदाचित् तो मरण–परायण असेल; पण त्यानें क्षात्रधर्माचा परम उत्कर्ष दाखविला असें म्हणतां यावयाचें नाहीं.

भीष्मानें कर्णास अर्धरथी म्हटलें तें मत्सरानें किंवा द्वेषानें म्हटलें नाहीं, पण त्याचा पाणउतारा हाच त्याच्या हृदयांत भिनलेल्या अभिमानविषाचा उतार आहे असें समजून आणि दुर्योधनानें युद्धास चंग बांधतांना जो चुकीचा हिशोब करून ठेविला होता तो सुधारण्याच्या हेतूनें. ' भीष्म जिवंत आहेत तोंवर मी युद्धांत भाग घेणार नाहीं ' असें जाहीर करून कर्णानें क्षात्रधर्मास आणि मित्रनिष्ठेसहि हरताळ फासला आणि युद्धांत भीष्म विजयी न होतां मारला जाणार आहे या कल्पनेला दृढ करून आरंभालाच अपशकुनी वातावरण उत्पन्न केलें. मित्रनिष्ठ, दानप्रतिज्ञ आणि युद्धदुर्दम तनुत्यागी कर्ण शेवटीं अहंप्रेमीच होता असें त्यानें तेथें सिद्ध केलें !

कर्णाचें वीर्य, त्याची मित्रनिष्ठा, जन्माच्या बाबतींत त्याला झालेला अन्याय आणि त्याला आलेलें वीरोचित मरण आणि तेथेंहि त्याला झालेला अन्याय या सर्व गोष्टींमुळें कर्णाविषयीं जनतेमध्यें स्वाभाविक सहानुभूति, कौतुक आणि पक्षपात आहे. या पक्षपातामुळें कर्णाच्या दोषांकडे लक्ष न जाऊन कर्णाला उदार न्याय देऊं जातां कृष्णार्जुनादि पांडवपक्षीयांना अन्याय होऊं नये आणि भीष्माचार्यांचें मन कर्णाच्या बाबतींत कांहींसें प्रमाणाबाहेर कलुषित झालें होतें असा ग्रह बांधला जाऊं नये म्हणूनच हें एवढें विवेचन करणें आवश्यक वाटलें.

एका रीतीनें पाहतां भीष्म आणि कर्ण दोघेहि आपली बाजू असत्पक्षाची आहे आणि बलकौशल्याच्या दृष्टीनेंहि लंगडी आहे हें जाणूनबुजून केवळ कर्तव्यनिष्ठेनें स्वतःच्या आर्यवृत्तीला जागून फलाविषयीं संपूर्ण उदासीनता बाळगून लढले आहेत. भारतवर्षावर राजेपणाचा खरा हक्क जसा भीष्माचा तसा तो कर्णाचाहि होता. भीष्मानें सावत्र आईच्या वंशासाठीं किंवा संतोषासाठीं आणि कर्णानें जन्मदात्या आईच्या उपेक्षेमुळें गादीचा हक्क सोडून दिला. भीष्माची

पितृनिष्ठा आणि सत्यनिष्ठा आणि कर्णाची मित्रनिष्ठा आणि पक्षनिष्ठा या दोन्ही आर्यसंस्कृतीचें मोठें धन आहेत.

कर्ण आणि भीष्म एकमेकाला पाण्यांत पहातात असें वाटणें जरी स्वाभाविक आहे तरी थोर पुरुष एकमेकांची थोरवी ओळखल्यावांचून रहात नाहींत हीच गोष्ट जगाच्या निदर्शनास आणण्यासाठीं भीष्म पडल्यानंतर आणि उभय पक्षांनीं शोकानिमित्त युद्ध तहकूब ठेविल्यानंतर भारतकारांनीं कर्णाला दुःखनम्र मनानें भीष्माकडे एकटा आणिला आहे. हा प्रसंग खरोखरीच उदात्त-करुण आहे. हा म्हातारा पक्षपाती आहे, आपणा सर्वांना हा पाण्यांत पाहतो, असें नेहमीं दुर्योधनाच्या मनांत भरवून देणारा कर्ण बाष्परुद्ध आवाजानें ' हा मी कर्ण आपल्या भेटीला आलों आहें, मजकडे दयेनें पहा आणि दोन शब्द बोला ' अशी जेव्हां विनवणी करितो, तेव्हां खरोखरच कलियुगाचें भीषण बीजारोपण करणारा काल संपून प्रेमधर्माचें सिंचन करणारा आणि सत्ययुगाची आठवण करून देणारा काल आला आहे कीं काय असा तेथें भास होतो. राजकारणी लोक प्रसंगविशेषीं मऊ मनाचे होऊन दाखवितात, मतलब जाऊं न देतां उदारता, आर्यता आणि अंतर्मुखता हीं दाखवितात. पण हा प्रसंग अशा दंभी संस्कारितेचा मुळींच नाहीं.

' आदौ नम्राः पुनर्नम्राः कार्यकाले च निष्ठुराः। कार्ये कृत्वा पुनर्नम्राः ' अशा बीभत्स मुत्सद्यांपैकीं भीष्म किंवा कर्ण कोणीच नव्हता. कणिकनीतींत सांगितल्याप्रमाणें कार्यभाग साधल्यानंतर डोळे ओले करून दाखविण्याची धूर्तताहि या ठिकाणीं नव्हती. एक आर्य पुरुष दुसऱ्या आर्योत्तम आणि अर्हत् पदाला पोहोंचलेल्या पुरुषाला प्रणामांजलि देण्यासाठीं आलेला आहे. भीष्मांनीं सद्गदित अंतःकरणानें कर्णाला जवळ करून त्याच्याविषयीं स्वतःच्या मनांत किती आदर आहे तें बोलून दाखविलें. कर्णाचा नेहमीं तेजोवध

करण्यांत आपला काय हेतु होता हेंहि त्यांनीं आतां सांगितलें; आणि जन्मभर ज्या शांतीसाठीं जिवापाड मेहनत केली त्या शांतीची कर्णाकडे निर्मळपणें याचनाहि केली. कर्णानेंहि तितक्याच मोकळ्या मनानें तसें कां करितां येत नाहीं याचीं आपलीं कारणें सांगून आपल्या निश्चयासाठीं भीष्माचा आशीर्वाद याचिला. उदार भीष्मानें तो दिला आणि त्याला गौरवून अनासक्तपणें लढण्याची आणि कौरवांचें पुढारीपण स्वीकारण्याची त्याला शिफारस केली. हिमालयासारखें उत्तुंग आर्यत्व आणि महासागरासारखें गंभीर कारुण्य एकाच वेळीं व्यक्त करणें दुसऱ्या कोणत्या प्रसंगीं शक्य आहे ! युद्धाच्या वर्णनाप्रमाणें या प्रसंगाचें वर्णन न लांबवून भारतकारानें प्रसंगाचें पावित्र्य आणि वर्णनाचें औचित्य दोन्हीं सांभाळलीं आहेत. भारतवर्षासारख्या समृद्ध आणि सर्वसौंदर्यबहुल देशाचीच ज्याला उपमा साजेल अशा महाभारत ग्रंथांत देखील असले देवदुर्मिळ प्रसंग किती असतील !

# प्रकीर्ण

## ज्ञानकर्मसमुच्चय.

१. गीतेंतील विचारप्रणालीचें श्रवणमनन केल्यास असें दिसून येईल कीं ज्ञानकर्मसमुच्चयवाद हा गीतेसाठीं नाहींच. कारण ज्ञान व कर्म हे दोन्ही शब्द गीतेनें जवळजवळ एकाच अर्थी वापरलेले आहेत.

' भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ' हीं कर्माची व्याख्या ( गी. ८.३ ) पाहिली किंवा ' एतज्ज्ञानमिति प्रोक्तं ' या पदांपूर्वी दिग्दर्शित केलेली ज्ञानाची व्याख्या ( गी. १३. ७ ते ११ ) आणि १८ व्या अध्यायांतील 'ब्रह्मकर्म स्वभावजम्' (श्लोक ४२) या पदांचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, गीतेनें कर्मापासून मिळणारें अंतिम फल व ज्ञानापासून मिळणारें अंतिम फल यांमध्यें फरक केलेला नाहीं.

ज्ञान झाल्याबरोबर मोक्ष मिळतो याचा खोल विचार करूं लागल्यास ' ज्ञान झालें म्हणजे काय ? ' याचा अर्थ आपल्याला नक्की करावा लागेल. शब्दांच्या अर्थाची प्रगल्भता, खोली किंवा व्यापकता कसकशी वाढत गेली याविषयीं देखील विचार करणें बोधक होईल.

## ' अनासक्ति' चा अर्थ.

मनुष्य कितीहि बुद्धिमान, चौकस, बहुश्रुत आणि कुशल असला तरी त्याला सर्वज्ञ होणें कधींहि शक्य नाहीं. म्हणून त्याच्या कार्यांत जमेस न धरलेला, ध्यानांत न आलेला, न पाहिलेला, अ–दृष्ट असा भाग रहाणारच. मनुष्याची ही स्थिति ज्याला बालंबाल पटली त्याच्या स्वभावांत एक प्रकारची नम्रता, शरणागतता आणि ईश्वरनिष्ठा ह्या

यावयाच्याच. ही विश्वव्यवस्था मला समजणें शक्य नाहीं, माझ्या हातांत नाहीं, विश्वरचनेचा उद्देश माझ्या सफलतेनें जसा सफळ व्हावयाचा तसा माझ्या विफलतेनेंहि सफळ होणारा आहे अशा ज्ञान-युक्त श्रद्धेनें मनुष्य नम्र आणि शांत होतो. परममंगल परमात्म्याच्या हातांत विश्वतंत्र सुरक्षित आहे, या विश्वासानें श्रद्धावान मनुष्य निश्चित होतो. व या योजनेहून भिन्न असा माझा स्वतंत्र अर्थ—संकुचित स्वार्थ-कधींहि नसो, असला क्षुद्रस्वार्थ दुर्दैवानें हृदयांत प्रादुर्भूत झाल्यास तो विफल होवो, त्याचा अभिमान मला नसो, मीं तदाकार न व्हावें अशीच त्याची प्रार्थना असणार. या सर्व वृत्तीला अनासक्ति म्हणून ओळखावें.

## क्रोध.

वासनांच्या योगानें अभिभूत झालेला मनुष्य सर्वकल्याणकारी मंगल योजना विसरून जातो आणि त्यामुळें सृष्टीचें तंत्र आपल्या वासनेच्या दृष्टीनें अनुकूल चालत नाहीं म्हणून अस्वस्थ होतो. दळ-तांना हातांत धरावयाच्या खुंट्यानें स्वतःचें महत्त्व वाढावें म्हणून स्वतः मध्यस्थ खिळ्याच्या भोंवतीं फिरण्याचें सोडून स्वतःभोंवतीं जात्यानें फिरावें अशी जर इच्छा केली तर दळण्याच्या क्रियेचें जें होईल तसेंच सृष्टितंत्राचें वासनाधीन मनुष्याच्या हातीं होईल. विश्व-तंत्र आपल्या वासनेला अनुकूल होत नाहीं असें पाहून आसपासच्या दरेक वस्तूविषयीं मनुष्य नवीनच राग—द्वेष नक्की करितो; आणि सरतेशेवटीं जगावर चिडतो. या चिडीचेंच दुसरें नांव क्रोध असें आहे.

## स्मृतिभ्रंश.

मनुष्याच्या वागण्यांत आपण कोण आहोंत, कोठें आहोंत, काय करीत आहोंत, आपला व आपल्या वृत्ति—कृतीचा आसपास काय परिणाम होत आहे याचा जागृत विचार असणें, याचें उग्र भान

असणें याचें नांव स्मृति. वासनाधीन मनुष्य क्रोधानें बावचळला म्हणजे त्याला असली स्मृति रहात नाहीं व त्यामुळें सत् आणि असत् यांचा विवेक करणाऱ्या व योग्य वेळीं निर्णय देणाऱ्या व्यवस्थापक अशा बुद्धीचा नाश होतो. आणि अशा बुद्धीचा नाश झाला म्हणजे मनुष्याचा अधःपात पुरा होतो.

## यज्ञ.

एखाद्या कांचेच्या हंडीखालीं एखादें रोपटें पाण्यासहित ठेविलें आणि त्यास प्रकाश मुबलक मिळाला तरी हवेच्या अभावीं कांहीं काळानें तें मरून जाईल. अशाच प्रकारें टेबलावर उलट्या ठेवलेल्या हंडीखालीं रोपट्याच्या ऐवजीं उंदीर ठेविला आणि तेथें त्याला खावयास घातलें तरी हवेच्या अभावीं तो मरून जाईल. पण जर एकाच हंडीखालीं उंदीर व झाड दोन्हीं ठेविलीं तर उंदराच्या पोटांतून बाहेर पडणारी हवा झाडाला पोषण देईल, आणि झाडाच्या पानांतून सुटणारी हवा उंदराला प्राणवायु पुरा पाडील. अशा रीतीनें परस्परावलंबी हे दोघे ( झाड आणि उंदीर ) एकमेकांना पोषण देऊन बराच वेळपर्यंत जगतील. दोघांच्या या देवाणघेवाणाचें प्रमाण जर बरोबर जमलें, तर हवेची टंचाई पडून मरण्याची पाळी त्या दोघांवर कधींच यावयाची नाहीं. अशा व्यवस्थेला इंग्रजींत Symbiosis म्हणतात. हाच आपला यज्ञ. सर्व विश्वामध्यें यज्ञप्रभु परमात्म्यानें अशी व्यवस्था ठेवलेली आहे. ही व्यवस्था ओळखून बुद्धिपुरस्सर यज्ञनिष्ठ रहाणें हें मनुष्याचें प्रथम कर्तव्य आहे. यज्ञनिष्ठेनेंच मनुष्य निष्पाप आणि इहपरलोकीं सुखी होतो, आणि विश्वमांगल्याचा सेवक बनतो. लोकसंख्या वाढल्यानें पृथ्वीचा भार वाढत नसतो. पण यज्ञच बंद पडल्यानें, मनुष्यप्राणी यज्ञपराङ्मुख झाल्यानें समाज हतबळ होतो, पृथ्वीचा भार वाढतो, आणि मग विप्लव ओढवतो.

प्रत्येक मनुष्यानें आहार, रक्षण, विद्या, आनंद, इत्यादि बाबतींत जें कांहीं मिळविलें असेल तितकें पुनः त्याचप्रकारचें उत्पन्न करून आपल्या उपभोगानें जें दारिद्य उत्पन्न झालें असेल तें आपल्या परिश्रमानें दूर करणें याचेंच नांव यज्ञक्रिया आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे यज्ञ हा भोग भोगल्याची भरपाई आहे. समाज हा परस्परसंबद्ध व एकजीव असल्यानें सर्वांच्या वतीनें सर्वांनीं यज्ञ केला पाहिजे. ज्याला यज्ञरहस्य समजलें त्यानें जमाखर्च बरोबर होण्याइतके सर्वांच्या वतीनें परिश्रम केलेच पाहिजेत. अज्ञ लोकांचें ओझें ज्ञानी लोकांनीं उचलावें हाच धर्म आहे आणि न्याय आहे. कारण, जगांतील अज्ञानाची जबाबदारी ज्ञानी लोकांच्याच डोक्यावर येऊन पडते.

## विभूति.

गीतेंतील सातव्या आणि दहाव्या अध्यायांत विभूतींचें वर्णन आलें आहे. या जगांत जें कांहीं आहे तें ईश्वरापासूनच निर्माण झालें आहे; सर्व जगाचा प्रभय आणि प्रलय तो परमात्माच आहे; असें सांगून भूतमात्राच्याठायीं बुद्धि, ज्ञान, असंमोह, क्षमा, सत्य, दम, शम, सुखदुःखादि द्वंद्वें, अहिंसा, समता, तुष्टि, तप, दान वगैरे सर्व भाव हे ईश्वरापासूनच आहेत असें भगवंतांनीं सांगितलें आणि नंतर ईश्वरापासूनच निर्माण झालेल्या भूतजातांमध्यें ईश्वरी अंशाचा अर्थात् ऐश्वर्यांचा उत्कर्ष जेथें जेथें असेल तेथें तेथें स्वतःची विभूति आहे असें भगवंतांनीं विस्तारपूर्वक सांगितलें आहे. या विभूतींना अंत–पार–नाहीं असेंहि भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें. तेव्हां या विभूतिविस्ताराचें दिव्य दर्शन होईल काय ? पृथक् भावांना एकत्र करून त्यांचें समस्त दर्शन करणें शक्य आहे काय, अशी तळमळ अर्जुनाला लागली होती. कारण सर्व भूतांमध्यें एक आणि अव्यय असा भाव पहाणें, विभक्तांमध्यें अविभक्ताला ओळखणें हेंच खरें ज्ञान होय.

भूतपृथक्भाव एके ठिकाणीं स्थापलेला जेव्हां पहातां येईल आणि त्या एकस्थ भावांतूनच हा सर्व विस्तार झाला आहे अशी प्रचीति येईल तेव्हांच ब्रह्माचें आकलन झालें म्हणावयाचें.

भगवंतांनीं दहाव्या अध्यायांत जो विभूतियोग विस्तारानें वर्णिला त्याचाच साक्षात्कार अकराव्या अध्यायांत अर्जुनाच्या दिव्य दृष्टीला करून दिला. आणि अशा दुहेरी कृपाप्रसादानें भगवंतांच्या प्रवृत्तीचें रहस्य उकलण्याचा किंवा आकलण्याचा त्याला अधिकार प्राप्त करून दिला.

यासाठीं आपण विभूतिमत्त्व ही काय वस्तु आहे हें समजून घेऊं. जगांतील सर्वच वस्तू आणि सर्वच प्राणी आणि त्यांचे सर्व भाव हे परमात्म्यापासून उत्पन्न झाले आहेत. उत्तम, मध्यम, कनिष्ठ या सर्व स्थिती सत्त्वांना त्याच्यामुळेंच आहेत. पण दरेकांत ईश्वरी तत्त्वें कमी-अधिक प्रमाणानें व्यक्त होतात. मोठ्या खिडकींतून अधिक प्रकाश पडतो, लहान खिडकींतून कमी. मध्यें पातळ असलेल्या काचेंतून प्रकाश चारी बाजूला विखुरला जातो; साध्या काचेंतून आहे तसाच आरपार जातो; पारदर्शक नसलेल्या पदार्थांतून तो मुळींच जात नाहीं. बिलवरी काचेंतून प्रकाश मोडतो व फुटतो आणि एका शुभ्र रंगाचे सात निरनिराळे रंग होतात. आणि तोच प्रकाश मध्यें जाड असलेल्या सूक्ष्मदर्शक भिंगांतून केंद्रीभूत होऊन अत्यंत तेजस्वी आणि तपस्वी होतो. याच न्यायानें ज्या व्यक्तींच्या, सत्त्वांच्या अथवा पदार्थांच्या घटनेमध्यें कोणत्याहि एका गुणाचा किंवा पदवीचा अत्यंत उत्कर्ष झालेला असतो त्या सत्त्वांना विभूती असें म्हणतात. हिमालयाची थोरवी त्याच्या सर्वोच्च शिखरांत आहे. पाण्याचें जीवनत्व त्याच्या रसगुणामध्यें आहे. प्रभेचें चंडत्व अथवा सौम्यत्व यांच्यामुळेंच सूर्य-चंद्रांना महत्त्व आलें आहे. आपल्या शक्तीनें, तेजानें, प्रभावानें, कांतीनें, समृद्धीनें, सात्विकतेनें, दाहकतेनें अथवा अशाच कोणत्या

तरी असाधारण गुणानें ज्या ज्या वस्तूला विशेषत्व येतें ती ती ईश्वराचीच विभूति होय. जगांतील बरें–वाईट, इष्ट–अनिष्ट, सर्वच ईश्वरापासून असल्यानें जुगाऱ्यांमध्यें शकुनी ही देखील ईश्वराचीच विभूति आहे. उन्नतीची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें सर्वच विभूतींचें अनुशीलन अथवा अनुकरण करावयाचें नसतें. पण प्रत्येकांत ईश्वरी तत्त्वच आहे असें ओळखून आणि लवकर किंवा उशीरां सर्वच ईश्वराकडे पोहोंचणार आहेत हें ध्यानांत धरून माणसानें अहंकार आणि तिरस्कार हीं दोन्हीं सोडून दिलीं पाहिजेत. आणि शुभ विभूतींच्या प्राप्तीसाठीं अखंड प्रयत्न केला पाहिजे.

व्यवहारांत आपण एखाद्याला थोर पुरुष म्हणून ओळखतों; एखाद्याला पामर प्राणी म्हणून म्हणतों, एखादा सामान्य कोटीचा असतो; एखादा अलौकिक ठरतो. हा भेद कशानें पडतो? शंकराचार्यांसारखा संन्यासी, जनकासारखा कर्मयोगी, अर्जुनउद्धवासारखे भक्त, कबीरासारखे ज्ञानी आणि गोरक्षासारखे तपस्वी हे सर्व तुमच्या आमच्यासारख्यांच्या परिस्थितीमध्येंच वाढलेले. तीच पृथ्वी, तोच लोकसमाज, तींच कर्तव्यें, तोच आहार आणि तितकेच दिवसाचे चोवीस तास प्रत्येकाच्या वाट्यास आलेले. मग सामान्य लोकांत व त्यांच्यांत फरक कसा पडला? सारख्याच उसांतून कोणी अधिक रस चोखूं शकतो कोणी कमी. जेलमधल्या डाळभाजी व दोन भाकरींमधून माझ्यासारखा जगण्याइतकेंहि पोषण मिळवूं शकत नाहीं. आणि एखादा अट्टल दरोडेखोर तेवढ्याच आहारांत आपले दंड पीळदार ठेवण्याइतकें पोषण खेचूं शकतो. हा जो रस खेचण्याचा शक्तिभेद आहे हा प्रत्येकाच्या अंगच्या उत्कटतेवर अवलंबून असतो. एखाद्या काव्यांतून किंवा धर्मवचनांतून किती भाव काढावयाचा हें ज्याच्या त्याच्या संस्कार्यतेवर अवलंबून असतें.

ही जी उत्कटता तीच विभूति होय. उथळपणें वरवर पोहोणें हा

सामान्य जीवांचा स्वभाव झाला. तितक्याच काळांत आणि त्याच परिस्थितींत ज्यांना बुडी मारून ठाव पहाण्याचें साधलें त्यांना विभूतिमत्त्वाचें रहस्य कळलें. ही उत्कटता ज्यांच्यामध्यें अधिक त्यांचा उत्कर्ष किंवा अपकर्ष फार झपाट्यानें व उदंड होईल. आणि म्हणून ज्यांच्यांत ही उत्कटता आहे त्यांनीं अशुभ मार्गाकडे न जाण्याविषयीं सामान्य जीवांपेक्षां अधिक जपलें पाहिजे. आणि प्रत्येकानें स्वभाव, स्वधर्म ओळखून उत्कटतेनें, तेजस्वितेनें आणि तरस्वितेनें स्वतःमधील विभूतिमत्त्व वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हेंच जीवनकर्तव्य आणि यांतच जीवनसाफल्य.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत् तत् एव ...... मम तेजोंऽशसंभवम् ॥

**मनुष्याच्या जीवनांत वारंवार उठणारे सनातन सवाल.**

**१. आध्यात्मिक ( दार्शनिक ) सवाल.**

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये
अस्तीत्येके नायमस्तीति चैके ।

**२. नैतिक सवाल.**

किं कृत्वा सुकृतं भवेत्.

**३. मानसिक सवाल.**

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।

**४. धार्मिक सवाल.**

किमहं पापमकरवम् । किमहं साधु नाकरवम् ।

# मरणोत्तर जीवन व सांपराय याचें टिप्पण

१. मनुष्य मेल्यानंतरहि आपले विचार, आपल्या भावना, आपले संकल्प आणि आपण चालन दिलेले पुरुषार्थ यांच्यायोगें समाजामध्यें जगतच असतो. हें मरणोत्तर जीवन मरणपूर्वजीवनाप्रमाणेंच महत्त्वपूर्ण असतें. तें परिपुष्ट होईल आणि क्षीणहि होईल. हें जीवन जर समाजोन्नतिकारक असेल तर मनुष्याचा तो स्वर्ग होईल. जर समाजाला तें पातक ( पाडणारें ) असेल तर त्याचा तो नरक होय. पंचमहाभूतात्मक देहापेक्षां समाजरूपी देहामध्यें वास करून मनुष्य अतिदीर्घ जीवन मिळवूं शकतो, आणि जीवितसाफल्याचा अधिकारी होतो. या मरणोत्तर जीवनाचें व्यक्तिरूपी आरशांत–अहंकाररूपी आरशांत–जें प्रतिबिंब पडतें तेंच कीर्ति किंवा यश होय.

२. मरणोत्तर समाजरूपी जीवनाची यथार्थ कल्पना सामान्य मनुष्यास नसते म्हणूनच कीर्ति, यश, पुण्य, पाप आणि स्वर्ग–नरक इत्यादि कल्पना रचून मनुष्यापुढें त्या मांडलेल्या आहेत. परलोक म्हणजे या पृथ्वीच्या बाहेरच असला पाहिजे असें नाहीं. परलोक म्हणजे मरणोत्तर स्थिति. याला उपनिषदांत ‘ सांपराय ’ असें म्हटलें आहे. बालकबुद्धि मूढाला या सांपरायाचें आकलन नसतें. देह, त्या देहाचीं सुखदु:खें, त्या सुखदु:खाला साधनीभूत अशी मत्ता ( वस्तुजात ), त्या सुखदु:खांचा भोक्ता अहंकार ( अस्मिता ) आणि देहगत कालामध्यें कोंडून ठेवलेलें आयुष्य एवढेंच काय तें स्वतःचें जीवन आहे असें मूढ लोकांना वाटतें. या सर्व गोष्टी मिळून जें व्यक्तित्व होतें तें आपल्या जीवनाचा अल्पमात्र अंश आहे. खरें पाहतां आपलें जीवन काल, देश ( व्याप्ति ) आणि आधार या दृष्टींनीं

पाहतां अत्यंत विशाळ आहे. हें ज्याला समजलें तो निष्पाप आणि अमर झालाच पाहिजे.

३. अशा मनुष्यानें जर म्हटलें, 'मरण माझें मरोनि गेलें, झालों मी अमर' तर त्याचा अर्थ कळणें कठीण नाहीं. जीवनाच्या दृष्टीनें शारिरिक मरण हें कःपदार्थ आहे एवढें तर सहज समजलेंच पाहिजे.

## पारलौकिक जीवनाची स्पष्ट कल्पना

स्वर्गनरकाचा इतिहासभूगोल पुराणांतून पुष्कळ वाचावयास मिळतो. ज्याप्रमाणें हिंदुस्थानच्या पलीकडे तिबेट आहे, दक्षिणेस लंका आहे, सात समुद्राच्या पलीकडे इंग्रजांचें श्वेतद्वीप आहे, त्याचप्रमाणें ढगांच्या पलीकडे आकाशांत स्वर्गभूमि म्हणजे एखादी जमीन असेल, तेथें देव रहात असतील, अशी कल्पना डोक्यांत येते. पृथ्वीवरील देश पृथ्वीच्या पृष्ठभागावर शेजारीं शेजारीं असतात. स्वर्गांतील इंद्र-लोक, चंद्रलोक, गोलोक, विष्णुलोक वगैरे जहाजांतील केबिनप्रमाणें किंवा इंटरक्लासच्या डब्यांतील अंथरुणांप्रमाणें किंवा मुंबईच्या चाळींतील मजल्यांप्रमाणें वर खालीं असतील एवढाच काय तो फरक.

नागलोकाचें याहून जरा विचित्र. पाण्यांत बुडाल्यानंतर नाग-लोकांस जातां येतें. तें कसें तें ध्यानांत येत नाहीं. आणि नरक पृथ्वीच्या खालीं म्हणजे कोठें आहे व तिकडे कसें जातां येतें याची तर कल्पनाच होत नाहीं. पृथ्वी वाटोळी आहे असें ठरल्यानंतर अमे-रिकेला आपण पाताळाची भूमि असें म्हणूं लागलों. मग यमराष्ट्र कोठें स्थापावयाचें !

हे सर्व लोक काल्पनिक आहेत असें सिद्ध करण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. हे असले सर्व लोक विचारी लोकांच्या मनांतून केव्हांच उतरले आहेत. पण मरणोत्तर जीवन कसें असतें याचा मात्र उलगडा मन रोज मागत असतें. स्वर्गाची पौराणिक कल्पना आज अगदींच तुच्छ वाटते. सामान्य विलासी मनुष्याला इहलोकीं जे सुखोपभोग हवे असतात त्यांचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हणजेच स्वर्ग असें म्हणावयास हरकत नाहीं. मनुष्याची कल्पना

झाली म्हणून तरी ती चालून चालून किती चालणार ? जें पाहिलें, अनुभविलें असेल त्याच वस्तूचे भिन्न भिन्न अवयव एकत्र करून स्वर्गादि लोकांची काचोळी तयार केली जाते. पृथ्वीवर काय तर मनुष्य निरनिराळीं मधुर पेयें– सरबतें आणि आंसवें– पितो; स्वर्गामध्यें या सर्व पेयांचे प्रतिनिधि म्हणून माधुर्याची सीमा असें अमृत कल्पिलें. पृथ्वीवर विलासी लोक सर्वसाधारण अशा वारयोषितांचें सेवन करितात; स्वर्गांत त्याऐवजीं अप्सरांची कल्पना केली. पृथ्वीवर विषयसेवन करणाऱ्या मानवांना व्याधी, जरा आणि मरण हीं भोगावीं लागतात; स्वर्ग हा काव्यप्रदेशाप्रमाणें काल्पनिक असल्याकारणानें तेथें या तीन्ही उपाधी नाहींत असें स्वर्गविधात्या कल्पकांनीं ठरविलें. स्वर्गांत व्याधीप्रमाणें आधी म्हणजे मानसिक चिंताहि नाहीं असें पौराणिक भूगोलशास्त्रवेत्ते सांगतात. पण स्वर्गाचा इतिहास त्याच्या विरुद्ध बोलतो. स्वर्गाचा राजा इंद्र भोगक्षीण नृपाळाप्रमाणें नेहमीं भिऊन असतो. कोणीहि तपस्या करूं लागला म्हणजे इंद्राचें धाबें दणाणतें. कोणीहि बलवान गडी दिसला तर त्याजकडे जाऊन तूंच इंद्र हो अशी याची ऑफर ठेवलेलीच; आणि आंतून त्याच्यावर आपलीं सुकुमार प्रहरणें पाठविण्यासहि तयार. अशा रोज युक्त्या लढवून त्याला आपलें स्थान सांभाळावें लागतें. याहून दुसरा आधि तो कोणता ?

आणि बाकीचे देव तरी निश्चिंत असावेत ! देव अमृत पितात, अप्सरांचे नाच पहातात. गाणेंबजावणें आणि सर्व इंद्रियें तृप्त करणें हें स्वर्गांत अखंड चाललेलें असतें. पण या सर्व गोडीमुळें बसलेला मिठ्ठा दूर करण्यासाठींच जणूं काय तेथें तिखट तिखट सुंठवडेहि ठेवलेले आहेत. देवांमध्यें समान दर्जा नाहीं. प्रत्येकजण आपापल्या पुण्याप्रमाणें ए. बी. सी.सारख्या एखाद्या वर्गांत असावयाचा ! आणि स्वर्ग नांवाच्या हॉटेलमधील ज्याच्या नांवें जितकी पुण्यांशाची जमा

असेल त्याला तसलें भोगसुख मिळावयाचें. बँकेंतील शिल्लक संपली कीं, तेथील यजमानांनीं प्राण्याला खालीं लोटून दिलेंच. देवांमध्यें दर्जा हीच एक मोठी भगभग आहे. आपल्याहून ज्याचें आसन खालीं त्याच्याकडे तुच्छतेनें पहावयाचें आणि आपल्याहून जे वर असतील त्यांचा हेवा करावयाचा, अशी व्यवस्था स्वर्गात नसती तर स्वर्गांतलें अखंड सुखमय जीवन अगदींच कंटाळवाणें झालें असतें.

राजदरबारी विलासांवरून जशी मनुष्याला स्वर्गाची कल्पना सुचली तशी नरकाची कल्पना सुचली कारावासांतील यातनांच्या अनुभवांवरून! येथेंहि प्रत्यक्ष अनुभवाच्या बाहेर कल्पना फारशी दूर जाऊं शकली नाहीं. पीडा देण्यासाठीं किंवा सूड उगविण्यासाठीं इहलोकीं जे जे प्रकार केले जातात तेच नरकाच्या ठायीं सुधारून वाढविलेल्या रूपांत आरोपिले आहेत. येथील सुखोपभोगांत रोग–जरा–मरण ही जशी एक मोठी गोम आहे त्याचप्रमाणें यातना करण्याची हौस भागविण्यांत देखील एक मोठी गोम आहे. मारणाऱ्या मनुष्याला कोणत्या वेळीं थकवा अथवा कळवळा येईल हें सांगवत नाहीं ही एक अडचण आहेच, पण या बाबतींत मन आणि शरीर घट्ट करितां येतील. पण हाणामारीचा आणि छळवणुकीचा अतिरेक झाला तर पीड्यमान मनुष्य बेशुद्ध पडतो अथवा मरून जातो. दोन्ही रीतींनें मनुष्य आपल्या आटोक्याच्या बाहेर जातो याला उपाय नाहीं. नरकामध्यें ही अडचण नाहीं. तेथें यमदूत धंदेवाईक असल्यानें त्यांना थकवा, कंटाळा किंवा कळवळा शिवूंच शकत नाहीं. आणि तेथल्या यातना कितीहि भयंकर असल्या तरी मनुष्य बेशुद्धहि पडत नाहीं आणि संपूनहि जात नाहीं.

स्वर्गनरकाची लोकरूढ कल्पना ही अशी मानवी अनुभवावरच उभारलेली आहे असें समजल्यानंतर त्यांची फारशी किंमत रहात नाहीं. पण मनुष्यजीवनाहून श्रेष्ठ असें जीवन असलें पाहिजे; तसेंच

मनुष्यजीवनाहून हीन, अर्थशून्य आणि संतापदायक जीवन असलेंच पाहिजे अशी आकांक्षा मात्र कायम रहाते.

तेव्हां मरणोत्तर जीवन, पारलौकिक जीवन, स्वर्गलोक, मृत्युलोक वगैरे गोष्टी आहेत काय हें आपल्या मनाशीं पुनः एकदां विचारून पहाण्याची बुद्धि मनुष्यजातीला पुनः पुनः होते. एक देह सोडल्या-नंतर तात्काळ किंवा कालांतरानें याच पृथ्वीवर किंवा अन्यत्र मनुष्य-कोटींत किंवा अन्य कोटींत मृत जीव नवीन देह धारण करितो आणि नवीन अनुभव प्राप्त करूं लागतो. ही जी सर्वसामान्य लोककल्पना तिच्याशीं कोणतीहि हुजत न घालतां आपण निराळ्या रीतीनें या प्रश्नाचा विचार करूं.

एखादा मनुष्य आपल्या पूर्वजांचें श्राद्ध करितो म्हणजे कोणाचें करितो ? आत्मा सर्वव्यापी म्हणजे विभु आहे. त्याला मरण नाहीं, त्याला स्थानांतर किंवा लोकांतरहि नाहीं. तेव्हां त्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. देहाची राख किंवा माती होऊन जाते. कदाचित् देह इतर प्राण्यांचें भक्ष्य होऊन त्यांच्याशीं एकरूपहि होऊन गेला असेल. मृत देहाला खाऊन टाकणाऱ्या कोल्ह्या–लांडग्या–गिधाडांचें श्राद्ध कांहीं आपण करीत नाहीं. अथवा देहाला किडे पडून त्या किड्यांचेच एक मोठें राष्ट्र जमलें असेल; त्यांच्या तृप्तीसाठीं देखील आपण पाणी सोडीत नाहीं किंवा पिंड देत नाहीं.

राहतां राहिला मरणाऱ्याच्या वासनांचा समुच्चय किंवा मागें राह-णाऱ्या लोकांच्या मनांत असलेला त्याच्याविषयींचा भावनासमुच्चय. या दोन वासनात्मक आणि भावनात्मक देहानें मनुष्य उरलेला असतो. त्यांपैकीं एकाचें अथवा उभयतांचें श्राद्ध संभवतें.

असा मरून गेलेला एखादा पूर्वज मोठा शूर, क्रूर, खादाड आणि आळशी असला तर त्याचा वासनासमुच्चय अथवा लिंगदेह

वाघाच्या किंवा लांडग्याच्या जन्मास जाईल अशी लोककल्पना वाहते. जर तो एकलकोंडा असेल तर वाघाच्या योनीस जाईल. समानशीलांचा संघ करण्याची वृत्ति त्याच्यांत असेल तर लांडग्याची योनि त्याला अधिक अनुकूल ठरेल. श्राद्ध करावयाचें तें कांहीं या वाघालांडग्यांचें नव्हे. नाहींतर त्यांच्या नांवें खीरवडे अर्पण करण्यास एखादा वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण बोलवावा, आणि पूर्वजानें तो ब्राह्मणच पसंत करावा असें होऊन बसावयाचें! आणि श्राद्धापायीं पशुहत्या जी पूर्वीं होत असे तिच्याऐवजीं ब्रह्महत्या मात्र व्हावयाची!

[मानवपित्या मनु भगवानानें म्हटलें आहे, ‘ मां स भक्षयिताऽमुत्र यस्य मांसं इहाद्म्यहम् इति मांसस्य मांसत्वम्’ ज्याचें मांस मी येथें खातों तो मला परलोकीं खाईल, असें असल्यामुळें मांसाला मांस म्हणतात. या न्यायानें श्राद्धाचा विचार केला तर जगांत सर्वत्र श्राद्धच चाललें आहे असें म्हटलें पाहिजे. ]

पूर्वजांपैकीं कोणी आपल्या कर्म, वासना आणि संस्कारानुरूप कोणत्याहि योनींत गेलेला असो, आणि तेथें जुन्या वासनांची तृप्ति आणि नव्या वासनांचें बंधन रचीत असो, आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आपला पूर्वज देह सोडून गेला तरी इहलोकांतून तो संपूर्णपणें नष्ट झाला नाहीं. त्यानें केलेलीं बरीं वाईट कर्में, त्यानें प्रेरिलेल्या बऱ्या वाईट प्रेरणा, आणि त्यानें मनुष्यस्वभावांत घातलेली भर हें सर्व इहलोकांत मौजूद आहे.

त्याच्याशीं संबंध आलेल्या आप्तइष्ट, शत्रुमित्र इत्यादि लोकांच्या स्मरणांत आणि भावनांत तो मनुष्य पूर्वीसारखा आहे एवढेंच नव्हे तर दिवसेंदिवस त्याच्या या मरणपश्चात्च्या स्मृतिगत अवशिष्ट जीवनांत फेरफारहि होत जातात. आतां त्याचें वास्तव्य एका देहांत नसून स्मृतिरूपानें, कार्यरूपानें अथवा प्रेरणारूपानें त्यानें जेवढा समाज व्यापला असेल त्या समाजांत त्याचें वास्तव्य आहे व या

जीवनासंबंधानेंच श्राद्ध संभवतें. शिवाजीमहाराजासारखा पुण्यश्लोक राजा मोक्षास गेला असेल अथवा त्यानें इहलोकीं अथवा अन्य लोकीं एकाद्या राष्ट्रपुरुषाचा जन्म घेतला असेल. त्या त्याच्या नवीन यात्रेचें – करीयरचें – आपण श्राद्ध करीत नाहीं. पण आपण आज आपल्या हृदयांत जे शिवाजीमहाराज वावरत आहेत आणि मोठे होत आहेत त्या शिवाजीमहाराजांचें श्राद्ध करितों. श्राद्ध मेले-ल्यांचें होत नसतें. पण देहत्यागानंतर जे समाजांत जिवंत आहेत, वावरत आहेत, वाढत आहेत आणि पुरुषार्थ करीत आहेत त्यांचेंच श्राद्ध होत असतें. हें जें मरणोत्तर सामाजिक जीवन तेंच खरें पार-लौकिक जीवन. जिवंतपणाची जीं सहा लक्षणें शास्त्रकारांनीं सांगि-तलीं आहेत – अस्ति, जायते, वर्धते, अपक्षीयते, परिणमते, म्रियते – तीं सर्व या जीवनास देखील लागू पडतात. म्हणून हें जीवन काल्पनिक नसून वास्तविक आहे, व्यापक आहे, दीर्घजीवी आहे, परिणामकारी आहे. हेंच पारलौकिक जीवन. हें जीवन सुंदर, उन्नतिकर, शुभकर असेल तर तो त्या जीवाचा स्वर्ग होय. हेंच जीवन जर समाजाचा अधःपात करणारें असेल, आर्यत्वाचा ध्वंस करणारें असेल, तर तेंच नरक होय. या दृष्टीनें पाहतां प्रत्येक जीवाचा स्वर्गनरक त्याच्या मरणानंतर सुरू होतो, पण तो इहलोका-मध्येंच ओतप्रोत असतो.

मुसलमान लोक मानतात कीं, मनुष्य मेल्यानंतर बर्झक म्हणून एक स्थान आहे तेथें राहून 'क्यामत'ची – अंतिम निवाड्याच्या दिवसाची – वाट पहात असतो. सर्व प्राणी मरून येथील सबंध नाटक संपल्याशिवाय निवाडयासाठीं सर्व हजर राहूं शकणार नाहींत व हिशोबाच्या वह्याहि बंद होणार नाहींत. हिशोब संपला, सर्व लोक (नट) नाटकाच्या अंतीं गोळा होतात त्याप्रमाणें सर्वजण गोळा झाले, सर्व भेद खुला झाला, म्हणजेच सर्वांसमक्ष निवाडा होऊं

शकेल. निवाड्याच्या शेवटीं ज्यांच्या वाट्याला स्वर्ग ( बाहिस्त ) येईल ते कायमचे स्वर्गांत मौज करतील. आणि ज्यांच्या वाट्याला नरक — जहन्नम ( दोझक ) — येईल ते अखंड वेदनेंत खितपत पड-तील. तोंवर सर्व मेलेल्यांना बर्झकच्या वेटिंग — रूममध्यें बसावयाचें आहे. बर्झक ही कर्मभूमि नसली तरी तेथें मनुष्याच्या स्थितींत फेर-बदल होत असतो. कारण त्याच्या पापपुण्याचा हिशोब बँकेंतल्या ठेवीप्रमाणें किंवा व्यापारांतल्या भांडवलाप्रमाणें वाढत असतो.

मीं जर माझ्या जिवंतपणीं एखादी विहीर बांधली असेल तर जसजसा लोक त्या विहिरीचा उपयोग करितील त्याप्रमाणें बर्झकमध्यें माझ्या नांवें पुण्य (सुवाब ) वाढत जाणार. मीं जर एखादें अगदीं नवीन प्रकारचें सत्कृत्य केलें असलें आणि लोक त्याचें अनुकरण करूं लागले तर सत्कृत्याच्या नवीन क्षेत्राचा शोध लावणारा म्हणून माझें अनुकरण करणाऱ्यांच्या पुण्यांतून कांहीं वाटा (रॉयल्टी) म्हणून मला बर्झकमध्यें मिळत असतो. ॲबेल आणि केन यांच्या भाऊ-बंदकीमुळें मनुष्यजातींत पहिला खून झाला असल्यामुळें आतां मनुष्यकोटींत कोणींहि खून केला तरी खुनाचा मार्ग उघडून देण्या-ऱ्या बंधुघातकी केनच्या नांवें कांहीं पापांश लिहिला जातोच. पर-लोकांत पेटंट ॲक्ट नसला तरी न्यायाचीं चोपडीं अगदीं जागृत असतात.

वर सांगितलेली बर्झकची कल्पना आणि आपली पारलौकिक जीवनाची कल्पना ह्या जवळजवळ समानच आहेत.

ज्याला आपण कीर्ति म्हणतों तें खरोखर या पारलौकिक जीव-नाचें प्रतिबिंबच होय. पारलौकिक जीवनाच्या मानानें जन्ममरणाच्या खुंटामधील सुखदुःखात्मक जीवन फारच लहान म्हटलें पाहिजे. पुरु-षार्थाच्या दृष्टीनें पाहतां हें जीवन फार महत्त्वाचें आहे. कारण हीच कर्मभूमि आहे. भोगाच्या दृष्टीनें पहातां हें देहगत जीवन अत्यंत

अल्प आणि तुच्छ आहे. त्यासाठींच स्वतःच्या फायद्याचा हिशोब ज्याला करितां येतो त्यानें ऐहिक सुखोपभोगावर फारशी नजर न ठेवितां मरणोत्तरच्या पारलौकिक यशःकायाची आणि तेथें मिळणाऱ्या कीर्तिरूपी सुखोपभोगाची आणि लोकांपासून अखंड मिळणाऱ्या कृतज्ञतेची अधिक काळजी बाळगली पाहिजे. इहलोकीं जर आपण सत्कर्में केलीं, लोकांना सत्प्रेरणा दिली आणि सर्व बाजूंनीं मांगल्याचा विस्तार केला तर मरणोत्तर या सर्व गोष्टी वाढीस लागून आपलें मरणोत्तर जीवन परिपुष्ट, लोकोन्नतिकर असें होईल.

या जीवनाची प्राकृत लोकांना कल्पना नसते म्हणून त्यांना स्वर्ग-नरकाच्या काल्पनिक इतिहास–भुगोलाची लालूच दाखविलेली असते अथवा लालूच म्हणण्यापेक्षां वस्तुस्थितीचेंच तें एक बालग्राह्य चित्र आहे असें म्हटल्यास चालेल.

---

# हिंदुधर्मांतील अवतारवाद

.अवतारवाद हा हिंदुधर्माचा एक विशेष आहे. मनुष्य हा मुळांत ईश्वर आहे असें वेदांत सांगतो. दरेक व्यक्तीच्या हृदयांत ईश्वरी तत्त्वाचें वास्तव्य आहे ही गोष्ट थोड्याफार फरकानें दरेक धर्मानें सांगितली आहे. ज्यांच्यामध्यें देवांचें गोताबळ फार मोठें आहे अशा रोमन, ग्रीक किंवा पौराणिक धर्मांत आणि जगदेकमल्ल होऊन राहणाऱ्या मत्सरी देवावरच निष्ठा राखणाऱ्या यहुदी, ख्रिस्ती आणि इस्लामी धर्मांत सुद्धा देवादेवांचा स्वभाव जवळजवळ मनुष्यासारखाच आहे. धर्मकथांमधून देवानें मनुष्याला उत्पन्न केलें असें जरी सांगितलें असलें तरी देव हाच मनुष्यकृत आहे असें विकासवादी सांगत आले आहेत. या सर्व मतांशीं अवतारवादाचें साम्य दिसण्याचा संभव आहे. पण अवतारवाद हा खरोखरच एक विलक्षण आणि अद्भुत-परिणामी असा विचार आहे. हा वाद हृदयाला जितका आश्वासन-दायी आहे तितकाच तर्कबुद्धीलाहि पटण्याजोगा आहे. त्याचें यथार्थ स्वरूप समजून घेतलें पाहिजे. अवतारवाद कांहीं अंशीं समजून घेत-ल्यानंतर मुसलमान आणि ख्रिस्ती लोकहि आतां म्हणूं लागले आहेत कीं, 'अवतार म्हणजेच पैगंबर' या अर्थानें अवतारवाद आम्हांस मान्य आहे. कुराणांत तर स्पष्ट सांगितलें आहे कीं,'अशी एकहि भूमि किंवा पिढी नाहीं कीं जिला परमेश्वरानें पैगंबर दिला नाहीं.' पैगंबरांची परं-परा सृष्टीप्रमाणेंच अव्याहत चालू आहे. यहुदी आणि ख्रिस्तीलोक देखील पैगंबराच्या परंपरेवर विश्वास ठेवणारे आहेत. तेव्हां आतां जर आपण अवतारवादाची मीमांसा मूळ कल्पनेला आणि भिन्नधर्मा-तील भिन्नभिन्न समजुतींच्या यथार्थस्वरूपाला धरून मांडली तर केवळ हिंदुधर्मालाच नव्हे तर सर्व धर्मांना ती मान्य होऊन यापुढें सर्व

मानव्याला साधारण असें जें विश्वधर्माचें तत्त्वकुटुंब तयार होणार आहे त्यामध्यें अवतारवादाला प्रमुख स्थान मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. केवळ फायद्याच्या किंवा प्रतिष्ठेच्या दृष्टीनें अवतारवादाला सजविण्याचा येथें उद्देश नाहीं. पण अवतारमीमांसा ही आज किती महत्त्वाची आणि संस्कृतिपोषक आहे एवढेंच सांगण्याचा येथें हेतु आहे.

बौद्ध परिभाषेप्रमाणें एखादा जीव जेव्हां अंतर्मुख होऊन स्वतःच्या स्थितीविषयीं असंतुष्ट होतो आणि स्वतःचे सर्व दोष दूर करून सर्व शुभ गुणांचा आत्यंतिक विकास करण्याचा संकल्प करतो तेव्हां त्याला बोधिसत्त्व असें म्हणतात. असा बोधिसत्त्व एक एक सद्गुणाची पारमिता म्हणजे सर्वोच्च कोटी कमावत कमावत दर जन्मीं वर चढत जातो आणि बुद्ध होतो. स्वतःचा उद्धार करण्याची शक्ति त्याला प्राप्त झाली म्हणजे त्याला 'पच्चेक ( प्रत्येक ) बुद्ध' असें म्हणतात. तोच जगदुद्धार करण्यास समर्थ झाला म्हणजे गौतम बुद्धाप्रमाणें 'तथागत' होतो.

प्रत्येक मनुष्याचा स्वाभाविक उन्नतिक्रम हाच आहे. गीतेनें ज्याला अनेकजन्मसंसिद्ध असें म्हटलें आहे त्यालाच 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय।' या लोकोक्तीप्रमाणें 'नारायण' असें म्हटलें आहे.

आपला उद्धारक आपल्यामधूनच उदय पावला, आपण जी साधना केली नाहीं ती त्यानें केली, आपल्यांतला असून परात्पराचा अंशरूप तो झाला असें प्रत्यक्ष पाहूनहि तें तसें स्वीकारणें मनुष्याला जड जातें. आपल्या बरोबरीचा आपल्या पुढें गेला हें स्वीकारण्यांत स्वतःकडे कमीपणा येतो ही एक अडचण तर खरीच; पण दुसरी एक तात्त्विक आडचण आहे, तिचा विचार झाला पाहिजे.

प्रत्येक आत्मा स्वभावतः शुद्ध, बुद्ध, नित्य, मुक्त आणि सर्वसमर्थ असा असतांना हें आपले मूळ पद तो कसें गमावून बसला अशी शंका सहजच येते. शुद्धानें अशुद्ध कां व्हावें ? मुक्तानें बंधनांत

कां सांपडावें ? जो नित्य आहे तो अनित्य कसा होईल ? आणि जो सर्वसमर्थ आहे तो स्वतःला अधःपातापासून कसा वाचवूं शकला नाहीं ? हे प्रश्न स्वाभाविक आहेत. तर्क म्हणतो, 'आत्म्याचा अधः-पात झालाच नाहीं. हा सर्व भ्रम आहे. आत्मा शुद्ध, बुद्ध, नित्य, मुक्तच आहे.' तर मग हा भ्रम कोठून आला ? परस्परविरोधी अशीं विधानें स्वतंत्रपणें खरीं वाटूं लागलीं म्हणजे तर्कबुद्धि गोंधळते आणि तिला कबूल करावें लागते कीं, याची उपपत्ति मजजवळ नाहीं. स्वतःच्या पराभवाचा हा जो कबूलीजबाव यालाच माया असें म्हणतात. माया हा कांहीं वाद नव्हे; सिद्धांत नव्हे; पण वस्तुस्थि-तीचा स्वीकार आहे.

सर्वोच्च स्थितीवर असून जो स्वतःचें स्थान टिकवूं शकला नाहीं तो अशुद्ध, अनित्य, अज्ञानी आणि बद्ध झाल्यानंतर वर चढण्याची शक्ति कोठून आणणार ? होतें तें संभाळतां आलें नाहीं त्याला गेलेलें स्वतःच्या जोरावर परत कसें मिळवितां येणार ? तेव्हां जो समर्थ आहे त्यानेंच कृपाळू होऊन खालीं उतरून आपला हात धरून वर नेलें पाहिजे. येथें स्वतः चढण्याचें काम नसून समर्थानें वर ओढ-ण्याचें काम आहे. सर्वसमर्थ परमात्मा कारुण्यबुद्धीनें कृपाळू होऊन उद्धारार्थ खालीं उतरतो आणि हात देतो म्हणूनच आपण पतित झालेले पुनीत होऊं शकतो. ज्या ज्या विभूतीमध्यें उद्धारक शक्ति आपण पाहतों त्या त्या विभूतीमध्यें तारक प्रभु अवतरला आहे, उतरला आहे असें मानणेंच युक्तियुक्त आहे. हा अवतार अल्पप्रमाणानें असेल किंवा पूर्णांशानें असेल; अमुक काळापुरता असेल अथवा जीवनावधि असेल; पण तारक तत्त्व बाहेरून येऊन मनुष्यांत अवतरलें आहे खास, अशी जी जगदुद्धाराची कल्पना तिलाच अवतारवाद असें म्हणतात.

कुंभाराचें चाक एकदां फिरूं लागलें म्हणजे फिरत राहतें. पण

त्याची गति स्वयंभू नाहीं. मिळालेली गति पुष्कळ काळपर्यंत टिकविणें एवढेंच त्या चाकाचें सामर्थ्य. स्वभावाप्रमाणें जें चाक अत्यल्प प्रमाणानें कां होईना पण क्षणोक्षणीं थांबण्याचाच प्रयत्न करीत असतें. यासाठींच त्याची गति कायम राखण्यास कुंभाराला हातांत एक दांडकें घेऊन पुनः पुनः त्याला प्रेरणा द्यावी लागते. कुलालाची दंडव्रातप्रपातपरंपरा बाहेरून मिळते म्हणूनच चाक चालू राहतें. स्वभावजड समाजाचेंहि असेंच आहे. अवतारी पुरुषांच्या प्रतापाची परंपरा ईश्वरकृपेनें चालू आहे. प्रेरणेचा भाता चालू आहे म्हणूनच संस्कृतिरूपी अग्नि प्रज्ज्वलित राहिला आहे.

ही प्रेरणा बाहेरून येते कीं अंतस्फूर्त आहे ? मानवी आहे कीं अतिमानवी आहे ? याची चर्चा येथें करावयाची नाहीं. अवतारवाद म्हणतो, प्रेरणा निःसंशय बाह्य आहे, अतिमानवी आहे. मनुष्यप्राणी अशी प्रेरणा ग्रहण करूं शकतो, धारण करूं शकतो एवढीच त्याची थोरवी ! विरूद्ध पक्ष म्हणेल, उष्णता फार वाढली म्हणजे ती पेट घेते आणि प्रकाशाचें रूप धारण करते असें आपण नेहमीं पाहतों. उष्णतेमधूनच प्रकाश प्रगट होतो. उष्णता आणि प्रकाश यांमध्यें स्वरूपभेद आहे पण तत्वतः उष्णतेचें उत्कट रूप म्हणजेच प्रकाश याविषयीं आपण शंका करीत नाहीं. उष्णता फार वाढली तेव्हां आपल्या अवतारास योग्य आधार तयार झाला असें म्हणून कोठून तरी येऊन प्रकाश त्यांत घुसून बसत नाहीं. तो आंतूनच प्रदीप्त होतो. त्याचप्रमाणें मनुष्यजातीचा तारणहार (तारक) मनुष्यांतूनच उत्पन्न होतो आणि मनुष्यस्वभावाचाच तो बनलेला असतो.

ही चर्चा थोडीशी अधिक वाढविली म्हणजे दोन्ही पक्षांमध्यें मतभेद नाहीं, केवळ शब्दभेद आहे असें दिसून येईल. गांधी म्हणतात : ‘ जो पुरुष स्वतःच्या युगांत सर्वांहून श्रेष्ठ धर्मवान आहे त्याला भविष्यकालीन प्रजा अवताररूपानें पूजित असते. ज्याच्यामध्यें धर्म-

जागृति स्वतःच्या युगांत सर्वांहून अधिक आहे तो विशेष अवतार आहे.' अवताराच्या कल्पनेला असें दुहेरी रूप देऊन गांधींनीं वरील वादच मिटविला आहे. प्रत्येक पिढीमध्यें, प्रत्येक काळीं, समाजाला सावधान ठेवणारा असा कोणीतरी पुरुष असतोच. त्याचीच विभूति लोकांना असाधारण वाटली म्हणजे त्याच्या मागून येणारे लोक त्याला अवतार म्हणूं लागतात; आणि त्यानें दिलेल्या प्रेरणेला ईश्वरी प्रेरणा मानून श्रद्धा आणि आदरानें तिचा स्वीकार करितात.

कुराणांत देखील स्पष्ट म्हटलें आहे कीं, अल्लानें प्रत्येक देशाला आणि प्रत्येक जमान्याला एकेक पैगंबर दिला आहे. पैगंबरविहीन अशी भूमि नाहीं; पैगंबरविहीन असा समाज नाहीं; पैगंबरविहीन असा काळ नाहीं. याचा अर्थ असा झाला कीं, हरएक स्थळीं आणि हरएक काळीं कोणी ना कोणी तारक पुरुष हा असणारच. समाजांत त्याला ओळखण्याची शक्ति असली पाहिजे.

याच ठिकाणीं शास्त्रप्रामाण्याचा आपण थोडासा विचार करूं. तारक विभूतींच्या प्रेरणेचा श्रद्धादरानें एकदां स्वीकार झाला म्हणजे त्यांच्या वचनांचा संग्रह होणें अगदीं स्वाभाविक असतें. अशा रीतीनें प्रेरणा शब्दबद्ध होऊन ग्रंथाचें रूप धारण करिते आणि संतवचन म्हणजेच शास्त्र हा जो मूळ सिद्धांत होता तो विकृत होऊन शास्त्र-प्रामाण्याला ग्रंथप्रामाण्याचें रूप येतें. धर्माचें तत्त्व गूढ आहे; प्रसंगा-प्रमाणें त्याचा विनियोग बदलत असतो. धर्मज्ञ पुरुषानें परिस्थितीचें जिवंत निरीक्षण करून एका काळीं जो निर्णय दिलेला असतो तोच काळ आणि परिस्थिति बदलतांच गैरलागू ठरतो. शंकराचार्यांनींहि म्हटलें आहे कीं, 'यस्मिन् देशे काले निमित्ते च यो धर्मोऽनुष्ठीयते स एव देशकालनिमित्तान्तरेषु अधर्मो भवति।' (शांकर शारीरभाष्य—३.१,२५.) अशा स्थितींत व्याकरणशास्त्र, तर्कशास्त्र आणि मीमांसा-शास्त्र यांच्या जोरावर प्राचीन वचनांचा अर्थ करणें आणि मृतप्राय

ग्रंथांवर जिवंत समाजाचा जीवनक्रम व त्याचें भाग्य अवलंबून ठेवणें यांत अत्याचार व आत्मद्रोह आहे. 'शिष्टाः प्रमाणम्' हाच मार्ग खरा आहे. शिष्ट म्हणजे ज्यांची बुद्धि व हृदय शुद्ध आहे, ज्यांना समाज-हित कळतें आणि ज्यांचें हृदय समाजहिताकडेच वळतें अशी पवित्र व्यक्ति. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह इत्यादि व्रतें ज्यांना स्वाभाविक झालीं आहेत अशा ज्या विरळ व्यक्ती असतील त्यांनाच शिष्ट म्हणावयाचें. अशांनीं जो मार्ग घालून दिला असेल तेंच शास्त्र. भर्तृहरि तर याहून पुढें जाऊन म्हणतो कीं, सत्पुरुष सहजासहजीं जें सांगतात तें देखील शास्त्रच होय.

परिचरितव्याः सन्तः यद्यपि कथयन्ति ते न उपदेशम् ।
यास्तेषां स्वैरकथाः ता एव भवन्ति शास्त्राणि ॥

जुन्या शास्त्रवचनांचा अर्थ करावयाचा तो देखील अशा शिष्ट लोकांनींच केला पाहिजे. जीवनतत्त्वज्ञान केवळ पंडितांच्या तावडींत सांपडतां कामा नये.

भूमीचा भार हरण करण्यासाठीं युगे युगे अवतार येत असतात असें आपल्या पूर्वजांनीं सांगून ठेविलें आहे. या वचनाचा शाब्दिक अर्थ घेऊन पुष्कळांनीं स्वतःची अशी समजूत करून घेतली आहे कीं, ज्याप्रमाणें होडींत उतारूंची संख्या वाढली म्हणजे होडीला तो भार सहन न होऊन ती बुडते त्याप्रमाणें पृथ्वीवर लोकसंख्या वाढली म्हणजे पृथ्वीच्या पाठीला भार असह्य होतो. खरें पाहतां पृथ्वीवर व पृथ्वींत जें जड द्रव्य आहे तें अशा रीतीनें कमी अधिक होतच नसतें. मोहरीएवढ्या दाण्यांतून वडासारखें मोठें झाड जमि-नीवर उगवतें पण झाडाचा हा एवढा मोठा बोजा हवा, पाणी आणि माती यांतूनच तयार झालेला असतो. झाड वाढल्यानें जमिनीचा भार कसा वाढणार! घोड्यावर बसल्या बसल्या पडशींतील भाकरी जर स्वारानें खाल्ल्या तर पडशीचा भार कमी होईल आणि स्वाराच्या

पोटाचा – कोठ्याचा – भार वाढेल. पण घोड्याला त्याचें काय होय? घोड्याला सारखाच भार वहन करावा लागणार. पृथ्वीचेंहि असेंच आहे. पृथ्वीचा जो भार वाढतो तो भौतिक नसून नैतिक आहे. त्याचें निवारण करणें हें अवताराचें कार्य आहे. जेव्हां समाजांत अनाचार वाढतो; स्वार्थ, विद्रोह, कलह आणि नास्तिकता हीं माजतात तेव्हां पृथ्वीला तें ओझें असह्य होतें आणि पृथ्वी दीन होऊन आपल्या विधात्या पालनकर्त्याकडे गरीब गाय होऊन जाते. सर्वांतर्यामी परमात्मा दयाळू होऊन धर्मपरायण व्यक्तीमध्यें अवतरतो. शेगडी. हलवून आणि फुंकणी फुंकून शेगडींतील अग्नि प्रज्वलित करावा त्याप्रमाणें समाजाला हलवून, धर्म फुंकून, धर्माचें संस्करण करून अवतारी पुरुष सज्जनतेची, मनुष्यप्रेमाची व दैवी संपत्तीची पुनः स्थापना करितात. समाजांतील शहाणे पुरुष ही धर्मप्रेरणा ओळखून आस्तिकतेनें तिचा स्वीकार करतात.

अवताराचा उद्देश धर्मसंस्थापना हा आहे. धर्मसंस्थापना म्हणजे एखादें मत किंवा एखादा पंथ चालविणें हें नव्हे; पण लोकांमध्यें सत्य, दया, प्रेम, वासनासंयम, सर्वभूतहितेरतत्व इत्यादि शुभ मंगल तत्त्वांवरचा विश्वास जिवंत करणें हें होय. ज्यामध्यें सर्वांचें कल्याण आहे तो धर्म. सर्व प्रजांचें सार्वत्रिक आणि सनातन धारण करतो तो धर्म. हा धर्म विश्वव्यापी, सनातन आणि म्हणूनच नित्य नूतन असतो. जिवंत चलनवलनात्मक चैतन्ययुक्त शरीरावर मोहित होऊन चित्रकार त्याचें चित्र काढतो, मूर्तिकार त्याची मूर्ति बनवितो. ज्यांनीं जिवंत शरीर पाहिलें आहे, त्याच्याशीं सत्संग केला आहे त्यांना चित्र आणि मूर्ति पाहूनहि मूळ चैतन्याचें स्मरण होतें, आणि चैतन्यमयी प्रेरणा मिळते. पण ज्यांचा अनुभव चित्रांमूर्तीबाहेर नाहीं त्यांना तें एक बंधनच होऊन बसतें. चैतन्याची तहानभूक मूर्तीनें कशी भागावी? जिवंत मूर्ती उद्धार करितात. निष्प्राण मूर्ती

गळ्यांतला धोंडा होऊन बुडवितात.

अवतारी पुरुषांच्या नांवानें जे धर्म चालू आहेत ते खरो-खर त्यांचे धर्म नव्हेत. प्रेमाचा संदेश परगांवीं पोहोंचविणें झाल्यास प्रेमपत्र पाठवावें लागतें. प्रेमपत्र घेऊन जाणारा संदेशवाहक कांहीं प्रेमी नसतो. पत्रांतील कागद, शाई, शाईचा रंग, अक्षरांचें वळण, शब्द, भाषा, भाषेचे अलंकार आणि शैली यांपैकीं कांहींच प्रेम नव्हे. प्रेम अमूर्त आहे. पण या सर्व साधनांवांचून त्याचें वहन कसें होणार ! प्रेम समजणारा या सर्व साधनांचा उपयोग करूनहि त्यांच्या-वर निर्भर राहत नाहीं. प्रेम साधनांहून भिन्न आहे हें तो ओळ-खतो आणि म्हणून साधनांनाच सर्वस्व करून ठेवीत नाहीं. याच न्यायानें पैगंबरदेखील त्याच्या समाजांत रूढ असलेल्या कल्पना, रिवाज आणि सिद्धांत घेऊन त्यांमध्येंच आपला संदेश ओततात, आणि लोकांना वाढतात. जुन्यापैकीं जेवढें अगदीं वाईट आणि टाकाऊ अशी त्यांची खात्री झाली असेल तेवढ्याचाच ते विरोध कर-तात. जेवढें निभावून घेण्याजोगें असेल तेवढें निभावून घेण्याकडेच त्यांची वृत्ति असते. त्यांनीं जीं नवीन साधनें, नवीन रिवाज किंवा नवीन संस्था उत्पन्न केलेल्या असतात आणि ज्यांचेविषयीं त्यांनीं अत्यंत आदर आणि आग्रह वाढविलेला असतो त्या वस्तूंना देखील आपल्या संदेशाचे वाहक म्हणूनच त्यांनीं किंमत दिलेली असते. पण अविद्येनें घेरलेल्या मनुष्यजातीनें तत्त्वाशीं गांठ घालण्याचें सोडून तत्त्ववाहक अथवा तत्त्वसंग्राहक अशा बाह्य साधनांनाच महत्त्व दिलें आहे आणि त्यावरच रणें माजविलीं आहेत. उलटपक्षीं, कांहीं लोक तत्त्वाचें केवळ बौद्धिक ग्रहण करून संतोष मानतात. त्यांचा साधने-वर विश्वास नसल्यानें साधनमात्राची ते उपेक्षा करितात. धर्म हा तत्त्वांच्या केवळ ज्ञानासाठीं नसून जीवनपरिवर्तनासाठीं, आत्मशुद्धी-साठीं, आत्मसाक्षात्कारासाठीं असतो हें त्यांच्या लक्षांत नसतें.

-सामान्य जनसमुदाय देवाला सोडून देवळाची किंवा मशिदीची उपासना करितो; आणि कांहीं उत्साही पण अज्ञानी बंडखोर देवळें मोडून देवाला वांचवूं पहातात. खरी आवश्यकता ही आहे कीं, मनुष्यानें देवळाला देऊळ म्हणून आणि देवालाच देव म्हणून ओळखलें पाहिजे. असें झालें म्हणजे साधनाविषयीं साध्याइतकाच आग्रह राखूनहि ते साधन-पूजक होणार नाहींत. दरेक पैगंबर जें कांहीं देऊन जातो त्याचें शुद्धपणें सेवन व्हावयास त्याचें क्षणोंक्षणीं संस्करण झालें पाहिजे. ज्याचें नित्य संस्करण होतें त्याचा नाश करावा लागत नाहीं. नित्यसंस्करण हेंच जीवनाचें साधन किंवा व्याकरण आहे.

महम्मद पैगंबरापूर्वी अरबस्तानांत बाबा अब्राहमाचा धर्म चालत होता. त्या धर्मांत तरतऱ्हेचे दोष शिरले. त्यांपैकीं जे दोष महम्मदसाहेबाला असह्य वाटले त्यांचा त्यानें निकरानें विरोध केला. पण मक्केची यात्रा, काब्याचें चुंबन, तेथील स्नान, एकवस्त्री यात्रा वगैरे विधि निर्दोष पाहून त्यानें ते चालू ठेविले. बकरीदचा बळी हा देखील महम्मद पैगंबरानें चालूं केलेला नव्हे; पण त्याच्या मुळाशीं शिबिश्रियाळासारखी किंवा रुक्मांगदासारखी अलौकिक ईश्वरनिष्ठा पाहून त्यानें तो चालू ठेविला. मांसाहारी लोकांत बकरीदचा बळी सहजच शोभतो; पण हाच बकरीद्चा बळी हिंदुस्थानांत कलहाचें बीज होऊन बसला आहे. तटस्थपणें इस्लामचा अभ्यास करितां दिसून आलें आहे कीं, बकरीद्चा बळी हें कांहीं इस्लामचें आवश्यक अंग नव्हे. इस्लाम म्हणजे ईश्वराविषयीं अनन्य निष्ठा. इस्लामचा खरा आग्रह ईश्वराच्या अद्वैताविषयीं आहे. अनात्म्याला आत्मा मानणें, अनीश्वराला ईश्वर मानणें याची इस्लामला अत्यंत चीड आहे. प्रत्येक धर्मनिष्ठ साधकाला आणि भक्ताला ती असतेच. जे विलासनिष्ठ आहेत, धनलोलुप आहेत, जानमालपरस्त आहेत, किताबपरस्त आहेत,

ते खरे भक्त नव्हेत, खरे मुसलमान नव्हेत. आजकालचे मुसलमान इतर लोकांचें अनुकरण करून ताबूत काढतात, मसजिदपरस्तीच्या दोषांत येतात हा भाग निराळा. खरा इस्लाम म्हणजे ईश्वरनिष्ठा, गरीबांविषयीं दया, ईश्वरप्रार्थना, आणि धर्मसेवा हा आहे. दरेक धर्माविषयीं असेंच सांगतां येईल. एका गुजराथी निरक्षर भक्तानें म्हटलें आहे:—

भाला भोला ठाकुर हारू, बाझी का मरो ।

# ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय।

मनुष्यसमाजाच्या धार्मिक उपासनेची आधुनिक, शास्त्रशुद्ध आणि अत्यंत उन्नत अशी पायरी वरील मंत्रामध्यें व्यक्त होते. नारायण म्हणजे मनुष्यसमाजाच्या हृदयीं वास करणारें अंतर्यामी परमात्मतत्त्व. नर म्हणजे मनुष्य. यांत स्त्रीपुरुषादि सर्व आले. या सर्वांचा त्रिकालव्यापी समूह अथवा समाज याला नार असें म्हणतात. नार म्हणजे मनुष्य-कोटी, मानव्य. मागें होऊन गेलेले, आज असलेले व पुढें होणारे सर्व मनुष्यप्राणी ज्याच्यामध्यें अंतर्भूत होतात अशी सनातन म्हणजे नित्य नुष्यजाति हें नार ज्याचें अयन म्हणजे आश्रयस्थान झालें तो मनुष्य-हृदयांत अखंड व्यक्त होणारा परमात्मा नारायण या नांवानें ओळखला जातो. या विश्वामध्यें जें कांहीं जडत्व भासतें तें नश्वर आहे, निःसार आहे. साररूप, सनातन, शुद्ध आणि नित्य आणि म्हणूनच अन्वेष्टव्य, मृग्य आणि प्राप्य असें जें नारायणतत्त्व त्यालाच जीवनाचें ध्येय करावें, त्याच्यासाठींच आणि त्यांतच जगावें अशी दृढ निष्ठा ठेवणारा बलवान युवान भक्त सत्याग्रही प्रल्हाद हा नारायणाचा उपासक असल्यानें नारायण या नांवाबरोबर सत्याची वीर्ययुक्त अनन्य उपासनाहि ध्यानांत येते. प्रत्येक नरानें म्हणजे स्त्री-पुरुषानें जीवन-नेच्या द्वारां अंतीं नारायणरूप व्हावयाचें आहे असें प्राचीन व अर्वाचीन महात्मे सांगत आले आहेत. नारायणाचें ध्यान करणें म्हणजे नरजन्माचें अंतिम उद्दिष्ट अथवा ध्येय अखंड लक्षांत बाळगणें. नराचा अंतिम आणि अनंत विकास तेंच हें नारायणतत्त्व ही स्थिति आज आपल्याला प्राप्त झालेली नाहीं. पण शक्य त्या उपायांनीं, शक्य तितक्या त्वरेनें ही स्थिति प्राप्त करून घ्यावयाची आहे, याची स्मृति आणि साधना ‘ नमः ’ शब्दानें व्यक्त होते. नदी

ज्याप्रमाणें सागराकडे वाहते त्याप्रमाणें अपूर्णानें पूर्णाकडे वाहणें यालाच ' नमस्कार ' म्हणतात.

पुरुष म्हणजे नवद्वाराच्या या पुरांत अर्थात् देहांत शयन करणारा, राहणारा, वास करणारा आत्मा, साधनाक्षम असा जीव. स्त्री आणि पुमान् दोहोंचा यांत समावेश होतो. (ज्याप्रमाणें दिवस या शब्दांत दिवस आणि रात्र या दोहोंचा समावेश होऊं शकतो अथवा पितर या शब्दांत पिता व माता या दोहोंचा समावेश होतो त्याचप्रमाणें 'पुरुष' शब्दांत पुरुष आणि स्त्री या उभयांचा समावेश होतो. ) हा पुरुष व्यक्तिरूपानें एका देहांत राहतो;हाच समाजरूपानें त्रिकालव्यापी समुदायांत असतो; आणि विराटरूपानें सर्व विश्वांत असतो. व्यक्तीमध्यें ज्याप्रमाणें आपण याला ' पुरुष ' रूपानें ( personality म्हणून ) ओळखतो त्याप्रमाणें सर्व विश्वांत सूर्यचंद्रादि ग्रह व नक्षत्र-तारा यांच्या समुदायांत देखील पुरुषरूपानेंच पाहिलें पाहिजे. मनुष्यसमाजाचा विचार करितांना देखील समष्टिरूपानें तो एक पुरुष आहे हें आपण ओळखलें पाहिजे.

' पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।' विविधवर्णात्मक मनुष्यसमाज हाहि अविकल पुरुषच होय. या पुरुषाच्या क्षर आणि अक्षर अशा दोन बाजू आहेत. भूतरूपानें पाहतां हा क्षर आहेसा दिसतो. त्यांतील कूटस्थ तत्त्वांचा विचार करितां तो अक्षर आहे असें उमगतें. या क्षराक्षराची सर्व साधना ज्या आदर्शाला सिद्ध करूं पहात आहे त्या पुरुषतत्त्वाला ' पुरुषोत्तम ' असें नांव आहे. आजचा मनुष्य अपूर्ण आहे, असम आहे आणि सदोष आहे. आजचें विश्व अपूर्ण आहे, असम आहे आणि सदोष आहे. याला पूर्ण, सम आणि निर्दोष अर्थात् भूमा आणि बृहत् व्हावयाचें आहे म्हणजे पुरुषोत्तम व्हावयाचें आहे. विराट पुरुषाचा हा जो अंतिम आदर्श तोच पुरुषोत्तम. आत्मौपम्याच्याद्वारां विश्वात्मैक्याचा साक्षात्कार केला तरच हें पुरुषोत्तम पद प्राप्त होणार. म्हणून विश्वात्मैक्य हाच पुरुषाचा ' पुरुषार्थ. ' मोक्ष हें

विश्वात्मैक्याचें केवळ प्राथमिक साधन आहे. धर्म–अर्थ–काम हे पुरुषाला ज्या मानानें मोक्षाकडे घेऊन जाणार त्या मानानें त्यांनाहि उपलक्षणेनें पुरुषार्थ म्हणावयास हरकत नाहीं. पुरुषोत्तमप्राप्तीसाठीं पुरुषानें जी साधना करावयाची, जो पुरुषार्थ करावयाचा, जो निरलस अखंड आणि वर्धमान पराक्रम करावयाचा तो ' नमः ' या शब्दानें व्यक्त केला आहे.

या सर्वांचें आद्य कारण अथवा मूळ आधार अशी आस्तिक्यरूपी जी श्रद्धा तिलाच ' ॐ ' असें नांव आहे. ' ॐ ' म्हणजे होय. जेथें नकाराला, निषेधाला, अभावाला, अश्रद्धेला, तिळमात्र स्थान नाहीं त्या पदवीला, त्या वृत्तीला, त्या श्रद्धेला ' ॐ ' असें म्हणतात. ॐ ही अजरामर आणि अखंड अशी आस्तिकता आहे. माझें जीवन सत्यरूप आहे, त्याचा अंतिम आदर्श सत्यरूप आहे, त्या आदर्शाला पोहोंचणें शक्य आहे; या पोहोंचण्याची यात्रा अथवा साधना कृतार्थ होण्याला समर्थ आहे असा जो दृढ विश्वास तोच हा ॐकार होय. सच्चिदानंदरूपी प्रभूहून तो भिन्न नाहीं. म्हणून त्याच्या स्मरणपूर्वकच सर्व ध्यान चालावयाचें असतें. आणि ध्यानपूर्वकच सर्व साधना म्हणजे पराक्रम व्हावयाचा असतो. आणि ही साधना जसजशी सिद्ध होत जाईल, ध्येयाचा जसजसा साक्षात्कार होत जाईल तसतसा प्राप्तीचा आनंदहि या मंत्रानेंच व्यक्त व्हावयाचा असतो. हा सर्व हेतु मनांत धरूनच या मंत्राचा सरहस्य जप सांगितला आहे.

# गौरक्षा

अहिंसा म्हणजे ज्यांना सुखदुःख आहे अशा सर्व सचेतन सत्वांविषयीं क्रूरपणाचा अभाव. प्राणिमात्रांस अभयदान देणें, त्यांच्या घातास प्रवृत्त न होणें ही व्यापक अहिंसा आहे.

( १ )

एवढ्या उच्च कोटीपर्यंत मनुष्याची धर्मबुद्धि अजून पोहोंचली नाहीं. मनुष्यहृदय इतकें उन्नत झालें नाहीं. तेव्हां सबंध मनुष्यकोटीकडून आजच्या स्थितींत अधिकाधिक अपेक्षा करावयाची ती इतकीच कीं माणसामाणसांमधील वैर टळावें, कोणीं कोणाचा घातपात करूं नये, एवढेंच नव्हे तर कोणीं कोणास नाडूं नये, कोणीं कोणाचा अन्याय करूं नये.

कोणीं अन्याय केला, नाश केला अथवा वैर केलें तर त्याचें शासन किंवा प्रतिशोधन म्हणूनहि कोणीं कोणास मारूं नये, कोणाचा नाश करूं नये. कारण हिंसेनें हिंसा वाढते, कमी होत नाहीं. उलट, क्षमावृत्तीनें सहन करण्यानें आणि प्रसंगीं सत्याग्रही सविनय विरोध करण्यानें मनुष्य हृदयांतील सज्जनता वाढते.

धर्मपालन म्हणून, क्षिक्षणाचा एक प्रकार म्हणून आणि युद्धाची एक नवीन पद्धति म्हणून माणसामाणसांमध्यें अहिंसेचेंच जर अवलंबन झालें तरी आजचें युग कृतार्थ झाल्यासारखें होईल.

( २ )

याच्या पुढील पाऊल म्हणजे आपल्या लहानग्या भावंडांसारखी जी प्राणिसृष्टि परमेश्वरानें मनुष्याच्या ताब्यांत सोपविली आहे तिच्याशीं धर्मानें वागणें हें होय. ज्या प्राण्यांपासून मनुष्यास लाभहानी कांहींच नाहीं त्यांच्याविषयीं तर तो उदासीनच असणार. केवळ

दुष्ट बुद्धीनें अथवा चैनीखातर तो त्यांचा संहार करण्यास कधीं कधीं प्रवृत्त होतो खरा; पण असा संहार थोड्याशा प्रयत्नानें थांबवितां येण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें मनुष्याचा हातून क्वचित् न कळत होणारा अनावश्यक संहारहि थांबविणें फारसें अवघड नाहीं.

पण जे प्राणी मनुष्याच्या प्रत्यक्ष नाशास अथवा दुःखास कारणीभूत होतात त्यांचा संहार किंवा निरोध करणें योग्य आहे, आवश्यक आहे आणि स्वाभाविक आहे असें मनुष्यास इतक्या उत्कटतेनें वाटतें कीं, त्याच्या या वृत्तीचा निरोध करणें निदान आज तरी फार मुष्किल आहे.

केवळ यंत्राच्या साहाय्यानें पाहतां येण्यासारखे अथवा ज्यांच्या अस्तित्वाची माहिती जन्तुविद्याविशारदांच्या सांगण्यावरूनच आपणांस होते अशा रोगाच्या जन्तूंसारख्या सूक्ष्मातिसूक्ष्म जीवांच्या जीवनमरणाविषयीं, विकासविनाशाविषयीं अथवा सुखदुःखाविषयीं मनुष्यहृदय जागृत नसतें. या जीवांविषयीं अमुक मानवधर्म आहे असा प्रचार करणें कठिण आहे.

( ३ )

आतां राहिले असे जीव कीं ज्यांचा मनुष्यजीवनाशीं संबंध नेहमीं येतो. यांपैकीं ज्यांना पकडून मनुष्य स्वतःचे आश्रित करीत नाहीं अथवा ज्यांची सेवा घेत नाहीं, त्यांचें रक्षण किंवा पालन करण्याचा धर्म त्याच्यावर येऊं शकत नाहीं. त्यांचें जीवन प्रकृतीच्या नियमांना अनुसरूनच व्यतीत होणार. मुंग्या, डोंगळे, जंगली खबुतरें व रानांतील सर्व पशुपक्षी व पाण्यांतील मासे वगैरेंचें पालन पोषण करणें अथवा प्रयत्नपूर्वक रक्षण करणें हें कांहीं मनुष्याचें धर्मप्राप्त कर्तव्य नाहीं. असें करणें ही एक प्रकारची हौस आहे; विनोद आहे अथवा दयाधर्माचा अंध अतिरेक आहे.

पण आज ज्या प्राण्यांचा मनुष्याच्या आहारासाठीं वध होतो तो

थांबवितां आल्यास फार उत्तम. पण याला मार्ग एकच : मनुष्य हृदयाला जागृत करणें. अन्य मार्ग नाहीं. जेथें भक्ष्य–भक्षक भाव ठरून गेला आहे तेथें दयाबुद्धि उत्पन्न करणें फारच कठिण. अशा ठिकाणीं वधासाठीं पशुपक्षी किंवा मासे पाळण्यांत येतात. हें त्यांच्या शिकारीपेक्षांहि जास्त गर्ह्य आहे. ज्यांचें पालन आपण करितो त्यांचाच वध करणें व ज्यांना खाऊं घालतों त्यांनाच खाऊन टाकणें यांत त्या जीवांची हिंसा आहेच पण त्याहून भयानक अशी मनुष्यहृदयाची हिंसा आहे.

अशा स्थितींत वधासाठीं ज्यांचें पालनपोषण आपण करितों त्यांचा वध करणें जितकें अनिष्ट आहे तितकेंच त्यांचा वंशविस्तार होऊं देणेंहि अनिष्ट आहे. वधाच्या हेतूनें पाळण्यांत येणाऱ्या प्राण्यांचा वंशविस्तार वंद करणें अगर मर्यादित करणें ही अहिंसेची एक पायरीच आहे

ज्या प्राण्यांना पाळून आपण आपले कायमचे आश्रित केले आहे त्यांच्या वंशविस्ताराचें सर्व पाप आपल्या डोक्यावरच आहे. ज्यावेळीं आपणांस त्यांचा उपयोग राहिला नाहीं अशी स्थिति येईल त्यावेळीं त्यांना जंगलांत नेऊन सोडून देणें व पुनः वन्य करणें हा एक मार्ग आहे. दुसरा मार्ग म्हणजे त्यांचा वंश वाढूं न देणें हा होय. अनावश्यक प्राण्यांच्या पालनाचा भार उचलणें मनुष्याच्या शक्तीच्या बाहेरचें आहे.

( ४ )

ज्या प्राण्यांपासून आपणांस दूध वगैरे आहार मिळतो अथवा ज्यांची श्रमरूपी सेवा आपण घेतों ते आपले कुटुंबी होतात. त्यांचा वध करणें अथवा होऊं देणें अत्यन्त निंद्य आहे. गाय, बैल, म्हैस, रेडा, हत्ती, घोडा, उंट, गाढव, खेचर वगैरे प्राणी आश्रित दशेंत असतील तोपर्यंत त्यांना मनुष्याकडून अभयदान मिळालें पाहिजे.

आणि हे अभयदान तरच देतां येईल कीं जर त्या त्या प्राण्याचें पालनपोषण मनुष्यास लाभकारक होईल. निदान नुकसानीची बाब तरी होऊं नये.

वरील प्राण्यांपैकीं हत्ती, घोडा व उंट यांचा प्रश्न आपल्या देशांत महत्त्वाचा नाहीं. त्यांचें जीवन कांहीं संशयांत पडलेलें नाहीं. गाढवासाठीं मनुष्य फारसा खर्च करीतच नाहीं. त्याची सेवा तो जवळ जवळ फुकटच उपटतो. म्हणजे त्याचाहि प्रश्न वादाचा नाहीं.

आतां प्रश्न राहिला तो गाय–बैल व म्हैस–रेडे या दोन जातींचा. यांपैकीं गाय-बैलांची, ते जिवंत असेतोंपर्यंत, आपल्याला अमर्याद सेवा मिळते. त्यामुळें त्यांच्या पालनपोषणाची व ते म्हातारे झाल्यावर त्यांच्या संगोपनाची जबाबदारी आपल्यावर राहते. त्यांतून बैलाची सेवा अखंडपणें आपणांस मिळत असल्यानें त्याची उपयोगिता स्वयंसिद्ध आहे. म्हणून त्याचा वध सहसा कोणीं करूं नये. गाईची उपयोगिता तिच्या दुधाच्या मानानें कमीजास्त होते व म्हणूनच तिचें जीवन संकटांत सांपडलें आहे. बैलाप्रमाणेंच जर गाईकडून सर्वकाळ लाभ होऊं लागला तर तिच्या वधासहि कोणी सहसा प्रवृत्त होणार नाहीं.

गाईवर दुसरें एक संकट ओढवलें आहे. तिला एक जबरदस्त प्रतिस्पर्धी म्हणून म्हैस उत्पन्न झाली आहे. म्हशीच्या अवलादीचें पालनपोषण व वृद्धावस्थेंत संगोपन मनुष्यधर्माला ओळखून जर आपण करूं गेलों तर म्हैस आपणांस कधींहि फायद्यांत पडणार नाहीं. गाईपेक्षां म्हशीला दूध जास्त, तिच्या दुधांत चरबीचें प्रमाण अधिक आणि म्हशीची संगोपना जास्त सोपी; त्यामुळें ती गाईचें स्थान हिरावून घेत आहे. पण असें करण्यांत माणुसकी विसरून जाऊन लहान अगर मोठ्या रेड्यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें वध केल्यानेंच म्हशीचें दूध स्वस्त पडतें ही गोष्ट

आपण विसरतां कामा नये. रेडा जातीचा श्रमसहिष्णु नाहीं व बुद्धिवानहि नाहीं. ओलसर व दमट हवेंत तो थोडेंबहुत काम करूं शकतो एवढेंच. साधारणतः तो मेहनत बिलकुल करूं शकत नाहीं. त्याच्या आहाराच्या मानानें त्याची उपयोगिता फार कमी व फार श्रम पडल्यास तो मरून जातो. म्हणजे रेड्याचें निरर्थक ओझें स्वीकारल्यास म्हशीचें दूध फारच महाग पडेल. वैद्यकीय दृष्टया म्हशीचें दूध गाईच्या दुधाइतकें पथ्यकर नाहीं ही गोष्टहि विचारणीय आहे. तेव्हां म्हैस मनुष्याच्या सेवेंत सापडून स्वतःच्या वंशावर व गाईच्याहि जिवावर उठली आहे. मनुष्यानें म्हशीला पाळावयासच नको होतें. जंगलांतच तिचें काय व्हावयाचें तें झालें असतें. आजहि आपला धर्म असेंच सांगतो कीं, म्हशीची सेवा व त्यामुळें उत्पन्न होणारी जबाबदारी हीं दोन्हीं सोडा; आणि केवळ गाईबैलांच्या सेवेंतच धर्मपालन होऊं शकते म्हणून त्यांतच संतोष माना.

म्हशीची अधर्म्य प्रतिस्पर्धा बंद करण्याचे मार्ग अनेक आहेत. पण त्या सर्वांच्या मुळांत रामबाण उपाय हा आहे कीं, आपण म्हशीच्या दुधाचा व त्यापासून होणाऱ्या सर्व पदार्थांचा त्याग करावा. म्हैस अगर रेड्याची सेवा घ्यावयाची नाहीं असें एकदां नक्की केलें म्हणजे म्हैस स्वस्त पडो अगर महाग पडो, तिचें दूध जास्त पौष्टिक व विपुल असो किंवा नसो, त्याच्याशीं आपल्याला कांहींच कर्तव्य नाहीं. गाईबरोबर असलेला आपला ऋणानुबंध आहे तोच कायम राहील.

गाईला आणि तिच्या वंशाला एवढें अभयदान दिल्यानंतर तिच्या दुधाचें प्रमाण कसें वाढेल व तें सकस कसें होईल याची काळजी आपणांस आपोआपच घ्यावी लागणार. याचें शास्त्र आज पुष्कळ वाढलेलें आहे. त्याचा आपण पुरता उपयोग करून घेतला पाहिजे.

दुसरें असें कीं, गाईच्या बाबतींत आजवर आपण जो अन्याय

केला आहे तो स्मरून आदर्श गोपालनापासून होणारा सर्व नफा गाईच्या आणि तिच्या वंशाच्या रक्षणार्थ वापरावा. ज्याप्रमाणें खादी-कार्याची शेवटची भिस्त संन्यस्तवृत्तीनें राहणाऱ्या परोपकारी, त्यागी व निर्लोभ अशा समाजसेवकांवर आहे त्याप्रमाणेंच गौरक्षेचा आधारहि संन्यस्त वृत्तीच्या गोभक्त समाजसेवक स्त्रीपुरुषांवरच असणार. माणसाचें ओझें गाईवर पडणार नाहीं व गाईचें ओझें माणसावर पडणार नाहीं अशी स्थिति आणण्याचे सर्व प्रयत्न व्हावयास पाहिजेत. गाईचें दुभतें लोकांना शक्य तितके स्वस्त मिळालें व गाईची उपयोगिता आणि किंमत तितकी वाढली तरच गाय निर्भय होईल. आज गाय पोसण्यापेक्षां मारणें फायद्याचें होतें ही किती लाजिरवाणी स्थिति आहे बरें! ही स्थिति बदललीच पाहिजे, व गाईसारख्या मूल्यवान प्राण्यास मारण्यांत आर्थिक नुकसानच आहे असे जगाला वाटलें पाहिजे.

गाईची अवलाद सुधारण्याचे प्रयत्न करावयास पाहिजेत. वासरें देण्याची तिची शक्ति शेवटपर्यंत टिकविण्याचे उपाय शोधून काढा-वयास पाहिजेत. गाईचें दूध न देण्याचे दिवस शक्य तितके कमी होतील असें केलें पाहिजे. भाकड होईतोंपर्यंत तिचें दूध फारसें आटणार नाहीं याबद्दल काळजी घ्यावयास पाहिजे. आणि जे थोडे दिवस गाय दूध देत नाहीं त्या दिवसांत तिचें पोषण चांगलें व्हावें व खर्च कमी यावा याचीहि काळजी घ्यावयास पाहिजे.

गाईच्या दुधाखेरीज तिचें शेण व मूत ही अत्यन्त उपयोगी पैदास आहे. आपण हिंदु लोक गोमय व गोमूत्र यांस फार पवित्र मानतो, पण त्यांच्या उपयोगितेची आपणांस पुरती जाणीव नाहीं. गोमूत्राचा खत म्हणून आपण पुरता उपयोग करीत नाहीं. शेण वाळवून तें आपण जाळून टाकतों, किंवा सारविण्याच्या कामीं वापरतों.

हा शेणाचा दुरुपयोग असून शेतीचा द्रोह आहे. खताकरितां शेण सांठविण्याची कला आपण शिकून घेतली पाहिजे.

( शेणानें सारवलेल्या जागेस आपण पवित्र मानतों तर धर्मचुस्त मुसलमान ती अपवित्र मानतो. शेणानें सारवलेल्या जागेवर मुसलमान कधींहि नमाज पढणार नाहीं. शुद्ध मातीनें सारवलेली जमीन दोघांनाहि सारखीच पवित्र आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. )

गाईचें स्वाभाविक मरण झाल्यानंतरहि तिच्या पाळणाऱ्याला तिचा जास्त उपयोग करून घेतां आला पाहिजे. गाईचा वध करणें हें पाप आहे. पण स्वाभाविक मरणानें मेलेल्या गाईचें कातडें, तिचीं खुरें, शिंगें, हाडें व आंतडीं आणि मांस या सर्वांचा कांहीं तरी उपयोग आपल्याला करितां आला पाहिजे. मेलेल्या जनावराचें मांस कधींहि खाण्यांत येतां कामा नये. कारण तें शारिरिक व मानसिक आरोग्याचा नाश करतें. त्यामुळें जुगुप्सा उत्पन्न होते. त्यांत अनेक जन्तू उत्पन्न झालेले असतात व तें अनेक रोगांचें माहेरघर होऊन बसतें.

स्वाभाविक मरणानें मेलेल्या गाईचें मांस जमीनींत पुरून त्याचा उत्तम खतादाखल उपयोग करितां येतो. शिंगें व खुरांपासून सरस काढतां येईल. शिंगांचा दुसराहि पुष्कळ उपयोग आहे. सरस काढून घेतल्यानंतर जो चोथा राहतो त्यांपासून उत्तम ब्रश बनतात. स्वाभाविक मरणानें मेलेल्या गाईचें कांतडें अत्यन्त पवित्र मानून तेंच वापरण्याचा आग्रह धरला पाहिजे. गाईच्या हाडांचा व कातड्यांचा व्यापार आज गोभक्षकांच्या ताब्यांत असल्यामुळें गाईची कत्तल वाढत आहे. हा व्यापार गोसेवकांच्या हातीं आल्यास ती तितकीच कमी होईल व या व्यापारांत होणारा मोठा नफा गोसेवेंतच वापरतां येईल. ' हत्याचर्म ' कमा-

वर्णे सोपें आहे. 'मृतिचर्म' कमावण्यास विशेष कला अवगत असली पाहिजे. गोसेवकांनीं ती कला शिकून वाढविली पाहिजे. खऱ्या गोसेवकांनीं 'मृतिचर्म' च वापरण्याचें व्रत घेतलें पाहिजे.

आणि अशा रीतीनें हृदयबळ, बुद्धिबळ, विज्ञानबळ, द्रव्यबळ, व्यापारबळ आणि संघबळाच्या योगानें धर्मनिष्ठ मनुष्यानें मनुष्यकुटुंबांत दाखल झालेल्या असहाय अशा प्राण्याचें – गाईचें व तिच्या वंशाचें– रक्षण व पालन केलें पाहिजे.

हा धर्म केवळ हिंदूंचाच नाहीं, पण ज्यांना तो पटेल अशा प्रत्येक मनुष्याचा आहे. यांत अहिंसाधर्माचा व मनुष्यहृदयाचा विकास आहे व त्यामुळें याला ईश्वराचा आशीर्वादच आहे.

ज्यांना हा धर्म पटला, त्यांनीं त्यासाठीं पुरती तपस्या केल्यास त्या तपस्येच्या प्रभावानें या गौरक्षाधर्माचा सर्वत्र प्रसार होईल असा अध्यात्मशास्त्राचा कौल ( अभिवचन ) आहे.[१]

४००४
REFBK-0005004

१ गोरक्षा या प्रकरणाचा क्रम औद्योगिक शिक्षण या प्रकरणानंतर असावयास पाहिजे; परंतु तें प्रकरण वेळेवर हातीं येऊं न शकल्यामुळें शेवटीं दिलें आहे.
प्रकाशक.